# आत्मचरित्र - माझ्या आठवणी

लेखक -
स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



# आत्मचरित्र - माझ्या आठवणी

लेखक: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**

**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प संचालक : रणजित विक्रम सावरकर

www.savarkarsmarak.com

### आत्मचरित्र

# माझ्या आठवणी

## भाग १ : भगूर

"माझ्या आठवणी" लिहिताना प्रथमच हे सांगणे अवश्य आहे की, मला माझा जन्म झाल्याची मुळीच आठवण नाही.

काही स्पष्टपणे स्मरणाऱ्या आठवणी सांगताना ज्या मुळीच आठवत नाहीत त्या आठवणी केव्हाकेव्हा गृहीत घ्याव्या लागतात. म्हणून आम्ही गेल्या प्रास्ताविक भागात जे म्हटले, त्याचे ही अगदी पहिलीच आठवण हे उत्कृष्ट उदाहरण आहे. आपला जन्म होताना तो प्रत्यक्ष पाहिलेलं बहुधा कोणासही आठवत नाही; आणि तरीही, केवळ आप्तवाक्यावर विश्वास ठेवून ती गोष्ट गृहीत धरल्याविना आत्मचरित्राचे एक पाऊल देखील पुढे पडणे अशक्य असते. केवळ प्रत्यक्ष हेच प्रमाण मानणे, जे अगदी दुर्घट होते आणि आप्तवाक्य हे केव्हाकेव्हा प्रत्यक्षाहूनही, निदान प्रत्यक्षाइतके तरी, बलवत्तर प्रमाण जे मानावे लागते ते असे! आपला जन्म केव्हा तरी झाला ह्यास आप्तवाक्यावाचून काय प्रमाण आहे? तीच स्थिती आईबापांची. माझी ही जननी आणि हे जनक, या भावनेस, प्रमाण केवळ आप्तवाक्य. खरोखर, आपल्या जीवनात प्रत्यक्षावरच आपण अवलंबू लागलो, तर जीवन जवळजवळ असंभव होईल. दात नव्हते तेव्हा, आईच्या दुधाची धार ही जितकी जीवनास आत्यंतिक आधार होती, तितकाच, प्रत्यक्षाचा जाणता प्रादुर्भाव होण्याच्या आधी तरी, आप्तवाक्य हाच जीवनाचा अपरिहार्य आधार होता. पालापाणी, आगनाग इत्यादी सर्व वस्तूंचे हिताहितप्रभृति गुणधर्म आप्तवाक्य जर शिकवणार नाही, तर परिस्थिति ही त्या प्रत्यक्षाच्या पांगुळगाड्यासच धरून चालणाऱ्यांस आपल्या बाष्परुळाखाली तत्काळ चिरडून टाकती.

असे सांगतात की, माझा जन्म मे २८ सन १८८३ सोमवार ह्या दिवशी नाशिक तालुक्यातील भगूर ह्या गावी आमच्या कुटुंबाच्या 'जुन्या घरात' झाला. पुढे आमच्या चुलत्यांनी आणि वडिलांनी एक नवे टुमदार घर बांधले. तेव्हापासून, या वडिलोपार्जित घरास, 'जुने घर' म्हणू लागले. माझ्या जन्माचे टिपण, पुढे जेव्हा प्रथम प्लेगाच्या आणि नंतर राज्यकर्त्यांच्या कहरात आमच्या कुटुंबाच्या घरदाराची आणि कागदपत्रांची वाताहात झाली, तेव्हा बहुधा नाहीसेच झाले होते. पहिल्यापासूनच ग्रहावग्रहांच्या स्तोमाची मला फारशी भीडभाड वाटत नसल्यामुळे मी माझ्या जन्मकुंडलीची वास्तपुस्त आजपर्यंतही केलेली नव्हती. पण माझे ज्येष्ठ बंधु बाबाराव यांना फल-ज्योतिषाचा छंद पूर्वीपासूनच असल्यामुळे त्यांनी माझे जन्मटिपण आणि जन्मकुंडली कुठूनशी पुन्हा हुडकून काढली आहे. त्यांच्याकडून ती आणून इथे दिली पाहिजे. माझ्या आईचे नाव राधाबाई आणि वडिलांचे नाव दामोदरपंत अर्थात् अण्णाराव हे होते. आमच्या तिघा बंधूंच्या जन्मकुंडल्या उपलब्ध आहेत तशा खाली दिल्या आहेत.

आम्हां तिघा बंधूंची जन्मतिथि व तारीख खालीलप्रमाणे आहे.

*गणेश दामोदर सावरकर,*
*जन्म शके १८०१, ज्येष्ठ*
*कृष्ण ९, सूर्योदयात् घटी ४७*
*पळें ३६. दि. जून १३,*
*सन १८७९.*

*विनायक दामोदर सावरकर,*
*जन्म शके १८०५, वैशाख*
*कृष्ण ६, सूर्योदयात् घटी ३९*
*पळें ५५. मे २८, सन १८८३.*

*नारायण दामोदर सावरकर,*
*जन्म शके १८१०, वैशाख*
*शुद्ध १५, सूर्योदयात् घटी २५*
*पळें ३५, मे २५, सन १८८८*

पूर्वी पेशवाईच्या काळात धोपावकर आणि सावरकर अशी दोन कुटुंबे आपला भाग्योदय करण्यासाठी कोकणातील चिपळूण तालुक्यातून गुहागर पेट्यातून देशावर गेली आणि भगूरजवळील राहुरी हे गाव पेशव्यांकडून त्यांस अनाम मिळाले अशी आख्यायिका आहे.

ते गाव आणि भगूरची काही इनामे, आमच्या काळापर्यंत, आमच्या घराण्यात अव्याहत चालत असत. मी लहान असता, त्या राहुरी गावात कित्येक वेळा, आमच्या जहागिरदारांचा मुलगा म्हणून, तेथील भाविक स्त्री-पुरुषांकडून कुरवाळला गेल्याचे समजते. इतकेच नव्हे, तर तेथील आमच्या आंबराईत उभे असता किंवा त्या राहुरी गावातील बहुधा मारुतीच्या देवळापाशी असलेल्या कोणा ओढ्याचे स्वच्छ पाणी पिताना माझ्याभोवती प्रेमाने आणि आदराने गोळा झालेल्या गावकऱ्यात जहागिरदाराच्या मुलास साजेल अशा चिमुकल्या ऐटीने आणि ममताळू ऐश्वर्याने उभे राहण्याचा आणि वागण्याचा जाणीवपूर्वक यत्न केल्याचीही लहानपणची पुसट आठवण मला होते. असेही पुसट आठवते की, आमच्या आंबराईतील आंब्याच्या गाड्या घेऊन कुणबी लोक उन्हात घरी आले असता त्यांच्या श्रमांची मला दया यावी आणि मी त्यांस ममतेने ओसरीवर बैठकीवर बसावयाचा आग्रह करावा, त्यांस थंड पाणी द्यावे आणि विसावा घ्या म्हणावे. ते म्हणाले की, “अहो, छोटे जहागिरदार, पण आम्हांस बापूसाहेब (आमचे काका) रागावतील ते!” म्हणजे मी पोरसवदा गांभीर्याने त्यांना आश्वासावे, “माझे नाव सांगा. मी तुम्हास बैठकीवर बसविले. मग बापू कसे रागावतील!” थोडया वेळाने बापू आले म्हणजे ते म्हणत, “बापूसाहेब, आमच्या छोट्या जहागिरदारांच्या वशिल्याने बसलो आहोत इथे आम्ही. किती ममताळू आहे हो तुमचे मूल!” ते ऐकून बापूही हसत आणि म्हणत, “आमच्या बाळ्याचा वशिला का? मग काय आमची माय व्याली आहे तुम्हांस उठा म्हणायची, बसा, बसा.”

आमच्या कुळाला सावरकर हे नाव कसे पडले याविषयी काही निश्चयाने सांगता येत नाही. ज्या गुहागराकडून हे कुटुंब आले, तिकडेही सावरकर हे उपनावच चालू आहे. अर्थात् कोकणात असतानाही हेच उपनाव होते. त्या बाजूस गुहागरपासून सहा मैलांवर पालशेत नावाचा एक पाट नि बंधारा आहे. त्यास सावरवाडी म्हणून नाव असल्याचे समजते. तेव्हा बहुधा या सावरवाडीहून सावरकर हे नाव पडले असावे. त्याच्याबरोबरच देशावर आलेल्या दुसऱ्या कुटुंबाचे धोपावकर हे नाव त्यांच्या कोकणातील मूळच्या धोपाव गावावरून पडले. यापेक्षा सध्या काही जास्त माहिती मिळत नाही.

सावरकर आणि धोपावकरांची ही दोन कुटुंबे प्राप्तीच्या अर्ध्या वाट्याच्या कराराने देशावर आल्यानंतर भगूरला झालेल्या जहागिरी वगैरे प्राप्तीचा अर्धा वाटा परस्पर देऊन घेऊन प्रतिज्ञेप्रमाणे पिढ्यानपिढ्या नांदत आली.

आमच्या कोणा एका पूर्वजांना त्यांच्या संस्कृत विद्येच्या सन्मानार्थ पालखीचा मानही पेशव्यांकडून मिळाला होता, अशी आमच्या कुळात आख्यायिका सांगत.

माझे वडील आणि काका लहानपणी मला घराच्या माळ्यावरचे एक भले भक्कम लाकूड दाखवून सांगत की, हे लाकूड त्या पूर्वार्जित पालखीचाच अवशेष आहे. मला अगदी स्पष्ट आठवते की, मी वारंवार त्या लाकडाकडे विषण्ण कौतुकाने बघावे, माझ्या बालसुलभ कल्पनेपुढे त्या लाकडाची जुळवाजुळव होत होत तेथील खंडोबाच्या देवळातील पालखीप्रमाणे एक सजलेली पालखी उभी राहावी व त्यात एक कोणी भव्य पुरुष माझ्या काकांच्या भल्या थोरल्या पागोट्यासारखे पागोटे घालून बसलेला दिसावा, आणि मी इजिप्तच्या खोदकामात अकस्मात् उपस्थित झालेल्या समाधिकल्पातील एखाद्या राजश्रीच्या अवशेषाकडे एखादा संशोधक बघतो तसे साभिमान आश्चर्याने त्याकडे बघत विमुग्ध होऊन जावे!

**माझे 'भगूर' गाव**

ज्या भगूर गावी आमचे पूर्वपुरुष 'हरभट' हे सातआठ पिढ्यांपूर्वी येऊन राहिल्याचे वर लिहिले आहे त्या भगूर गावचे भाग्यही पूर्वी या त्यातील पालखीपदस्थ कुटुंबाप्रमाणेच बरेच उघडलेले असे. पेशवाईतील ऐश्वर्याच्या दिवसांत त्या गावी चौदा-चौकी वाडे असत म्हणून आमचे काका आम्हास सांगत. कितीकदा तरी त्या गावातील पडलेल्या बखळीतून माती खणताना कोणास एखादा चौक सापडल्याचे ऐकताच मी सरासरी आठदहा वर्षांचा असताना दिवसानुदिवस तेथे त्या 'चौदा-चौकी' वाड्यांतील एखाद्याचा तरी शोध लावण्याच्या आशेने त्या बखळीची पाहणी करावी, सापडलेले चौकच पुनःपुन्हा मोजावे; आणि शेवटी बाकीचे त्या पलीकडल्या घराखाली असावेत असा तर्क करावा.

आमच्या दारासमोरच्या पडीत जागेत एक विहिर असे. तिला आतून एक भुयाराचे दार आहे; आणि त्यात एक नाग एका ठेव्यावर राखण असेतो अशी आख्यायिका एकून त्या विहिरीच्या काठावर कितीकदा तो नाग, ते भुयार वा तो ठेवा, कसा असेल याच्या अद्भुत कल्पना करीत मी बसावे. पण इतिहाससंशोधनाच्या या महत्कार्यात ते 'चौदा-चौकी वाडे किंवा ते भुयार उघडकीस आणून, माझ्या गावाचा 'राजवाडे' बनण्याचे भाग्य मला मुंजीआधी तर लाभले नाहीच; पण अजूनही तसे ते लाभण्याचा काही शुभशकुन आढळून येत नाही.

ते गाव पेशवाईत अनेक श्रीमंती कुटुंबांचा आवडता निवास असे! तेथील पाणी उत्तम असे आजही, त्याच वारापाण्याच्या आरोग्यप्रदतेमुळे, देवळालीला, इंग्रजी सेनेची छावणी जवळच वसलेली आहे. त्या गावात एकदा स्वतः पेशवे येऊन गेल्याची आख्यायिका आहे; पण ते शेवटचे बाजीराव पेशवे होते. हे सांगताना, “ब्रह्मावर्तास पेन्शनावर जाताना ती पळपुटी पायधुळीच माझ्या गावाला त्यांनी झाडली” असा कोणी ऐतिहासिक शोध लावतो, की काय अशी माझ्या मनात सारखी धडकी भरते. ही दंतकथा आहे असे आमचे बापूकाका सांगत. जर दंतकथाच सांगावयाची, तर मग शेवटच्या बाजीरावाच्या ठिकाणी पहिले बाजीराव माझ्या गावी आले होते असे सांगण्यात त्या दंतकथेचे काय बिघडले होते कोणास ठाऊक! बापूकाका म्हणत, “रावबाजीस हिरव्या हरभऱ्यांची खमंग उसळ, जीस माझ्या गावात सोले म्हणत, ते फार आवडत. म्हणून त्यांना ताज्या खमंग सोल्यांची उसळ देण्यात आली.”

त्या भगूर गावी माझ्या बाळपणी गावाबाहेरची वेशीची पडकी भिंत, ते गावाबाहेरील जुने महादेवाचे आणि गणपतीचे देऊळ; ती खंडोबाची भव्य मूर्ति; ज्या पारिजातक वृक्षाची फुले माझे वडील नेहमी आणीत आणि ज्यावरून ते एकदा पडून रक्तबंबाळ अवस्थेत मूर्च्छित झाल्याची माझ्या कुटुंबजगातील एक चिरस्मरणीय घटना ऐकताच माझ्या अंगावर रोमांच उभे राहत, तो त्या पडक्या मठातील पारिजात वृक्ष; ती गावापासून दूर असलेली लहानशी दारणा नदी, लहानपणीच आई वारल्याने, बारा वर्षांचा असताना, प्यावयास तिचे पाणी आणण्यासाठी मी तिच्यावर जाताना ज्या चिंचाखाली नि बाभळीखाली उभा राही त्या चिंचा नि बाभळी, तिथे माझ्यासाठी वाट पाहत जे कोणी उभे असत ते; आणि त्या लडिवाळ सान्निध्यामुळे अधिकच रम्य भासणारा तो बाभळीच्या फुलांचा सोनेरी सुगंधी सडा; ह्या सर्व वस्तु, त्यांच्याविषयींच्या त्या गावकरी दंतकथा, ह्या माझ्या बालसुलभ कल्पनेला किती प्रिय वाटत! आणि उलटपक्षी त्या प्रीतीमुळे त्यांची स्मृति अजूनही किती रम्य वाटते!

*सामान्य वस्तुही ऐशा दिव्य-वैभव-मोहना।*
*प्रीतिच्या लोलकांतूनीं बघतां गमती मना।।*

ह्या गावाची गुणगूण, वाचक, आपल्या कानावर आधीच आलेली आहे. नाही आठवत? देऊ का मग ती आठवण? पण एकाच अटीवर हो! ज्या बालकाची गोष्ट--ही, त्याच्या बालभाषेतली ती अट हीच, की ती जम्मत दुसऱ्या कुणाला अगदी कुणाला, कळली न पाहिजे! तर सांगतो! गोमांतक काव्य आहे ना? त्यात तुमच्या परिचयाचे झालेले भार्गव म्हणजेच माझे लहानपणचे भगूर. त्या कवितेत भार्गव गोमतकात बसलेले दिसले, तरी ते माझ्या मनात बसलेल्या भगूरचेच छायाचित्र नसले तरी कल्पनाचित्र आहे. माझे गाव भगूर पाहावयाचे आहे ना? मग हे पहा ते ‘भार्गव’ :

*होती एक नदी नामें दारका तापहारका।*
*प्रतिपच्चंद्रलेखेव तन्वंगी धवलोदका।।*
*हराचा हरण्यासाठी तो हलाहल ताप गा।*
*दंग स्वर्गात आणी जी पापक्षालनि आपगा,।।*
*भगीरथसम सम्राट्कुलांच्या वसुधातलीं।*

www.savarkarsmarak.com

भागीरथी महत्कार्यीं ऐशा संतत गुंतली;।।
एतदर्थचि जे ऐसे महान नसलें जरी।
पुण्य होयचि दीनांचे तृष्णासांत्वन कीं तरी।।
असे जाणुनि जीं गावें तान्हेलीं बहु त्यांजला।
नदी चिमुकलीशी ही जाई पाजित सज्जला।।
सिंहीण शावकांसी ती सिंहाच्या वितरी पया।
पानवे हरिणीही ही हरिणा पय द्यावया!।।
शोभवी 'दारके'सी त्या तटग्राम लहानसा।
फुलांचा झुबका कोण्या रानमोगरिला जसा।।
हिरवीचार चौभोती शेती दूरवरी फुले।
सिंधूत बेट की तैसें गांव तीत मधे खुलें।।
शेतीचे गीत 'ये बैला' असें अुंच दृढस्वरी।
पहाटेस उठे फुल्लां गंधांच्यासह अंबरी।।
मोटांतूनि पडे धोधो पाणी पाणथळामधी।
स्निग्ध गंभीर नादाने मोर नाचति त्या तधीं।।
दया जरी निसर्गाची पूर्वीपासुनिया जशी।
गावावरी तया होती, होती आजहि कीं तशी।।
तरी सुरूपही जैसा दिसावा दुखणेकरी।
जाळिला ज्या विजेनें तो जीवे वृक्ष कसा तरी।।
परचक्रार्त हें तैसे गांव भार्गव की धरी।
म्लानता वर्तमानाची गतगर्व मुखावरी।।
द्वाराची भग्नवेशीच्या भिंत एकचि ही नभी।
हृद्भग्ना अर्धशल्याचें की शेषार्ध तशी उभी।।
देवालय महादेवाचें जें सन्निध जीर्णसें।
धर्मकेंद्र समाजाचा एक हा उरला असे,।।
यथे प्रदक्षिणा भोती घेताना युवती, मुलें।
त्यांची गुंफित बैसावी चाफ्याची गळती फुलें।।
वृक्ष जो पारिजाताचा शेजारीच मठात या।
फुलांही तो अणी वाके गाव गर्वभरें तया।।
जी पारिजातकाची या कथा दंतकथा कथी।
ती पूर्वी नारदा सांगे स्वये अर्जुनसारथी।।
की भामा रुक्मिणी आणि कोणीही दुसरीचिया।

प्रांगणी पारिजातासी सहूं न शकती तया।।
दोघींच्याही तआीं ईर्ष्ये हराया, सहसा हरी।
वाहूनि पारिजाता दे भृगूंच्या चरणांवरी।।
तै निजाश्रमि ज्या देई ॠषि रोपुनि वृक्ष की।
तोचि हा मठ, हा तोची पारिजातक आणखी!।।
दहापांच दुकानें जीं मध्यवस्तीत लागली।
रंगवूनि खडूने जीं गेरूनेच चितारिली।।
‘मुखपेठ’ असे मानी स्थळा नांव मिळे तया।
येती रंगेल येथेची सायंकाळि फिरावया।।
जाता शेतां सकाळी की दुकानी दिधलें, तया।
नळ्यात भरुनी तेला सांजे नेति इथे स्त्रिया।।
कवड्या चलनी नाणें घेत देत जिरेंमिरें।
वाणी दुप्पट दामा घे - हिशोब चुकुनी बरें!।।
तशात मोठ्या पोटाचे ज्यांत शोभति शेटजी।
दुकाना लाभली एका पेढी ही पदवी अजी।।
मुलें भिकार तेथे जै भीक दाटुनि मागती।
पायाची आग शेठींच्या पोटा थेटचि जात ती।।
दंडू त्या जों स्वदेहासी शेठ नीट उभारिती।
मुलें तों शकती जाऊ अर्धा धावुनि गाव तीं।।
सोडू गाई सकाळी जो उशीर बहुधा करी।
घेऊ मुलें गुराख्यांची सूड त्या भटजीवरी।।
जाता जाता कुठे त्यांची वस्त्रे वाळत सोवळी।
दिसताचि शिवोनी त्या काढिती पळ गोवळीं।।
गांवात जोड ना ज्यासी निघता नव मल्ल तो।
यात्रे शेजारच्या गावी जननीपद वंदितो. ।।
‘सांभाळ बरें!’ आई कथिता हसुनी पुढे।
निघे नीट जिथे यात्रा मल्लरंगण तें पडे;।।
आणि कुस्तीत पाडोनी गडी दुप्पटसा झणी।
परते पटका जेतेपणाचा पटकावुनी,।।
तै स्वागता किती वेशीपाशी ते जन दाटले।
‘जै जै’ कारात गावाचें लघु अंबर फाटलें ।।
‘संबळे’ वाजता चाले छाती काढुनि की जसें।

मारूनि रावणा साकेतासी रामचि येतसे!!।।
गावातची तरी धाडी माहेरा नच सासरा।
म्हणोनि भाउ बालेचा टपे संकेत वासरा।।
येता नदीपथे भेटे, भावापासुनिया स्वसा।
मेवा किंवा मुका घेते मेव्याहूनि मिठाससा. ।।
पंचाईत सभा पंचांची ती वाद हरावया।
पाटील धीट गावाचे रक्षणासि करावया।।
नित्य नैमित्तिका सर्वा धर्मासी करवी करी।
ग्रामोपाध्याय गावाचीं दुरितें पळवी दुरी।।
दैवी भौतिक आपत्ती ऐशा होऊनिया दुरी।
निश्चिंत एकनिष्ठेने शेती शेतकरी करी. ।।
मुकुटासम जै शेती सोनेरी कणसें धरी।
प्राण देही डुले आणि समाधान घरोघरी।।
तदा वर्षभरी जो जो उणीव अपुली पुरी।
कोष्टी, कुंभार, वंजारी, सुतारादिक की करी।।
त्या त्या सहाय्यका साऱ्या निजा शेतकरी मुदे।
धान्यभाग यथान्याये विभागूनि ठरीव दे. ।।
धान्यसंग्रह वर्षासी अवश्य तितुका जना।
पुरूनिहि उरे जो की ज्याचें संप्रति काज ना।।
समुदायहितासी तें सामाईक निधीमधे।
पाटील धान्य गावाच्या पेवामाजि भरूनि दे।।
अवर्षणाचें दुर्दैवें येता संकट भूतलीं।
करील धान्य संपत्ति लोकपोषण त्यातली. ।।
ग्रामसंस्था अशी जी की प्रतिग्राम करीतसे।
लोकसत्ताकची कोणी स्वयंपूर्ण लहानसें।।
आसन्नमृत्यु संस्था ती आणिकी जनताहि ती।
परराज्यप्रबंधाच्या रोधे घेत पराकृति!।।
मद्याचीं मध्यरस्त्यात दुकानें बसलीं नवीं।
कशी तशी कृषी सोशी करकर्षण दानवी।।
ह्या अशा ग्रामसंस्थेच्याहुनिही प्रथिता तशी।
प्राणभूतचि गावाची संस्था जी दुसरी तशी।।

ती होय हा युगस्थायी वटवृक्ष महायशा।
विस्तारल्या जयाच्या की पारंब्या प्रतिवृक्षशा।।
आला तो पाहुणा जाऊ शकलाचि न मागुता।
पाहिल्याविण त्या वृक्षा ऐकल्याविण वा कथा।।
की पूर्वी ज्या दिनी वीरोत्तंस-भार्गवमार्गणे।
लावी सकंप सिंधूते हटण्या शतयोजनें।।
त्या दिनीच तया वीरें विजयध्वजची तसा।
रोपिला वृक्ष हा आणि गाव स्थापियला असा।।
पार हेमाडपंती हा चुन्या वा चिखला विना।
मंत्रें बद्धशिला, ऐसा या 'आख्या पृथमीत' ना!।।
अखंड जात्यायेत्यांचे गप्पापीठचि पार तें।
राजकारण गावाचें सारें येथचि घाटतें।।
संथागार (town hall) दिनी आणी पार रात्रिस होय हा।
रंगभू सार्वजनिका या कुणीहि, कुणी पहा!।।
तुणतुणे तंबुऱ्याशी तैं ढोलकें तबल्या भिडे।
लावण्यांच्या चढाओढीसि न रात्र पुरी पडे।।
ये तिथे फिरता साधु धुन लावुनिया बसे।
प्रार्थिता बहुती सांगे लवदेश कुठे कसे।।
वदे चिलिमिच्या, शब्दी शब्दी, सोडित तो धुरा।
विलायेत कशी आहे काशीच्याच पुढे जरा।।
अवधूत असो; प्रेमे वधूही वटवृक्ष तो।
उपासिता नव्या वृक्षा किती मत्सर वाटतो!।।
तया वृद्ध वटाध्यक्षत्वाच्या वत्सल सावली।
खाली जशी प्रजा पक्षे छावणी अपुली दिली।।
तशीच चावडीही ही लुप्तश्रीक अजी तरी।
कै कै राज्याधिकाऱ्यांचा शिबिरध्वज ती धरी।।
जसें त्या दिवशी; की जै येताती फिरतीवरी।
मामलेदार तै गावी कोण धांदल ती तरी!।।
जो तो ह्या त्या निमित्ते त्या पथे जात विलोकुनी।
भीत भीत दुरोनी त्या धूमकेतु जसे कुणी!।।
जरि पाटिलबोवांच्या भव्य गालमिशा कधी।
तशीच कुळकर्ण्यांची लेखणी लवचीक ती।।

www.savarkarsmarak.com

*खूपची वाढवीती तन्महत्व भय अंतरी।*
*तया गांवकऱ्यांच्या की त्याचि एक दिनी तरी।।*
*मामलेदार जै जाता फिरती करुनी धरा।*
*घ्यावया मुजरा त्यांचा मान वाकविती जरा।।*
*तिथेचि 'मिशना'ची ती शाळा एक नवी भरे।*
*राग कां न तिचा यावा भाउ 'पंतुजि'ना बरें!।।*
*ओसरी ओस तों ह्यांची; परस्थ परधर्मदा।*
*शाळे त्या घोकिता जाती भ्रष्ट शब्द मुलें तदा।।*
*'क्रिस्त', 'क्रूस', 'अमेरीका', 'अलबुकर्क'! हरे हरे!।।*
*श्रीगणेशाविनाची ती शिकतातिं धुळाक्षरें!।।*

या भगूर गावाशेजारीच एक राहुरी म्हणून लहान गाव आहे. ते आमच्या वंशास जहागिर होते. एक अनामही असे. आमच्या कुळातील अनेक पुरुष वेदशास्त्रसंपन्न असून आमच्या कुळात पूर्वी केव्हा तरी यज्ञदीक्षा घेणारा पुरुष झाला असल्याने, 'दीक्षित' म्हणून पदवी असे. आमच्या वडिलांच्या मातुःश्रीचे वडील नावाजलेले पटाईत वीर असत. "मकराणी" स्वारांचे पथक त्यांच्या पदरी होते. ह्याच पथकाच्या सहाय्याने त्यांनी एकदा लुटारुंचे बंड मोडून त्यांच्या मुख्य देवतेची एक मूर्ति आणली; ती आमची आजी भगूरला घेऊन आली. ती अष्टभुजा भवानीची मूर्ति फारच सुंदर असून आमच्या कुलाची कुलदेवी म्हणून गणली गेली. तिच्या जाज्वल्यपणाच्या अनेक दंतकथा आमच्या घरी आणि गावात प्रचलित होत्या. तिला तेथील खंडोबाच्या देवळात बळी द्यावयाची सोय व्हावी म्हणून ठेवली. तिची पालखी समारंभाने निघत असे. आमच्या दाराशी ती आली म्हणजे आमचे घरचे कर्ते पुरुष दर्शनास येईतो ती पालखी अगदी जड होई. ती काही केल्या हलत नसे असे भोई म्हणत. पुढे ही मूर्ति आमच्या वडीलांनी नवे घर बांधल्यावर घरीच आणिली. तेव्हापासून तिच्या पूजाअर्चेची मला अत्यंत आवड लागली. माझे वडील नवरात्रीत व्रतस्थ होऊन तुपाचे दिवे लावून, उदबत्त्यांनी घमघमाटलेल्या देवघरात एका बैठकीस सप्तशतीचा पाठ करीत तेव्हा ते "या देवी सर्व भूतेषु बुद्धिरूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमोनमः। या देवी सर्व भूतेषु शक्तिरूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमोनमः।" इत्यादी त्याच त्या नमस्तस्यै नमस्तस्यै नमोनमः या ध्रुवपदाचे श्लोक म्हणत असता, मी अगदी मंत्रमुग्ध होत्साता, जवळजवळ एखाद्या समधिस्थासारखा, भान हरपून बसलेला असे. माझ्या वयाच्या बाराव्यातेराव्या वर्षाचा तो संस्कार जागृत झाला म्हणजे मला अजूनही ती रोमहर्षक भावना मोहित करते. किती तरी ते भावसुंदर श्लोक! मला लहानपणी वाटे; किती तरी तत्वसुंदर श्लोक! मला आता वाटते.

**"माझे वडील"**

माझ्या पितामहांना दोन मुलगे आणि एक मुलगी अशी अपत्ये झाली. वडील पुत्र आमचे "बापू" काका, आणि त्यांच्याहून १४/१५ वर्षांनी धाकटे आमचे वडील, दामोदरपंत. आम्ही वडिलांना अण्णा म्हणू. आमच्या वडिलांचा स्वभाव फार लडिवाळ आणि ममताळू असे. आम्ही मुलांनी त्यांस "अहो जाहो" म्हणावे

असे कोणी आम्हास शिकविले तर ते त्यांस अवघड वाटे. आम्ही मुलांनी "ए अण्णा" म्हणून हाक मारली, म्हणजे त्यांस फार आवडे. त्यांचा बांधा किवा ठेवण पिळदार, रंग गोरा, तोंडवळा सुबक आणि कोमल असे. त्यांचे शिक्षण मॅट्रीक-पर्यंत नाशिक हायस्कुलात झाले. त्यांचे शिक्षक त्यास एक बुद्धिमान परंतु दांडगा विद्यार्थी म्हणून समजत. त्यावेळी हायस्कुलांतील सातवी यत्तेचे विद्यार्थी अंगावर उपरणे घेऊन आणि डोक्यास पागोटे घालून जात. त्या उपरण्याचा एक विशेष उपयोग त्या विद्यार्थ्यांस जो होई तो म्हणजे वर्गात कोणी डुलकी घेऊ लागला तर गुरुजींची दृष्टि चुकवून त्या उपरण्याचा गच्च चेंडू बांधून त्या अभागी झोपाळूवर फेकण्यासाठी होय. माझ्या वडिलांवर तर, एकदा, हायस्कूलच्या खालच्या यत्तेत असताना, असा आरोप आला होता की, प्रत्यक्ष मुख्य अध्यापक हेडमास्तर महाशयच एकदा डुलकी घेत असता, त्यांच्यावरही आपल्या उपरण्याचा चेंडू त्यांनी असा अलगत फेकला होता. त्यांस कविता करण्याचा छंद असे. काव्याचे वाचन हा तर त्यांचा आमरण आवडता व्यासंग असे. संस्कृत-मधील भामिनीविलासादिक काव्ये, त्यांची मराठी भाषांतरे आणि मराठी वामनपंडित, मोरोपंतादिक कवि यांची कविता त्यांस फार आवडे. माझ्या अगदी लहानपणी त्यांनी नवनीतातील अनेक सुरेख आख्याने आणि वेचे मला वारंवार म्हणून दाखवाव आणि ऐकून ऐकून माझे पाठ व्हावेत.

**"माझे बापूकाका"**

माझे चुलते बापूकाका हे अुंच भरदार बांध्याचे, व्यायामात पटाईत आणि आम्हा मुलांवर तरी निष्कपट प्रेम करणारे असत. मराठीतूनच त्यांना निबंधाचे (कायद्याचे) ज्ञान चांगले झालेले असे. त्यांनी त्यांच्या वडिलांच्या मागे, आपल्या स्वतःच्या कर्तृत्वावर साव-कारीचा धंदा चालवून, लौकिक कमावला. नाशिकच्या बहुतेक जुन्या वकील मंडळींशी त्यांचा स्नेह असे. ती वकील मंडळी आणि मामलेदारादिक अधिकारीवर्ग, मे महिन्याच्या सुटीत टोळ्याटोळ्यांनी भगुरास 'सावकारांकडे' येऊन राहत. आमची एक नामी आंबराई असे, मळे असत, माळ असत, शेते असत. आंब्याच्या आणि उन्हाच्या दिवसातही थोर थोर नागरिक आणि स्नेही मंडळी आमच्या घरी येऊन शेतीच्या मोकळ्या चैनीचा आणि ताज्या चिजांचा यथेच्छ उपभोग घेत.

आमची आत्या कोठुरच्या कानेटकर घराण्यात दिली होती. त्यांचे यजमान, आमच्या वडिलांचे मेहुणे, धोंडुअण्णा हेही आपले भांडवल आमच्या चुलत्यांचे हाती देऊन सावकारीत गुंतवीत. ब्राह्मणात अग्रगण्य, जहागिरदार, इनामदार आणि त्या गावातील इंग्रजी शिक्षणात आणि इंग्रजी निर्बंधात प्रवीण असे पहिले कुटुंब, म्हणून आमच्या घराण्याचे वजन आणि लौकिक आजूबाजूस पुष्कळच पसरलेला असे; पण दुर्दैवाने, त्या घराण्यास एक गालबोटही लावलेले होते. आमचे चुलते आणि वडील यांची आपसात फार भाऊबंदकी चाले. वेळप्रसंगी दोघा भावांची मारहाणही होई असे मला आठवते. बापूकाकांस मूलबाळ नसे. पत्नीही पूर्वीच वारलेली, म्हणून मला लहानपणी त्यांची फार दया येई.

सावरकरांचे घर आणि ते एक ओसाड गावात, अर्थात चोरालुटारूंचा आमच्या घरास सर्वदा त्रास होई. माझे वडील स्वभावतःच शूर असत. कित्येक प्रसंगी त्यांनी हातात तलवार घेऊन एकट्याने सशस्त्र परदेशी दरोडेखोरांवर चालून जाऊन रातोरात झुंज द्यावी. त्यांचा चोरास दरारा बसवणारा, आणखी एक

शूर साथी असे, तो म्हणजे त्यांचा लाडका 'कोळ्या'. या कुत्र्याच्या कित्येक दंतकथा आमच्या घरात पौराणिक कहाण्यां-प्रमाणे मंडळींना सकौतुक सांगितल्या, ऐकिल्या जात. हजारो रुपयांच्या चळथी बैठकीत तशाच ठेवून बापूकाका कामास निघून जात; पण "कोळ्या" तिथे असता, जमलेल्या शेतकऱ्यांपैकी, त्या पैशास गमतीने देखील, हात लावण्याची, कुणाची छाती होत नसे. त्या कुत्र्या-विषयी चोरांस इतके शत्रुत्व वाटे की शेवटी त्यांपैकीच कोणी तरी, एकदा त्यास विष देऊन मारून टाकले!

बापूकाकांचे मी फार आवडते लेकरू असे. कोणी थोर अधिकारी वगैरे आले की मोठया गर्वभराने त्यांनी आपल्या घराण्याचे अमूल्य भूषण म्हणून मला दाखवावे. माझ्या गुणांचे कौतुक करताकरता त्यांस पुरेसेच होत नसे. "काय, बाळंभट" अशी प्रेमाने माझे तोंड कुरवाळीत येणारी, त्यांची हाक मला ऐकू येते. 'भटो भटो! कुठे गेले होते? हटास!' हा प्रश्नोत्तरमय जुन्या काळचा गोड बाळसंवाद, गाणी आणि खेळ त्यांनी मला शिकवावे! मलाही त्यांचा फार लळा असे. माझी आजी फार लहानपणी वारली. त्यानंतर मलाच दत्तक घेण्याची त्यांची मनीषा होती; पण माझ्या वडिलांशी त्यांचा उभा दावा असल्याने ती गोष्ट उभयपक्षीं संमत झाली नाही. त्यांच्या मृत्युच्या आधी मी चवदापंधरा वर्षांचा असेन नसेन, तेव्हा भगूरला घडवून आणलेल्या एका सार्वजनिक गणोशोत्सवात माझे पहिले प्रकट (जाहीर) व्याख्यान झाले. ते संपताच त्यांस इतका आनंद झाला, की त्यांनी 'वा! बाळ्या वा! फार बहार केलीस! तू आमच्या घराचे नाव काढणार!' असे म्हणून, पोटाशी घेत मुका घेतला. त्यांच्या मृत्युच्या आधीची, हीच मला असलेली, शेवटची स्मृति. म्हणून, येथेच तिच्या आठवणीसरशी आलेल्या अश्रूंचीच प्रेमळ तिलांजलि त्यांच्या ह्या स्मृतीस देऊन त्यांच्या ह्या आत्मवृत्तापुरता तरी शेवटचा निरोप घेत आहे.

### "माझी आई"

माझी आई कोठुरच्या मनोहरांची कन्या. तिचे वडीलही शास्त्रसंपन्न "दीक्षित" असत. त्यांच्यामागे माझ्या आईचे आणि तिच्या एकुलत्या एक भावाचे, माझ्या मामाचे, पालन नि वर्धन माझ्या मातामही आजीनेच केले. माझ्या मामास कविता करण्याचा फार छंद आहे. त्यांच्या तारुण्यात कसरतीत आणि कुस्तीत ते फार पटाईत असत. देहाने विशाल, रूपाने देखणे, बुद्धीने तीक्ष्ण, मनाने फार हळवे, अडल्यापडल्याच्या कामात ते सदा तत्पर, त्यांच्या इष्टमित्रांसाठी ते आजन्म अनेक कष्ट सोशीत आले. गीतेसारख्या विषयावरही त्यांनी काही प्रसादयुक्त कविता केली आहे. मला वाटते बहुधा माझ्या वडिलांच्या आणि मामांच्या उभय कुली आढळून येणाऱ्या उपजत कवित्वशक्तीचे अंकुरच आम्हां बंधूंच्या कवितेत पल्लवित, पुष्पित आणि फलित झाले असावेत.

माझ्या वयाच्या नवव्या वर्षीच माझी आई वारल्यामुळे मला तिच्या रूपरेखेचा इतका विसर पडला आहे की ती पुन्हा दिसली तरी मी तिला ओळखू देखील शकणार नाही! पण तिच्याविषयीची जी माहिती मी ऐके आणि तिच्या लालनपालनाच्या ज्या काही पुसट आठवणी येतात, त्यांचेच प्रतिबिंब कवितेच्या लोलकांतून गोमांतक काव्यातील 'रमे'च्या भूमिकेवर पडले आहे. रूपाने सुंदर, रंगाने गोरी, स्वभावाने सुशील आणि मनाची ममताळू म्हणून आबालवृद्धात तिचा लौकिक पसरलेला असे. श्रीमंतीचा गर्व असा तिला शिवला नाही. ती वारल्यानंतर जेव्हा आमच्या कुटुंबाच्या संपन्नतेला ओहोटी लागली, तेव्हा माझे

वडील नेहमी म्हणत, “आमच्या घरी ती आली ती लक्ष्मी घेऊन आली, ती जाताच लक्ष्मी निघून गेली. तीच माझ्या घरची लक्ष्मी होती!” माझे वडील माझ्या आईवर फार लोलुप असत. आणि प्रथमपासूनच

*प्रिया त्यासमची त्याची युवतीच वये जरी।*
*गृहिणीपद कर्तव्या प्रौढा पूर्ण तशी करी।*
*गृहनिर्मल सैपाक सुरसाल तिचा सदा।*
*गमे लहानथोरशी व्हावीशीच प्रियंवदा।।*
*आग्रहें वडिलां सेवी लहानां शिकवीतसे।*
*वाणीनें वेतनाहूनी सेवकां सुख देतसे।*
*ती सदा ऋणको येतां तिच्या शेतकरी घरी।*
*भाकरी ऊन दे जी तत्स्मित स्वादुतरा करी।*
*आपल्या आंबराईच्या आंब्यांही घर जैं भरे।*
*सुरंग, सुरस, स्वादु ते तें वेचुनी ती करें।*
*सुवासिनींस जातींच्या सर्व बोलवुनी घरी।*
*अंगणी आम्रराशीतें तयांच्या लुटवी करीं।।*
*अंबेचा स्तन वा प्यावा आंबा कांचनगौर वा।*
*स्तनंधये दो लोभांच्या मध्ये स्तंभित तेधवा।*
*किंचित कोपी तरी होता प्रेमकोमल तत्पती।*
*जीव कीं प्राण तो लेखी तिज जेंवि तयास ती।।*
*वेणी घाली तिची हस्तें प्रेमे न्हाणी तिला स्वयें।*
*लाजता ती,तिशी रागे क्षणमात्र वदूं नये।।*

माझ्या काकांना अपत्य नव्हते. आणि माझ्या आईचा पहिला मुलगा आणि त्याच्या पाठचा दुसरा मुलगा हे अत्यंत अल्पायुषी झाले. त्यामुळे तिचा तिसरा मुलगा म्हणजेच माझे वडील बंधु ह्यांच्यावर लहानपणापासूनच नव्या नवसाने लाभलेले आणि टिकलेले मूल, म्हणून, माझ्या मातामही आजीचा आणि आईचा फार लोभ असे. त्यांच्या पाठीवर ४ वर्षांनी माझा जन्म झाला. माझ्या पाठीवर तीन वर्षांनी आमची बहीण माई आणि तिच्या पाठीवर आमचे धाकटे बंधु “बाळ” यांचा जन्म झाला. त्यांच्या पाठीवर एक मुलगा झाला, पण आडवे येऊन उपजताच वारला.

माझ्या आईबापांचा तारुण्यातील संसार फार आनंदात झाला. ते गमतीचे दिवस कसे जात, दारणा नदीच्या पलीकडे असलेल्या, त्या जहागिरीच्या राहुरी गावाजवळील, आमच्या आंबराईत हौसेने वनभोजने कशी होत, माझ्या आईचा प्रेमळ, कर्तव्यतत्पर आणि पवित्र दिनक्रम कसा असे, याचा काही आभास गोमांतकांतील खालील ‘रमे’ विषयीच्या वेच्यांच्या आरशात दिसू शकेल.

*रमा माधव ते ऐसे अन्योन्यी रमतां सुखे।*
*फुले सुख दुजे तेही कराया पहिले फिके।।*

यथाकालीं जई दैवें रमा ती रमणीयशा।
तनया प्रसवे एका वंशाच्या उजळू यशा।।
जन्मासि बाल तें येतां गगनी सुम वर्षतें।
थवे दिव्य विमानांचे दाटले अथवा न ते।।
प्राचीन पूज्य गोत्रर्षी आशीर्वाद वदूं स्वयें।
गंधर्व संघ वा गाऊ तदा ये अथवा नये।।
मुलाचे मुख वात्सल्यें चुंबिण्यातचि गुंतली।
नभीं ते चुकली देखूं तीं मातापितरें जरी,।।
तथापि सुतजन्माची जी प्रीत्युत्कटता तधी।
होय हर्म्यी अयोध्येच्या दुंदभीतुनि गाजती।।
सामान्य मायबापांच्या त्या सामान्यहि कीं घरी।
प्रीत्युत्कटत्व तैसेची असामान्य मुकें जरी।।
पयाचा पहिला पान्हा ये दाटूनि पयोधरी।
तदग्रा तनयें तीच्या चेपिलें मृदुलाधरीं।।
मउ, मंजुल व्हाव्याशा त्या चेपात पलोपली।
तै रमेच्या हृदीं प्रेमाची जी वीज थरारली।।
मोहकत्व तिचें कौसल्यासुखाहुनि का गुणे।
सिंहासनस्थ सम्राज्ञी होय ती म्हणूनी उणें।।
बाल 'आई' अशी मंजु हांक दे पहिली जआीं।
तिचा पदर वात्सल्याश्रुत चिंब भिजे तआीं।।
मातेच्या स्तनपानीं, तो पित्याच्या प्रिय चुंबनीं।
बाल घे पोषणा मूल्या लोभ हर्षण होउनी।।
कर्णी सुंदर डोलावें डूल दुड दुड धावता।
होई आपणाचि प्रेमें घास आईस घालता।।
घोडा खेळावया ताता कामा जाऊ मुळी न दे।
वस्त्रचि लपवी, राही दाराच्याचि उभा मधे।।
जसा जसा तिचा गेला बाल वाढत सद्‌गुणी।
श्रेय प्रेय तिच्या जाति एक होउनि जीवनीं।।
प्रथमप्रसवा पाजी तान्हें चुंबित जैं स्तनी।
सहोदर नद्या घेती प्रीति नीति तिथे जनीं।।
भोग्याची योग्य होई कीं अपत्य प्रतिपालची।
गति जीवन गंगे दे, सृष्टिसी नवता तिची।।

www.savarkarsmarak.com

*बाल संगोपनी नारी जीवनक्रम रम्यसा।*
*तोचि पावनसा होई सुव्रत क्रम कीं तसा।।*
*एक दोन शकुंतांनी लकेऱ्या दिधल्या कुठे।*
*पहाटेस अशा एका रमा नित्य तशी उठे।।*
*सडा संमार्जना दासी असूनी स्वकरें करी।*
*स्वयें मग शुचिर्भूता स्त्राता होउनि सुंदरी।।*
*लाविली फुलवाडी जी तिनेच परसामधी।*
*देवपूजेप्रती तोडूं जाई तींत फुलें तधी।।*
*सुगंधात फुलांच्या ती, सुरंगात उषेचिया।*
*रंगुनि क्षण तैं पाहे सृष्टि कौतुक तन्मया।।*
*खुडूं मग फुलें लागे गाता मंजुळ गीतिशी।*
*शांततेची प्रभाताच्या वाचा मूर्तिमती तशी।।*
*पतिसी तनया आणि हळूचि उठवूनि दे।*
*पाहुनि क्षेम त्या यावी नयने भरुनी मुदें।।*
*मग जैं तुलशीपाशी जपा ती जपण्या बसे।*
*तिचा बाल तिला तैशी पाहुनि कुतुकें हंसे।।*
*पूजा ती करितां पाहे शिवायास पलोपली।*
*धूरची उदबत्त्यांचा धरायास बघे करीं।।*
*शुद्धोष्ण तोय देऊनी बालासी मग न्हाववी।*
*एकेक शब्द देऊनी स्तोत्र पावन गावावी।।*
*येता येता खुलोनीया पाकळ्या कमलाचिया।*
*बघे उमलत्या मालाकार श्रीस जसा तया।।*
*कौतुकें प्रिय आश्चर्यें तशी ती जननी बघे।*
*फुल्लद हृदीं तया अर्थ ज्ञान कैंवि विकास घे।।*
*नमस्कारवुनी देवा तुलसीस पुढे सती।*
*प्रेमें बसे रमा घालूं जेवाया तनयास ती।।*
*शैशवी दूध भाताचा घास लावुनि लोणचें।*
*ताटलीतुनि जो देई आई त्या सम कोणचें।।*
*मिष्ट पक्वान्न हो लागे आयुष्यात पुन्हा तसे!*
*प्रेम कोण पुन्हा आईनिरपेक्ष करीतसे।।*
*“ऐकणें होतसे का तें तिकडूनि” सहास्य ती।*
*मधेंचि पतितें उद्देशूनिया वदली सती।।*

www.savarkarsmarak.com

*"पांचवा ज्येष्ठ ये, लागे वर्ष पंचम शंकरा।*
*बेत वाढदिसा तात्याच्या वनभोजनची बरा।।*
*शंका! टिका! मिळे तैं त्या सूचनेप्रति संमती।*
*तीनही वाचनें होतां प्रेमपंचसभेमधी।।*
*पसंत उभयां ऐशा वसंत वनभोजना।*
*रमा माधव सन्मानें पाचारिती सुहृज्जना।।*
*सुग्रणी युवती नाना पक्वान्नें करुनी घरीं।*
*तया शुभदिनीं येतां आणितात बरोबरी।।*
*प्रातःकालीच वाद्यांचे नाद मंगल वाजले।*
*बांधिल्या फुलमालाही छकडे बहु साजले।।*
*वाहनें सुटतां एकाएकीं जैं हिसका बसे।*
*भेट नारी नरा होता सहसा पिकलें हसे।।*
*शेतें शेतांतलीं धान्यें पशुपक्षी फलेफुलें।*
*मार्गी अक्रम सौंदर्यें वस्तु संग्रह गुंफले।।*
*त्या बाल वस्तु वस्तूंच्या पुसे नाम गुणां झणीं।*
*टाळी वाजवुनी केव्हां केव्हां अंगुलि दाबुनी।।*
*वाहने घर्घरा जाता शेतां त्यागुनियां जधी।*
*पक्षी सलील गीताते गेले गात नभामधीं।।*
*"माणसे ही अशी आई उडूं गे शकतील कां?"*
*पुसे बाल तया प्रेमें वदलीं कुलेलालका।।*
*"दे बाल देव पक्षासी पंख तेंवि न मानवा।*
*नवा पंख घडाया ये विमानीय अम्हां नवा।।"*

**माझी पहिली आठवण**

मला माझी स्वतःची अशी, जी पहिली सांगण्या-सारखी, आठवण आठवत ती, माझ्या वयाच्या सातव्याआठव्या वर्षाची होय. माझ्या वडिलांचा परिपाठ असे की रात्री जेवणे झाल्यावर आमच्या वडील बंधूकडून, रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत, जैमिनी अश्वमेध असे ओवीबद्ध ग्रंथ वाचवावे; आणि आईशी त्यांच्याविषयी चर्चा करावी. त्या चर्चेत प्रत्येक कल्प हा अगदी मागच्या कल्पासारखाच असेतो; आणि या कल्पांची अगदी यथावत आवृत्ति त्या कल्पामध्ये होते, असा विषय एका रात्री निघाला होता. माझ्या ध्यानात ती गोष्ट राहिली होती. दुसऱ्या दिवशी, शाळेच्या दुपारच्या सुटीत कारणे काय की, बहुधा दुपारच्या फराळावरूनच, मी घरी येताच रुसलो. त्या रुसव्यातच सुटीचा वेळ जाऊन आईशी प्रत्यहीचे गोड बोलणे झाले नाही. शाळेत जायची वेळ होताच मला रुसून बसून आईशी हसण्या-खेळण्याचे अंतरले म्हणून फार हळहळ वाटली. मनात आले पुन्हा आता हा गेला क्षण कसचा येणार? ते सुख आता

नित्याचे अंतरलो. इतक्यात कालच्या कथेची आठवण होऊन समाधान वाटले की; का? पुढील कल्पात हा दिवस पुन्हा उजाडणार! हीच आई, हीच शाळेची आजची सुटी, हाच क्षण पुन्हा येणार! तेव्हा मग आपण रुसलो नाही की, आजच्या गेल्या क्षणाचे हरवलेले सुख मिळवू आणि आईशी गोड बोलून घेऊ; पण हाय हाय! लगेच दुसरा विचार आला. पुढील कल्पामध्ये, या सगळ्या गोष्टी जशा जशाच्या तशा घडणार, त्याप्रमाणे रुसण्याचीही चूक घडणारच! अगदी आपण आज न चिडण्याचा निश्चय केला तरी घडणारच! कारण प्रत्येक कल्प हा मागच्या कल्पाची अगदी यथावत् प्रत असतो. तेव्हा गेला क्षण, गेला तो गेला. आईचे गोड शब्द अंतरले ते अंतरलेच. हे उलटसुलट विचार एकदम चमकेसारखे येऊन गेले. त्या कल्पनेसरसा उदासीनतेचा संस्कार माझ्या मनास अजूनही केव्हा केव्हा उदास करतो.

माझी मुंज केव्हा झाली, कशी झाली याची मला काही एक स्मृति येत नाही. बाळाच्या पाठीवरील शेवटच्या बाळंतपणात आईला आडवे आले तो दिवस. त्या रात्रीची ती सर्वांची चिंतामग्न स्थिति, डोळ्यांतून पाणी आणीत ये-जा करणारे माझे वडील, रातोरात नाशिकला जाऊन त्यांनी आणलेले ते बिवलकर डॉक्टर, त्यांच्या प्रयत्नाने आई प्रसूत होताच झालेला आनंदीआनंद मला चांगला आठवतो. त्या आनंदात ते शेवटचे मूल वारल्याचे दुःख देखील विसरण्यात आले. त्याच वेळच्या एकदोन गोष्टी माझे बंधु सांगतात. त्यांना इंग्लिश शिकवताना माझे वडील, शब्द आले नाहीत म्हणजे रागावून शिक्षा देत, की अंगणातील त्या लांबलचक बागेच्या टोकापर्यंत कान धरून तो शब्द घोकून ये; बाबा (माझे वडील बंधू) प्रामाणिकपणे तसे कान धरून शब्द घोकीत फेऱ्या घालीत. हे पाहून मला वाईट वाटे. शेवटी मी त्यास एक तोड काढली. मी म्हटले "शब्द पाठ व्हावा हाच ना मुख्य उद्देश? मग तो फिरल्याने होतो आणि बसल्याने होत नाही असे थोडेच आहे! तर या अंगणातील तुळशी वृंदावनामागे लपून तू तो शब्द पाठ कर; मी अण्णा माडीवरून उतरले तर तुला कळविण्यासाठी पहारा करतो. तसे झाल्यास तू पटकन् उठून कान धरून तेवढ्यापुरता चालू लाग म्हणजे झाले."

बाबाच्यावर मी या कानधरणी टाळण्याच्या केलेल्या उपकारांची फेड करण्यासाठीच की काय, त्यानेही मला एकदा मनापासून बचावण्याचे धाडस केले. आमच्या लहानपणी अण्णा इतर सर्वांस शिस्तीसाठी केव्हाकेव्हा मारीतही. पण त्यांचा रागीट स्वभावही माझ्याविषयी फार पक्षपाती असून, ते मला मात्र, कधी बोट लावीत नाहीत, असा सर्व कुटुंबाचा, माझ्या वडिलांवर नेहमीचा आक्षेप असे. पण एकदा झाले काय की, माझ्यावरही रागावून ते मला दोनचार चपाट्या देण्याची प्रतिज्ञा करून माडीवरून खाली येऊ लागले. मी माजघराच्या खोलीत लपण्यासाठी धावलोच. बाबांनी म्हटले, "अरे थांब, ही तिजोरी उघडीच आहे, तीत बैस." लगेच मी तिजोरीत स्वतःस गुंडाळून घेतले. बाबाने झांकण लावले. अण्णा येऊन, मी पळालो असे पाहून, राग जाऊन, हसत आणि "लबाड! लुच्चा गेला कुठे तरी" असे गर्जत माडीवर गेले. मार चुकला पण तिकडे तिजोरीत मरण ओढवले. वडील लवकरच परत गेले म्हणून बरे! कारण, ते जाताच बाबा झांकण उघडून तिजोरी उघडतात तो मी श्वास गुदमरून घाबरलेला दिसलो. लगेच हाकाहाक झाली; आणि आईने पाणी शिंपडून कसेबसे मला सावध केले!

www.savarkarsmarak.com

**“आई वारली”**

सन १८९२ या वर्षी आमच्या गावात महामारीची मोठी साथ आली. हो-ना करताकरता तिचा घाला माझ्या आईवर पडला. त्यावेळी तिचे वय फार फार तर बत्तीस तेहतीसचे असेल. दिसण्यात तर ती अगदी तरणी दिसे. आम्ही चार लहान मुले, घरी श्रीमंती, तिच्यावर निरतिशय प्रेम करणारा पति, संसाराच्या सुखाचा भर, तो दुर्दैवास पाहवला नाही, तिला महामारी झाली. तो दिवस मला स्पष्ट आठवतो. सकाळपासूनच तिला रेच होत होते; पण त्या दिवशी श्राद्ध का कायसे नैमित्तिक होते. म्हणून जीव मुठीत घेऊन तिने स्वयंपाक केला. मधेच पुन्हा रेच झाला; तेव्हा पुन्हा स्नान करून ती वाढण्यास आली. तोवर कोणास काही कळले नाही; पण, भर पंक्तीत तिला एकदम भोवळ येऊन ती परतली; आणि त्या जुन्या घराच्या देवघरापाशी निजली, ती पुन्हा काही उठली नाही. जेवण तसेच राहिले. तिला मधल्या घराच्या खोलीत अण्णांनी उचलून नेली, आजोळास तारा देऊन मामांना आणि आजीला बोलाविले. सर्व उपचार झाले, पण उतार पडेना! शके १८१४ शुद्ध आषाढ प्रतिपदेच्या पहाटेस नाड्या आखडल्या. आम्हा मुलांस एक एक करून तिला भेटवून आणले. बाळ सगळ्यात धाकटे मूल! पांच वर्षांचे असेल नसेल. त्याला पाहताच त्या अर्धशुद्धीतही त्या माउलीच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा गळू लागल्या. खुणेने या लेकरास सांभाळा असे म्हणून ती निरवू लागली. बाळाला आईचा फार लळा. क्षणभर दूर होत नसे! त्याला आता नित्याचे दूर करावयाचे!!! तुळशीपत्र आणि काशीचे गंगोदक देवघरात पूजेस होते, ती कुपी आणून ते आईच्या मुखात अण्णांनी घातले आणि भरल्या चुड्यानिशी त्या साध्वीचे प्राणोत्क्रमण झाले. अण्णा आईच्या प्रेतापाशी धायधाय रडू लागले. माझ्या बापूकाकांची आणि अण्णांची भाऊबंदकी भयंकर, पण माझ्या आईचा द्वेष करी असा निर्दय कोणी नसे. बापूकाका आम्हा मुलांस पोटाशी धरून “राधे! माझ्या चिल्यापिल्यांस पोरकी करून तूं कशी गेलीस! आमच्या घरची लक्ष्मी आम्हांस अंतरली.” असे स्फुंदस्फुंदून शोक करू लागले. सगळ्या घरावर मरणकळा पसरली. दुपारी दोन वाजता प्रेत दहन होऊन इतर सर्व मंडळी स्मशानातून परतली. आई काही परत आली नाही!

या घटना मला स्पष्ट आठवतात. आणि मनुष्याच्या मनाचा कोण विक्षिप्तपणा! मला त्यातच एक घटना स्पष्टपणे आठवते की मंडळी दुपारी दोन वाजता परतल्यावर राधाकाकू नावाच्या आमच्या एका नातलगणीने सैंपाक करून आम्हा मुलांस जेवावयास वाढले. तेव्हा अतिशय भूक लागलेल्या मला बटाट्याची आमटी अतिशय गोड लागली. इतकी की अजून कधी चांगली बटाट्यांची आमटी कुठे पाहिली की मला हटकून त्या आमटीची आठवण होते. तशी आमटी पुन्हा केव्हाही गोड लागलेली आठवत नाही. एकदा केव्हासे आईच्या हातचे दूधभात लोणचे; एकदा आंबराईतून मामासह आम्ही संध्याकाळी घरी परत आलो होतो. पाऊस गळून घर चिंब झाले होते; आणि भूक खमखमीत लागली होती, त्या रात्री आईने केलेले फोडणीचे वरण आणि आई वारली त्या दिवसाची राधाकाकूने केलेली ही बटाट्याची आमटी ह्या पदार्थांच्या गोडीचा विसर मला अजून पडलेला नाही. त्या दहा वर्षांच्या वयातील ह्या पदार्थांवाचून जेवणाची अशी मला इतर कोणतीही आठवण येत नाही.

आईच्या मागे आम्ही तिघे भाऊ नि माझ्या पाठची एकुलती एक बहीण, अशी चार भावंडे उरलो. आई वारल्यानंतर माझ्या वडिलांना त्या घरात देखील राहणे असह्य होऊ लागले. आईच्या आवडीसाठी एक नवे टुमदार तिमजली घर जुन्या घराला लागूनच बांधले जात होते, ते झटपट पुरे करून वडील आम्हा मुलांसह त्यात राहावयास गेले. जुन्या घरी बापूकाका एकटेच राहू लागले. ते हातांनीच सैपाक करीत. त्यांचे वय साठीच्या जवळचे होते पण माझ्या वडिलांचे वय चाळीस-बेचाळीसच असावे. बाहेर शेतीभाती, सावकारी, देवघेव, खटले, भांडणे यांचा व्याप, घरी आम्ही लहान चार लेकरे; त्यांचे संगोपन, स्वयंपाक, घरव्यवस्था इत्यादी बघण्यास वडिलांनी दुसरें लग्न करावे म्हणून इष्टमित्र साहजिकच म्हणू लागले. त्या काळी अशी लग्ने नित्याची होत असत; पण आम्हा मुलांवर वडिलांची इतकी निरतिशय ममता होती की त्यांनी तो विचार चित्ती आणलाच नाही. बाहेरचा सारा व्याप संभाळून त्यांनी स्वतः, आई करीना तसे, आमचे लालनपालन केले.

आम्हास गाणी म्हणून निजवावे त्यांनी, थोपटावे त्यांनी, उठवावे त्यांनी, न्हाणावे त्यांनी, कपडे घालावे त्यांनी, सैंपाक करावा त्यांनी. पुढे वडील बंधू व मी सैंपाक करू लागलो. कामास गडीमाणसे असत; पण मुलांचे आई जे जे काम करते, ते ते मात्र, माझे वडील इतर कोणासही कधीही करू न देता, स्वहस्ते करीत का की, मुलांस आईची माया अंतरली असे घडू नये. रात्री आपल्या हाताने केलेले जेवण जेववून आम्हास झोपी जात असलेले पाहत; आणि स्वतः झोपी जाण्यापूर्वी अगदी नियमाने आम्हा निजलेल्या मुलांच्या तोंडावरून आपला ममतेचा हात ते फिरवीत असता, त्या कनवाळू स्पर्शासरशी आई म्हणून कोणती उणीव या जगात आम्हास उरली आहे याची आम्हांस कल्पनासुद्धा येत नसे. आमच्या बंधूंना फक्कड सैंपाक येई; पण, आम्ही आपले सूपशास्त्रात, त्यावेळेपासून अजूनपर्यंत, गणंगचे गणंग राहिलो आहोत.

आईच्या मागे माझ्या धाकट्या भावाची मुंज झाली. लग्नकार्याच्या वेळी माझी आजी, मामी आणि मामा आजोळाहून भगूरास येत. पुढे माझ्या वडील बंधूंचे लग्न त्यांच्या १७ व्या वर्षी, त्र्यंबकेश्वरी, श्री. नानाराव फडके यांच्या पुतणीशी झाले. ती माझी येसूवहिनी. आमच्याच वयाची ती. स्वभावाने इतकी मायाळू की आम्हास ती एक नवीन भावंडच वाटावे. तिची पाठांतरशक्ति इतकी उत्तम असे की त्या वयात तिला कमीत कमी ५०-६० लहानमोठी गाणी तोंडपाठ असत. गाणे म्हणणे तरी किती गोड. तिला उभी गजगौरी पाठ असे. ते गाणे ती म्हणू लागली की त्यातील त्या अद्भुत गोष्टींची ती सरस वर्णने, ती पल्लेदार मंजुळ चाल; वहिनीने, आम्ही ते ऐकत झोपी गेलो की काय म्हणून, मधूनच आम्हांस ते डिवचणे. त्या गोड संध्याकाळीं, मला इतक्याआवडाव्यात की जर एकदम परलोकविद्येच्या तन्त्राने माझी वहिनी माझ्या खुर्चीपाशी आता येऊन उभी राहिली, तर मी तिला पहिली विनवणी हीच करीन की, “ती गजगौरी पुन्हा एकदा म्हण ना वहिनी!” माझ्या आजीपाशीही ते गजगौरीचे गाणे मी तास तास ऐकत बसावे; या वेळी माझ्या वडील बंधूंस इंग्रजी शिकण्यासाठी नाशिकला धाडण्यात आले. अण्णाही कामकाजी खटल्याबिटल्याविषयी नाशिककडे येऊन जाऊन असत. तेव्हा आम्हा मुलांची सर्व काळजी, वहिनीच घेई. तिला आणि माझ्या लहान बहिणीला मी लिहिण्या-वाचण्यास बळे बळे शिकवू पाही. मला कविता

करण्याचा छंद असे. मी वहिनीलाही कविता करण्याचा त्रास देई. त्यायोगे पुढे ती काही काही कविता करू शके. आम्हा दोघा बंधूंस पुढे जेव्हा जन्मठेपेची शिक्षा झाली आणि राजक्रांतीच्या त्या संकटास तोंड देत देत; आणि त्या वियोगाने झुरत झुरत जेव्हा माझी येसूवहिनी मृत्युशय्येस खिळली, तेव्हा तिच्या आणि आमच्या अनेक इष्टमित्रांच्या मनात, माझ्याविषयींच्या त्यांच्या आठवणी, प्रत्येकी, लिहून ठेवाव्या की, ज्या योगे माझे चरित्र उघड प्रसिद्ध करणे (त्या काळी एकाद्या राजकीय दंडनीय अपराधासारखे निषिद्ध होते. ) पुढे तरी शक्य व्हावे, अशी जी इच्छा बळावलेली होती, ती तिच्यापुरती तरी पुरी करण्यासाठी, आमच्या वहिनीने, तिच्या ओळखीपासूनच्या, माझ्या तिला आठवणाऱ्या अनेक आठवणी टिपून ठेवल्या. त्यातील माझ्या, माझ्या वडील बंधूंच्या, भावंडांच्या आणि तिच्या स्वतःच्या, लहानपणाच्या अल्लड दिवसांच्या कहाणीतील काही वेंचे, त्या बालकालातील बोलांची आणि भावनांची एक यथावत गोड आठवण म्हणून तिने लिहिले तसेच देत आहे.

मी तिला आमच्या अगदी लहानपणी लिहिण्यास शिकविले. त्या उपकाराची फेड माझ्या मला आता मुळीच न आठवणाऱ्या अनेक कागाळ्या लिहून ठेवून, त्यांतच त्या कलेचा उपयोग करून, तिने केली ती अशी : -

"माझ्या भाउजींना मी त्यांच्या वयाच्या अकराव्या वर्षीच्या आसपास प्रथम पाहिले. माझे लग्नात त्यांची व माझी ओळख कशी झाली ते सांगते ऐका. अगदी लग्नाची वेळ. मी देखील अक्षदा वहात बसले आहे. इतक्यात ही दोन मुले (माझे दोघे दीर) जेथे लग्नाची तयारी केली होती त्या दारात येऊन उभी राहिली व विचारतात, "हेच का फडक्यांचे घर? आमची वहिनी कुठे आहे?" अशी अक्षरे ऐकताच माझी मावशी त्यना विचारते, "तुम्ही कोणाचे व तुमची नावे काय?" नावे काय असे विचारताच हे आमचे भाउजी सांगतात, "हा माझा लहान भाऊ; त्याचे नाव नारायण दामोदर सावरकर, माझे नाव विनायक दामोदर सावरकर व आमचे वडील बंधू ज्यांचे आता लग्न आहे त्यांचे नाव गणेश दामोदर सावरकर." असे, सर्व मंडळी ऐकताच माझे आईस व मावशीस अति धन्यता वाटली; व लगेच माझी आई म्हणाली, "किती शहाणे, हुषार आणि खडखडीत मुलगे आहेत हे आमच्या येसूचे दीर बरे!" हे सर्व मी फार उल्हसित मनाने ऐकत होते. मला त्यांची ती प्रेमळ सुकुमार व नाजुक मूर्ति किती पाहू असे झाले. खरोखर, मला प्रेम आणि त्याचा आनंद कसा असेतो ते त्या दिवशी समजले. वरील सर्व बोलणे होत आहे, इतक्यात, आमचे भाउजी म्हणतात "का हो, लग्न कुठे लागायचे? आमची वहिनी कोणीकडे उभी रहायची? मला वहिनीचे जवळ बसून सर्व गंमत पहायची आहे."

त्यास मावशी म्हणाली, "बसा असे इकडे. याच बाजूस तुमची वहिनी उभी राहील." तेव्हा, मला समाधान वाटले. भाउजी जवळ बसले. आम्ही वधूवरांनी एकमेकांवर अक्षता टाकणे, कांकण बांधणे झाले, नंतर ते गेले चार दिवस लग्नमंडपी अकडून तिकडे येरझारा घालीत. फक्त जेवणाचे वेळी, "वहिनी घास दे" म्हणून; नि "वहिनीला घास दे" म्हणून; सांगावे. दक्षिणा देण्यास कोणी आले की म्हणावे "वहिनीला दक्षणा द्या". नि मला दक्षणा दिली की पटकन उचलून घ्यायचे. नि कोणी का घेतलीस म्हटले, तर म्हणायचे की "वा, वहिनी आता आमची झाली; म्हणून, दक्षणाही आमचीच." लग्न झाल्यावर आम्ही

(त्रिंबकेश्वराहून भगूरला) घरी जाण्यास निघालो. माझी आई माझी समजूत घालीत होती. “तुला लवकर परत आणू” व इतक्यात भाउजी आले व माझे आईस थोरपणे म्हणतात, “आई, काळजी करू नका. वहिनीचे डोळे आले आहेत. त्यास औषध उपचार करून आता बरे करू.” नंतर, आम्ही निघालो. सारी रात्र गाड्या चालल्या. सूर्य उदयाचे वेळी भाउजी म्हणतात, “किती सुंदर ही वेळ! ते कोवळे किरण दृष्टीला व मनाला कसे आल्हाद देत आहेत म्हणून सांगू! परंतु वहिनी (तुझे डोळे आल्याने) तुला काहीही मजा पाहता येत नाही. वहिनी, सूर्य उदय होताच ती मोरे कशी नाचू लागली आहेत. तो हरणांचा कळप कसा पळत आहे. पण, तू डोळे मिटून बसली आहेस. मी पाणी आणतो, तू डोळे उघड. असे म्हणून, पाणी आणले व मी डोळे उघडले. भगूर आले. दुसऱ्या घरी उतरल्यानंतर, पुनः पुन्हा माझ्या डोळ्यांना अफूचे पाण्याने शेकले का नाही, या मी शेकतो, अशी चवकशी करीत आपल्या बाळमित्रांना सांगतात की आमची वहिनी पहावयास घरी या! पहाटे स्वतःचे घरी जाणे तो मामेसासूनी ऊन पाणी आणले. भावजीनी मला म्हटले, “वहिनी, उठ.” मग माझे डोके मांडीवर घेऊन शेकले. घरी नेण्यास गडी आला, तेव्हा भाउजी म्हणतात, वहिनीला कडेवर घे. बाबा पायांनी चालेला तरी चालेल” घरी आता देवीची पूजा झाली. भाउजी सर्वांस म्हणतात, “खडीसाखर, आमच्या वहिनीचे नाव सरस्वती ठेवले.” दोन तीन दिवसांनी लग्नाची सर्व गडबड कमी झाली; आणि भाउजी, पूर्ववत् आपले उद्योगास लागले.

सकाळी स्नान वगैरे करून शाळेस जाताना आजीस, माईस, अमुक करावयाचे, तमुक करावयाचे सांगत. मराठी शाळेतून १० वाजता आल्यावर कोणास औषधपाणी काय राहिले ते विचारून, नसेल ते स्वतः करावयाचे. जेवण झाले म्हणजे आम्ही काही खेळत असेलो की आमचेमध्ये यायचे व खेळायचे. दोन वाजले, की पुन्हा शाळेत. अडीच-तीन वाजता पुन्हा पाणी प्यायच्या सुट्टीत यायचे. मग, सर्वांनी एका ताटात फराळास बसावयाचे. मग अशी थट्टा करावयाची की काही विचारू नका. आमचे पदार्थ चोरून पळवायचे, मग त्यास त्या वेळेस त्रिंबकच्या जोगळेकरांची एक मुलगी द्यावयाचे घाटत होते तिचे नाव घेऊन आम्ही चिडवायचे की “काळी, काळी गिधाड” की, त्यांनी आम्हास मनगटे धरून उंच उचलावे.. आम्ही ओरडावे, मग आमचेकडून मान्य करून घ्यावे, की “आम्ही आता तसे म्हणणार नाही;” की, मग सोडावे. मग ते पुन्हा शाळेत जात. पाच वाजता येतात न येतात, तोच घरादारांशी मुले उभी असत. ती खेळावयास जात. परत येताच, जेवण आटोपून निजत.

मग हळद कुंकू आले. तेव्हा एक सारखी अशी गौर मांडा, तसे दिवे लावा, वेणी अशी घाला, अंगात काय घालता? असे सारखे विचारणे, सांगणे, चालले आहे. इतक्यात एक रांगोळी स्वतःच काढली. मला म्हणतात- “कशी छानदार रांगोळी आहे? तुला काय येते?” मी म्हटले, “झेला. तुमच्या या रांगोळीचे नाव काय?” तर चटकन. थट्टा करीत म्हणतात, “फुटका पेला”. तेव्हा सर्वांस हसू आले. त्यांस रांगोळी काढायचा नाद असे. नि कागदाचे कातर कामही करीत. बायका आल्या. त्यांनी मी नवीन लग्नाची म्हणून प्रत्येकी नाव घ्यावयास सांगावे, तेव्हा त्या जाताच त्यांनी म्हणावे- “वहिनी इतके निरनिराळे उखाणे तू शिकलीस तरी कुठे?” मग वसंतपूजा होती. भावजींनी मामीस त्याचा अर्थ विचारला. मग तो ऐकून पूजेच्या वेळेस गुलाल, हळदकुंकू, खिरापत. सर्वांचे निरनिराळे उखाणे मी घेतले. तेव्हा, मला परत त्या

वस्तू देताना, भाउजी तिकडचा पक्ष घेऊन म्हणतात- “बाबा तू पण उखाणे घे.” आणि त्या सर्व वस्तूंवर, नवे नवे उखाणे तत्काळ रचून, भाउजींनी सांगितले; नि वस्तू देवविल्या.

या वेळी भाऊजी अकरा वयाचे अगदी लहान; पण वाचनाचा नाद त्यांना फार. आमचे गाव ते खेडेच होते. पण तिथे ४-५ वर्तमानपत्रे येत. पुणेवैभव, गुराखी, केसरी, जगद्हितेच्छु व आणखी काही असतील तर मला आठवत नाहीत. परंतु ती सर्व पत्रे आणावयाची, वाचावयाची, त्यांची त्यास द्यावयाची. कुठे कादंबरी पाहिली वाच, पुस्तक पाहिले की वाचलेच, इतका लहानपणापासून वाचण्याचा नाद!

एक दिवस काय झाले! जेवण जेवून हात धुवून सद्रा घातला नी समोरच्या घरी किती वाजले ते बघायला गेले. तो सोवळ्याची लंगोटी तशीच. तेथील सर्व मंडळी हसली; तसे, त्यावर कोटी करून म्हणतात, “मला लंगोटी धुवायची होती आज म्हणून असे केले.”

मग मी माहेरास गेले. तीन महिन्यांनी मंगळा-गौरीकरता पुन्हा भगुरास आले. ही माझी सासरची दुसरी खेप. मंगळागौरीचे आम्ही संध्याकाळचे फराळास बसलो. त्या दिवशी जेवताना बोलायचे नसते. भाउजी पंक्तीत आले; नि विचारू लागले, कोणास काय हवे? माझे मावसनणंदेने लिहून दाखविले, “तांदूळ हवे पण मला लिहिता येत नव्हते. तेव्हा मी नुसत्या खुणा केल्या. तसे फराळ झाल्यावर मला विचारतात, “वहिनी, तुला लिहिता वाचता येत नाही? तुला कोणीही शिकवले नाही?” मी, “नाही” सांगितले. तसे म्हणाले, “मी तुला शिकवीन.” मग आमच्या सगळ्यांबरोबर झोपाळ्यावर बसले, ओव्या म्हटल्या. मग मामीशी कट करून म्हणतात - “मामी आपण निजू आता, मला झोप आली.” मला, त्यांची लबाडी कळली नाही; मी आपली खरीच निजले. तसे उठले नी माझे हात पाय बांधले, चिडवू लागले. मी रागावले तसे म्हणतात - “तुला आवडत नसेल तर मी नाही हो थट्टा करणार!” पण, दुसरे दिवशी माझी काशीयात्रा केली.

दिवाळसणाला ही सर्व मंडळी माझे माहेरी (त्रिंबकेश्वरी) आली होती. काही दिवसांनी मी सासरी तिसऱ्या खेपेस आले. घरी स्वैपाकास ब्राह्मण होता. तो गेला. तेव्हा, मला काही काही पदार्थ मुळीच करता येत नसत; ते मला भाउजींनी शिकवावे. पाहुणे आले म्हणजे आम्ही दोघे मिळून सैंपाक करावा; मग खेळावे. असे चालताना, मला लिहिता वाचता येत नाही त्याची त्यास आठवण झाली. मला शिकवू लागले. मला अक्षरओळख चांगली झाली; पण पुढे मामंजी भाउजींना म्हणू लागले, “बाळू तिला कशाला शिकवतोस, तिचे डोळे अधू आणि ते बिघडतात.” तेव्हा, वडिलांच्या म्हणण्यासाठी त्यांनी पाटी घेऊन एक सारखे शिकवणे बंद केले.

मग चौथ्या खेपेस चैत्रात मी सासरी आले तेव्हा भाउजींचे वय १२ वर्षांचे होते. त्यांचे वेळापत्रक ठरलेले असे. त्याप्रमाणे वागत. त्यांचा अभ्यासाचा वेळ ठरलेला. देवीची भक्ति त्यांना फार. नेहमी पूजा स्वतः करीत. ध्यान करावयास लागले म्हणजे त्यना काही दुसरे खरोखरच कळत नसे. लहान वयी इतकी एकाग्रता मी दुसरी कुठे पाहिली नाही. पूजा, ध्यान आटोपून जेवत. मग अभ्यासास बसत. त्यावर तिथेच कालिकेची तसबीर लाविली होती. वरचेवर तिजकडे बघावयाचे, अभ्यास करावयाचा. मी, बाळ, माई (माझी लहान नणंद) काही खेळत बसू. नाट, सोंगट्या, बुदबळे, चूलबोळकी. इतक्यात कधी त्यांना कटाळा आला

की ते येत, आम्ही खेळू तिथे काही खेळत, कंटाळा गेला की पुन्हा जात अभ्यासाला. कधी कंटाळा आला, कीं, म्हणत "आरसा आण पाहू!" आरसा दिला, की, वेडीवाकडी तोंडे करून त्यात बघावयाचे नि म्हणावयाचे "मी असा असेतो तर तुम्हास आवडतो का? आम्ही म्हणावे तसे असता तरी आवडता नि आता तर आवडताच!" कधी परसाकडे जाताना वाचावयास वर्तमानपत्र नेत. येऊन हातपाय धुताना कोणास नकळत कुत्र्याच्या पिल्लासारखे ओरडत. सर्वांस वाटे खरच पिलु आहे. आमच्या परसात फुलबाग असे. ती झाडे खाण्याकरिता बकऱ्या येत. त्या बकऱ्यांसारखे ओरडायचे. मंडळींना वाटे खरेंच बकरी आली की काय! पाहतात तर हे! कधी आम्ही त्यास चिडविले तर आम्हास धरीत नि शिक्षा काय तर आम्ही एका लहान कोनाड्यात बरोबर डोकी घालून काही वेळ उभे राहिले पाहिजे. रविवारी तर खूपच खेळायचे. आगगाडीचा खेळ खूप आवडे. झोपाळ्यावरचे त्यांचे गाणे पेशव्यांविषयीचे असे. मी लिहिले तर हसाल. हसा पाहिजे तर. मी त्यांचे सर्व काही लिहिणार. ते गाणे म्हणत, "रथ मोठे मातबर केले, श्रीमंतांचा जय झाला. कारले येथे सैन्य जमले. पर्वतीचे देवळात दर्शनास गेले. तेथून पुण्यास कूच केले. जयजयाची तोफ सुटली" असे म्हणून, मोठा झोका घ्यावयाचा. अशी भारी आनंदी वृत्ति. मला बरोबरीचे तेच. वन्सं लहान, बाळ त्याहून लहान; तेव्हा, ते बोलले नाहीत तर मला करमेनासे होई. मग मी म्हणे, "रागावू नका न; मी तशी चूक पुन्हा नाही करणार," की पुन्हा हसू खेळू लागत.

त्या वेळेस ते पेशव्यांची बखर वाचीत असत. त्यात सवाई माधवरावांचा फोटो असे. तो त्यांनी कागदावर रेखाटून काढला. आम्हाला फार आवडला. मग त्यांनी सवाई माधवराव रंग खेळले ते गाणे केले व मला शिकविले. एकदा झोपाळ्यावर खेळता खेळता एकदम खाली निजले. डोळे वेडेवाकडे करून, जीभ बाहेर आणून, "ए आई, ए वहिनी' असे हाका मारू लागले, तशा वन्स घाबरल्या. मी म्हणाले, "थट्टा करीत असतील." तसे भाउजी म्हणतात, "दुसऱ्याचा जीव जातो तरी वहिनीची थट्टाच. बहिण ती बहीण, वहिनी ती वहिनी. बहिणीला माया ती वहिनीला कसली?" तेव्हा मला वाईट वाटले. मी रडू लागले. तसे उलट खाऊन मला समजावू लागले. "अग वहिनी, माई चार दिवसांनी सासरी जाईल, नेहमीची तूच आहेस" असे एकाद्याची उलटसुलट समजूत पाडण्यात कसे पटाईत असत."

काही दिवसांनी बाळाची मुंज झाली. नि लगेच वन्सचे लग्न झाले. (त्यांना त्रिंबकेश्वरचे काळे यांचे घरी दिली असल्याने आणि लग्न त्रिंबकलाच होण्याचे असल्याने, सर्व मंडळी त्रिंबकलाच गेली.) आमची मंडळी माझे माहेरी म्हणजे फडके यांचे घरीच उतरली. मग लग्न वगैरे लागले. मग भाउजी आणि स्वतः त्यांचेबरोबर जायचे होते. आणखी काही मंडळी पर्वतावर गंगाद्वार पहावयास गेली. तेव्हा भाऊजींच्या जिवावरचे एक संकट गेले. पर्वतावरून उतरताना, पायऱ्याचे बाजूंनी असतात त्या कठडेवजा पायऱ्यांवरून उतरायची पैज लागली. पन्नास एक पायऱ्या उतरल्या, तोच पाय निसरून पडले. पडताना 'भद्रकाली' अशी आरोळी मारली. ती मागील मंडळींनी ऐकली व येऊन पाहतात तर कपाळाला दोन खोका पडल्या आहेत व त्यातून रक्त वाहत आहे; असे पाहताच, तिथे एक गोसावी राहत असे त्याचेजवळून पाणी घेऊन, घाव धुऊन त्यात पाणकणीस भरले व त्रिंबकेश्वराचे कारभारी जोगळेकर, यांनी आपले जरीकाठी उपरणे फाडून तेलपट्टीही बांधली. घाव बरा झाल्यावर चार आठ दिवसात सर्वजण भगूरला परत आलो. मे महिना संपला

आणि जूनला, आमचे भाऊजी, नाशिकास इंग्रजी शिकावयास गेले; तेव्हा त्यांना तेरावे वर्ष लागले होते. मराठी पाच इयत्ता पुऱ्या झाल्यावर त्यांनी दोन इयत्तांचा इंग्रजी अभ्यास अगदी स्वतःच्या उद्योगाने घरी बसल्या केला होता. ते जाताच शिवाजी स्कूलमध्ये तिसरीत बसले व चार महिन्यांनी चौथीत बसले. व गणपती उत्सवास घरी आले. ते पूर्वी दोन वर्षांपासून मेळा काढीत. पण त्यात पुढे अभंग वगैरे म्हणत. पण या वर्षी उत्सव मोठा केला; तेवढ्या लहान वयात स्वतः सात आठ पदे केली. भगूरला उत्सव त्यांनीच काढला. मुले जमवून मामंजी घरी नसताना घरचे मोलवान कपडे देऊन मुलांचा मेळा भालदार, चोपदार, काढला. पदांतील थोडे आठवते ते देते :

*सद्बुद्धि आम्हासी दे गजानना।*
*शेंदूर चर्चित शीर्षी मूषक वाहना।*
*सरळसड वक्रतुंड कस्तुरी टिळा।*
*लंबोदर मंगलाकार रूपसुंदरा।*
*जाणुनिया नमित तुला भक्तवत्सला।*
*उद्धारा आर्यजना आर्य भूमिला।*
*त्या स्वतंत्र छत्रिं आर्य ठेवणे त्वरे।*
*प्रार्थुनिया कार्याला लागलो बरे।।*

पुढील पदे मला आठवत नाहीत. याचवेळी स्वदेशीचा फटका केला.

आता मला आणखी थोडी गंमत आठवते. ती देण्यात काही मागेपुढे झाले आहे. पण ते इथेच देते. पुढे कोणी तपशील, ते जुळवून घेईल. घरी एकदा पुष्कळ मंडळी होती. तात्या आमचे पंक्तीचे वेळी हळूच ओरडायचे "ॐ भवति भिक्षां देहि." बायका फसायच्या की, खराच माधुकरी आला. एकदा मामेसासूबाओंनी म्हटले की, "घाला ग खरच त्याला माधुकरी". तर भाऊजींच्या पक्षात आम्ही खरेच पोळी टाकली. तसे जाऊन उलट मामंजींपाशी आमचे गाऱ्हाणे करतात की त्या माझे अंगावर माधुकरी म्हणून पोळी टाकतात. पण मामंजींनी त्यांचे कपट ओळखले. एकदा असे झाले की त्यांनी मला गजगौरीचे गाणे जे त्यांना फार आवडे, म्हणावयास सांगितले. मी म्हटले तसे त्यातले एक कडवे माझे सोंग करीत धोतराचा पदर डोक्यावर घेऊन आपण म्हणू लागले. सगळी मंडळी कौतुकाने हसू लागली. तसे मध्येच म्हणतात, "अग ओटी बिटी भराल की नाही माझी काही!" तेव्हा बायका मंडळींनी म्हटले "भर ग माई ओटी! तेव्हा माईंनी (वन्संनी) त्यांना कूंकू लावले नी ओटी भरली. तसे मामंजीकडे तडक जाऊन सांगतात, "मला ह्या साऱ्या जणींनी, बळाने धरून, कुंकू लावले नी ओटी भरली. त्या वेळेस मामंजींना ते खरे वाटले आणि ते माईला उद्देशून, पण सगळ्यांना लावून म्हणाले "काय ग अशी का करता दांडगाई त्याच्याशी!" तसे मामंजी जाताच, सगळ्याजणींपुढे टाळ्या पिटीत, भाउजी हसू लागले. नि म्हणू लागले, "कशी उलटून दिली बाजू? कशी उडाली?" पण त्यांचा कोणास राग येत नसे. असे त्यांचे बोलणे गोड लागे. ते घरात आले म्हणजे सगळ्यांना आनंदी आनंद वाटे. केव्हा केव्हा दोघे भाऊ बोलताना प्रकरण चिडे, मग माझे पती मारायला आले की, त्यांनी पळून मजजवळ यावे की, मग माझ्या पतीचा नाईलाज व्हायचा. तसे हे माझ्या मागून

आणखीन चिडवायचे की कसा हा माझा दुर्भेद्य किल्ला आहे? आता मला इथे येऊन धरण्याची कोणाची छाती आहे? असे काय काय म्हणत की, फार राग येई माझ्या पतींना. पण मजजवळ येता येत नसल्याने तिकडचे काही चालत नसे. एकदा असेच काही होऊन भाउजी माझ्या मागे आले तेव्हा त्यास दुरून कांदे मारण्यास आरंभ केला, तर भाउजी कांदे चुकवीत मोठ्याने म्हणतात, “बाबा वहिनीला कांदे मारतो आहे बरं का?” तसे कोणी ऐकेल या भीतीने बाहेर जायचे, असा विचित्रपणा करीत. बागेत बकऱ्या येत त्यांना धरायचे. मला म्हणायचे दार अडीव. बकरी धरली तर माझी खूप वाहवा करायचे आणि जर मी भ्याले नि बकरी सुटली, तर माझी अशी फजिती करून, मला फुलपाखराचे फार भय वाटे ती मुठीत धरून माझ्यावर फेकायचे ही शिक्षा.

याच वयात त्यांनी देशी कापडावरचा फटका केला. नाशिकला कुठे सभा असली की हटकून जायचे. नेहमी वाचनालयात वाचायचे, पुन्हा अभ्यासात पटाईत. फारच लहान वयापासून त्यांचे हे वाचन पाहून जो तो कौतुक करी. नाशिकचे पुढारी आणि प्रख्यात कवी बळवंत खंडोजी पारख असत. त्यांना देखील कविता आणि तरतरी पाहून फार आनंद वाटे. ते ह्यांना बोलावून न्यायचे. सभेत ओळख करून द्यावयाचे. ज्यांनी त्यांनी म्हणावे काय हुशार हा मुलगा? (पारख त्यांचे वडिलांस भेटून म्हणाले “अण्णासाहेब, हा असा पोरगा फार दिवस लाभणार नाही. यास दृष्ट लागेल) तो एकदा खरोखरच दृष्ट लागली. मामंजींना पत्र आले की तात्यास ताप येत आहे, घेऊन जा. मग मामंजी गेले नि घेऊन आले. (त्यांचा दृष्टीवर विश्वास) त्यांनी भाऊजींची नाना प्रकारची दृष्ट काढली पण उतार पडेना. तापात सारी बडबड शाळेची नि सभातील (राजकारणाची). पंधरा तीन वारांनी ताप उतरला. मग घरीच अभ्यास करावयास लागले. मग पुन्हा नासिकला गेले. ही माहिती त्यांच्या चवदाव्या वर्षाची. त्यास वाचनाप्रमाणे लिहिण्याचाही फार नाद. त्यांचे सर्व सारसंग्रह नावाचे एक पुस्तक असे. त्यात वाचलेल्या पुस्तकांचा सारांश आपल्या शब्दात टिपून ठेवीत. उतारे उतरून घेत. नाशिकला प्रथम दोघे भाऊ हातांनी स्वयंपाक करीत. कारण, खानावळ वाईट. पण पुढे खानावळीत जाऊ लागले. (सुट्टीत भगूरला आले. ) मग त्यांना देवी आल्या. वडिलांनी स्वतः शुश्रूषा केली. थोड्यावरच निभावले. अंगावर वण कुठेच उठले नाहीत.”

आता वहिनींच्या चरित्रातील उतारा इथेच सोडून माझा वृत्तांत पुढे चालवू.

### “माझे बालमित्र”

माझी आई वारून आम्ही नव्या घरात येईतो म्हणजे माझे वयाचे दहाव्या वर्षापर्यंत माझे खेळगडी कोण होते हे मला स्पष्टपणे आठवत नाही. पण त्यापुढे मात्र माझेभोवती एक संघटित मित्रमंडळ जमत गेले ते मला आठवते. त्यात ज्यांचा अगदी माझ्याशी घरोब्याचा संबंध आला आणि जे अगदी सामान्य आणि बापड्या स्थितीत असूनही माझ्या आणि माझ्या घराच्या अत्यंत उपयोगी पडले आणि कोणाचीही लालूच नसताना जे माझ्या घरावर स्वतःच्या घराहून अधिक लोभ करीत, अधिक अभिमान बाळगीत ते राणू शिंप्याचे मुलगे परशुराम शिंपी आणि राजाराम शिंपी हे होत. ही दोन्ही मुले आमच्याशी दिवसभर खेळावयास येत. जेव्हा अण्णा नाशिकास जात तेव्हा रात्री सोबतीस येत. वेळप्रसंगी हरघडी अडलेले काम करीत. घरातील दागदागिने, वस्त्रपात्र सांभाळीत. त्यांच्या घरचा तमासगीर मंडळींचा ताफा असे. हे दोघेही

लावण्या म्हणण्यात पटाईत असत. त्यात परशराम हा स्त्रीपात्राचे नाचण्याचे कामही करी. त्याचा त्याविषयीचा मंडळीत लौकिक असे. माझे नादाने वर्तमानपत्रे वगैरे वाचण्याचा छंद लागून त्या योगे त्यांचा मनोविकास होत गेला. माझ्या चिमुकल्या राष्ट्रीय चळवळीत आणि राजकारणात ते प्रमुखपणे भाग घेत. त्यांचे तमाशाचे ताफ्यासाठी मी काही उपदेशपर आणि राजकीय लावण्या आणि झगडे त्यांस करून दिले. त्या लावण्या पसंत पडून त्यांच्या वडील मंडळींनी जेव्हा तमाशात म्हटल्या आणि एवढ्या मोठ्या ताफ्याचा शाहीर म्हणून मला या-बसा झाली, तेव्हा त्या लहान गावच्या राजसभेतील त्या चिमुकल्या राजकवीस काही थोडी आत्मप्रौढी वाटली नाही. आम्ही आजारी पडलो म्हणजे आमची शुश्रूषाही रात्रंदिवस करीत. आमच्या घरावर संकट आले म्हणजे त्यांस रडू येई. आमचे बरे झाले म्हणजे त्यांस बरे वाटे व आनंद होई. “राजा- परशा”च्या या जोडीवर आमच्या कुटुंबाचीही घरातील मुलांप्रमाणे ममता असे. वडील घरी नसले म्हणजे मी त्यांचेबरोबर घरी एका पंक्तीस जेवावे. लहानपणापासूनच मला जातिभेदाचा तिटकारा वाटे. हे शिंपी मी ब्राह्मण ही कल्पनाच मला उपमर्दाची भासे. माझ्यावर त्यांच्या घरातील माणसांचाही फार लोभ असे. त्यांच्या भावजया आणि आई ह्यांनी माझ्यासाठी ताजी भाकरी आणि लाल लाल लसणाच्या तिखटाची चटणी, मोठ्या प्रेमाने आणि विशेष काळजीने करावी आणि ती मी खावी. तेव्हा ब्राह्मणाचा आणि जहागिरदाराचा मुलगा आपल्या घरी जेवला याचे त्यांना केवढे उपकार वाटावे, अभिमान वाटावा! भगूरला मंगळवारी बाजार भरे. त्यात त्या दोघा भावांची घासलेट विडीकाडीची दुकाने असत. संध्याकाळी खाऊचे पैसे त्यांना त्यांचे आईबाप देत. त्यांच्या त्यांनी रेवड्या आणाव्या. त्यातली पहिली भेट मला नेहमी मिळे. त्या रेवड्या मला फार आवडत. आणि त्या खाताना माझ्या वडिलांनी शिकविलेली मोरोपंतांची पहिली आर्या जेवणाचेवेळी ब्राह्मण त्रिसुपर्ण म्हणतात त्या नियमाने मी म्हणत असे की - नित्य तुम्ही प्रभुपाशी प्रेमे बर्फी नवा खवा खावा। तरि म्यां एके दिवशी रेवडिचा स्वाद का न चाखावा।। माझ्या मित्रमंडळात अगदी बालपणापासून जे राजकीय तेज खेळत असे, त्याचा अंश त्यांच्या त्यांच्या शक्तीप्रमाणे ह्या दोन्ही मुलातही पकाशल्यावाचून राहिला नाही. पुढे नाशिकला अभिनव भारताचा धुमाकूळ उडाला त्यावेळी दोघांनीही त्या गावात स्वदेश स्वातंत्र्याची क्रांतिकारक चळवळ प्रसारण्यास्तव यथाशक्ति झटत रहावे. पुढे भगूर गावचे नाव ज्या देवळाली कँपमधून फुटून निघणाऱ्या चळवळीमुळे हिंदुस्थानच्या विधिसमितीपर्यंत गाजले. त्या प्रसंगीच्या आणि इतर सार्वजनिक चळवळीत, हे दोघे त्यांच्या एवढ्याशा सामर्थ्याप्रमाणे थोडेफार कार्य करीतच असत. परशुराम आम्ही सुटून येण्यापूर्वी वारला. पण राजाराम आम्ही सुटून आल्यानंतर आम्हास भेटला. लहानपणी केवळ स्नेहभावाने त्यास आमच्या घराण्याविषयी जो घरोबा वाटे तो पुढे त्यांच्या बुद्धीस जे अद्भुत वाटावे असे आमचे पराक्रम आणि कीर्ति जसजशी वाढत गेली तसतसा आमच्याविषयी देशभक्तांच्या पूज्यतेत परिणमित झाला होता. आम्ही सुटून येताच राजारामाने आमचे एक कुटुंबातील दुर्मिळ झालेले छायाचित्र (फोटो) आमच्या हाती दिले. आम्ही ते पाहून म्हटले की, “ही दुर्मिळ छाया! बरे झाले. तू चांगली भेट दिलीस. मी नेतो हे.” तेव्हा राजाराम कळकळून म्हणाला, “मी तो तुमचा फोटो तुम्हालाही देणार नाही.” जेव्हा अभिनव भारताच्या सभासदांची धरपकड आणि छळ झाला, जेव्हा तुमचे नाव घेणे अपराध होई आणि तुमची पदे

किंवा छाया ठेवणे क्रांतिकारक कृत्य समजले जाई तेव्हा माझ्या झडतीत देखील मी हा फोटो वरखाली दोन फळ्या एकमेकास टेकून आत दडपून ठेवला. हे पहा त्यावर काय आहे? हे असे आज चवदा पंधरा वर्षे मी त्यावर गंधफूल वाहून त्याची पूजा करीत आलो. तर तो मी कसा दूर करू? माझा भाव जाणून मला क्षमा करावी." "याची नवी प्रत काढून तुला देतो" "हात जोडतो ही जीर्ण प्रतच मला हवी; ती माझ्या पूजेची प्रत आहे." त्या मूळच्या प्रतीच्या नव्या प्रती काढल्या आणि ती त्याची पूजेची प्रत त्यास परत देण्यात आली. तेव्हा त्यास समाधान झाले! या प्रसंगानंतर लवकरच हा माझा भाविक दिन बापडा बालमित्र वारला. सध्या त्याचा धाकटा एक भाऊ जानकीराम राणूशेट शिंपी हा तेवढा आहे. आणि विनोदी नकला करण्याच्या कलेमुळे त्याची राजेराजवाडयातही थोडीफार प्रसिद्धि झालेली आहे.

माझ्या लहानपणचा माझा दुसरा मित्र गोपाळ होय. माझ्या सवंगड्यांच्या प्रभावळीत हा माझा बालमित्र केवळ सवंगडीच म्हणून नव्हे 'सहकारी म्हणूनही शोभे' तेथील गावच्या कुळकर्ण्यांचा हा मुलगा; वयाने माझ्याहून मोठा असून मी मराठी चौथीत असता तो सहावीत असे. त्याचे घराणे योग्यतेने प्रतिष्ठित पण परिस्थितीमुळे बापडे झालेले होते. मला सहाव्या मराठी पुस्तकातील स्यमंतक मण्याचे आख्यानादिक मोरोपंती कविता फार आवडत. अशी पुस्तके मी गोपाळकडून महिना काही पैसे देऊन आणवी. मी कविता रची त्या सुंदरपणे लिहिलेल्या दिसल्या म्हणजे मला अधिकच सुंदर भासत. पण माझे अक्षर तसे वळणदार नसे. म्हणून कुळकर्णी वळणाचे घोसदार अक्षर टापटिपीने लिहिण्यात पटाईत असलेल्या गोपाळला मी त्या लिहून काढण्यासाठी तसदी द्यावी आणि मोठ्या आग्रहाने त्याचे लिहिणावळीचे पैसे त्यास पोचवावे. त्यासही वाचनाचा आणि ज्ञानार्जनाचा भारी नाद असे. वर्तमानपत्रे, पुस्तके, पोथ्या आम्ही एकत्र वाचाव्या. आमच्या बाळमित्रांच्या चिमुकल्या राजकीय चळवळीत माझा प्रमुख सहकारी गोपाळ असे. पुढे जेव्हा त्या चळवळीस अभिनव भारताचे विराट देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले, तेव्हा त्यातही माझा बालमित्र आपल्या बुद्धीने, निस्सीम देशभक्तीने आणि एकनिष्ठ स्नेहाने प्रेरित होत्साता. माझ्या पाठीशी हाक मारताच उभा राही. अर्थात लवकरच त्यावर राजकोपाच्या शनीची दृष्टि वळली. त्याचे कुळकर्णीपणाचे अधिकार छिनावले गेले. दारिद्र्याने अतिशय गांजला पण तो च्युत झाला नाही. भगूर गावास १९०६ च्या पहिल्या प्रचंड आंदोलनात महाराष्ट्रातील गावातील प्रमुख गावाच्या पदवीस जर कोणी पोचविले असेल तर ते आमच्या राष्ट्रीय आंदोलनाच्या तेजाने स्वतः उद्दीप्त होऊन ते गाव आणि त्याचा आसमंत त्या दीप्तीच्या संचाराने थरारून सोडणाऱ्या माझ्या या बालमित्रानेच होय. मी अंदमानात गेल्यावर हाच माझा एकनिष्ठ बालमित्र गोपाळ हरिभक्तपरायण गोपाळराव आनंदराव देसाई या नावाने उभ्या महाराष्ट्रात आपल्या कक्षेतील एक अत्यंत चिकाटीचा कार्यकर्ता म्हणून प्रसिद्धी पावला आहे.

माझी एक दूरची मावशी धोपावकरांकडे दिलेली असे. तिचा मुलगा वामन, दादा कुळकर्ण्यांचा मुलगा बाळू, रावजी आणि त्रिंबक शिंपी, भिकू वंजारी, बापू, नथू ही मुलेही माझे लहानपणचे एकनिष्ठ अनुयायी असत. माझ्या लहान भावाचे त्या गावातील लहान खेळगड्यांपैकी एकाचे नाव तर अगदी प्रथमोल्लेखनीय झालेले आहे. ते म्हणजे त्या काळी नोकरीनिमित्त त्या गावी वसलेल्या श्री. आठल्ये

यांच्या लहान मुलाचे, जे आज सातारचे सुप्रसिद्ध डॉ. आठल्ये झालेले आहेत त्यांचे. पुढे 'अभिनव' भारतावर ब्रिटिशांनी शस्त्र उपसल्यावर सातारच्या या अभिनव भारताची शाखा काढण्यासाठी डॉ. महाशयांवर खटला होऊन क्रांतिकारक कटास्तव शिक्षाही झाली. माझ्या वाचनाचा, संगतीचा, राजकीय आकांक्षांचा, राजकीय खेळांचा, उत्सवांचा या सर्व मंडळींवर चिरस्थायी परिणाम होऊन, तदभावी तशा खेडवळ स्थितीत जो होणे बहुधा दुर्घट होते, असा त्यांच्या बुद्धीचा आणि शक्तीचा त्या त्या प्रमाणात विकास झाल्यामुळे, पुढच्या अभिनव भारताच्या प्रचंड चळवळीत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आपला लहान मोठा भाग उचलण्याची त्यांच्या मनात पूर्व सिद्धता, तेव्हापासूनच होत गेली.

आई वारल्यानंतर माझ्या राजकीय आणि धार्मिक संस्काराची आणि क्रियेची वाढ झपाट्याने होत गेली. विटाळ वेडाचा, फाजील सोवळ्या-ओवळ्याचा, जातिभेदाचा, मला तेव्हापासूनच तिटकारा येई. माझा एक आवडता पोरखेळ म्हणजे देवळे बांधणे हा होता. लहान लहान लाकडी तुकडे एकत्र करावे. आपल्या ह्या मित्रासह हाताने मातीच्या विटा पाडाव्या. रावजी शिंपी याजकडून लुकणाच्या मूर्ती करवाव्या, आणि आजच्या मापात गुडघ्याएवढी, पण त्या दहाव्या-अकराव्या वर्षी, प्रचंड वाटणारी देवळे, आम्ही बांधावी. दुसरा खेळ म्हणजे पालखी काढणे; त्यासाठी एक लहान पालखी वडिलांनी करून दिली. श्रावणी सोमवारी, आम्ही गोंडे बांधून, मोठ्या थाटामाटाने, तिची गावात मिरवणूक काढावी. आमच्या लहान मंडळीतच पांडवप्रतापादि ग्रंथांचे सप्ताह करावे. समाप्तीचा उत्सव करावा. यावेळी माझे वडील केसरी पत्र मजकडून वाचवून घेऊ लागले. मुंबईचे 'गुराखी', पुण्याचे जगत्हितेच्छु', आणि 'पुणेवैभव' ही माझी आवडती पत्रे असत. किती मिनतवारी, किती लाडीगोडी करून त्यांच्या वर्गणीदाराकडून मी ती आणवावी. ती वाचताना बळेबळे मुले जमवून त्यास वाचवून दाखवावी. निदान त्यांच्यातील चळवळीचा सारखा ऊहापोह त्या मुलांशी करीत जावा. माझ्या घरी वडिलांच्या पुस्तकांच्या आणि पोथ्यांच्या फळ्या असत. रविवारची माझी आवडती करमणूक म्हणजे त्या फळ्यांवरच्या पोथ्या आणि पुस्तके पुन्हा काढून, पुन्हा चाळून, पुन्हा लावून ठेवणे ही. कित्येकदा ती पुस्तके फळ्यांवरती लावण्याकरिता घडवंचीवर चढताना मी पुस्तकांतसुध्दा पडे. कित्येकदा वडील रागावत, पण माझा तो छंद सुटेना.

**"आरण्यके"**

एकदा एक संस्कृत हस्तलिखित पोथी लाल हिरव्या शाईच्या शब्दांनी मध्ये मध्ये शोभविलेली अशी, उघडून मी वाचत बसलो. काही कळेना तरी नुसत्या वाचण्याने त्याची गोडी वाटे. तोच एखादा अपशकून अकस्मात घडावा तसे दचकून माझे वडिल वर आले आणि ती पोथी हिसकीत म्हणाले, "वेड्या! हे काय करतोस! ते अरण्यक आहे, ते घरात वाचू नये नाही तर घराचे अरण्य होते!" असे बजावत ती पोथी गुंडाळून ठेवते झाले. त्या काळी त्या अर्थवादाचा एका अस्पष्ट भयावाचून मजवर, काय परिणाम होणार होता! पण आज, त्या फलश्रुतीची दंतकथा किती कौतुकास्पद वाटत आहे! त्या आरण्यकांतील आाणि त्यांच्या अंताशी आरंभ होणाऱ्या उपनिषदांतील विचार, ज्याला या संस्कृतच्या मायेच्या घरात राहावयाचे आहे त्याने खरोखरच वाचू नयेत. निदान निष्ठापूर्वक तरी वाचू नयेत. नाही तर त्याच मायेच्या घरास, 'जनाकीर्णं मन्ये हुतवहपरतं गृहमिव' असेच, तृष्णा वह्मीने पेटलेले मानीत तो त्याचा

त्याग करण्यास कसा सोडील? आणि 'सर्वास्ते फासुका भग्नां गृहकूटंच नश्यति' म्हणून उर्ध्वबाहु विरोदन करीत एखादया बुध्दासारखा तो बाहेर पडल्यावाचून कसा स्वस्थ बसेल! त्या मायेच्या घराचे रान झाल्यावाचून कसे राहील! कारण त्याच्या गृहाच्या 'त्यागेनैके अमृतत्वमानशुः! या गर्भितार्थास व्यक्तविणारी ही दंतकथा किती कौतुकास्पद आहे! आणि तिच्या त्या गर्भितार्थाची ती जाणीव पार पुसटून जाऊन तिच्या शब्दासच अक्षरशः सत्य मानणारा विश्वासही किती आंधळा आहे! पाण्यात पाहशील तर दात पडतील या फलश्रुतीप्रमाणेच ही फलश्रुती हो उत्तानार्थी एक बुजगावणे आहे आणि माझ्या बंडखोर तात्त्विक मतीला ते उत्तान अर्थाचे बुजगावणेच तेवढे दाखविण्यात यऊनही मी त्यास न बुजता जसा, "कुठे दात पडतात," म्हणून दात काढीत पुनः पुन्हा पाण्यात पाही तसाच वडिलांस टाळून ती आरण्यकाची रंगीत शाईची शोभिवंत पाने पुनः पुन्हा वाची नि पाही. ती नुसती वाचून घराचे रान कसे होणार, म्हणून मनाशीच पाखंड उपहास करी.

**"पहिले पान नसलेला इतिहास"**

त्याच फळ्यांवरील आणखी एका फाटक्या इंग्रजी पुस्तकाने माझ्या मनावर एक चिरंतन परिणाम केला होता. तेथे एक Short History of The World नावाच्या पुस्तकाचा कोणतासा भाग होता. मी घरीच तिसऱ्या इयत्तेपर्यंत इंग्रजी शिकलो होतो. इतिहासाची मला भारी जिज्ञासा. त्या पुस्तकाच्या नावासरशी, आपले कोट कल्याण करणारे, एखादे अकल्पित घबाड सापडले असा आनंद झाला. वाटले आता इतिहासाचे सर्व धन हाती लागले. पण त्या पुस्तकाचे पहिले पानच नव्हते; आाणि आत इंग्रजी लिखाण! तेव्हा वडिलांची मनधरणी करून, त्यांनी मला ते थोडेथोडे सांगावे असे ठरविले. पुढे कळले तो एक भाग आहे, सर्व इतिहास नव्हे; ह्या भागात अरबस्थानच्या इतिहासास आरंभ होत होता. मी विचारले "यात केलेल्या आरंभापूर्वी अरबस्थानची काय स्थिती होती?" वडील म्हणले "याचे पहिले पान फाटले; त्यात ते असेल." ते पान धुंडाळू लागलो, सापडेना. त्यासरशी माझा हिरमोड झाला आणि त्या हिरमोडासरशी अकस्मात मनात असा प्रश्न उभा राहिला की, समजा पहिले पान सापडले तरी काय? त्यात जेथून कोठून आरंभ झालेला असेल, त्यापूर्वी, 'काय होते?' हा प्रश्न उरणारच. पहिले पान नसणारे हे फाटके पुस्तकच नव्हे, तर पहिले पान असेणारा कोणताही इतिहासग्रंथ देखील वास्तविक, सरासरी दुसऱ्या पानासूनच आरभिलेला असणार!

मध्यंतरीच्या व्याप्ति-हेतु-निगमन इत्यादी अनुमान परंपरेच्या घटपटादि खटपटीचा कोणताही जाणीव आधार न घेता, माझ्या गुप्त संज्ञ मनात कसा काय प्रकार झाला असेल तो असो; पण माझ्या संज्ञ मनात तशा तर्काचा लवलेशही न स्पर्शता आणि त्या बाल बुद्धीस तसा सुसंगत तर्क त्यावेळी जवळ जवळ अशक्य असताही, हा सिद्धांत, एखाद्या स्वयंस्फूर्तिसारखा माझ्या बुद्धीला आठवला, पटला. त्याचे तार्किक समर्थन मी आता सविस्तर करू शकेन. मानवाचा इतिहास मर्कटापर्यंत पोहचवीन. मर्कटांचा जिवाणूपर्यंत, त्याचा वनस्पतिपर्यंत, त्याचा भूगर्भापर्यंत, त्याचा सूर्यापर्यंत, त्याचा तेजोमेघापर्यंत, त्याचा त्याच्या मागे मागे! "सप्तर्षि" कवितेत आताच्या प्रौढतर्कपरिभाषेत जे मी पुढे सांगितले की खंड इतिहास

शक्य आहे. भौमिक खंड इतिहासाच्या आधीच्या ऐतिहासिक भागांचा, विश्वेतिहासाचा, पहिला भाग सापडणे अशक्य आहे! जो इतिहास शक्य आहे तो केवळ

**जे, भौमिक त्यांचा न शक्य सकलांचा,**
**विश्वेतिहास लिप्से; तुजसी वेध अकाट्य विकलाचा**
**कल्प विमानीही की, तू, ताऱ्यांचे जिने करूनि नभी**
**जाशील अुंच शोधित, शोधित, कितिही जरी धरूनि न भी**
**इतिहासाचें पहिलें, पान न मिळणें कधी पहायाते**
**आरंभ तुझा दुसऱ्या, पानापासूनि शाप हा याते**

तोच सिद्धांत माझ्या लहानपणी, त्या फाटक्या पुस्तकाचे हरवलेले पहिले पान धुंडाळताना, मला स्वयंस्फूर्त झाला.

त्या फळ्यांवर विष्णूशास्त्र्यांची निबंधमाला होती. ती मी अनेक वेळा वाचली. केसरीचे पहिल्या वर्षाचे आणि चिपळूणकरांच्या मृत्युलेखाचे अंक एका खोक्यात तिसऱ्या मजल्यावर असत ते वाचावे. जुन्या काव्येतिहास-संग्रहाचे अंकही पुष्कळ वाचले. महाभारताचे भाषांतर 'कथासार' का सद्धर्मप्रदीप नावाच्या मासिकात येई, त्याचे जुने अंक वाचावे. मला जे तुटके फुटके इंग्लिश येऊ लागले होते त्याच बळावर होमरचे पोफत इलियड वाचावे. माझे वडील-बंधूकडून, माझे वडील पूर्वी ते सार्थ वाचून घेत. तेव्हा मला ते फार आवडे. रात्री आम्ही निजताना, बंगल्यातच, वडील मोठ्या वाडग्यात कुस्करून, साखर तूप दुधात भिजवून ठेवलेल्या, दशम्या खात; फराळ करीत; नि मी इलियड वाची, ते अर्थ सांगत. ॲग्यामेमनान आणि अकेलिज यांच्या पराक्रमाची वर्णने, भीमार्जुनांच्या पराक्रमाप्रमाणेच, माझे बाहु थरथरून सोडीत. पेशव्यची बखर आणि छत्रपतींची बखर मला वडिलांनी नाशिकहून आणून दिली. ती तर मी किती वेळा वाचली त्याची गणतीच नाही. ही सर्व पुस्तके वाचताना मी माझ्या वरील मित्र मंडळीत त्यांची रात्रंदिवस चर्चा करावी. नाशिकची वकील मामलेदार वगैरे मंडळी घरी यावी, त्यांनी माझ्याशी कौतुकाने वाद करावा; त्यात माझा धीटपणा आणि वयमानाने अधिकच खुलून दिसणारा हा बहुश्रुतपणा पाहून, त्यांनी माझे अतिशय कौतुक करावे. याचवेळी मी निबंधमालेसारखी लांब लांब वाक्ये रचता यावी म्हणून, निबंध लिहू लागलो. वडिलांनी म्हणावी ती आणि स्वतः पाठ करावी ती मोरोपंती कविता पाहून, त्याचे अनुकरणे, कविता लिहाव्या. नवनीत माझे बहुतेक पाठ होते. वामन कवींची मला मोठी आवड असे. अर्जुन भीम या जोडीत मला भीमाचा मोठा अभिमान! वडिलांशी, वकिलांशी, मित्रांशी मी वाद घाली. कोणी अर्जुनाची स्तुति केली की, मी म्हणे भीम मोठा; त्याच्या वचनाप्रमाणे धर्म चालता तर पायात मोडावयाचे आधीच काटा चिरडून टाकता आला असता. उभे महाभारत - तो भीषण संहार टळता. द्यूत समयी, कीचकप्रसंगी, शिष्टाईप्रसंगी भीम जो मार्ग सुचवी, तोच धक्के खाल्ल्यानंतर आणि त्याचे प्रथमच न ऐकल्याचे प्रायश्चित भोगल्यानंतर सर्वांना, कृष्णालाही स्वीकारावा लागे. मोह अर्जुनाला झाला; भीमाला केव्हाही झाला नाही. उभी गीता गावी लागली त्या अर्जुनापुढे - भीमापुढे नव्हे. असा मी वाद घाली, तेव्हा मला खिजवणाऱ्या वडील माणसांना हसता हसता पुरेसे होई.

### “माझी कवितेची धूळपाटी”

आई असतानाच, सरासरी आठव्या वर्षाच्या संधीस कवितेची धूळपाटी मी पहिल्याने हाती घेतली. घरी श्रीधरकृत ‘हरि विजयादि’ पोथ्या पाहून, मला वाटले, “आपणही एक महाकाव्य, एक ग्रंथ लिहिला पाहिजे”. माझ्या चिमुकल्या बुद्धीच्या निश्चयाचा आकारही माझ्या चिमुकल्या नयनास सतोषवील असाच असणार! आगपेटीच्या मापाच्या पानाएवढी पाने कापून, एकेक अध्यायाची पाने लहानशा दोऱ्यांच्या वेष्टणीत गुंफून, बोरूची बारकी लेखणी, चारदा करता चारदा मोडून, शेवटी टाक मनाप्रमाणे कापला जाऊन, त्या पानाभोवती पोथीप्रमाणे चहूबाजू छान लाल रेखांची चौकट आखून, त्या महाकाव्याच्या ग्रंथाची सारी महत्त्वाची सामुग्री सज्ज केली. ‘श्री गणेशाय नमः’ ही लिहिला. आता ग्रंथ लिहिण्याच्या सामुग्रीतील उरलेली यःकश्चित गोष्ट म्हणजे ग्रंथ लिहिणे ही! ती मात्र जी तशीच राहून गेली ती गेलीच! याचे कारण मुख्यत्वे हेच की, ‘तो श्री गणेशाय नमः’ माझ्या चिडबिड अक्षरांत त्या लहान टीचभर पानावर लिहिला जाताच, ती पोथी कल्पनेत जितकी सुंदर लिहिलेली दिसली होती. तशाची तशीच, पानावर अवतरण्याची आशा पार मावळून गेली. तेव्हा आधी अक्षर चांगले घोटीव करावे नि मग तो महाकाव्याचा ग्रंथ हाती घ्यावा, असा त्यातल्या त्यात बराच पोक्त असेणारा विचार ठरला; आणि कवितेची धूळपाटी बाजूस सारून खरडा वळविण्याचा सपाटा चालेला.

ती कवितेची धूळपाटी, पुढे किती दिवस तशीच धूळ खात पडली होती, आठवत नाही पण, दहाव्या वर्षाचे आधीच, कोण्या तरी एका शुभ मुहूर्तावर, तीवर कवितेची धुळाक्षरे घटविली गेली असावी हे निश्चित. कारण अकराव्या-बाराव्या वर्षाचे वेळी ओव्या, फटके, आर्या मी किती तरी रची आणि किती तरी पाठ करी. आणि किती तरी विसरून जाई. ओव्या तर अगदी बोलावे तसे बोलत जाई. झोपाळयावर दहा-दहा बारा-बारा मुली आणि प्रौढ स्त्रिया एका बाजूस होऊन, कौतुकाने मला हटविण्यस झटत. त्यांची एक ओवी संपते तो मी नवी रचून तोड द्यावी. एक आख्यान धरावे आणि ‘पहिली माझी ओवी’पासून त्या आख्यानाचा तंतु उचलून, वेळी ‘दोनशावी माझी ओवीपर्यंत’, ते चालवावे. माझ्या आजोळी, माझ्या वहिनीच्या माहेरी आणि पुढे नाशिकला मी चांगला सतरा- अठरा वर्षांचा होईतो घरगुती हौशीच्या प्रसंगी, आमच्या घरोब्याच्या कुटुंबातील स्त्री मंडळाने, ही चढाओढीची मौज हटकून घडवून आणावी आणि मला हटविण्याचे गुप्त कट सारखे करीत राहावे. ही झाली बिचाऱ्या ओवीची गोष्ट! पण आर्येने मात्र, एखाद्या अनार्येसारखे, आपल्या मात्रांचे अप्रामाणिक वळसे देऊन, माझ्या चिमुकल्या प्रतिभेची बोबडी वळविण्याची पाळी आणली होती. ती फसगत सांगण्यास, जर सत्यकथनाच्या लौकिक स्तुतीचे आमिष लोभवितेना तर, मन आजही लाजलेच असते.

### “आर्येची माला”

ओव्या जशा वाचून ऐकून मी सहज रचू लागावे; तशाच पंतांच्या आर्या पाठ करून, वाचून, आर्याही केवळ श्रुतिगतीच्या साच्यावरच विसंबून मी वाचीत असे. त्या माझ्या कानाला गोड लागतात. वकील वगैरे मंडळींनीही, बहुधा लहान वयाच्या वशिल्यामुळे, त्याचे कौतुक करावे. आमच्या मराठी शाळेचे मुख्याध्यापक (हेडमास्तर) त्या वेळेस एक वृद्ध प्रेमळ सहनशील गृहस्थ असत. त्यांच्या घरी भाजीपाला

नेणे, निरोप पोचविणे, त्यांना दुपारची डुलकी येऊ लागून, त्यांचे डोळे मिटले, तर कोणी परके माणूस शाळेत येते की नाही हे पाहण्यासाठी माझे डोळे उघडे ठेवणे इत्यादी विश्वासाची कामे करण्याचा मान, केव्हा केव्हा मला मिळे. इतकेच काय, पण ज्या मानासाठी, पाचवी-सहावीच्या विद्यार्थ्यांत मोठी चुरस लागावयाची, तो (टपाल हेडमास्तरही हेच मास्तर असल्यामुळे,) गावच्या त्यांच्याकडे येणाऱ्या-जाणाऱ्या टपालावर छाप मारण्याचा मानही, राजमुद्रा, राजा आपल्या अनुपस्थितीत, आपल्या अत्यंत विश्वासूक प्रधानास बोलावून, ज्या ऐश्वर्योचित सहज गांभीर्याने देतो तशा सहज डौलाने, मला बोलावून, आमचे हेडमास्तर मला देत असत; आणि तो छाप घेऊन त्या पत्रांवर मारताना, त्या मानाच्या जाणिवेचा छाप माझ्या मुद्रेवर उमटत असे. या माझ्या उपयुक्ततेचा परिणाम असो, किंवा गुरुजींच्या स्वभावजन्य सहनशीलतेचा परिणाम असो पण, माझ्या आर्या ते न डगमगता ऐकत आणि म्हणत, "वा! असाच यत्न करीत जा, चांगला कवि होशील. दुर्दैवाने, मी पांचवी होऊन शाळा सोडतो न सोडतो तो हे पुरातन गुरुजी जाऊन एक नवशिके मुख्य शिक्षक तिथे आले. माझी, विगत विद्यार्थ्यांच्या माननीय पटात, गणना, त्याचवेळी होऊ लागल्यामुळे, माझ्या बुद्धीविषयी, त्यांना विद्यमान विद्यार्थ्यांकडून, वारंवार उल्लेख झालेला ऐकू येई; पण त्यांस का, काय की, माझ्यासारख्या विद्यार्थ्याचा हा मान, नाकापेक्षा जड भासणाऱ्या मोत्याच्या भावासारखा, त्रासद वाटे. दुर्दैवाने, मी त्यांची ओळख करून घेऊन, त्यांच्याशी, राजकारणाचे वादही घातले. तेव्हा प्रत्येक वेळी, त्यांचे शेवटचे अमोघ उत्तर म्हणजे, हे की, "बैस! लहान तोंडी मोठा घास घेत जाऊ नकोस!" तरी काही माझी ही खोड गेली नाही, आणि एकदा तर, मी माझ्या काही आर्या नेऊन दाखविण्याचा, खरोखरीच, लहान तोंडी मोठा घास घेतला. त्या पाहताच, त्यांनी मला तिरस्कारून म्हटले, "मोठा कविता करावयास निघाला! तुला गणमात्रा कशाशी खातात हे तरी माहित आहे का? जा पुन्हा असा लहान तोंडी मोठा घास घेत जाऊ नकोस!" मास्तरांचे हे वाक्य ऐकताच, माझ्या कवितांस आजवर वाखाणणारी पोरेही, 'गणमात्रावृत्त' तोंडपाठ असेणाऱ्या तज्ञांनी हंसावे तशी हंसली. इतकेच नव्हे, तर असा अव्यापारेषु व्यापार करून कविता करण्याचे वेडेपण आपण कधीच केले नाही हा आपला केवढा शहाणपणा झाला अशा प्रौढीने ते माझ्याकडे पाहू लागली.

तोवर मला गण, मात्रा या शब्दांचा एकच अर्थ माहीत होता. गण म्हणजे घरी, लग्नाबिग्नाच्या गोष्टी नेहमी चालत त्यावेळी, उल्लेखिला जाणारा देवगण किंवा राक्षसगण किंवा मनुष्यगण; आणि मात्रा म्हणजे, मूळ 'श्रीगणेशा', त्या गणाचे डोक्यावर चढण्यास सोडीत नाही ती! वरील तीन गणांपैकी प्रत्येक मुलीप्रमाणेच प्रत्येक आर्येलाही एखादा गण असेतो की काय? मुलीला उपजत गण असेतो हे जितके विश्वासार्ह आहे, तितकेच तेही आहेच! आणि डोक्यावर मात्रा असलेली प्रत्येक आर्येत किती अक्षरे हवीत? पण हे सांगणार कोण? गावात सर्वज्ञ असा एक हेडमास्तरच; आणि त्याला पुन्हा तशाप्रमाणे विचारावे, तरी सर्वशास्त्रांचे सार ते पुन्हा त्याच एका विश्वव्यापक नियमात सांगणार, "जा, पुन्हा असा लहान तोंडी मोठा घास घेत जाऊ नकोस!!"

खरे पाहिले असता, एका दहा मिनिटात, त्या शिक्षकांना मला, आर्येच्या मात्रांचे रहस्य समजाऊन देऊन, उत्तेजन देता आले असते. पण तेही कविता करीत आणि म्हणूनच विद्यार्थीही कविता करतात

असे झाले तर आपल्या मास्तरकीची विशेष थोरवी ती काय उरली असा राग त्यांना साहजिकपणे आला. माझ्या लहानपणी काय किंवा प्रौढपणी काय मला माझ्या या साध्या धाडसापासून तो अगदी स्वातंत्र्यघोषणेच्या आणि राज्यक्रांतीच्या वा समाजक्रांतीच्या अभिनव भारतीय धाडसापर्यंत उत्तेजन देणारे गुरुजन मिळण्याचे सुदैव क्वचितच लाभले! उलट तेजोभंगाच्या आणि मनोभंगाच्या बेड्यांनी माझे पाय बहुधा गुरुजनांकडूनच जखडून ठेवण्यात येत. पुढे जाण्यात, जी अन्यथा अधिक उपयोगी पडती, अशी माझी किती तरी शक्ति, गुरुजनांनी पाय मागे खेचण्यासाठी ठेवलेल्या या बेड्या, पुढे जाण्यासाठी, तोडण्यातच खर्ची पडली.

मोठ्या आयासाने मी शेवटी आर्येच्या नियमाची एक आर्या मिळविली.

**आर्येच्या प्रथम पदी, द्वादशमात्रा, तशाच, तिसऱ्याला।**

**अष्टादश, दुसऱ्याला, मात्रा अठरा, तशाच, चवथ्याला।।**

मग मोठ्या उल्हासाने माझ्या आर्यात मात्रा डोक्यावरच असलेली अक्षरे मोजू लागलो. तो एकही आर्या तितक्या मात्रांची आढळेना! मग मोरोपंती आर्या पाहू लागलो तो काय! डोक्यावर मात्रा असलेली द्वादश अक्षरे पहिल्या पदी तर काय, पण सबंध आर्येत आढळेनात! मोठ्या बुचकळ्यात पडलो. प्रत्येक आर्येला स्वतंत्र नियम असेतो काय येथपर्यंत शंका यावी. सगळ्या मात्रा धुंडाळल्या! केवळ काकांच्या औषधी बटव्यांतील मात्रा तेवढ्या धुंडाळायच्या उरल्या! फार निरुत्साह होई. पुढे वृत्तदर्पणाचे पुस्तक मिळविले. पण दर्पणात पाहणाऱ्यापाशी असेल ते दिसेल. दहाव्या-अकराव्या वर्षी, एकट्या माझ्या मला, त्याची परिभाषा काय कळणार! शेवटी केव्हा काय की नि कसे काय की, मला कळले की, कवितेतील मात्रा म्हणजे अक्षराच्या डोक्यावर असते ती नसून लघुदीर्घ भेदाने होते ती!!! तेव्हा सर्वत्र लख्ख पकाश पडला. माझ्या जुन्या बहुतेक आर्या, त्या अयोध्यच्या आर्येसारख्याच या दिव्यातून निर्दोषी म्हणून बाहेर येताच, मला जनकासारखे हायसे वाटले.

पण, मध्यंतरी माझा कवितेचा छंद सुटला मात्र नव्हता. उलट आर्या नसल्या तर फटके, ओव्या, पदे ही रचून वर्तमानपत्रात गुपचुपपणे छापण्यास धाडण्याचेही साहस मी करू लागलो. त्यामुळे छापखान्याच्या केराच्या टोपलीची नवीच भर होता होता, एक दिवस माझा 'स्वदेशीचा फटका' खरोखरच छापून आला! कोण तो महत्त्वाचा दिवस! गावातील बालमित्रांच्या बाजारात माझ्या कवितेची उतरलेली प्रत जशा क्षुल्लक कारणाने उतरली, तितक्याच क्षुल्लक कारणाने कुठेच्या कुठे चढली. ही जी कविता छापून आली, ती वर्तमानपत्रात आणि त्यात पुण्याच्या. मग ती "जगत्हितेच्छूंत" का असेना, ती कविता असलीच पाहिजे. तो कवि असलाच पाहिजे. आता यापुढे मी कवि नाही असे म्हणण्याची कोणाची माय व्यायली आहे असे माझे मला देखील वाटले. कारण त्या बिचाऱ्या खेडेगावच्या उभ्या आयुष्यात, ज्याची कविता वर्तमानपत्रात छापली गेली, असा कवि मीच, म्हणून, लहानथोरांत त्या गावभर गाजावाजाच झाला तसा! बरे झाले की, जी कविता जगत्हितेच्छुकारांनी प्रसिद्ध केली, ती एका खेड्यातील बारा वर्षांच्या मुलाची होती हे त्यांना कळले नाही. नाही तर क्वचित ती प्रसिद्ध झाली नसती! कारण कविता कशी आहे, यापेक्षा कवि कोण आहे यावरच चालचलाऊ नियेतकालिकांतील मुद्रण बहुधा अधिक अवलंबून असते.

www.savarkarsmarak.com

या काळात माझी राजकीय महत्वाकांक्षा सशस्त्र क्रांतीकडे झपाट्याने झुकू लागली. तिचे पाय माझ्या पोरखेळाच्या पाळण्यात स्पष्ट दिसू लागले होते. मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारांचा आणि इंग्रजांच्या राजकीय अत्याचारांचा, ते काय आहेत हे स्फुटतः कळण्यापूर्वीच, ते आहेत येवढ्याच अस्फुट निश्चिततेने तीव्र तिटकारा येई; आणि माझे बालमित्रांसह, या बालभावनेचे उट्टे लुटपुट्या लढाया मारून मी उगवून घेई. मराठी शाळा सुटली की, आमची टोळी हातात छड्या घेई. त्यास तलवारीसारखे फिरवीत, फिरवीत त्या तलवारीच वाटू लागल्या की एक बिचारे काटेरी कोवळे झाड, ज्याला पिवळी फुले येतात असे त्या रानी उगवे, त्याची शंभर वर्षे भरत. त्याची त्या छड्यांच्या वारासरशी, सपासप कापाकापी चाले. त्या दुर्दैवी झाडावरच ही आपत्ति येण्याचे कारण इतकेच की त्यास 'विलायती' असे नाव असे! त्या विलायतेच सरसकट कत्तल करीत चाललो असता, विलायेतवाल्यांचीच कत्तल केल्याचे समाधान, अगदी सत्तावनच्या क्रांतियुद्धात इंग्रजांची कत्तल उडविणाऱ्या बंडवाल्यांइतके उत्कटपणे आणि त्याहून किती तरी स्वस्तात आम्हांस भोगावयास सापडे. या काल्पनिक राष्ट्रीय सूडाच्या मागोमाग एक खरोखरचाच राष्ट्रीय सूड उगविण्याच्या कार्यी आमच्या या वेताच्या तलवारीचे पाणी जोखण्याचा प्रसंगही लवकरच येऊन गुदरला.

कारण, सन १८९४ ते ९५ चे संधीस मुंबई, पुणे वगैरे ठिकाणी हिंदु-मुसलमानी दंग्यांची मोठी भयंकर लाट उसळली. केसरी, पुणेवैभव वगैरे पत्रांतून त्याचे वृत्त वाचण्यासाठी इतके उत्सुक व्हावे की, त्या पत्रांच्या डाकेची वाट पाहत तासतास टपाल ठाण्यापाशी तिष्ठत उभे राहावे. मुसलमानांनी दंगे आरंभून हिंदूंचा पाडाव केला की आम्ही अगदी संतप्त व्हावे. हिंदु चूप का राहतात! इतक्यात हिंदूंनी प्रतिकार करून मुसलमानास चेचल्याचे वृत्त आले की आमच्या मंडळींचा हर्ष गगनात मावू नये. देशभर उसळलेल्या या आपत्तीत आमच्या लहानग्या टोळीने, भगूरपुरता जरी पराक्रम गाजविला नसता, तरी हिंदु धर्माचे अस्तित्व थोडेच उरणार होते! आमच्या बालसवंगड्यास जमवून मी ठरविले की या राष्ट्रीय अपमानाचा वचपा भगूरला भरून काढावयाचा आणि तो काढण्याचा उत्तम मार्ग, म्हणजे वेशीबाहेर असलेल्या, त्या एकुलत्या एका, ओसाड मशिदीवर चाल करून जाण्यावाचून, दुसरा कोणता असणार! झाले. ती आमची बारा-तेरा वर्षांच्या आतील मुलांची टोळी, नव्हे, वीरांची टोळी! एका संध्याकाळी, गनिमी पद्धतीने लपत लपत, त्या मशिदीवर छापा घालण्यास गेली. मशिदीत कोणी नव्हतेच. क्वचित ह्या आपल्या दहा-बारा वीरांच्या असंख्य सैन्यास भिऊन शत्रू पळूनच गेला नसेल कशावरून! आम्ही मशिदीची मनसोक्त मोडतोड करून; आणि शिवछत्रपतींच्या हल्ल्यांची धूळाक्षरे आपण वळवीत आहोत ही पूर्ण जाणीव ठेवून, त्या शिवसंप्रदायातील शेवटचे कृत्य, जे रणातून चटकन पाय काढणे ते अगदी शक्य तितक्या आरंभीच उरकून घेतले. दुसऱ्या दिवशी ही बातमी मुसलमानी मुलांसही कळली. त्या गावातील, आमच्या मराठी शाळेच्या पडवीतच भरणाऱ्या, उर्दुशाळेसमोरील लहानशा अंगणाइतक्याविस्तीर्ण रणक्षेत्रात, शाळाशिक्षक येण्याच्या आधीच, तुंबळ लढाई झाली. पण मुसलमान मुलांच्या दुर्दैवाने, चाकू, रूळ, टांचणी इत्यादि रणयुद्धाचा आधीच पुरवठा करून ठेवणारा सेनापति त्यास कोणी न लाभल्याने आणि हिंदु मुलांपाशी हे साहित्य, मी प्रथमपासूनच, सज्ज ठेवल्याने, अर्थातच हिंदूंचा जय झाला. शेवटी संधि होऊन

त्यात मुख्य अट अर्थातच ही ठरली की, ही बातमी उभय पक्षी कोणीही शिक्षकांस कळवू नये! पण त्यात दोन-तीन मुसलमान मुलांनी शेवटी एक गुप्त कट केला की, या पराजयाचा सूड म्हणून या “बम्मनके बच्चास” म्हणजे मला विनायकाला कुठे तरी गाठून माझ्या तोंडी, शास्त्रोक्त मोदकाच्या ठायी, एक “बोंबील” मासा कोंबावयाचाच. तो त्यांचा डाव अर्थातच ‘ऑफस्’ झाला. पण ही बातमी कळताच आमच्या पक्षाची सिद्धताही अधिकच वेगाने होऊ लागली. इतकेच नव्हे तर आमच्या सैन्यातल शिस्तीत, त्या मशिदीवरील छाप्याचे ऐतिहासिक प्रसंगी जी काही धर्मवीरांस फारशी शोभा न देणारी ढिलाई दिसली, ती घालवून टाकून, हे सैन्य अधिक कार्यक्षम करण्यासाठी आम्ही व्यवस्थितपणे सैनिक शिक्षण घेऊ लागलो. कारण आपसात म्हणूनच -आणि कोणाही मुसलमान वाचकांस ऐकू जाऊ नये इतके हळूच सांगतो की त्या मशिदीवरील छाप्यात काही धर्मविरांना आपल्या आईची नसती हाक एकाएकी ऐकू येऊन घरी जाणे हे प्रथम कर्तव्य वाटले. काहींना आयत्या वेळी लघवीसाठी फारच दूर जावे लागले, आणि काहींनी आत घुसा म्हणून म्हणताच, मला म्हटले तू का घुसत नाहीस? आणि मी आत घुसलो तेव्हा त्यांनी म्हटले, “आता सगळेच आत कशाला? आम्ही बाहेर पहाऱ्यावरच राहतो?” फार काय, वाटेत पहारा देणे हे स्वकर्तव्य, असा निर्धार केलेल्या या मंडळींपैकी काहींनी, पहाऱ्यावरून पोबाऱ्यावरही स्वकर्तव्याची व्याख्या आणली आणि धूम ठोकून महादेवाचे देवळाचे बाजूने गाव गाठले.

ह्या सर्व दोषांसाठी, मी माझ्या बालमित्रांचा बराच समाचार घेतला, तेव्हा सर्वांचे मते एक सैनिकशाळा काढून शिस्त आणि शौर्य वाढवावयाचे ठरले. लवकरच लुटपुटीच्या लढाया चालू झाल्या. आम्ही दोन पक्ष करावे. एकाने इंग्रज किंवा मुसलमान व्हावे. दुसऱ्याने हिंदु. मग, दारूगोळा, म्हणून निंबोळया जमवाव्या. त्या वाटून घ्याव्या. एक सीमा ठरवून युद्धास आरंभ व्हावा. निंबोळ्यांचा भडिमार करीत मधल्या सीमेवरील ध्वज जो पाडाव करून प्रतिपक्षाचे आत शिरून त्याचा दारूगोळा लुटून आणील तो पक्ष विजयी ठरे. बहुतेक जय माझ्या हिंदूंच्याच पक्षाचा होई. जर एखादे वेळी, अहिंदु पक्षाकडे जय जातो असे वाटले तर मी लगेच देशाभिमानाची ग्वाही देऊन, त्या पक्षास विनवी की तुम्ही होऊन पिछेहाट करून घेणे हेच अवश्य, नाहीतर, हिंदूंचा पराभव आणि इंग्रजांचा जय झाला असा अशुभ निकाल ऐकावा लागेल! यामुळे, अपयशाचे खापर माथी घेऊनही, ते बिचारे, हिंदूंच्या हाती पडत. अशा कोणत्याही युक्तीने का होईना पण हिंदूंचा जय झाला की ते आमचे सर्व टोळके हिंदूजयाचे पोवाडे गात, भगूरच्या गल्ल्यागल्ल्यांतून मिरवत जाई.

या सैनिक शाळेस लवकरच एका घोड्याची आवश्यकता न लागणे शक्यच नव्हते, ह्या होऊ घातलेल्या भावी तानाजी-बाजींस घोड्यांवर नको का बसता यावयास! वर उल्लेखिलेल्या माझ्या मित्रांपैकी राजा-परशाच्या किराणा दुकानातील आडबाजारी जाणारे एक तट्टू असे. आम्हां गोटीबंद दशवीरांचा असा शामकर्ण होण्याचा मान, त्या बाजार तट्टाच्या वाट्यास आला. त्यांच्या आईबापास कळू न देता ते दोघे आपले हे तट्टू आमच्या सैनिक शाळेच्या उपयोगास केव्हा केव्हा देत; आणि आळीपाळीने आम्ही बसावयास शिकू. मी पहिल्यांदा घोड्यावर बसलो तो याच. तो आकाराने जरी घोडा होता, तरी त्याच्या समान मंदगतीमुळे, त्याचा आमच्या भावी स्वातंत्र्य युद्धात हत्तीसारखाही उपयोग करता आला असता.

त्याला पिटाळण्यासाठी बऱ्याच छड्या माराव्या लागत. त्या अनुभवामुळे, घोडा इतका पिटाळण्यास इतक्याछड्या असे कोष्टक मला पाठ झाले होते. दुर्दैवाने, ह्या कोष्टकाच्या शिस्तीत वागण्याइतके सर्वच घोडे विनयशील नसतात हे मला पुढील एका खडतर अनुभवावरून कळले. कारण आठ-नऊ वर्षांनी, जव्हारच्या राजधानीतील एका तेजस्वी घोड्यावर बसण्याचा, आमच्या सासुरवाडीस जेव्हा आम्हाला प्रसंग आला, तेव्हा त्या घोड्यासही, या शास्त्रोक्त सूत्रानूसार तितक्या छड्या मारताच तो उनाड घोडा जो बेफाम सुटला, तो आम्हास अलगद एखाद्या चेंडूसारखा, दूर फेकल्यानंतरच उभा राहिला! आमच्या वडील बंधूस धनुष्यबाणाचा फार नाद असे. एकदा-दोनदा त्यांनी कण्हेराचे फूल बाण मारून उडविलेले मी स्वतः पाहिले. ते नेम अचूक धरल्यामुळे उडाले किंवा चुकून बरोबर लागल्यामुळे ते काही सांगता येत नाही, पण त्या धनुष्य-बाणांचा अभ्यास करण्याची ईर्षा ह्यामुळे मलाही उत्पन्न झाली खरी. आणि आमच्या या शाळेत धनुष्य-बाणांचा अभ्यासही चालू झाला. वडिलांकडून आग्रहाने भिल्ल कोळ्यांच, पात्यांचे आणि पिसांचे बाण आणवून, धनुष्ये करून, तांती बांधून, ती मोडतोड करण्यात आणि बाण खेळण्यात, आमची कितीतरी करमणूक होई. आमच्या वडिलांस बारभराऊ बंदुकीची आणि तलवारीचीही परवानगी असे. बंदुकीत छरे भरून त्यांनी ओसाड घरातील बिळात वा तळ्यात दडलेले साप मारावे. ती बंदूकही आम्ही दोन-चारदा उडविली. त्याचे मला काय आश्चर्य वाटावे. ते छरे, ती बंदूक, मोठी गंमत वाटे. माझ्या सैनिक शाळेतील सवंगड्यांपैकी एका दोघांस वडिलांस चोरून ती उडवावयास शिकवी. जुन्या घराच्या एका लहान खिडकीतून, समोरच्या नव्या घरात छपलेले एक घुबड मारण्यासाठी, एकदा माझ्या वडिलांनी एक बंदूक झाडली, तो परत धक्क्याने त्यांच्या हनुवटीस दस्ता लागून वडील घायाळ झाले. त्याच धक्क्याने बंदूक शिकण्याची कला आमच्या लंगोटीबंद सैन्याची हौसही जी घायाळ झाल्यासारखी झाली, ती पुन्हा काही सुधारल्याचे आठवत नाही. आमच्या घरात एक गुप्ती आणि एक दोन लपवून ठेवलेल्या जुन्या तलवारी असत. त्यांस अगदी कोणाला न सांगण्याच्या शंभर शपथा देऊन मी बहुतेकांना मोठ्या गंभीर, सावध रीतीने दाखवीत असावे आणि तिसऱ्या मजल्यावर जाऊन मी त्या पुन्हा काढाव्या, घासाव्या, पुन्हा लपवून ठेवाव्या. ही आयुधे लपविण्याचे माझे शस्त्रागार म्हणजे तिसऱ्या मजल्यावरचे एक बळद असे त्यात ती टांगून ठेवलेली असत.

या तेराव्या-चवदाव्या वर्षाचे मध्यंतरीच, माझी आमच्या कुलस्वामिनी देवीवरील भक्ति पराकाष्ठेची वाढली. पूर्वी सांगितल्याप्रमाणे ती मूर्ति रुधिरप्रिय म्हणून खंडोबाचे देवळात त्याच्या अब्राह्मण पुजाऱ्याकडे बोकडांचे बळी मिळावे म्हणून ठेविली असे. पण त्यास अशी स्वप्ने पडूं लागली की देवी मला माझ्या घरी पोचीव असे आज्ञापीत आहे. माझ्या वडिलांस स्वप्न पडावे देवी घरी आली आहे. त्या देवतेच्या जागृत कडकपणाच्या आख्यायिका, पूर्वापार त्या गावात पसरलेल्या असल्याने, तिच्याविषयी सर्वांसच भाविक भीती वाटे. शेवटी त्या पुजाऱ्यांकडून देवीची इच्छा म्हणून ती मूर्ति अण्णांनी घरी आणली. अनेक इष्टमित्र म्हणाले ही रुधिरप्रिय जाज्वल्य देवता! प्रसंगी कोपाने सर्व घर भस्मसात करील. देवळातच ठेवावी! तो हे काय केलेत! वडील म्हणत, “देवीची इच्छा काय होईल ते होईल! पण मला तर मुलाला जशी आई तशी ती देवी कृपाळू, ममताळू, आणि वत्सल वाटे. मी लडिवाळपणे तिच्यापाशी

माझ्या लहानग्या सुखदुःखाचा पाढा वाचावा. पुढे पुढे तर एखादा साधक जसा तन्मय होतो तसा मी दिवसानुदिवस त्या नव्या घराच्या सुंदर देवघरात, त्या मूर्तीच्या पूजेअर्चेत, तन्मय साधना करीत असावे. पांडवप्रतापादिक ग्रंथाप्रमाणे केवळ देवीचरित्राचाच मराठी ग्रंथ नव्हता, निदान मला मिळालेला नव्हता. सप्तशती संस्कृत वाचावी, पण स्पष्ट समजेना म्हणून मोठी तळमळ लागे. इतक्यात वर्तमानपत्रात देवी भागवताची मराठी पोथी, देवीविजय म्हणून, प्रसिद्ध होत असल्याचे वाचले. तो केवढा आनंद! वडील हे नवे होणारे पुस्तक घेतील न घेतील या भयाने परस्पर पैसे भरून एक प्रत देय मूल्याने (व्ही. पी. ने) मागविली, आणि ग्रंथ येताच, पारायणे चालू झाली. या ग्रंथातील माहितीवरून देवीच्या भक्तांची चरित्रे वर्णून, ती मालिका थेट प्रताप शिवाजीपर्यंत आणून ठेवावी, असा संकल्प करून, दुर्गादास विजय नावाचा ओवीबध्द ग्रंथ लिहिण्यास आरंभ केला. प्रथम देवीची स्तुति आणि नंतर ग्रंथकाराचे चरित्र. देवीचे त्याला झालेले साक्षात्कार, भारतीय स्वातंत्र्यार्थ ग्रंथकार जे युद्ध करणार होता त्यांत यश देण्याविषयी, देवीची प्रारंभिक प्रार्थना, अशा पहिल्या उपक्रमाचेच चार पाच अध्याय तीनचारशे ओव्यांचे रचिलेही होते. श्रीधर स्वामी आपले ग्रंथ पंढरीच्या देवळात रचीत आणि पांडुरंग ते ऐके ह्या दंतकथेचा गौरवही आपल्या ग्रंथास अंतरू नये म्हणून, प्रत्येक अध्याय रचला जाताच, मी देवघरात तन्मय चित्ते, देवीस वाचून दाखवावा. देवावर नाना प्रकारच्या फुलांची सदर सजावट नेहमी केलेलीच असे. अध्याय वाचण्याच्या उभ्या वेळीत, एखादे फूल देवीवरून पडले तरी तो मला तिच्या संमतीचाच प्रसाद भासे; आणि तो चमत्कार त्यात गोवला जाऊन श्रीधरांच्या ग्रंथाची माझा ग्रंथही, यथावत् प्रत बने. त्या ग्रंथातील अनेक ओव्या खरोखरच फार प्रासादिक असत. इंग्रजांच्या अत्याचाराचे वर्णन “दैत्य” “पृथ्वी भारहरण” “अवतार” इत्यादी थेट पौराणिक भाषेत केले जाई. तो माझ्या आयुष्याच्या पहाटेसच, आत्मचरित्र लिहिण्याचा पहिला प्रयत्न, त्यानंतर दुसरा असा हाच आयुष्याचा तिसऱ्या प्रहरास चाललेला.

याहूनही खरोखरच आश्चर्यकारक चमत्कारांचा, माझ्या बालसुलभ भावप्रवण मनाला अनुभव यावा. ध्यान लावून मी बसावे, देवी कधी कधी प्रत्यक्ष मला दिसावी, दैवी भाषा ऐकू याव्या कशा, ते आता आठवत नाही. एकदा, एक बहिणीच्या कानातला मोलाचा दागिना, माझ्या हातून हरवला. सर्वांनी धुंड धुंड धुंडाळला. मी शेवटी वडिलांच्या रागाच्या धाके, देवीपाशी धरणे घेतले, तो माझ्या मिटलेल्या डोळ्यांस तो दागिना फडताळाखाली अंधारात पडलेला स्पष्ट दिसला. तिथे तर आम्ही दहादा पाहून, सापडला नव्हता. पण पुन्हा मला आवाज ऐकू आला. ऊठ, पुन्हा पहा. मी उठलो नि वहिनीला घेऊन त्या फडताळाखाली गेलो, तो अचूक हात टाकताच दागिना सापडला. वडिलांना देखील हे फार आश्चर्य वाटे. मी तेव्हा हे दैवी चमत्कार समजे. त्या दुर्गादास विजयात ओव्या रचून ग्रंथी. मी आता मनासच विचारू लागतो - “दैविक की भावनिक?” मनाचे एकाग्रतेने सुप्त स्मृति जागृत होऊन आठवे? जे दिव्य दृष्टीने दिसे ते उत्कट मानसाचे केवळ अतिदर्शन (clair voyance) असे आणि आकाशवाणी भासे ते अतिश्रवण (clairaudience) ? कसेही घडो पण असे अनेकदा घडत असे खरे.

पण लहानपणापासूनच माझी भावना जितकी उत्कट तितकी माझी बुद्धीही तर्कट पडल्यामुळे दोघ्या सख्या पण छटेल बहिणींप्रमाणे, परस्परांचा पाणउतारा करण्यासाठी टपून बसण्यातच, त्यांच्या

परस्पर प्रेमाची करमणूक चाललेली असे. देवीवरील माझ्या भावनेचा, हा, अत्यंत सरळ आणि निस्सीम विश्वास, माझ्या बुद्धीच्या डोळ्यात, नक्की केव्हा, सलू लागला ते आठवत नाही. बहुधा या गुप्तकटाचा सुगावा तिने संज्ञ स्मृतीला देखील लागू दिला नसावा. पण भावनेच्या, ह्या सहज आनंदाच्या शुद्ध दुधात संशयाच्या मिठाचा पहिला खडा, अगदी उघड, उघड, केव्हा टाकला ते मात्र पक्के स्मरते. त्या दिवशी मला "देव भक्ताचा नेहमी पाठीराखा असेतोच असे नाही," तर, तो अनेकदा त्यास पाठमोराही होतो, असे वाटू लागून माझ्या अल्लड भावनेचा मोठा आधार तुटल्यासारखे झाले. त्या दिवशी नाशिकहून काही मोठमोठे वकील सावकारादिक माझ्या वडिलांचे इष्ट मित्र, घरी पाहुणे यावयाचे होते. माझे वडील घरच्या देण्याघेण्याच्या गोष्टी मजशी अगदी बरोबरीने बोलल्यामुळे मला माझ्या वडिलांना त्या वेळेस कोणचासा ऋणाचा हप्ता भरण्यासाठी अवश्य असणारी रोकड रक्कम घेऊन ते पाहुणे येणार होते हे मला माहित होते. पण वाट पाहून पाहून थकलो तरी ते पाहुणे आले नाहीत. वडील सचिंतपणे बसलेले पाहून मला फार वाईट वाटले. अर्थातच वडील जो छंद पुरवू शकत नाहीत तो छंद पुरवण्यासाठी मूल जसे आईला गळ घालू लागते तशाच सहज श्रद्धेने मी माझ्या देवीपाशी जाऊन तिला गळ घालू लागलो. डोळ्यात पाणी आले. मी अशा प्रार्थना ओव्यातच करी. तशी ओव्यांमध्ये स्तोत्रे बोलत बोलत रचून माझ्या वडिलांस ह्या संकटातून सोडीव म्हणून करुणा भाकली. जर ही वेळ सांभाळली नाही तर आजवर "पुराणांतरी ऐकिले पवाडे नव्हे ते रोकडे ऐसे होई"! म्हणून अगदी त्राग्यावर आलो. पण दोन दिवस उलटून गेले तरी पाहुणे येईनात. वडिलांचे ध्यानात माझा हा देवलसी स्वभाव होताच. त्यांनी मला देवास असे येता जाता संकट घालू नये असे काहीसे सांगून माझेच उलट सांत्वन केले; आणि तेच रक्कम आणावयास नाशिकला गेले. पण, ती द्यावयाची नव्हती म्हणूनच ते पाहुणे आलेले नव्हते. ती तिथेही मिळाली नाही. आणि त्या योगे तर मी फारच उदास झालो. मनात वाटले आपला भाव इतर भक्तीहून कमी तर नाही? का इतर भक्तांच्या संकटास देव कधी कधी असाच पावत नसे? या संशयासरशी पूर्वी भक्तिविजयादिकांत वाचलेली चरित्रे पुनः पुन्हा वाचली. आजवर जे पोथीत लिहिले ते सत्य की असेत्य ही कल्पनाच शिवली नव्हती. पण मी आता प्रथमतःच श्रद्धेचा आणि संशयाचा असे दोन्ही डोळे उघडून पोथी वाचली तो हे बुद्धीचे म्हणणे पटू लागले की ज्या संकटी देव भक्तास पावला न पावलासा भासला, तेवढीच प्रकरणे पोथ्यांत रंगवून लिहिलेली असून त्याच भक्त प्रवरांच्या त्याच उत्कट भावास अनेक वेळा तोच देव पावलाही नाही. ज्ञानदेव समाधिस्थ झाले तेव्हा मुक्ताबाई फारच शोकाकुल झाल्या. देवाने ज्ञानदेवास पुन्हा सजीव केले नाही. तुकारामाच्या धाव्यासरशी त्याच्या कागदी वह्या ज्या देवाने तारल्या, त्याच तुकारामाच्या शेवटी शेवटी लोहगावी झालेल्या कीर्तन प्रसंगी आग लागून माणसे जळली; पण देवाने ती विझविली नाही. एक गाव म्लेंछांनी लुटले, त्यामुळे कळवळून माझ्यासारखाच तुकारामही त्रागा करून बोलले की "हरीचिया दासा परचक्राची भीति ही तो दुष्कीर्ती आपुलीची." पण, देवाने ते परचक्र देखादेखी निर्दाळिले नाही. आता तर मी आणखी कित्येक उदाहरणे देऊ शकेन. त्या चोख्या मेळ्याचे? त्याला त्याच्या सनातनी हरिपूजक धर्मबंधूंनी देवळात शिवलास म्हणून शिळेस बांधून मृत्यूदंड दिला. तेव्हा जोखड धरून ज्या श्रीकृष्णाने त्यास वाचविले त्या चोख्यास पुढे प्रत्यक्ष हरिद्वेषी म्लेंछांनी वेठीस धरून वेस बांधण्यास नेले असता वेस

कोसळून तो अनेक दुबळ्यांसह चेंगरून मेला तेव्हा श्रीकृष्ण - गोवर्धन करांगुलीवर धरण्याची शक्ति असूनीही त्या वेशीस रोखून धरून त्या भक्तांस वाचविते झाले नाहीत! पण पोथ्यांतून असले प्रसंग अगदी उपेक्षेने उल्लेखून टाकलेले असतात. ते का? याच वेळेस ज्यांतील अक्षर नि अक्षर अगदी अशंकनीय सत्यच असले पाहिजे असा माझा तोपर्यंत विश्वास होता. त्या पोथ्या पुराणावरील ती अशंकनीय श्रद्धा डळमळविणारी आणखी एक नवी घटना घडली. मी नेहमी वाची. अठराही पुराणे व्यासाने केली. म्हणजे देवी भागवताचे मराठी ओवीबद्ध सार देवीविजय हा ग्रंथही अर्थातच व्यासकृत मुळाचे आधारे रचलेला. पण तो वाचता वाचता त्यात रामचरित्र जे आले त्यात लिहिलेले आढळते की राम-लक्ष्मण हे सख्खे भाऊ नव्हते! इतर पुराणांतून तर हे सख्खे भाऊ आणि भरत शत्रुघ्न हे सावत्र भाऊ म्हणून वाचले होते. प्रथम वाटले, आपण ओव्यांचा अर्थ चुकत आहोत, पण काही केल्या दुसरा अर्थ लागेना मग वाटले, मूळ देवी भागवतच पाहावे. पण ते तर तेव्हा अगदी दुर्मीळ, दुर्घट, त्यामुळे आणि ती दृष्टि एकदा लागताच इतरही अनेक कथातील विरोध ध्यानात येता येता मनाशी त्याच वयात अगदी दुसऱ्या कोणाचेही याविषयी मतमतांतर ऐकण्यापूर्वी माझ्या मनाने खूणगाठ बांधून ठेवली की अठरा पुराणे ही एकाच व्यासाची असणे असंभवनीय. सर्व पोथ्या सारख्या खऱ्या नाहीत. या वेळेपासून माझ्या बंधूशी, मामांशी आणि पुढे नाशिकला तर पदवीधरांसारख्या माझ्यापेक्षा त्यावेळी अनेक पटींनी अधिक शिक्षित असलेल्या मंडळींशीही मी वरील पुरावा मांडून याविषयी सारखा वाद घालू लागलो आणि त्यांची भोळी चिकाटी पाहून थक्क होऊ लागलो. गुरुचरित्रादिक ग्रंथांकडेही, माझ्या बुद्धीच्या संशयी लहरीची साडेसाती लवकरच वळली. त्यातील काही व्रते नियम मी प्रथम मनःपूर्वक पाळून पाही. पण पुढे ती त्यांची जटिलता अशक्यच नव्हे तर परस्पर विरुद्ध आणि निरर्थकही वाटू लागली. शौचाच्या वेळी क्षालनार्थ इतके मातीचे गोळे न्यावे. मी उघड उघड वितंडवाद घाली. रेचाचे दिवशी याहून अधिक नेले पाहिजेत. आरोग्य असेल तेव्हा याहून कमी नेले पाहिजेत. एकठसी माप काय म्हणून फलश्रुती तर कित्येक वेळा निव्वळ थापा भासत. शेंडी मोकळी सोडून जितकी पावले जाल तितक्या ब्रम्हहत्या. माझे वडील बंधु मी शेंडीस गांठ देण्यास विसरलो की सहजच रागावून वरील भय घालीत. मी वाकडे उत्तर देई. "चिंता नाही. संध्याकाळी शिवाचे नाव घेतले की सात जन्माची पापे भस्म होतील (सायान्हे सप्त जन्मानि) आणि गंगा गंगेति म्हटले तर मुळीच "मुच्यते सर्व पापेभ्यो!"

माझ्या धार्मिक विचारात उडत चाललेल्या या खळबळीमुळे अर्थातच माझी पूजाअर्चा पूर्वीच्या अल्लड उत्कटतेने होईनाशी झाली. ज्या क्षुल्लक चमत्कारांनी ती भक्तीची उत्कटता इतकी तीव्र झाली होती, तसल्याच क्षुल्लक चमत्कारांच्या अभावी ती तशीच बोथटही होऊ लागली, पण उत्कटतेचा अतिरेक जरी ओसरत चालेला, तरी भक्तिच अशी या वयात नाहीशी झाली नाही. इतकेच नव्हे तर त्या माझ्या वत्सल देवीविषयी तर, ती अजूनही, सुकोमल प्रेमाने ओथंबलेली असे. तिला शेवटी तत्वाच्या पोलादी टिकाण्याचे अभंग अधिष्ठानही सापडावयाचे होते. पण त्याआधी कराव्या लागणाऱ्या संशयाच्या अग्निप्रवेशाच्या भीषण-महान दिव्यातून ती अजून पार पडली नव्हती. हे तर कुठे त्यांचे सूतोवाच होते.

## “तत्व जिज्ञासेचा सूत्रपात”

परंतु संशयाच्या या अग्निकल्लोळात पहिल्या भोळ्या भावनेच्या भुसांचा पाय सापडण्याचा हा सूतोवाच होत असताच माझ्या निष्ठेला लवकरच मिळणाऱ्या वर उल्लेखिलेल्या तत्त्वाच्या भक्कम पायाचाही सूत्रपात झाला. तत्वविचारांचा उदय माझ्या मनात करणारा गुरु म्हणजे, माझे ज्येष्ठ बंधुच होत. कारण माझ्या वडिलांना किंवा माझ्या भोवतालच्या कोणालाच वेदान्ताचा छंद नसे. व्यासंग तर नव्हताच, पण माझ्या वरिष्ठ बंधूंचा ह्या त्यांच्या सतराव्या-अठराव्या वर्षाचे वयातही वेदान्ताचे ग्रंथ वाचण्याकडे, योगादिकांचा अभ्यास करण्याकडे भारी ओढा असे. मला अगदी पहिला असा वेदान्त ग्रंथ वाचलेला आठवतो तो या वेळेस त्यांनी विकत घेतलेला ग्वालेरचे श्री. जठार यांनी लिहिलेला “स्वानंदसाम्राज्य” हा. माझ्या बंधूंनी तो मला बळेबळे वाचावयास द्यावा. त्याची सुंदर बांधणी, साम्राज्य या शब्दास माझ्या आवडत्या राजकारणीय कल्पनांचा येणारा वास, वडील बंधूंचा आग्रह आणि कोणत्याहि विषयात कोणाच्याहि मागे न पडण्याची आकांक्षा, या सर्व प्रवृत्तींच्या बळे मी तो ग्रंथ वाचला. काही प्रकरणे फारच आवडली, पण तो माया शब्दाचा काथ्याकूट आणि त्याहूनही त्या ब्रह्म शब्दाचा ब्रह्मघोटाळा त्या वयात मला त्या विषयापासून अधिकच दूराविण्यास काय तो उपयोगी पडला. ते दूराविणे असलेली बंधने तोडून नव्हे, तर प्रबळ जिज्ञासेची आणि संस्कारांची नवीन आतुर साखळी माझ्या बुद्धीच्या गळ्यात पक्केपणी बांधून! दिवसैंदिवस त्या विषयाच्या अनेक उपांगांवर, अद्भुत चमत्कार, सत्य की असेत्य यावर बडेजावी मिरवणारे भोंदू की साधू, सोवळे, ओवळे, पदोपदी धर्मधर्म म्हणून बोकाळलेल्या रूढी त्याज्य की अत्याज्य, केवळ आचार कोणते आणि खरे धर्म कोणते, फार काय, देवाचे अस्तित्व की नास्तित्व असल्या विषयांवर माझे माझ्या बंधूंशी, माझ्याहून वयाने वा ज्ञानाने वडील असेणारांशी, आणि समवयस्कांशी उघड उघड वादविवाद सारखे चालू लागले. त्यांत ज्या ज्या ग्रंथांचे आधार त्यांनी द्यावेत, ते ते खुडून काढण्यासाठी का होईना, पण मी ते ते ग्रंथ वाचून विवंचून त्यातील खोड्या काढण्यात गर्क होई. आणि अनायासेच त्या त्या विषयांचे चिरंतन मर्मही हळूहळू माझ्या मनावरही ठसत जाई. माझ्या भोळ्या भावनेला पोथ्यापुराणातील काल्पनिक वा पुष्पित वाक्ये पण रसाळ आख्याने डोळे मिटून वाचण्यात जे समाधान येत असे, ते समाधान आता त्यात जरी सापडेना, तरी तत्वज्ञानाच्या ग्रंथांतील गंभीर संवादात आणि प्रयोगात माझी बुद्धिही गगून गेली असता माझी प्रबुद्ध भावना दिवसेदिवस अधिकाधिकपणे विकास पावू लागली.

कालक्रमाने ज्या थोड्या पुढेमागे घडलेल्या पण विषयसंदर्भापुरत्या येथेच उल्लेखिणे श्रेयस्कर आहे, अशा आणखी काही गोष्टी येथेच सांगू या. माझ्या वडील बंधूंस साधूंच्या संगतीचा मोठा नाद. कोणीही राख फासलेला वा जटा वाढविलेला पाहिला की हे त्याच्या नादी लागले. अशा कित्येक जणांस त्यांनी जेव्हा पुढे घरी योगक्षेमाची अतिशय अडचण पडली, तेव्हाही प्रत्यही शेर शेर दूध काय पाजावे, फळे काय द्यावी, सेवा काय करावी! त्यात काही सत्पुरूषही असत. पण त्यांच्यातील अनेकांनी माझ्या बंधूंच्या भोळ्या आणि सरळ स्वभावाचा लाभ घेऊन त्यांस कित्येकदा साफ फसवावे! म्हणजे मी त्यांचा उपहास करून त्यांस सतवावे, त्यांनीही कित्येकदा फसलो म्हणून मानावे, पण पुन्हा राख किंवा जटा दिसली रे

दिसली की त्या मठीत आमचे बाबा रंगून जाऊन मला सांगण्यास आलेच म्हणून समजावे की “तात्या, ते दुसरे सोड, पण हा मात्र सिद्ध पुरुष! एकदा चल तू त्याच्याकडे” कित्येकदा मी जाईही अशाकडे. एक बोवाजी तर स्पष्टपणे मला आठवतात. तेही सच्छीलच असत, पण अगदी साधारण, नाशीकला मी तेव्हाच शिकावयास गेलो होतो. पंचवटीच्या रामाच्या धर्मशाळेतील एका कोंदट दगडीखोलीत ते पूजाअर्चा मांडून बसत. मधून मधून काही ब्राह्मणांच्या पंगती करीत. बाबांची धारणा की हा पैसा देव त्यास इच्छामात्रे देतो. बाबांनी त्यास बरेच दिवस आपले गुरुपद अर्पिले होते. मी जाण्याआधीच माझा परिचय, बाबांनी त्यास पुष्कळ करून दिला होता; आणि मलाही त्यांचा परिचय ‘केवळ अर्वाचीन रामदास! अंतर्ज्ञानाने तुझी भावी थोरवी जाणून तुला आणण्याचा फार आग्रह करतात” असा करून दिलेलाच होता. शेवटी कोण्या शुभ मुहूर्ती मी त्यांच्याकडे गेलो. मला पाहाताच फार प्रसन्न झाले. हा मुलगा कोणीतरी थोर पुरुष होणार. अत्यंत शुभलक्षणी! असे त्यांनी म्हणावे. कितीही निरीक्षून परीक्षून पाहिले तरी मला शिवाजी करणारे रामदासपण त्यांच्यात लवलेश आढळेना. माझ्या राजकीय प्रवृत्तीला मधाचे बोट लावण्या पलीकडे त्यास रामदास म्हणून मला परिचित करण्यात बाबांचा दुसरा काही हेतु नसावा असे मला वाटू लागले. दोनदा-तीनदा मी ‘इंग्रजांच्या जाचांतून भारतास मुक्त करण्यासाठी सशस्त्र युद्धावाचून दुसरा उपाय नाही’ असे अगदी उतावीळ वादही घातले, पण प्रत्येक समयी त्यात तू प्रथम पडू नयेस. प्रथम ईश्वराचे अधिष्ठान ते येथे संपादावे (म्हणजे अर्थातच त्यांच्या ब्राह्मणभोजन प्रसंगी पाने मांडावी, वाढावे, प्रत्यही मठीत राबावे) नंतर आपण होऊन सर्व होईल! हे त्यांचे पालुपद, बहुतेक गोसाव्या-बैराग्यांचे दर्शनास गेलो असता हेच आढळले. राजकारणाचे ज्ञान मुळीच नाही. चर्चा करताच भयभीत होउन निरोप देत, जाता जाता प्रसाद म्हणून हा ईश्वराचे अधिष्ठानचा भ्रमाचा भोपळा काय तो आमच्या हाती देऊन! कोणी म्हणत, देवाची ती इच्छा! घडा भरेल तेव्हा घडेल. म्हणजे मी उसळून म्हणावे की चोरांचे राज्य ती देवाची इच्छा, आणि आम्हा सर्वांची त्यांचे राज्य उलथून टाकण्याची ही प्रवृत्ती काय कोणा राक्षसाची इच्छा? जर सर्व कर्ताकरविता देव, तर हीही देवाचीच! किंबहुना ही इच्छा आम्हात उदय पावली, हीच गोष्ट तो घडा भरल्याचीच साक्ष का समजू नये? देवाची आता अशी इच्छा झाली असे का मानू नये?

ज्या काळाचे हे वृत्त लिहिले जात आहे त्या काळापासून माझी प्रवृत्ति क्रांतिकारक कार्यक्रमाकडे वेगाने होत चालली होती. तेव्हा येथे त्यावेळचे विचार आणि चळवळी यथावत् वर्णिल्या पाहिजेत. यास्तव येथेच हेही स्पष्टपणे पुन्हा एकदा सांगून टाकीत आहे की ते क्रांतिकारक विचार आणि चळवळी आजच्या काळीही अनुकरणीयच आहेत, म्हणून त्या ग्रंथिल्या असे कोणीही समजू नये. केवळ काय घडले आणि कसे नि का घडले हेच इथे सांगणे आहे. त्यातील प्रत्येक किंवा एकंदर घटनेचे समर्थन नव्हे.

**माझ्या इंग्रजी शिक्षणाचा आरंभ**

मराठी पाच इयत्ता भगूरच्या शाळेत झाल्यानंतर मी घरच्या अडचणीमुळे दीडदोन वर्षे भगूरला घरीच होतो आणि तेवढ्यात मुख्यत्वे स्वतःच्याच बुद्धीने इंग्रजी दोन इयत्तापर्यंत शिकलो. एकंदरीत मला गणिताची फारशी आवड नसे. त्या विषयात जरी मी कॉलेजपर्यंत अनुत्तीर्ण असा केव्हाच झालो नाही, तरी पण त्याची आवड अशी नसे. माझ्या बरोबरीची भगूरची मारवाड्यांची मुले तोंडच्या हिशोबात फार

प्रवीण असत. प्रत्यही विक्रीचा त्यांचा व्यवसाय. त्यामुळे तोळामासागुंज, पायली-मण खंडी यांचे तोंडचे हिशोब ते तडातड सोडवीत. मी कविता, लेख इंग्रजी इत्यादिविषयी लौकिक पाव. तेव्हा येता जाता त्यांनी माझ्यावर आपली श्रेष्ठता स्थापण्यासाठी तोंडच्या हिशोबाचे ब्रम्हास्त्र सोडावे. आणि मला त उत्तर चटकन न आल की त्या मुलांच्या वडील माणसांनी खो खो हसून म्हणावे, "काय सावरकर! तुम्ही म्हणे मोठे बुद्धिमान विद्यार्थी आहात, पण हा साधा हिशोब येईना! आमचा मुलगा पाहा. काय तुमच्या त्या कविता नि इंग्रजी मॅट कॅट जाळायचे आहे!" म्हणजे मला पाणउतारा झाल्यासारख वाटावे. आणि मीही टोचून त्यांस म्हणाव "अहो माझ्याहून तर काय पण न्यायमूर्ति रानड्यांहूनही हा तुमचा मुलगा श्रेष्ठ आहे! कारण न्यायमूर्तींना देखील ही जिऱ्यामिऱ्यांची विक्री इतकी बरोबर नि झटपट करता येणार नाही. मग यालाच हायकोर्टाचा जज्ज करा की एकदाचा!" इथेच, मला ज्या अशाच एका दुसऱ्या भयंकर परीक्षेस, पुढे एकदा तोंड द्यावे लागले, तिचीही गंमत सांगून टाकू. माझे एक अगदी जवळचे नातलग असत. त्यांची बुद्धि खरोखरच फार तीक्ष्ण आणि विकासार्ह असे. पण अगदी लहान क्षेत्रातच तिला कोंडून पडावे लागल्याने ती खुरटलेली असे. त्यामुळ तिला स्वतःच्या वैभवाचे प्रदर्शन करण्यास तिच्या त्या ज्ञानाच्या झोपड्यांतील किडुकमिडुकासच येता जाता मिरविण्यावाचून दुसरी सोयच नसे. त्यांना नाशिक तालुक्याचा भूगोल तोंडपाठ येई. ही पारंगतता त्यांची ज्ञानाची मुख्य कसोटी असे. इतर सर्वांची ज्ञाने या कसोटीनेच ते पारखीत. त्यांच्या लहान विद्यार्थ्यांसही नाशिक तालुक्याच्या भूगोलात ते पटाईत होताच त्यांच्या युनिव्हर्सिटीचे ग्रॅज्युएट म्हणून ते समजत. आणि मी इंग्रजी शिकू लागलो, म्हणून त्यांच्या शिष्यापेक्षा मोठा विद्वान झालो नाही हे सिद्ध करण्याकडे त्यांचा सदोदित ओढा असे. मी चांगला मॅट्रीकमध्ये गेलो असता एकदा त्यांच्याशी कोणच्याशा धार्मिक का राजकीय विषयावर संवाद झाला. त्यांची मते खुडली गेल्यामुळे ते चिडले. आणि दुर्दैवाने त्याच वेळेस माझ्या तोंडून जगातील निरनिराळ्या देशांची नाव त्या विषयासंबंधी उदाहरणे म्हणून निघताच ते ओरडून म्हणाले "बस बस. मला तूच भूगोलाच्या गप्पा सांगू नकोस. मॅट्रिकमध्ये गेली म्हणजे म्हणे जगाचा भूगोल मुले शिकतात. अरे तुला जगाचा भूगोल येतो म्हणतोस, पण माझे हे मराठी तिसऱ्या इयत्तेतील चिमुकल शिष्य देखील तुझी फजिती उडवतील!" असे म्हणून त्यांनी त्यांच्या एका बजरबट्टूस सांगितले की, 'विचारा त्याला एकदोन प्रश्न! त्या मुलान मला ताडकन विचारल - "तुम्हाला जगाचा भूगोल येतो ना? सांगा पाहू दारणा नदीच्या काठच्या गावांची नावे? नाहीतर काजवा नदीच्या काठची गावे तरी" ह्या लहान सहान खेडवळ नद्यांच्या काठची गावे सांगण्याचा हा प्रश्न जर कोणत्याही युनिव्हर्सिटीच्या परीक्षा पत्रात येईल, तर बिचाऱ्या मॅट्रिकवाल्यांची तर काय, पण बी. ए. वाल्यांचीही बोबडी वळल्यावाचून राहणार नाही. मी तर चूपच बसलो नि हसू लागलो. तेव्हां त्या विद्यार्थ्याने ती गावे ताडताड पाठ म्हणून टाकली- नि ते गुरुजी माझ्या या पराजयाने भूगोल विषयकच नव्हे, तर राजकारण वा धर्मकारण विषयक वादही करण्याचा माझा अधिकारच छिनावला गेला असे घोषित करते झाले! "ज्याला दारणा नदीच्या काठची गाव येईनात, त्याला राजकारण ते काय कळणार नि धर्मकारण ते काय कळणार!"

## विद्वत्तेच्या परीक्षेची मूर्ख कसोटी

खेडेगावातून हा अनुभव मला नि बहुधा खेडेगावापेक्षा अधिक पुढे जाऊ न शकलेल्या पुष्कळ बी. ए. ,एम्. ए. वर वारंवार आलेला आह. या खेडवळांची एखादे आडदांड कोडे किंवा ज्ञानोबाची मेख, ठरलेली असावयाची आणि त्या एका मेखेवर, जगातील झाडून सारी विद्वत्ता केव्हा सुळी दिली जाईल याचा काही नियम नसावयाचा. कोणीही "मोठा शिकलेला" दिसला, की हे कोडे त्याला मोठ्या छद्मी विनयाने त्या अडाण्यातील कोण्या शहाण्याने घातलेच म्हणून समजावे नि त्याचे उत्तर मुळीच वा लवकर आले नाही की त्या "मोठ्या शिकलेल्या"ची सारी विद्वत्ता कुचकामाची ठरलीच!

कोणी मोठ्ठा ज्योतिषी आला; सूर्यमालांचे नि ग्रहमालांच वेध घेतो; पण जर त्याची खरी कसोटी या एकाच प्रश्नावर लागणार असेल की "अहो, ती दूरच्या आकाशातील ताऱ्यांची एवढी गणती करता, तर प्रथम माझ्या या घरावर कौले किती आहेत सांगा पाहू?" तर तो ज्योतिषी काय रडेल! "अहो, या हातावरच्या घरावरील कौले किती हे तुम्हास चटकन सांगता येईना आणि तुम्ही त्या अपार आकाशातील अमुक तारे मोजले नि तमुक मापले म्हणून गप्पा झोकता!" अशा हशास त्यास बळी पडलेच पाहिजे.

त्यांच्या दारिद्र्याच्या दुःखद जाणिवेस क्षणभर विसरविण्यास जसे ते कथिली वा पितळी दागिने उपयोगी पडतात तसेच त्यांच्या अज्ञानाच्या जाणिवेस भूल पाडण्यास आणि ज्ञानाच्या आढ्यतेचे तकलादी समाधान का होईना, पण ते तेवढे तरी भोगण्यास त्या बिचाऱ्या खेडवळास ही कोडी, ह्या मेखी अशा उपयोगी पडतात. हेही एका अर्थी ठीकच आहे.

पण आश्चर्याची गोष्ट अशी की विद्वत्तेच्या परीक्षची ही विक्षिप्त कसोटी आमच्या खेड्यातून काय ती आढळते असे नसून अशीच एक विक्षिप्त पद्धती पूर्वी मोठमोठ्या राजसभांतूनही विद्वत्तेची कसोटी लावण्यास उपयोजिली जात असे, असे त्यावेळच्या अनेक ग्रंथांतून दिसते. एखादा पंडित एखाद मत स्थापू वा अजिंक्य पत्र घेऊ निघाला की त्याला प्रतिद्वंद्वी विद्वानांकडून असेच वाटेल ते प्रश्न विचारण्यात येत. मग त्या मताशी वा त्या विशिष्ट शास्त्राशी त्याचा संबंध असो नसो. शंकराचार्य मंडनमिश्रवादात प्रतिपाद्य विधेय होत, कर्मकांड की ज्ञानकांड श्रेष्ठ, मोक्षद. पण त्या वादात शंकराचार्य जेते की मंडन, हे ठरविण्यासाठी शंकराचार्यांना प्रश्न घालण्यात आले कामशास्त्राचे! भूमितीच्या किंवा बीजगणिताच्या प्रश्न पत्रिकेत उपमा आणि उत्प्रेक्षा या अलंकारात भेद काय किंवा होमर आंधळा होता की डोळस हे प्रश्न विचारले जाण्याइतकेच ते सुसंगत होते. त्याहूनही कठीण प्रसंग केव्हा केव्हा गुजरे. उदाहरणार्थ रामानुजाचार्यांच्या वेळच्या अजिंक्यपत्र घेऊन निघालेल्या एका पंडिताविषयी असे घडले. दिवसा मशाल पाजळीत आणि त्या योगे सर्वत्र अज्ञान-अंधकार भरलेला असून मीच एक ज्ञानदीप आहे असे सुचवीत. जयिष्णु पंडित राजसभेत येत, तेथील प्रतिद्वंद्वी पंडित त्यांच्या विद्वत्तेशी झोंबी खेळताना असेही प्रश्न घालीत की, चार चार अशा प्रख्यात गोष्टी कोणत्या? की त्या जयिष्णु पंडितास जगातील यच्चयावत् चौकड्या तोंडपाठ म्हणाव्या लागत. ब्रह्मदेवाची तोंडे चार, दिशा चार, वेद चार, पुरुषार्थ चार, आश्रम चार, वर्ण चार, युगे चार, दशरथाच पुत्र चार, विष्णूच्या भुजा चार असा सारखा पाढा चालावयाचा! शेवटी गाढवाचे पाय चार इथपर्यंत तो पोचे की नाही या संबंधी काही ग्रंथाधार सापडत

नाही. बरे जर का या पाढ्यातून एखादा 'चार' गाळला आणि तो त्या प्रतिद्वंदी पंडितास आठवला, की त्या बिचाऱ्या जयिष्णु पंडिताची इतर विद्वत्ता कितीही उच्चतर असली तरी त्याची मशाल बुझालीच आणि अजिंक्यपत्राचा आशादीप विझलाच म्हणून समजाव! एका दृष्टीन असे आचार आणि दुसऱ्या दृष्टीन असे पोकळ पांडित्य एका बाजूस तर त्याची कसोटीची ही विक्षिप्त रीत दुसऱ्या बाजूस!

मागे सांगितल्याप्रमाणे मी इंग्रजी दोन इयत्ता घरीच शिकलो, नंतर वयाच्या तराव्या वर्षाच्या आसपास मला वडिलांनी इंग्रजी शिकण्यासाठी नाशिकला धाडले. माझे वडील बंधू पूर्वीच नाशिकला शिकत असत. मी ज्या दिवशी नाशिकला शिकावयास जाणार त्या दिवशी माझ्या लहान सवंगड्यांस आणि शेजाऱ्या-पाजाऱ्या प्रेमळ गावकऱ्यांस मी दूर जाणार म्हणून फार वाईट वाटले. मजवर त्या बालवयातही लहानमोठे अनेक स्त्री-पुरूष निस्सीम प्रेम आणि भक्ती करीत. त्यांना सोडताना मलाही फार वाईट वाटले. त्यापैकी काही तर मला नाशिकपर्यंत पोचवावयास आले. नाशिकला त्यावेळी शिवाजी स्कूल नावाची पुण्याच्या एका रानडे-विद्वांस प्रभृती मंडळींनी अलीकडेच वाढविलेली एक शाळा होती. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलप्रमाणे ती राष्ट्रीय बाण्याची होणार आहे, म्हणून तिचे संस्थापक म्हणत आणि काही विद्यार्थ्यांना त्या उपमेस पूर्णोपमा करण्याचा मोह साहजिकच सुटे. जर पुण्याचे न्यू इंग्लिश तस हे नाशिकचे शिवाजी स्कूल आहे; तर या त्या पुण्याच्या स्कूलच्या संस्थापकाप्रमाणे नाशिकच्या स्कूलचे संस्थापकही नाशिकचे विष्णूशास्त्री चिपळूणकर असलेच पाहिजेत! या बातम्या ऐकून मी या नव्या राष्ट्रीय शाळेतच जाण्याचे ठरविले. त्यातही हायस्कूलमध्ये मला घरच्या अभ्यासाच्या वशिल्यावर तिसरीत घेतीलच असे दिसेना. त्या राष्ट्रीय शाळेतही माझी परीक्षा घेण्यात आल्यानंतर इंग्रजी तिसरीत बसविले.

नाशिकला या वेळी ज्या ठिकाणी कानड्या मारुतीपाशी मी आणि बंधू राहत होतो, तिथ त्यांच्या वळणातली मंडळी जमे. ती माझ्या पुढची इंग्रजी सहावा-सातवीतली आणि वयाने मोठी असलेली. पण त्यांच्या आणि माझ्या प्रवृत्तीत आणि रुचीत मोठाच विरोध पडे. चैन, नाटके, गाणीबजावणी, बाष्कळ चकाट्या यातच त्यांचा सारा वेळ जाई. म्हणजे ते काही अगदीच बदमाश नसत. पण शाळेतील सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या शेवटच्या पातळीवर जो उनाड आणि शंखपणा आढळतो, त्यातील ते असत. पण माझी प्रवृत्ति अगदी निराळी पडे. अभ्यास व्यायाम आणि वाचन यात माझा दिवस रखलेला असे. उर तो वेळ राजकारणी चर्चेत घालविण्याची मला आवड. पण त्यांच्यात मला तसा कोणीही सापडना. मला त्या शिकल्या सवरल्या नागरिकांपेक्षा. माझे ते भगूरचे खेडवळ मित्र मंडळच अधिक ज्ञानी, देशभक्त, सत्संगी आणि राजकीय चर्चेत अधिक मर्मज्ञ असे. त्यामुळे नाशिकला बरेच महिने माझे मन अगदी झुरणीस लागल्यासारखे उदासीन असे. माझे वडिलांचा मला नि माझा त्यांना फार लळा. त्यामुळे ते पंधरवड्याकाठी आम्हांस भेटण्यासाठी नाशिकला येत. त्यावेळी मी डोळ्यात पाणी आणून त्यांची वाट पाहत बसावे. ते असेतो ते दोन दिवस आनंदात जात. ते परतून भगूरला जाऊ लागले की मला पुन्हा तळमळ लागावी. काही दिवस आम्ही दोघा बंधूंनी हातानी सैंपाक करून खावे नि शाळेत जावे. पुढे ते जमेना म्हणून खानावळीत गेलो. पण माझा स्वभाव अशा कामी फार लाजरा असे. आणि खानावळीत तर मागितल्यावाचून कोणी वाढणार नाही. त्यामुळे प्रथम किती तरी दिवस मी अर्धउपाशीच असे. त्या

गंगारामच्या खानावळीत आम्ही अधिक पैसे देणारे. आमच्यासाठी केलेल्या त्या लुसलुसीत पोळ्या कितीतरी खाव्याशा वाटत; पण मागण्याची लाज! हवी का? काय? म्हणून त्या वाढप्याने दरडावून विचारले की पटकन नको म्हणून जावे, म्हणजे तो वाढप्या संतुष्ट होई. नाही तर जळफळत मला सतावू पाही. खानावळीत ही अडचण म्हणून व्यायाम घेतल्यानंतर माझ्या बंधूंनी मला एका प्रसिद्ध हलवायाच्या येथे जिलबीचा उकाडा लावला. पण त्या काळी नाशिकला ब्राह्मणाने उघड हलवायाच्या येथे जिलबी खाणे हे अगदी निंद्य समजले जाई. जरी छपून पुष्कळजण तिथे खात, तरी उघड कोणी सहसा खात नसे. पण मला त्यात काही एक चुकतेसे वाटना. मी माझ्या सहाध्यायासमक्ष या अन्नव्यवहाराचेच समर्थन करावे. अन्नाने जातच बाटते ह्या समजुतीचा मी त्या वयातही सारखा उपहास करीत असे.

ज्या शिवाजी स्कुलात मी तिसरीत बसलो, त्यातच मी लगेच तीन एक महिन्यात चवथीतही गेलो. तेथील शिक्षक वर्गाचा माझी एकंदर टापटीप, चापल्य, बुद्धि आणि बहुश्रुतता पाहून माझ्यावर फार लोभ जडला. त्यांच्या शाळेचा हायस्कूलवर पगडा पाडण्यासारखा झाला तर हा विद्यार्थी होईल अशा आशेने त्यांनी मला ममतेने वागवावे. मलाही त्या शाळेचा फार अभिमान वाटे. त्या शिक्षकांना मी भगूरला असताना केलेल्या कविता व लिहिलेले लेख दाखविले. ते त्यास इतके पसंत पडले की त्यावेळी नाशकास निघत असलेल्या "नाशिक वैभव" नावाच्या वर्तमानपत्राचे संपादक श्री. खरे (एक मुखत्यार वकील) यांच्या कानावर त्यांनी ती गोष्ट घातली. त्यांनीही मला 'वा! वा! फार छान' म्हणून वाखाणले. पण इतक्या उत्तेजनासरशी मला त्यांच्या पत्रातच एक लेख लिहावा अशी आकांक्षा उत्पन्न होऊन मी हिंदु संस्कृतीचा गौरव अशा कोणच्याशा मथळ्याचा एक लेख श्री. खरे यांस धाडला. तो पाहून तर ते चकितच झाल. तो माझा नसावा असेही त्यास एकदा वाटले. पण शिक्षक मंडळींनी तो मीच लिहिल्याची ग्वाही दिली. तेव्हा संपादकीय म्हणूनच नाशिक वैभव-पत्रांत अग्रलेखाचे स्थानी तो लेख त्यांनी दोन अंकांतून मिळून संपूर्ण दिला. नाशिक वैभवातील त्या लेखांतील ते तेजस्वी विचार आणि त्या साधारण वर्तमानपत्रातील नेहमीच्या भाषेहून निराळी अशी एक प्रबळ भाषाशैली लगेच उमटून दिसली. जो तो, तो लेख कोणाचा म्हणून विचारी. थोड्याशा प्रमुख गृहस्थास तो शिवाजी स्कूलातील एक चवदा वर्षांच्या विद्यार्थ्याचा आहे हे ठाऊक झाले होते.

याच थोड्याशा मंडळीत नाशिकचे "लोकसेवा" पत्राचे कर्ते आणि प्रसिद्ध नाटककार अनंत वामन बर्वे हेही होते. शिवाजी स्कूलची चालक मंडळी श्री. रानडे, श्री. जोशी, श्री. बर्वे हे तिघेही पुण्याचे. "लोकसेवा" हे पुणेरी चळवळीचे नाशिकचे मुखपत्र होत. नाशिकच्या गणेशोत्सवास लोकमान्यांचे वळण देण्याच्या कार्यी त्यात स्वतः मेळे काढून, राजकीय पदे करून, व्याख्यान देऊन श्री. बर्वे यांनीच फार खटपट केली. शिवाजीउत्सव प्रभृति राष्ट्रीय पक्षाच्या चळवळीत तेच प्रमुख असत. गणेशो-त्सवातील त्यांची काही पदे ऐकण्यात मी अगदी तल्लीन होत असे. एकदोन चरणे तर मला अजून आठवतात.

*"स्वामी आम्ही एकदा होतो या महीचे ।*
*अनुभवतो परि दास्य ह सांप्रत परक्यांच।।*
*आमुच दिव्यज्ञान जे सकल जगा पुरले।।*

*त्यातून आता काहीहि आम्हा नच उरले।।"*

दुसऱ्या एका सुंदर संस्कृतानुवादित पदातील चरणे तर अजूनही मी गुणगुणत असेतो,

*"मूर्त जगन्मंगला कुठे*
*तुज स्नानालागी बघू जला।।*
*आश्रय देउनि कुठे*
*ठेवु तुज आधारचि तू जगताला।।" इ.*

नाशिकच्या सार्वजनिक चळवळी, पुढे लवकरच स्थापन होणाऱ्या आमच्या "मित्रमेळ्याच्या" हाती पडून त्या जाज्वल्य वळणावर जाण्यापूर्वी त्यास लोकमान्यांच्या राष्ट्रीय वळणापर्यंत आणून सोडण्याचे कार्य प्रमुखतः श्री. अनंतराव बर्वे हेच करीत होते. माझ्या बरोबरीची इतर मुल गंगेवर उनाडक्या करीत हिंडत असता मी एकटा या गणपतीच्या मेळ्याची पदे ऐकण्यात आणि राज-कारणाची व्याख्याने, सभा, चर्चा यामधून बोलावणे नसले तरी कसेबसे जाऊन गुपचुप श्रवणाचा भाग घेण्यात व्यग्र झालेला असे. नाशिकला आल्यापासूनच्या या पहिल्या दहा-बारा महिन्यात माझ्या प्रवृत्तीचे असे कोणतेही मंडळ मजभोवती गोळा झालेले नव्हते. मी एकटाच सर्व पाहत, सर्व ऐकत, मनाशीच अनेक बेत योजीत असे. अशा वेळी श्री. बर्वे यांच्याशी माझ्या शिक्षकांनी एक अत्यंत होतकरू कवि, लेखक आणि विद्‌यार्थी म्हणून करून दिलेल्या परिचयाने मला हवा होता अशा अनेक समारंभातून आणि संस्थातून माझा प्रवेश होण्यास सुलभ झाला.

## माझे पहिले प्रकट वक्तृत्व

श्री. बर्वे यांच्या परिचयाचा पहिला लाभ हा झाला की त्याचवेळी नाशिकच्या वक्तृत्वोत्तेजक सभेच्या वतीने होणाऱ्या त्या वर्षाच्या चढाओढीत मीही भाग घ्यावा असे त्यांनी माझे मनात भरवून दिले. माझा अर्ज श्री. बर्वे यांच्या सांगण्यावरून अवधि संपल्यानंतरही सभेने घेतला. मी माझे भाषण लिहून शिवाजी स्कूलच्या शिक्षक मंडळीस दाखविले होत. अर्जाच्या दुसऱ्या की तिसऱ्याच दिवशी माझी पाळी आली. मुलांच्या विषयात त्यांची विशिष्ट अशी फार तर तीन-चारच मुख्य विधेये असू शकणार. एकाच विषयावर अनेक वक्ते असले, म्हणजेही तत्संबंधी विधेये पुनः पुन्हा येत जाणारच. त्यामुळे अशा चढाओढीत पहिल्या दोघा तिघा वक्त्यांची भाषणे होताच शेवटच्यांची भाषणे ती पहिल्याच्या इतकी चांगली असली तरी चर्वितचर्वणासारखी श्रोत्यांस भासू लागणारच, हा ठराविक अनुभव. आणि माझा अर्ज अगदी शेवटी गेलेला; त्यामुळे त्या विषयावरील सर्व इच्छुक बोलून गेल्यावर माझी पाळी आलेली. तेव्हा भाषण रंगणे कठीण असेच सारे म्हणत होते. आणि श्रोते सारखे जाण्याच्या आधीची गडबड करण्यात गुंतले होते. पण माझी दहा-पंधरा वाक्ये होताच एकदम छाप पडल्यासारखे झाले. भाषण फारच उत्तम वठल. जिकडून तिकडून वाहवा होऊ लागली. शेवटी परीक्षकांनी निर्णयही लगेच सांगितला पण त्या आधी त्यांच्यात काही कुजबुज झाली. शेवटी माझा क्रमांक पहिला लागला. समारोपाच्या भाषणांत श्री. बर्वे यांनी परीक्षकात काय कुजबुज झाली ते सांगूनही टाकल, की "आता सर्वांच्या शेवटी ज्याने भाषण केले, अर्जात

त्याचा अर्ज सर्वांच्या खाली होता. ‘पण खाली असोनि सकला वरि होय तो की’ या पंडितांच्या उक्तीप्रमाणे तो सगळ्यांच्या वर आला. त्या कुमाराचे भाषण इतके चांगले झाले आहे की परीक्षकांस ते भाषण अशा लहान मुलाने लिहिलेले असणे शक्य नाही असा प्रबल संशय यावा! जरी तो निबंध दुसऱ्याने लिहिला असता तरी देखील तो पाठ करून इतक्यावक्तृत्वपूर्ण रीतीने बोलून दाखविणे हीही कला त्या कुमाराच्या वक्तृत्वशक्तीच्या गौरवास पुरेशी होती. पण मी आणि शिवाजी स्कूलच्या बहुतेक संचालकांनी हा निबंध त्यानच लिहिला इतकच नव्हे तर असे अनेक उत्कृष्ट निबंध तो लिहीत असून त्यापैकी काही वर्तमानपत्रात प्रसिद्धही पावले आहेत हे जेव्हा सांगितले, तेव्हा परीक्षकांना अधिकच आनंद झाला. त्याची मोहक मूर्ति, लहान वय आणि त्या मानाने कोणासही कौतुकास्पद वाटावी अशी अलंकृत भाषा, शास्त्रशुद्ध, निबंधपद्धति आणि अस्खलित वक्तृत्व ह्या गुणांचा जो गौरव आपणा सर्वांनी आज केला आहे, त्यामुळे योग्य तितकेच उत्तेजन पावून हे गुण दिवसैंदिवस अधिकाधिक वाढविण्याची प्रवृत्ति त्या कुमारात उत्पन्न होईल अशी मला आशा आहे.

## मी वक्तृत्वकला कशी कमाविली?

हेच भर सभेत झालेल माझे पहिल सार्वजनिक भाषण. माझ्या वक्तृत्वास, जेव्हा ते अगदी कोवळे लुसलुशीत रोप होते, तेव्हा असे उत्तजनाचे पहिले चुळकाभर पाणी घालण्याची दया ह्या नाशिकच्या वक्तृत्व सभेने केली. मला आता अनेक विद्वानांकडून आणि संपादकवर्गाकडून वारंवार विचारण्यात येते की आपण वक्तृत्वकला कशी साध्य केलीत ते एका निबंधात लिहून काढावे. माझ्या या पहिल्या प्रकट भाषणाचे आधीच, माझ्या वयाच्या चौदाव्या वर्षाचे आधीच- मला वक्तृत्वकला येण्यास काय काय साधने उपयोगी पडली ते थोडक्यात येथेच सांगितले असता त्याविषयी अधिक काही सांगण्याची फारशी आवश्यकता उरणार नाही. कारण माझ्या ज्ञानार्जनाचे आणि कार्यव्यापृत्वाचे क्षेत्र पुढे जसजसे विस्तृत होत गेले, तसतशी हीच साधन विस्तृत होत गेली. इतकेच काय ते. त्याचा विस्तार वाढला, पण प्रकार बहुधा तोच राहिला. मी बारा-तेरा वर्षांचे संधीसच वक्तृत्वकला या विषयावरची दोन मराठी पुस्तके वाचली. इतकेच नव्हे, तर त्याच्यात निबंध कसे असावे, विषयप्रवेश, विषयविवेचन, पूर्वपक्ष-उत्तरपक्ष, खंडन-मंडन, संकलन, समारोप इत्यादी निरनिराळ्या ग्रंथकारांच्या निरनिराळ्या पद्धतीतील नावांची तुलना करून पाही. तशा पायऱ्यांनी निबंध लिही. प्रथम असा पद्धतशीर निबंध लिहिण्यास शिकणेच उत्तम. जसे प्रथम ओळीने सप्तसूर शिकणेच उत्तम, मग आपण गायक झालो म्हणजे त्या सुरांची उलटी पटाईत सुलटी वाटेल तशी सुरेल मिश्रण करू शकतो, तसेच एकदा विषयाची मांडणी पद्धशीर कशी आणि का असते ते मर्म कळले, नि हात बसला की मग निबंध पद्धतशीर त्या मूल नियमांचा क्रम आपण हवा तसा बदलू शकतो किंवा एखादी नवीनच पद्धति, आणि नवीनच शैली पसवरणारी अपूर्व प्रतिभाही एखाद्यात विकसित होते. पण मूळ निबंध हा वक्तृत्वाचा दुय्यम भाग; वक्तृत्वाचा आत्मा म्हणजे भावना. विषयाशी स्वतःचे तादात्म्य झाल पाहिजे. ते स्वतःला इतके पटले पाहिजे की ते दुसऱ्याला पटविण्यावाचून चैनच पडू नये. यास्तव निबंध किंवा व्याख्यान लिहून काढण्यापेक्षा ते मूलतःच जेव्हा मी केवळ व्याख्यानीत जातो, भाषण करू लागतो, तेव्हाच माझे वक्तृत्व अधिक सरस उठते. कारण जसजशी भावना उद्दीप्त

होते, तशी तशी भाषाशैली, वाग्गति, आवेश, मुद्राविष्कार आणि अभिनय सहजगत्या यथावत् प्रकट होत जातात; पण ही तन्मयता यथावत् प्रकट होण्यास ज्या भाषेतून ती प्रकट व्हावयाची तीवर इतके प्रभुत्व हवे की ते ते शब्द अलंकार आणि वचने ही सर्व भावनांच्या मागोमाग अश्वामागे जशी चाके तशी सत्वर, सलील आणि सहज धावत चालली पाहिजेत. मी लहानपणापासून अनेक कविता, सुभाषिते पाठ केलेली असत. बखरी, निबंधमाला इत्यादी ग्रंथातील उत्तम उतारे लिहून काढी आणि माझ्या निबंधात तशी सुटसुटीत किंवा संमिश्र आणि संक्लिष्ट वाक्ये यथास्थली रचून घालण्याची सवय करी. विशेषतः गद्यात वाक्य न तोडता त्याच्या सहज गतीतच पद्यातील सुंदर अवतरण गुंफून देण्याची मला फार आवड असे. परंतु भावना, भाषाशैली, अभिनय, वाग्गति इत्यादी साधनांनी वक्तृत्व खुलून उठते हे जरी खरे असेल, तरी ते खरोखरच परिणामकारी प्रबळ आणि दुर्जय करावयाचे असेल तर मुख्यतः त्या विषयासंबंधीचाच नव्हे तर पुष्कळशा अवांतर ज्ञानाचाही भरपूर साठा जवळ असला पाहिजे. मला वाटत माझ्या वक्तृत्वाचा अमोघ परिणाम जो अनेकांवर होत आला तो बहुधा त्या त्या प्रसंगाच्या वयाच्या आणि विषयाच्या मानाने व मजजवळ ह्या तदुप्रकारक ज्ञानाचा भरपूर साठा असे त्यामुळेच होय. या विषयावर काय सांगू अशी लेखणीची मागचे टोक तोंडात चघळीत बसणारी चिंता मला केव्हाच भासली नाही, तर बहुधा या विषयावर काय लिहू नि काय नको हीच. व्यक्त होऊ पाहणाऱ्या विचारांची आणि माहितीची लेखणीच्या टोकाशी चाललेली धक्काधक्की बंद करता करता त्रासलेली चिंताच मला बहुधा भासत आली. याचे कारण लहानपणापासूनचे माझे विविध आणि अश्रांत वाचन, मनन आणि निरीक्षण.

सारांश माझ्या वक्तृत्व कलेला अद्यापि प्रतिभेचे तेजस्वी पाठबळ निसर्गतःच मिळाले होते. तरीही बव्हंशी नैसर्गिक देणगी असलेली ती प्रतिभाही काही अंशी प्रयत्नांनीही विकसित होणारी असल्यामुळे माझा अभ्यास, वाचन आणि मनन ह्या प्रयत्नाधीन गुणांस संपादिण्याचा मी सतत प्रयत्न केला म्हणूनच तिच्यात जो काही अमोघ, भरीव, प्रबळ आणि अजेय परिणामकारकपणा आलेला दिसतो, तो येऊ शकला. सारांश वक्तृत्वाचे काही घटक जरी उपजत देणगीनेच मला प्राप्त झाले होते, तरी त्यांचा विकास करून, कमावून, त्यांना कलेचे लालित्य प्राप्त करून देण्यास्तव मी प्रयत्नही तसेच केले. मात्र ज्ञान जे संपादी ते मुख्यतः ज्ञानासाठीच संपादी व वक्तृत्वाला त्याचा जो उपयोग झाला, तो माझ्या ज्ञानलिप्तेचाच सहज दुय्यम परिणाम. त्याप्रमाणे हेही सांगण्यासारखे आहे की मला लहानपणी कवितेप्रमाणेच वक्तृत्वकलचेही शिक्षण तर राहोच, पण त्या गुणास सहानुभूतीचे उत्तेजन देखील देणारा कोणीही मिळाला नाही. उलट माझ्या बहुतक समवयस्कांनी अरसिक अज्ञानामुळे आणि बहुतेक समकालीन प्रौढांनी मत्सरामुळे, माझा मनोभंग आणि तेजोभंग करण्याचा यत्न करीत असावा. पण त्या संघर्षणामुळे सुप्त अग्नीच्या ठिणग्या अधिकच प्रदीप्त होऊन उडू लागल्या. किशोरा नंतरही वक्तृत्वकलेच्या अभिरुचीस्तवच मी डिमास्थेनीस, मिसरो, शेरिडन इत्यादी इंग्रजी-मराठी चरित्रांचा आणि लेखांचा अभ्यास करीतच गेलो. त्यांच्या भाषणातील उत्कृष्ट भाग पाठ केले. मकालेच्या च्या इतिहासातीलही काही वक्तृत्वशाली छेदक माझे आवडीचे पाठांतर असे. महाभारतातील श्रीकृष्णाची सभापर्वातील किंवा कर्णपर्वातील ती अमोघ ओजस्वी भाषणे पद्यातून नि गद्यातून मी वारंवार वाचावी.

स्वतःशीच म्हणून दाखवावीत. ती मला फार आवडत. काय ते कोटिक्रम, त्या कोट्या, तो अधिकार, ती भाषा, ते तेज, तो प्रभाव, ती प्रभावळ! खरोखर श्रीकृष्णासारखा वाङ्मयी श्रीकृष्णच होऊन गेला!

वर दिलेल्या माझ्या पहिल्या सार्वजनिक भाषणाचे अर्थातच माझ्या वयाच्या मानाने - ज्यांनी फार कौतुक केले, त्यात नाशिकचे प्रख्यात शीघ्रकवि, टिळकांचे निस्सीम भक्त, तेथील एक पुढारी आणि वकील बळवंत खंडुजी पारख हे होत. या भाषणामुळे त्यांच्याशी माझी ओळख झाली. माझ्या वडिलांचा नि त्यांचा परिचय असे. तेव्हा मी त्या भगूरच्या सावरकरांचा मुलगा हे कळल्यापासून त्यांनी माझ्यावर फार लोभ करावा. रस्त्यातदेखील भेट झाली तरी माझ्या तोंडावरून हात फिरवीत आपणाबरोबर असणाऱ्या कोणा वकिलास वा पुढाऱ्यास म्हणत “हाच तो आमच्या सावरकरांचा मुलगा, बरं का! बाळ, सावरकर नाव यथार्थ कर बरं का! ज्याचा कर (हात) आपल्या पडत्या राष्ट्रास सावरतो, असा सावरकर हो आं.” शब्दावर कोट्या करण्यात पारख फार पटाईत, मोठा विनोदी वक्ता, शीघ्रकवि तर असा की मोठमोठ्या परिषदांची सुंदर घटना ती घडता घडताच सुंदर फटक्यातून ग्रथून गात जात. फटका हा त्यांचे शीघ्र कवितचा आवडता प्रबंध असे. परंतु श्लोकादिक वृत्तेंही ते सावकाशपणे रचीत. पंक्तीतून, बैठकातून, सभातून त्यांची मूर्ति म्हणजे सभ्य मार्मिक आणि क्वचित उच्छृंखल विनोदाचा आणि अदम्य हास्याचा निर्झर असे. त्यावेळी ते सर्वत्रास हवेसच वाटत.

मी नाशिकला प्रथम आलो तेव्हा माझ्या राजकीय आणि बौद्धिक प्रवृत्तीशी समरस असणारा कोणीही न मिळाल्यामुळे मी एकलकोंडेपणात काही काळ काढल्यानंतर वर सांगितल्याप्रमाणे सात-आठ महिन्यांच्या आतच नाशिकच्या अगदी पहिल्या प्रतीच्या पुढाऱ्यापर्यंत परिचित झालो. त्यामुळे मला पहिल्याने ज्यांच्यात राहावे लागले, त्यातील अज्ञ, आडाणी आणि उनाड मुलांवरही माझा वचक बसू लागला. त्यांच्यातही माझ्या संगतीने माझी प्रवृत्ति हळूहळू उपजू लागली. आणि माझ्या अशा एका संप्रदायाचे बीज रुजू घातले गेले. त्यातही मी प्रथम राहात होतो, ते कानड्यामारुतीकडील बिऱ्हाड सोडून मी आणि माझे बंधू त्यांचे मित्र श्री. दातार आणि वर्तक यांचा वळणाने तिळभांडेश्वराच्या गल्लीत वर्तकांच्या घरी एक खोली घेऊन राहू लागलो. जेवण खानावळीतच असे. ह्या ठिकाणी ज्या मंडळीत माझ वास्तव्य झाले, त्यांचा स्वभाव, योग्यता आणि प्रवृत्ती ही काही गोष्टीत त्या पहिल्या बिऱ्हाडाकडील मंडळींपक्षा पुष्कळच वरच्या प्रतीची होती. माझ्या चरित्राच्या यापुढील किती तरी महत्त्वाच्या भागाशी आणि काळाशी या मंडळींचाच संबंध सारखा येणारा असल्यामुळे त्यांचे स्वभाववर्णन, चरित्र आणि कार्य पुढे आपोआपच विशद होणार आह. यास्तव येथे त्यांच्या पहिल्या ओळखीचा नुसता निर्देश पुरे आहे.

**‘प्लेगचा प्रादुर्भाव’**

मध्यंतरी भगूरला माझे जाणे येणे होतच असे. मला देवी आल्यामुळे तर एकदा बरेच दिवस भगूरलाच राहावे लागल. मुंबई पुण्यास पहिल्या प्लेगचा जो भयंकर कहर उसळला, ते हे दिवस. केसरीतून प्लेगच्या भयानक स्वरूपाची आणि लोकांस त्याहूनही भयानक वाटणारी प्लग निवारणार्थ योजिलेल्या सरकारी ससेमिऱ्याची वर्णन अंकामागून अंक भरून येत. माझ वडील केसरी मजकडून वाचून घेत. ती ऐकावयास गावची बरीच मंडळी आमच्या बैठकीवर जमत. जो आज प्लगला लागला तो उद्या

नाहीसा झाला, घरात एक माणूस प्लेगने लागला की देखोदेखी बायका-मुले, माणसे, घरचे घर एखाद्या आगीत भस्म व्हावे त्याप्रमाणे पटापट मृत्युमुखी पडून नष्ट व्हावे. एकका घरात पाच-पाच, सहा-सहा प्रेत एकामागून एक पडलेली कोणाचे प्रेत कोण उचलणार! वाड्याचा वाडा, पेठांच्या पठा, घरोघर कण्हणे किंकाळ्या, प्रेते, पळापळ, रडारड चाललेली, जे दुसऱ्याचे प्रेत आज उचलीत, तेच उद्या त्या संसर्गासरशी प्लेगने लागून परवा त्यांची प्रेत त्याच मार्गाने तिसऱ्यास न्यावी लागत. तिथे कोण कोणाचे प्रेत उचलणार, मुले आई-बापाची प्रेते टाकून पळत, आई-बाप मुलांची प्रेते सोडून पळत; कारण घरात प्रेत आहे असे कळताच सरकारी अधिकाऱ्यांच्या आडदांड सोजिराशी गाठ पडे! घर शुद्ध करण्यासाठी म्हणून उध्वस्त करणार, सामानाची जाळपोळ, लुटालुट होणार आणि उरलेले कुटुंबचे कुटुंब वनवासात नेऊन "सेग्रिगशन"च्या अटकेत पडणार. पण तिथेही प्लेग. घरी प्लेग, दारी प्लग! दैवी प्लेग, राजकीय प्लेग, ती भयंकर वर्णने वाचताना अंगावर शहारे उठत.

पण मुंबई-पुण्यास चाललेल्या भयंकर कहराची ही वर्णने वाचूनच ज्यांच्या अंगावर शहारे उठत त्या भगूरच्या माझ्या घरातील बैठकीवर बसणाऱ्या आम्हा भगूर गावच्या त्या वाचकातील बहुतेक जण थोडेच दिवसात त्याच प्लगला तसेच बळी पडणार होते. आणि ते घर नि ते गावही तसेच उजाड होणार होते हे तेव्हा काय ठाऊक! पुण्यास लोक कसे मरतात हे वाचीत घाबरा होणारा तो भगूरचा प्रत्येक श्रोता- एकदोन अपवाद सोडून लवकरच त्या प्लेगात मेला! त्या एकदोन अपवादात एक अपवाद माझा. ती कथा सांगणारा जवळजवळ मी एकटा त्या केसरी वाचणाऱ्या ऐकणाऱ्या मंडळीतून उरलो!

## वीर चाफेकर आणि रानडे

बोलता बोलता हिंदुस्थानभर प्लेग वणव्यासारखा पसरला. सरकारी प्लेगनिवारक छळाचाही प्लेग त्या मागोमाग तसाच भडकत गेला. ठिकठिकाणी दंगेही झाले. पण प्लेगने किंवा प्लेगनिवारक छळाने, कोणाचेच डोळ उघडेनात. शेवटी पुण्यास गोष्ट अगदीच विकोपास गेली. सोजीरलोकांचा जाच, त्यांच्या त्या बुटांच्या लाथा, घरे फोडीत, दिसेल ते जाळीत, हे देव्हाऱ्यातील देव देखील फेकून देत. मरत्या नवऱ्यापासून बायकोला, आणि आईपासून मुलाला बळाने हिसडून अटकेत दडपीत फिरणाऱ्या प्लेगनिवारक टोळ्यांचा धिंगाणा दैत्यांच्या धिंगाण्यासारखा सर्व लोकांस असह्य आणि त्रासदायक झाला. आणि शेवटी त्याची व्हायची ती प्रतिक्रिया होऊन चाफेकर बंधूंनी सरकारच्या या प्लेगनिवारक अधिकाऱ्यांच्या जाचाचा सूड म्हणून 'रँड' आणि 'आयर्स्ट' या दोघा इंग्रजी अधिकाऱ्यास सन १८९७ च्या जूनमध्ये त्यांच्या भरधाव चाललेल्या बग्गीत झेप घालून गोळी झाडून ठार मारले. आणि ते कधी, तर महाराणी व्हिक्टोरियाचा हीरकोत्सव हिंदुस्थानभर ज्या दिवशी सरकारच्या वतीने गाजविला जाऊन ब्रिटिशसत्तेच्या विजयशाली प्रभावाने हिंदुस्थान दिपविले जाणार होते, तेव्हा त्या नेमक्या रात्री! त्या हीरकोत्सवाच्या अंतस्थ मर्मावरच या धाडसी सूडातील अंतस्थ हेतूने घाला घातला! त्यामुळ अर्थातच सरकार पिसाळून गेले. विलायेतपर्यंत पुणेरी ब्राह्मणाचा दरारा आणि द्वेष भडकून गेला. दडपशाहीच्या रावणी गर्जना उठू लागल्या की पुण्याच्या पुढाऱ्यांना भर चौकात वेत मारून पाठी सडकून काढू या! त्यास तितकच बेडर प्रत्युत्तर देत 'केसरी' विचारू लागला, "सरकारचे माथे ठिकाणावर आहे ना?" टिळक धरले गेले, नातूस देशपारीची

शिक्षा होऊन अटकेत ठेवले गेले, मोद वृत्तकारादिक संपादकवर्ग बंदिवासात पडला. दामोदरपंत आणि बाळकृष्णपंत चाफेकरही सापडले. त्यांच्या कटाच्या खटल्याने तर 'आगी'त तेल ओतले. हिंदुस्थानातून ब्रिटिश सत्ता सशस्त्र बंडाने उलथून पाडण्याचा वासुदव बळवंताचाच कित्ता चाफकर गिरवणार होते. तितकी ध्येयाची स्पष्टता, किंवा व्यूहाची वा कार्यक्रमाची व्यापकता तोवर जरी या कटवाल्यांच्या योजनेत समाविष्ट झाली नव्हती, तरीही व्हिक्टोरिया राणीच्या मुंबई येथील पुतळ्यास डांबर फासून जोड्यांची माळ घालणे इत्यादी अनेक राजद्रोही कृत्ये त्यांनी आधीच केली होती. या सर्व अपराधास्तव शेवटी त्यांस फाशीची शिक्षा झाली. या बातमीने उभा देश हळहळत आहे तोच त्या चाफकर बंधूस ज्या विश्वासघातक्यानी दहा हजार रुपयांसाठी धरून दिले त्या दोघांही द्रवीड बंधूंवर चाफेकरांच्या तिसऱ्या धाकट्या भावाने - वासुदवाने आणि त्याचा मित्र रानडे यांनी अचानक छापा घालून भर पुण्यात ठार कल्याची बातमी येऊन उभा देश नुसता हादरून गेला! -त्यांनाही फाशीची शिक्षा झाली. आणि ते तिघे चाफेकर बंधू आणि रानडे फाशी जात असताच ज्या प्लेग निवारक नियमांनी लोकांचा असह्य छळ झाला म्हणून त्याचा सूड उगविण्यासाठी या तरुणांनी हे अत्यद्भुत भीषण कर्म केले ते नियमही फासावर चढविल गेले! ते सोजीर लोक पुण्यातून काढून घेण्यात आले. ती त्रासदायक अररावी बंद झाली! जर ती या भीषण प्रतिक्रियेचे आधीच बंद होती तर? पण नाही; प्रतिक्रियनंतरच ती अप्रिय क्रिया हतवीर्य व्हावी! हा नेमानेम!

ह्या अत्यद्भुत रोमहर्षक घटना इतक्या सतत आणि द्रुतक्रमाने घडत गेल्या की त्या धक्क्यामागून बसलेल्या धक्क्याने मुर्दाडातील मुर्दाडांच्या अंगात देखील उत्तेजन आणि उत्क्षोभ संचरल्यावाचून राहिला नाही. असा सारा देश त्या नशेने धुंद झाल्यासारखा झाला. मग माझ्यासारख्या स्वदेशास स्वतंत्र करण्यास आधीच तळमळू लागलेल्या आणि शिवाजीच्या आणि पौराणिक वीरांच्या रंगातच रंगून राहिलेल्या युवकाची गोष्ट काय सांगावी! वर त्या त्या प्रसंगाचे वर्णन मी ज्या शब्दात दिले आहे ते शब्द, ते प्रसंग त्या त्या वेळी मला जसे भासले, तसे तसेच रेखाटले जावेत अशाच शब्दात देण्याचा प्रयत्न करण्याचा माझा बेत असताही मी त्या भावना ज्या शब्दात त्यावेळी व्यक्तविल्या असत्या, त्याहून शतपट सौम्य शब्दातच त्या वर वर्णिल्या गेल्या आहेत.

चाफेकर-रानड्यांच्या खटल्याची, शिक्षेची आणि फाशीची वर्णन वाचीत असता वर्तमानपत्रांचे अंक माझ्या गळत्या अश्रूंनी चिंब भिजत. इतरत्र लोक मनातून त्यास वाखाणीत, पण ती नाव घेण्यासच नव्हे, तर मोठ्याने ऐकण्यासही थरथर कापत. वर्तमानपत्रे त्यास खुनी, देशाचा घात करणारे, जातीला कलंक लावणारे, म्हणून भाराभर शिव्या वरवर का होईना - हासडीत. तेव्हा मी फार खिन्न आणि संतप्त होई. मी उघड उघड त्यांचे समर्थन करी आणि त्यास वीरवर (Martyr) म्हणे. (कारण 'हुतात्मा' किंवा 'देशवीर' हा शब्द त्यावेळी प्रचलित नव्हता.) तेव्हापासूनच ही स्वभाषेची उणीव मला झोंबे. मी नाना शब्द त्या अर्थी काढण्याचा यत्न करावा पण ते जमेना. शेवटी मॅझिनीच्या भाषांतराचे समयी मी आधीच वापरीत असलेल्या 'देशवीर' शब्दास National Martyr ह्या अर्थी निश्चित करून तो प्रचारात आणला. पण नुसत्या Martyr या शब्दाइतका तो व्यापक नव्हता. धर्मवीर, देशवीर, शास्त्रवीर असे फुटकळ प्रयोग

करावे लागत. उत्तर हिदुस्थानातील शहीद शब्दही वापरीत होतो, पण तो अरबी शब्द आहे हे कळताच सोडून दिला. पण अंदमानात असता एकदा माझ्या बंधूशी बोलता बोलता मला "हुतात्मा" हा शब्द सुचला. आणि तो त्या अर्थी Martyr पेक्षाही अत्यंत समर्पक, अधिक व्यापक, आणि अधिक पावित्र्यसूचक असल्याने तो मनास अगदी पटला. तेव्हापासूनच तो प्रचलित केला. केसरीत त्यास माथेफिरू वेडे पीर म्हटलेले पाहून मला विषाद वाटे. सामान्य लोकांत केसरीचे शब्द आंधळ्या सवयीने अर्थबिर्थ न पाहता रूढ होत. म्हणून या शब्दांचा मी तीव्र प्रतिरोध करी. मी म्हणे ते माथेफिरू तर तुम्ही मुर्दाड - मुर्दाडापेक्षा माथेफिरूसच राष्ट्रशत्रु अधिक वचकतात. पिनल कोडाच्या भीतीसाठी देखील त्यास माथेफिरू म्हणण्याचे कारण नाही. त्यास त्या भीतीसाठी चांगले म्हणू नका. पण शिवीगाळ का करता? लोक आपल्या भ्याडपणाची लाज झाकण्यासाठी त्यास माथेफिरू आणि वेडेपीर म्हणतात. नाही तर अशीच कृत्ये करणाऱ्या इंग्लिशांना, रशियनांना, आयरिशांना हीच पत्रे आणि हेच लोक "वीर!" `` Martyr`` हुतात्मा म्हणून निःसंकोचपणे का गौरवितात? कारण त्यास इंडिअन पिनल कोडाची भीती नसते. याच वेळेस पुण्याचे काही तरुण कोणाच्या नाटक मंडळीत जाण्यासाठी घरातून पळून आलेले वाटेने एका सावकाराचे घर म्हणून अनाहूतपणे आमच्या घरी येऊन उतरले. त्यांच्याकडून मी पुण्यातील मेळ्यांची वीर रसाने स्रवणारी पदे प्रथमच ऐकली. मी आणि माझ्या मताच्याच माझ्या भगूरच्या बालमित्रांनी त्यांना चाफेकरांची माहिती सारखी विचारावी. आणि "वर्तमानपत्राचे शेंदाड शिपाई अशा लढवय्यास माथेफिरू इत्यादि दुष्ट विशेषणे लावतात, याचा धिक्कार करावा". असे म्हणत असता एक दिवस त्यांच्यातील लवाटे आणि अण्णा नावाच्या दोघा प्रमुख जणांनी अगदी गुपचुप म्हणून मला नि माझ्या मित्रांना सांगितले की, अहो, चाफेकरांना उघडपणे माथेफिरू म्हटले तरी आतून टिळकांनीच त्यास रँडचा खून करण्यास आज्ञा दिली होती! मला वडील म्हणत, "आपण पुणेकरः तेव्हा आपणास पुण्याविषयी वाटेल ती थाप मारण्याचा उपजत अधिकार! तिला कोण खोटी म्हणणार! अशा कल्पनेने त्या वेळेस पुण्यातील बाहेर भटकणारे अनेक उनाडटप्पू वाटेल त्या बाता झोकीत फिरत असत. आणि त्यायोगे लोकात आपण कोणी तरी त्या कटातीलच मर्मज्ञ आहोत केवळ गुप्त फोडणे शहाणपणा नाही म्हणून त्याविषयी बोलणे बरे नाही असे म्हणत सारखे सारखे बोलत असत. नि फुकटचा डौल मिरवीत असत. त्यापैकी हेही कोणीतरी असावेत झाले. एखाद्या पोलिसाने नुसते दरडावले तर हे आता शेपट्या घालतील, त्यांचे काय ऐकतोस" असे माझे वडील वारंवार सांगत. पण, तरीही त्यांची ती बातमी ऐकून मला फार बरे वाटले. मी म्हटले असे असेल तर टिळकांसारख्या वीर केसरीने वीर केसरीस अनुरूप असेच कृत्य केले!- पण मग तर चाफेकरांना माथेफिरू वेडेपीर इत्यादी शिव्या देण्याचा "केसरी" प्रभृती पत्रांचा हा संप्रदाय अधिकच अक्षम्य आणि निंद्यतर ठरतो. राष्ट्रकार्यार्थ फार तर चाफेकरांचा संबंध नाकारणे ही युक्ती टिळकांसारख्या मोहऱ्यास, वीर सेनापतीस, वाचविण्यासाठी अवलंबवावी. पण आपणच तरुण क्रान्तिकारकास असे महत् कार्य करण्यास महत्कृत्य आहे म्हणून कर असे सांगावे आणि त्या वीरांनी ते करताच आपण आपली कातडी वाचविण्यासाठी पगडी पिरवून त्यास त्याच कृत्याविषयी माथेफिरू आणि वेडेपीर म्हणावे याहून निंद्य नीति ती कोणती? राष्ट्रघातकी मूर्खपणा तो कोणता? कारण त्यांस माथेफिरू म्हटल्याने पुन्हां

दुसरा तरुण असे करणे मूर्खपणाचे आहे, असे वाटून कचरणार आणि तरुणास, कोणी न्यायमूर्ति, कोणी हायकोर्ट जज्ज, होणे हाच देशभक्तीचा मुर्दाड मार्ग मोठा सभ्य, मोठ्या शहाणपणाचा वाटून अशा शत्रुंजय बलिदानाचा जाज्वल्य मार्गच वेडेपणाचा वाटेल. त्यामुळे देशात चाफेकरांच्या तेजाने चेतू पहाणारी शत्रुंजय वीर वृत्ती पुन्हा थंडगार होऊन जाईल!

आणि हा शेवटचाच विचार माझ्या मनास अत्यंत अस्वस्थ करू लागला. चाफेकर, रानडे, आपल्या स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन फासावर चढले. त्यांच्या प्राणज्योतीने जाता जाता चेतविलेली ही शत्रुंजय वृत्ती, यज्ञकुंडात समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणे असेल, आणि ती शेवटी कोण्या प्रचंड स्वातंत्र्ययुद्धाच्या महायज्ञांत परिणमवणे असेल तर त्याचे दायित्व माझ्यापुरते मजवरही पडत नाही का? चाफेकरांचे कार्य कुणी तरी चालविले पाहिजे ना! तर मग ते मीच का चालवू नये! तो होम मीही का करू नये!!

## भारतीय स्वातंत्र्ययुद्धाची शपथ!

वासुदेव आणि रानडे फाशी गेले तो त्या नाटकाचा शेवटचा प्रवेश मी ज्या दिवशी वर्तमानपत्रात वाचला- ते फाशीच्या आदल्या रात्री स्वस्थ निजले. पहाटे उठले. गीतापाठ केला आणि “नैनं छिंदन्ति शस्त्राणि” असे गर्जत गर्जत एकमेकांचा हसून निरोप घेत फासावर चढले ते वर्णन, ज्या दिवशी वाचले तेव्हांपासून तर, काही दिवस हे वरील प्रश्न, रात्री झोपेत देखील माझ्या मनात माझे मत विचारीत रहात. शेवटी, दोन चार दिवसांच्या मनाच्या ह्या अवस्थेत मला बालपणातील माझा शेवटचा आधार, माझे संकटी समाधान करणारी, जिला माझी सुखदुःखे मी सांगताच आणि ती ती हसतमुखी ऐकताच माझ्या मनास नेहमी हलकेसे वाटे ती माझी आई तिच्याकडे, त्या देवीकडे मी धाव घेतली, देवघरात गेलो, तिची पूजाभक्तिभावे बांधून स्वदेशाच्या दुःस्थितीने तळमळणाऱ्या म्या सद्‌गदित अंतःकरणाने तिचे ध्यान आरंभिले. आणि शेवटी तिच्या पवित्र चरणावर हात ठेवून - तिला साक्ष ठेवून, आणि मला तेव्हा भासे तसे तिची अनुमती घेऊन मी प्रतिज्ञा केली की “माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, मी सशस्त्र युद्धात शत्रूस मारीत चाफेकरासारखा मरेन किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकी स्वराज्याचा राज्याभिषेक करवीन!” आमच्या नव्या घराच्या लहानशा पण सुंदर देवघरात सुगंधी फुलांचा दरवळ पसरलेला, तुपाचा मंद मंद दिवा निरांजनात तेवत आहे. उदबत्त्यांचा उन्मादकारक नागमोडी धूर कुसुमांच्या कोमल परिमलात विणला जात आहे, महिषासुरास तुडविणारी, सिंहावर आरूढ, अष्टभुजा, जिच्या आठी हातात शस्त्रास्त्रे उपसलेली, उग्र परंतु मजकडे सुहास्य वदने मंदस्मित पाहत असलेली ती सुंदर देवीची मूर्ति देव्हाऱ्यात विराजत आहे, तिच्या पुढे त्या तशा पुण्यमय वातावरणात मी शपथ घेतली. यापुढे मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून “मारिता मारिता मरेतो” झुंजेन!!!

त्या चिमकुल्या देवघरात माझ्या वयाच्या १५ व्या वर्षी मी सद्‌गद अंतःकरणाने त्या देवीच्या पायाला हाताने स्पर्श करताच त्या दैवी स्पर्शाने ही जी शपथेची लहानगी ठिणगी उडाली - पुढे भविष्यात तिचा केवढा भडका होणार होता! किती रक्तपात, घात-प्रत्याघात, वध, फाशी, वनवास, छळ, यश आणि

अपयश, दौरात्म्य आणि हौतात्म्य, प्रकाश आणि अंधार, आगीचे आणि धुराचे कल्लोळ-खंडोखंडी ती आग भडकणारी होती की जी त्यावेळी त्या एका लहानशा ठिणगीत एक चमक होऊन दिसली. एक भयंकर वादळचे वादळ त्या पहिल्या विजेत तळपत सामावलेले होते! कारण आता भूतकाळाच्या दुर्बिणीतून माझ्या जीवनाच्या घटनाक्रमाकडे पाहताना हे स्पष्ट दिसत आहे की पुढे हिंदुस्थानभर गाजलेल्या अभिनव भारताच्या क्रांतिकारक संस्थेचा खरा उगम या शपथेतच झाला. ही माझी प्रतिज्ञाच अभिनव भारताचे मूळ बीज होती! हे सन १८९८ चे वर्ष होते.

पण त्या वेळेस ह्या व्यापक भविष्याची कोणास काय कल्पना असणार! तरी देखील माझा जीवनक्रम बदलवून टाकणारी माझ्यापुरती मी आज कोणती तरी महनीय गोष्ट केली आहे, हा माझ्या मनावर जो दृढ संस्कार त्या दिवशी झाला, तो पुन्हा केव्हाही पुसटला नाही. तो दिवस, ती घटना, एखाद्या लिहून दिलेल्या कर्जरोख्याप्रमाणे माझ्या मनास एकसारखी जाणवत आलेली आहे. मी ती शपथ घेताच त्या कैशोरसुलभ उत्कट भावनेच्या भरात मागे उल्लेखिलेल्या 'देवीदास विजय' ग्रंथात ती घटना, त्या माझ्या निश्चयास यश देण्याविषयी देवीची अतिशय कळवळून ज्यात करुणा भाकलेली आहे अशा ओव्या रचून ग्रथिली आणि त्यात पडलेल्या ठिणगीनेच शेवटी त्या चरित्र ग्रंथाचे ते कौतुकास्पद बाळखेळणे जळून भस्म झाले! कारण पुढे सहा-सात वर्षांतच जेव्हा क्रांतिकारक कटाच्या आरोपासाठी आमच्या तरुण मंडळावर सरकारी कोपाची वीज कडाडली तेव्हा माझ्या लहानपणाच्या लिखाणास देखील घराच्या झडतीत ते त्यांच्या हाती पडल्यास तोही क्रांतीची शपथ घेतल्याच्या उल्लेखामुळे कटाचा पुरावा करण्यात येईल, म्हणून माझ्या सहकाऱ्यांना ते सर्व चरित्र जाळून टाकणे भाग पडले. भगूरला क्रांतिकारक मतांचा फैलाव करण्यासाठी, लोकमान्य टिळकांच्या आणि चाफेकर-रानडे यांच्या उघड उघड गौरवाकरिता, मी लगेच एक एकांकी नाटक रचिले. नाटकाचा असा हा माझा पहिला प्रयत्न. पण मागे उल्लेखिल्याप्रमाणे आमच्या गावातील राणू शिंप्याच्या प्रमुख ताफ्याने तमाशेवाल्यांनी ते बसविण्यास आरंभ केल्यानंतरही कुलकर्णी-पाटलांच्या अंतःस्थ सूचनेमुळे घाबरून ते टाकून दिले. आणि तिथेच त्याची इतिश्री झाली.

पण त्याचवेळी मी दुसरी जी एक कविता रचीत होतो, तिचा योग मात्र दूरवर पसरण्याचा नि पुष्कळ साफल्य पावण्याचा होता. ती कविता म्हणजे "चाफेकरांचा फटका"- महाराष्ट्रभर निदान १९१० पर्यंत तरी ती तरुणांच्या हृदयास चेतवीत आणि चाफेकरांची स्मृति सारखी जागृत ठेवीत नगरोनगरी गुप्तपणे आणि प्रकटपणे गायली जात होती. माझे यापुढचे सहकारी श्री. म्हसकर आणि श्री. पागे यांनी ती छापवून काढण्याचाही प्रबळ प्रयत्न केला. छापता यावी म्हणून त्यातील क्रांतीची जाज्वल्य भाषा काही ठिकाणी गाळून, तिथे द्वयर्थी म्हणजेच वरवर क्रांतिकारक न दिसणारी पण काही झाले तरी क्रांतीच्या उलट नसणारी चरणेही घातली होती. तथापि तरीसुद्धा ती छापण्यास कोणताही छापखाना धजला नाही. कारण त्यावेळेस चाफेकर हे नाव म्हणजेच एखाद्या क्रांतीइतके सरकारास आणि जनतेस भयंकर वाटत होते! राजद्रोही समजले जात होते. तरी घरोघरी, विद्यालयातून, बैठकीतून, उपाहारातून, कॉलेजातून, सभांतूनही तो फटका तरुणात आणि प्रौढात, स्त्रियात आणि पुरुषात अत्यंत प्रिय झालेला असे. जेव्हा

केव्हा मी स्वतःच तो म्हणून दाखवी तेव्हा माझी वृत्ती इतकी उचंबळून यावी की बाहु स्फुरू लागावे, माझा आणि ऐकणाराचाही कंठ भरून यावा, आवेशासरशी आणि शोकासरशी आम्ही आपले देहभान क्षणभर विसरून जावे!

परंतु त्यावेळी माझ्या विचारांना हे क्रांतिकारक वळण लागलेले पाहून आणि माझे प्रत्यक्ष आचरणात मी ती भीषण तत्वे आणू लागलो हे बघून माझ्या वडिलांना निराळीच चिंता वाटू लागली. वास्तविक त्यांनीच मला लहानपणापासून देशप्रेमाची, कवितेची, इतिहासाची आणि लोकमान्य टिळकांच्या राजकारणाची रुचि लावली होती. माझ्या या गुणांचा ते परिपोष करू पाहीत आणि मनातले मनात माझ्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगीत. पण त्या लोकमान्य टिळकांच्या राजकारणापुढे प्रत्यक्ष पाऊल टाकण्याची माझी प्रवृत्ति जेव्हा होऊ लागली, मी या अल्पवयीच जेव्हा येता जाता इंग्रजांना मारण्याच्या आणि बंडाच्या गोष्टी बोलू लागलो, रात्र रात्र एकान्तात जागू लागलो आणि माझ्या मुद्रेवर एक अकालिक चिंता आणि गंभीरता दिसू लागली, तेव्हा ते दचकले आणि माझ्या जीवनास हे भयंकर वळण लागले असता मी प्राण-संकटात पडेन ही धास्ती त्यांनी खाल्ली. एक दिवस ते मध्यरात्री जेवण झाल्यावर सहज बंगल्यात आले तो मी काही कविता गुणगुणत आहे, अगदी गढून गेलो आहे, गालावरून टिपे वहात आहेत, नेत्र कोणा अदृश्य देखाव्याकडे टक लावून राहिले आहेत, इतक्यात नवीन चरण जमताच मी आवेशाने तो म्हणत लिहून काढीत आहे. अशा स्थितीत वडिलांनी मला अकस्मात पण हळूच स्पर्श केला. “काय रे ते”, म्हणून कागद उचलला. पाहतात तो चाफेकरांचा पोवाडा! त्यांनी ती झालेली कडवी पाहिली, फार कौतुक केले आणि माझ्या वदनास अत्यंत वात्सल्याने कुरवाळून म्हणाले, “तात्या, अजून तुझे वय कोवळे, तुझा देह मूळचाच सुकुमार, हे विचार आणि मार्ग भयंकर आणि कठोर. तुझ्या कोमल मेंदूला फार ताण बसेल अशा ह्या विषयाचा ध्यास धरू नकोस. त्यातही आपल्या कुटुंबाची सर्व आशा तुझ्यावर. माझी द्वारका एका खांबावर. फेडलेस तर तूच आपल्या घराचे पांग फेडशील. तेव्हा स्वतःच्या जिवास अशा संकटात ढकलू नकोस. तुला अजून याचे परिणाम किती भयंकर असतात ह्याची कल्पना नाही. तू इतर कविता रच, शीक. मोठा हो, मग काय ते कर!” मी चूप बसलो, पण मनात म्हणालो, “चाफेकरांच्या परिणामापेक्षा आणखी भयंकर परिणाम तो काय असणार? तो भोगण्यास तर आम्ही सिद्धच आहो!” तेव्हापासून उकडते म्हणून मी बंगल्यात झोपाळ्यावर एकटा निजे आणि सर्वजण निजल्यावर त्या कविता रची. दिवसा त्या विषयाकडे लक्षच नाहीसे दाखवून दुसरे वाचन, अभ्यास, चर्चा करी. ह्या तंद्रीत रात्री झोपेतच काही चरण जुळून जात. उठलो की ते पाठ करी.

## मी पुणे प्रथमच पाहिले

योगायोगाने याच वर्षाचे आगेमागे मी पुणे प्रथमच पाहिले. माझ्या वहिनीचे बंधु अण्णाराव फडके यांचे लग्न कर्जतला झाले. त्यावेळी बाबा नि मी असे आम्ही दोघे लग्नास गेलो. पण तिथे मुलाच्या आईच्या का कोणाच्या विटाळशीपणाची अडचण येऊन आठवडाभर लग्न लांबलं. त्या संधीत काही जणासह मी नि बाबा पुणे पाहण्यास जाऊन आलो. याच वेळी माझे भावी सासरे श्री. भाऊराव चिपळूणकर यांच्या घराण्याशी आमचा दाट परिचय झाला. पुण्यास आम्ही जव्हारकरांचे वाड्यातच उतरलो

होतो. माझ्याबरोबर आलेल्या मंडळीत कोणाचे कुणीकडे तर कोणाचे कुणीकडे लक्ष असे- पण माझे सारे चित्त त्या शनिवारवाड्याकडे वेधून राही! मला बखरींच्या अभ्यासाने पेशवाईतील पुणे न पाहाताच पूर्ण परिचयाचे झाले होते. मी किती तरी दिवस-रात्री त्या पेशवाईतील माझ्या मानसिक पुण्यात घालविल्या होत्या. तो शाहिस्तेखान उतरला तो वाडा, ज्या सैंपाकघरातून त्या खानावर झेप टाकण्यासाठी तो सिंहगडचा वाघ घुसला ते सैंपाकघर, पर्वतीवर नाना कुठे झुरत, सवाई माधवरावांचा रंग ज्या ज्या वाटानी गेला- त्या मी माझ्या कवितेत वर्णिलेल्या वाटा आणि पेठा कुठून कशा लागल्या, ते दुर्दैवी कारंजे ज्यावर सवाई माधव उडी घालून घायाळ झाला, तो नानांचा वाडा, ती दिंडी, जीतून सवाई माधवरावांच्या कारंजावरील उडीची ती भयंकर बातमी ऐकताच घाईघाईने निघत असता नाना अडखळून पडले! एक का दोन, हजारो ठिकाणे पाहावीशी वाटत. पण माझ्या बरोबरची मोठी मंडळी या विषयी पूर्ण उदासीन. त्यांची सगळी घाई पुण्याचे ताबूत पाहाण्याची. मला एकट्या लहान मुलाला ते मोकळेही सोडीनात. मला एकट्याला वाट चुकण्याचीही भीती वाटे. त्यातल्या त्यात शनिवारवाडा नि पर्वती पाहिली. मी तिथेच खिळून राही. मी त्या त्या स्थळांची ती ती मनोज्ञ माहिती भराभर सांगू पाही-पण ऐकतो कोण? सारी 'चल! चल!' ही पेशवाईच्या अभिरुचीची दशा, मग आजकालच्या वासुदेव बळवंत-चाफेकर-रानडे यांच्याविषयी तर मला एकदोन थापेबाजांच्या हो स हो ठोकून देणाऱ्या गप्पावाचून कोणीच काही सांगणारा भेटेना. मला वाटत होते पुण्यात पाय टाकताच टिळक-चाफेकरांच्या चर्चेवाचून मार्गोमार्गी लोक काही बोलत नसतील! पण पाहतो तो मी गेलो तिथे तिथे आमच्याकडे येणारे तरी लोक जर काही बोलण्याचे भीतभीत टाळीत असतील, तर त्यांच्या नावाचा उल्लेख! फार काय. चाफेकरांची निंदा करणारेही पुण्यास भेटले! माझी अपेक्षा अशी चुकीची ठरली! पण पुणे पाहून मला स्वतःला जो आनंद झाला तो काय सांगावा. वाटले, तिकडे त्या शनिवारवाड्याकडेच नेहमीच राहावे, पाचसहा दिवसांच्या आत मंडळी लग्नासाठी पुन्हा कर्जतला येताच मला समजले की तेथे शेजारीच असलेल्या दहिवली गावी वक्तृत्व समारंभ आहे. तेव्हा मी लगेच मुलांच्या विषयावर बोलण्यासाठी इच्छूक म्हणून उभा राहिलो. दोन चार दिवसात निबंध लिहून त्या आधारे मी समारंभात भाषण दिले. पहिला क्रमांक आला. पण अध्यक्षांनी पारितोषिके वाटताना माझ्या वक्तृत्वशक्तीची फार वाहवा करून म्हटले की "ह्या इच्छुकाच्या वयाचा मुलगा असा निबंध आणि अशी भाषा लिहू शकेल असे मला वाटत नाही. तो निबंध कोणीतरी लिहून दिला आहे. पण तरिही पहिले पारितोषिक मात्र त्यालाच मिळणे योग्य आहे कारण जरी लिहिले दुसऱ्याने, तरी ते उत्कृष्ट भाषण केले यानेच की नाही! या वयात असे वक्तृत्व निर्विवादपणे कौतुकावहच आहे!" त्यांच्या या भाषणाचा मला विषाद वाटला. मी ताडकन उठून सांगितले की, "निबंध मीच लिहिलेला आहे. मी तो लिहीत असता बिऱ्हाडी पुष्कळांनी पाहिला आहे. आणि हे मी दहादा व्यवस्थापक मंडळास कळवीत असता तो माझा निबंध नाही असे हट्टाने म्हणण्यास पुरावा काय, तर म्हणे माझे वय लहान आहे. ही माझी यःकश्चित् गोष्ट राहो. पण त्याच न्यायाने चालायचे तर ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली; हेही साफ खोटेच म्हणावे लागेल! "गुणाः पूजास्थानम् गुणिषु नच लिंगम् नच वयः!" हे वचन मी सांगून खाली बसताच क्षणभर सभा थक्क झाली. इतक्यात अध्यक्षांनी रागारागाने उठून असा लहान तोंडी मोठा घास

घेतल्याविषयी माझ्यावर ताशेरा झाडण्यास आरंभ केला. पण सभासदांनी आणि व्यवस्थापक मंडळींनी ते प्रकरण मिटते घेण्याचा कल स्पष्टपणे दाखविल्याने अध्यक्षांनी आपले भाषण समारोपाच्या इतर विषयाकडे वळविले आणि सभा संपली. लगेच कार्यवाहानी रात्री मला आपल्याच घरी जेवावयास बोलावून निबंध मीच लिहिला अशी स्वतः त्यांची निश्चिति झाल्याचे सांगितले. पण या सर्व पकरणाचे माझ्या जीवनाच्या दृष्टीने जर काही विशेष उल्लेखनीय महत्व असेल, तर ते हे पहिले पारितोषिक किंवा ही बाचाबाची ह्या यःकश्चित् गोष्टी नसून ते या निमित्ते मला - पुण्याच्या “काळ पत्राचा” परिचय घडला यात आहे. त्या सभेने दिलेल्या पारितोषिकात एक वर्षभर ‘काळ’ पत्रही मला फुकट मिळावे अशी व्यवस्था केलेली होती. हे ‘काळ’ पत्र पुण्याच्या सुप्रसिद्ध शिवरामपंत परांजपे यांचे होय, हे काही सांगावयास नकोच. त्यावेळी ते अगदी अलिकडेच निघालेले होते. पण कसे काय की पण दहिवलीच्या त्या सभेने तेच पत्र वर्षभर मला देणगी दिले. ह्याचा योजक कोण होता कोण जाणे. पण तो ‘दुर्लभ’ योजकातलाच एक योजक होता यात शंका नाही! कारण त्यावेळेस केसरीसारखी अत्यंत नावाजलेली पत्रे सोडून ज्याविषयी फारशी माहिती लोकांस नव्हती ते पत्र त्यांनी निवडले आणि ते मला दिले. खरोखर आता मागे वळून पाहताना त्यावेळेस न दिसणारे जे सर्व संबंध आणि परिणाम - परंपरा दिसतात ते पाहून असेच म्हणावे लागते की माझ्या त्या वेळच्या अभिष्टसिद्ध्यर्थ माझे हाती जर कोणते पत्र पहिल्याने पडावयास पाहिजे होते तर ते काळ पत्र होते. आणि काळासही जर त्याचे संदेशास चरितार्थ करणारा कोणी वाचक त्या पिढीत मिळण्यासारखा होता तर तो मी होतो. यावेळेस माझा काळपत्राशी जो परिचय झाला तो पुढे आजन्म टिकला. काळकर्त्यांचा परिचय अजून व्हावयाचा होता. परिचयामागोमागच काळावर माझी भक्तीही बसू लागली. कारण काळातून आलेला चाफेकर आणि रानडे हा सुप्रसिद्ध लेख माझ्या लवकरच वाचनात आला. त्या लेखात चाफेकर हे Murderer नसून Martyr आहेत, हत्यारी नसून हुतात्मे आहेत, असा त्यांचा गौरव केला होता. तो पाहून मला अत्यानंद झाला. माझ्या मनात खळबळ माजवून राहिलेल्या भावनेस केसरीहूनही अधिक साहसाने व्यक्तविणाऱ्या त्या काळाविषयी मला फार कृतज्ञता वाटू लागली. ह्या लेखासाठीच पुढे टाइम्सने काहूर माजविले आणि दादाभाईंसह सगळ्यांनी काळकर्त्यांस राष्ट्रसभेत मज्जाव केला! या वेळेपासून काळाचा लेख असा मी केव्हाही वाचल्यावाचून राहिलो नाही. काही काही लेख तर दहा-दहा वेळा वाचले असतील. जिथे जाई तिथे काळाची प्रशंसा करी. लोकांस काळ बळे बळे वाचून दाखवी. त्यांच्याविरुद्ध पक्ष त्यावेळेस फारच मोठा होता. लोकसमाज एकंदर भित्रा! क्रांतिकारक विचार वाचायची देखील त्यास भीति वाटे, सांगण्याची लाज वाटे म्हणून ते विचारच अतिरेकी, वेडेपणाचे, पोरकट म्हणून त्यांचाच द्‌वेष करीत. काहीकांस काळ हा केसरीचा मत्सर करतो अशा एका गांवढळ कल्पनेने पछाडलेले होते. मी जिथे जाई तिथे काळावरील या आक्षेपात मोठी झटापट घेई. कारण काळाच्या इतके सशस्त्र क्रांतीचे समर्थक आणि सूचक दुसरे कोणचेही असे पत्र त्यावेळेस नव्हते. माझ्या मतावर नसला तरी माझ्या ज्ञानावर, भाषेवर, संस्कृतीवर आणि उत्साहावर ‘काळा’च्या अखंड परिशीलनाचा फारच मोठा परिणाम झाला. इतका की, जर मला माझ्या क्रांतिकारक जीवनाच्या स्फूर्तीचे गुरुपद कोणास तरी देणेच असेल, तर ते मी काळासच देऊ शकेन; पण तेही केवळ क्रांतिकारक

जीवनाच्या स्फूर्तीचे- कृतीचे नव्हे. कारण माझ्या क्रांतिकारक संघटनेत आणि संगरात सदैव मलाच माझे पुढारी व्हावे लागले. मला माझ्याविणे दुसरा कोणताही गुरु वा नेता त्या रणकंदनांत प्रत्यक्ष सक्रिय सहाय्य देणारा नव्हता- बहुतेकजण मला नाकारणारेच होते. एक दोघे आतून ठीक वेळेवर "धन्य" ही म्हणणारे होते. पण माझ्या ध्येयाच्या, धाडसाच्या आणि रणधुमाळीच्या पुढे पाऊल टाकणारा त्यात माझे पुढारीपण घेणारा त्या पिढीतील पुढाऱ्यांत कोणीही नव्हता. ते झाडून सारेजण फारफार मागे उभे राहिलेले असत. आणि आपण मागे रेंगाळत आहोत असे न समजता मीच भरमसाट भडकलो आहे असे समजत. 'काळ'कर्त्यांनी एवढी चूक मात्र कधीही केली नाही. दुसऱ्यास मागे तरी ओढले नाही.

**पण गुरुणां गुरु : केसरीच -- लो. टिळकच!**

'काळा' संबंधीची ही चर्चा करीत असताना गैरसमज टाळण्यासाठी हेही येथेच सांगून टाकणे अवश्य आहे की क्रांतिकारक धोरणाची गोष्ट वगळली असता काळाइतकीच नव्हे तर काळाहूनही अनेक पटीने अधिक अशी 'केसरी'वरही माझी आबाल्य भक्ति होती. काळाप्रमाणेच केसरीच्याही अनेक लेखांची मी पारायणे करीत आलो. उभ्या महाराष्ट्राची आणि अंशतः हिंदुस्थानची देखील राजकीय घडण ज्या केसरीने घडविली, त्याच्या लिखाणाचा माझ्या घडणीतही अंश नसणे केवळ अशक्य होते. लोकमान्यांच्या अत्यंत कृतज्ञ आणि अत्यंत निष्ठावंत अनुयायाहूनही मी कृतज्ञ आणि निष्ठावंत होतो आणि राहिलो याचे हेच निरुत्तर प्रत्यंतर आहे की मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी लोकमान्यांचे सर्व राजकारण आणि उपदेश आचरण्याची पराकाष्ठा करून त्यांच्या कार्यक्षेत्राच्या पुढच्या प्रत्यक्ष रणक्षेत्रात उतरण्याची हाव धरलीः धाव घेतली! त्यांचे गणेशोत्सव, शिवोत्सव, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार, सभापरिषदा या सर्व अनेकमुखी आंदोलनांच्या कार्यक्षेत्रातील जे इंगित तेच आम्ही त्यांनी न सांगताही ओळखून त्या सर्वांचे अपरिहार्य पर्यवसान ज्यात व्हावयाचेच हे लोकमान्यच काय ते जाणत होते, त्या रणक्षेत्रातच आम्ही अचानक उतरलो, हेच त्यांच्या निष्ठावंत अनुयायित्वाचे आमचे प्रमाणपत्र.

त्यांच्या दिखावू ध्येयांच्या सुराज्य-होमरूल-स्वराज्य, या पायऱ्या चढत आम्ही त्यांच्या मनोमय खऱ्या उद्दिष्टाच्या, स्वातंत्र्याच्या, ध्येयाची पायरी चढलो. ते जे मनात बोलत - ते आम्ही गर्जलो. ते जेथे थांबत तेथून आम्ही पुढे सरू. ते नेते, राष्ट्राच्या एक पावले पुढे असत. पण त्यांनी त्यापुढची पाऊले निर्वेधपणे टाकता यावी म्हणून आम्ही त्यांच्याही पुढे शंभर पावले जाऊन झुंजून आमच्या राष्ट्राच्या सशस्त्र दळभाराचा मार्ग निष्कंटक करण्याचे Sappers and miners चे पुरस्सर पथकाचे यत्न केले. जिथे त्यांची साधने बोथट होती, तिथे अचानक त्याच साधनांच्या लोखंडास वितळवून आम्ही साधनाचे शस्त्र बनविले. बोथटपणास धार पाजली. म्हणूनच आम्ही त्यांचे खरे निष्ठावंत अनुयायी. कारण त्यांच्यापुढे धावून त्यांचे मनोगत, उद्दिष्ट सिद्धीस नेण्यास झटलो. ते खड्गाची मूठ होते. आम्ही क्रान्तिकारक त्यांचे पाते होतो. खड्गाची मूठ ही जरी पाते होऊ शकत नाही, तरी पाते हे मुठीच्याच आधारावर रणकंदनी लवलवते. पाते मुठीच्याच मनोगताचे पारणे फेडीत असते.

माझ्या या विचारातील क्रान्तिकारक चळवळीचा आणि माझ्या कक्षेत येणाऱ्या लहानमोठ्या मंडळीत मी त्या विषयी चालविलेल्या प्रयत्नांचा थोडाबहुत परिणाम माझ्या ज्येष्ठ बंधूंवर अगदीच न

होणे अशक्य होते. माझ्या कविता, लेख, भाषणे यांचा त्या लहान वयात गौरव होत असलेला पाहून कोणाही भावास होणार नाही इतका आनंद माझ्या बंधूंस होई. माझी राजकीय मते त्यांना रुचत. परंतु मला जसे त्या विचारांनी अगदी पछाडून सोडले होते तसा त्यांना त्याचा नाद त्यावेळेपर्यंत लागलेला नव्हता. वडिलांनी माझे आधीच त्यास नाशिकला शिकावयास ठेविले होते. इंग्रजी पाच इयत्ता उतरेतो ते लक्ष लावून शिकले. पण पुढे त्यांचे चित्त अभ्यासातून उडाले. तरी देखील माझ्या वडिलांच्या भाडभिडेने कसेबसे सातवीत गेले. त्यास त्या वेळेस दोन परस्पर विरुद्ध प्रवृत्ती दोन उलट दिशेने खेचीत होत्या. ते एकाच वेळी दोन संगतीत रमलेले असत. एक गोसाव्या बैराग्याची संगत, नि दुसरी नाटकी मंडळीची! एक भस्म आणि धूळ फासून धर्मशाळातील मठीत गुंगलेले. दुसरे रंगबेरंग फासून नाट्यशाळातून पेटी लावून रंगलेले. या दोन्ही वर्गात साम्य असे वाढविलेल्या केसांत काय ते असणार! एकाच्या वळलेल्या राकट जटा, दुसऱ्यांचे विंचरलेले कुरळ कुंतल! माझ्या बंधूंचा सारा वेळ निःपक्षपातपणे या दोघांत वाटलेला असे. त्यांच्या नाटकी मित्रांच्या नादाने त्यांच्या रात्रीमागून रात्री चहा, चिवडा, गाणेबजावणे, नाटक रंग यात जात, आणि त्यांचे दिवसामागून दिवस प्रभातस्नान करून अकरा वाजेतो प्राणायाम, जपजाप्य इत्यादी अभ्यासात घालवून दुपार गोसावी-बैरागी यांच्या अड्ड्यांतून वेदान्ताची आणि भक्तीची चर्चा करण्यात किंवा किमया, मंत्रतंत्र, जादूटोणा यांच्या गप्पा ऐकण्यात किंवा त्यांना भाजी आणून दे, आसन झटक, मठी झाड, पाय चेप इत्यादी त्यांची परिचर्या करण्यात जात. मुलगा नाटक्याबरोबर केव्हा निघून जाईल याचा वडिलांना नेहमी धाक वाटे. तथापि नाटक हा त्या मुलाच्या मनाचा ओढा होता परंतु त्याच्या आत्म्याचा ओढा नाटकातील संसारासच नव्हे तर या प्राकृतिक संसारासही तुच्छ मानून, त्याचा आमूलात् परित्याग करून ह्या चंचलापासून सुदूर, सुभव्य, सुगूढ अशा त्या चिरंतनाकडे लागलेला होता. त्याला ज्या वैतागाच्या लहरी मधून मधून येत त्यातली मी लिहीत आहे त्या काळातील म्हणजे सन १८९८-९९ च्या संधीस माझ्या बंधूंच्या विसाव्या वर्षाच्या आत बाहेर आलेली लहर अगदी निकराची होती. विवेकानंद अमेरिकेत वेदान्ताचा विजयदुंदुभि नादवून अलीकडेच परतले होते. उभा हिंदुस्थान त्यांच्या वेदान्तिक व्याख्यानांनी आणि राजयोग, कर्मयोग इत्यादी पुस्तकांनी भारला जात होता. ती पुस्तके आणि ती व्याख्याने माझ्या बंधूंनी आणि त्यांच्या नादाने मीही वाचली. विवेकानंद प्रत्यक्ष निर्विकार समाधिपदाचा अनुभव घेतलेला राजयोगी आणि तो अलभ्य राजयोग स्वतः येईल त्यास शिकविण्याची प्रतिज्ञा करून मायावतीच्या आश्रमात ठाण मांडीत आहेत. ही बातमी ऐकताच योगानंदासाठी आबाल्य तळमळणाऱ्या माझ्या बंधूंच्या मनास आणखी धीर धरवेना. त्यांनी घरातून निसटून मायावतीस पळून जाण्याचा बेत नक्की केला. अकस्मात 'तत्र तं बुद्धि संयोगम् लभते पौर्वदेहिकम्' असे काहीसे होऊन संसाराचा त्यास अत्यंत विराग आल्यासारखे झाले. कौटुंबिक, सामाजिक, राजकीय इत्यादी ऐहिक खटाटोप तुच्छ भासू लागले. जर का ते त्यावेळेस तसेच निघून जाते, तर बहुधा त्यांच्या उभ्या आयुष्याचे वळण अगदी निराळी दिशा घेते. पण त्यांचा तो निश्चय व्हावयास आणि त्यांचा बैरागी होऊन निघून जाण्याचे मार्गात दुर्लंघ्य अडचण न येती आणि तो उद्रित वैराग्य तरुण मायावतीस पळून जाऊ शकता तर त्याचे जीवनास बहुधा अगदी निराळेच वळण लागते आणि त्या प्रमाणात पुढे राज्यक्रांतीच्या आंदोलनात त्याने केलेल्या

प्रचंड उठाठेवीची उणीव पडून त्या मानाने तिच्याही प्रगतीत लक्षात येण्यासारखा फरक पडला असता; पण!-

**तोच अकस्मात् आमचे कुटुंबावरही प्लेगचे भयंकर अरिष्ट कोसळले!**

आणि त्यासरशी सर्वांचे बेत पत्त्याच्या तंबूसारखे ढासळून गेले. ते वर्ष १८९९ चे होते. नाशिकला त्यावर्षी प्लेगने पुन्हा हाहाःकार उडवून दिला. आम्ही दोघे शिकण्यासाठी नाशिकला ज्या तिळभांडेश्वराच्या गल्लीत वर्तकांच्या वाड्यात होतो, त्याच्या शेजारच्या श्री. दातारांच्या घरीही प्लेगचा प्रादुर्भाव झाला. वर्तकांप्रमाणेच दातारांचे रामभाऊ हेही माझ्या बंधूंचे हायस्कूलातील वर्गबंधु होते. पुढे त्यांचा दाट स्नेहही जडला. १८९८ वर्षी जेव्हा नाशिकला प्लेग प्रथमतःच आला आणि त्या रोगाच्या आणि सरकारी कडकपणाच्या त्रासाने लोक रानोमाळ धावपळ करू लागले तेव्हा माझ्या वडिलांनी माझ्या वडील बंधूंच्या आग्रहामुळे दातारांच्या सासरच्या मंडळीस भगूरला आमच्या जुन्या घरी प्लेग संपेतो राहावयास जागा दिली. तेव्हा रामभाऊंची मंडळीही आमचे घरी येऊन राहून गेली. त्यामुळे दातारांचे वडिलांना नाशिकला ह्या सन १८९९ च्या दुसऱ्या प्लेगमध्ये जेव्हा प्लेग झाला, तेव्हा बाबांनी त्यांची शुश्रषा स्वतःच्या जिवाकडे न पाहता अगदी त्यांच्या पुत्राप्रमाणेच केली. पण शेवटी ते वारले. आजूबाजूसही प्लेगने लोक पटापट मरू लागले. तेव्हा आमच्या वडिलांनी आम्हा दोघांस शाळेतून काढून भगूरला परत नेले.

ज्येष्ठ आषाढचे संधीस बातमी आली की माझी बहीण दिली होती त्या त्र्यंबकेश्वर गावीही प्लेगचा धुमाकुळ चालू झाला. ते दिवस आंब्याचे होते. भगूरला आमच्या नामांकित आंब्याच्या मोठाल्या आंबराया असत. आंब्याच्या दिवसात गाड्याच्या गाड्या भरून आंबे येत. त्यावेळी बहुतेक इष्टमित्र, संबंधी मंडळी प्रतिवर्षी अनेक गावाहून आमच्या घरी येऊन आठ-दहा दिवस राहून त्या नामांकित आंब्याचा पाहुणचार घेऊन जात. त्रिंबकला प्लेग झाला हे ऐकताच माझी धाकटी बहीण आणि मेव्हणे भास्करराव काळे यास प्लेगसाठी स्थानत्याग करण्यास्तव भगूरलाच बोलवावे. आंब्याचा पाहुणचार पण होईल अशा बेताने वडिलांनी त्यांना आणावयास माझ्या वडील बंधूंना धाडले.

धाडले खरे, पण भगूरला तरी काय? ज्याच्या त्याच्या पोटात सारखी धुगधुग होत होती. जवळच नाशिकला प्लेगने चाललेला कहर जाते येते पाहत होते. पुण्या-मुंबईस प्लेग चालू झाला तेव्हा उसळलेल्या ज्या भयंकर कहराची वर्णने केसरी प्रभृति पत्रातून माझ्या घरातील "सावरकरांच्या" बैठकीवर बसून ते भगूरचे गावकर "युद्धस्य कथा"प्रमाणे वाचून त्यातील भीतिबहुल अद्भुतता उपभोगण्यात दंग होत, - तोच प्लेग, तोच कहर आता आपल्या दाराशी येऊन प्रत्यक्ष उभा राहतो की काय, या विचारासरशी ज्याच्या त्याच्या पोटात धस्स होई. इतक्यात श्रावणाचे संधीस गावात अुंदीर पडू लागल्याच्या चोर बातम्या उठल्या. अशुभ बातमी खोटी आहे असे समजत राहण्याचा अगदी गळ्याशी भिडेतो मनुष्य सहजच प्रयत्न करतो आणि शुभ बातमी खरी असलीच पाहिजे असे गृहीत धरण्याचाही! त्यामुळे अुंदीर मरत असताही प्रथम आपल्या घरी अुंदीर मेले हे कोणीच मानीना. तुम्ही चोरी केली असा आक्षेप येताच आपण जितके संतापून तो नाकारू लागतो तसेच तुमच्या घरी अुंदीर मेले असे

कोणास विचारताच तो संतापून ते नाकारू लागे. कारण घरात अुंदीर मरण्याची त्यावेळी खरोखरच चोरी होती. अुंदीर मरताच सरकारी माणसे येऊन घरवाल्यास घर सोडण्याचा हुकूम दिला जाई. रानावनात ते कुटुंब भटकू लागे. घरचे सामान धुतले जाण्याच्या धांदलीत घरच धुवून नेले जाई. आणि त्या भीतीच्या सत्राच्या नि वनवासाच्या हबक्याने उद्या प्लेगने लागणारा मनुष्य आजच लागे. यास्तव घरी अुंदीर मेला हे जो तो नाकारी. जे निरुपायाने मानीत ते दुसऱ्याचीच नव्हे तर स्वतःचीही शेवटपर्यंत अशीच समजूत बळे बळे करून घेत की तो मांजराने मारला! प्लेगचा नव्हे. घरात प्लेगचे मनुष्य लागून पडेतो अुंदीर प्लेगने मेला हे कोणी मानीत नसे. आणि मनुष्य प्लेगने मरेतो तो प्लेगने लागला हे कोणी सिद्ध होऊ देत नसे. यामुळे प्लेग फैलावला असता त्याहून अधिक त्वरेने फैलावे. पण प्लेगपेक्षाही तो निवारण्याचा सरकारी सत्रास अधिक भीतीप्रद असल्यामुळे लोकास ही अशुभास अशुभ म्हणण्याची टाळाटाळी शक्यतोवर करीत राहण्यावाचून गत्यतर दिसेना. आमच्या घरातही दोनचार अुंदीर पडले. पण ते अण्णांनी-माझ्या वडिलांनी - प्लेगचे नसतील, नेहमीच मरत तसे मेले असे समजून अगदी गुपचुप फेकून देववून त्याची चर्चा कुठेही न करण्याविषयी आम्हा मुलांस अगदी बजावून सांगितले. ज्या मुलांचा माझ्या घरी फार लोभ असे, त्या राणू शिंप्याच्या राजा आणि परश्या या मुलांच्या घरीही अुंदीर पडले होते, पण त्यांनीही ते लपविले. तो दोन दिवसात त्याचा एक कर्ता भाऊ तुकाराम प्लेगने आजारी झाला. त्यास 'देवाचे' अंगात येई. त्यानेच तो ताप आला असे ढोंग ते दिवसभर करतात न करतात तोच दुसऱ्या दिवशी पहाटे तो वारला! मग मात्र गावभर एकच बोंबाबोंब झाली. ज्याच्या त्याच्या तोंडचे पाणी पळाले. राणू शिंप्याच्या घरावर पाटील कुलकर्ण्यांनी मोहोर केली. त्या पाचपंचवीस माणसांचे कुटुंबास रडत ओरडत तसेच रानात जाऊन दुकानाची पाले काय ती ताणून पडताना आम्ही पाहिले. तोच माझ्या शेजारीच एका गवंड्याच्या घरातील कर्ता पुरुष प्लेगने पडला. त्या रात्री दहा वाजण्याच्या संधीस त्या माणसास कण्ह लागला नि तो त्याचा भयंकर आवाज आमच्या खिडकीशी ऐकू येऊ लागला. आम्हा मुलांस भीती वाटेल म्हणून अण्णांनी आम्हास खालीच निजविले, पण मी गुपचुप उठून जिन्याच्या खिडकीशी जाऊन तो त्या शेजारच्या मनुष्याच्या मरणाचा कण्ह ऐकत बसलो. एकीकडे भीती वाटे, एकीकडे कुतुहल, आणि माझ्या स्वभावाचा तेव्हापासूनच जो एक अशुभाकांशी दूरदर्शीपणाचा विक्षिप्त आणि अपशकुनी कल असे, पण जो अशुभाशीच सतत झगडत राहणे दैवी आलेल्या माझ्या आयुष्यास आजवर फारच उपयोगी पडला त्या कलाप्रमाणे, त्या प्रवृत्तीप्रमाणे, माझ्या मनात स्वतःच्या कुटुंबावरच प्लेगचा कहर कोसळला तर काय करावे याचे भीषण विचार झटपट येऊ लागले. वडीलच प्लेगने वारले तर? सरकारी लोक आपले घर उस्कटतील. सामान कसे फेकतील. आपण भावाची व्यवस्था करू! पण भाऊच वारला तर! - अण्णा असे शोक करतील, आपणास असे रडू येईल, पण मग आपण धीर धरून त्यास असे समजावू; मग ते आपल्या धैर्यास असे वाखाणतील! पण आपणच प्लेगला बळी पडलो तर?- तो आपला 'दुर्गादास विजय' ग्रंथ आणि त्या कविता आणि तो सर्व-सार-संग्रह आपले हे सर्व लिखाण प्रसिद्ध करण्याची विनंती वडिलास अगदी शेवटची इच्छा म्हणून करावयाची, एक ना दोन, अनेक विचित्र आणि माझे मलाच अपशकुनी वाटणारे विचार मनात येऊन गेले. आणि तरीही प्रत्येक संकटास

अविचलपणे तोंड देण्याची आपल्या मनाची ही सज्जता पाहून त्या अपशकुनी विचारांविषयी मला धन्यताही वाटली! पुढे तो शेजारी एकदम किंकाळ्या मारू लागला. अण्णांना त्यांची मंडळी बोलावू आली. त्या प्लेगच्या स्पर्शजन्यपणाच्या भीतीने त्या काळी सगेसोयरे देखील रोग्याकडे जात नसत. अण्णाही अगदी निरुपाय म्हणूनच गेले समाचार घेऊन आले. थोडी झोप होते तो पहाटे एकदम रडारड ऐकू आली. चोवीस तासांच्या आत धडधाकट शेजारी मेला. सकाळी सरकारी लोकांनी येऊन त्या घराची कौले उस्कटली. सामानाची, धान्याची सुद्धा अंगणात फेकाफेक करून घर धुऊन काढले आणि प्रेताच्या मागोमाग रडारड करीत बायकापोरास घरातून काढून दिले. त्यांना गावाबाहेर राहण्यास सांगितले पण झोपडी काही बांधून दिली नाही! सरकारचे ते काम नव्हते!

त्या दिवशी रात्री अण्णा कुठे काय की आणखी एका प्लेगच्या रोग्याच्या समाचाराकरिता गेले. आमच्या मामांनी प्लेग चालू होताच, “भगूर सोडा, मुले माणसे पाठवून द्या” म्हणून तातडीने कळविले; पण घर सोडा हे म्हणणे जितके सोपे असते, तितके तत्क्षणी ते सोडणे कठीण असते. कुठे जावे याचा विचारही करण्यास वेळ नाही इतक्यातातडीने एका चार दिवसात उभ्या गावास आग लागली! त्या रात्री तोच घर सोडण्याचा विचार करीत अण्णा त्या रोग्याच्या घरून परत येत असता आमच्या आळीतच असेणारे ते राणू शिंप्याचे घर लागले. एका चार पाच दिवसांपूर्वी त्या घरात वीस-पंचवीस माणसांचे कुटुंब मुलांबाळांच्या हसण्याने गजबजलेले आनंदात नांदत होते. आज रात्री अंधारात ते घर एकाद्या स्मशानासारखे भयाण झालेले, आत मनुष्य नाही, दिवा नाही, कौले देखील उस्कटून टाकलेली, खिडक्या, दारे सताड उघडी, घुबड घूघू करीत, तोच काय तो त्यांचा ओसाड शब्द! अण्णांच्या मनात चर्र झाले. घाबरल्यासारखे झाले. आणि ती रोजची पाऊलवाट असताही, सरळ रस्त्यावर खड्डा असल्याचा भास होऊन पाय खोल टाकताच मुरगळून अण्णा पडले. तसेच घरी आले. रात्री भय वाटत आम्ही मुले दाराशीच त्यांची वाट पाहत होतो. येताच लंगडतातसे पाहून मी विचारले काय झाले. काही नाही, पाय मुरगळला इतकेच वडील म्हणाले. नाहीतर आम्ही मुले घाबरू! मी त्यांनी सांगितलेले औषध लावून पाय चेपीत राहिलो, एक प्लेगप्रतिबंधक औषध त्यांनी नाशिकहून आणलेले असे. ते सर्वांनी घेतले. मग निजलो. दुसऱ्या दिवशी वहिनीने नि मी स्वयंपाक केला. कारण स्वयंपाकात पोळ्याबिळ्या करून मी माझ्या लहान वहिनीस सहाय्य देत असे. पहातो तो अण्णा जांघेत काही चाचपीत उभे राहिलेले दिसले. मला पहाताच चपापले, मीही चपापलो. काय दुखते विचारले तर म्हणाले पाय मुरगळला त्याचा आवधाणा असावा. जेवण झाले. वडील माडीवर गेले, बाळ अगदी लहान, अवघा अकरा वर्षांचा, चवथ्या-पाचव्या वर्षी आई वारल्यापासून वडीलच त्याचे आई झालेले. प्रत्यही दुपारी त्यांच्यापाशी निजण्यास ते मूल जाई. पण, त्या दिवशी अण्णांनी बाळाला वर न नेता मला वर बोलाविले. त्यावेळी माझे वय सोळा वर्षांचे, वहिनीचे चौदा वर्षांचे आणि बाबांचे वीस वर्षांचे होते, आणि वर जाताच मला पोटाशी घेऊन एकदम डोळे भरून येऊन मला म्हणाले, “बाळ मला प्लेग झाला आहे! बाळांनो आता तुम्हा माझ्या चिल्यापिल्यांचे कसे होईल!” हे ऐकताच मी दचकलो. पण माझ्या स्वभावाचा लहानपणापासूनच हाच विशेष की संकट येताच माझे मन दगडासारखे होऊन-उलट एक प्रकारचे कर्तृत्वाचे अवसान चढे, मी

म्हटले “काय चिंता, वैद्यास बोलवून आणतो” छे छे, ही बातमी खाली मुलांस कळवू नकोस. नाहीतर पोलिस येतील. असे त्यांनी सांगितले. तेव्हा आधी वर्तमानपत्रात एक रामबाण औषध म्हणून वाचले होते ते लावू का म्हणून मी म्हटले. लाव म्हणताच मी काही निमित्ताने माझा एक त्रिंबक शिंपी म्हणून बालमित्र होता त्याच्या घरून दोन कोंबडीची अंडी गुपचूप आणविली आणि शेंदूर घालून तो लगदा अण्णांच्या गाठीवर बांधून मागच्या माडीत त्यांना निजविले, वहिनीला मात्र खरे ते सांगितले. आणि जेव्हा बाळ अण्णांना भेटण्याचा छंदच घेऊन बसला, तेव्हा त्यांना हिवताप आला आहे असे सांगून वर नेऊन भेटवून आणला, पण तिकडे मी अंडी आणविली- ब्राह्मणाच्या घरी अंडी हे विलक्षण! त्यामुळे त्रिंबकच्या घरी कुजबुज सुरू झाली. यावेळी माझ्या लहानपणाच्या प्रत्येक संकटात उपयोगी पडणारे राजा व परश्या हे दोघे भाऊ मागे सांगितले तसे रानात निघून गेलेले. त्यांचा भाऊ एक दिवसात वारताच लागोपाठ त्यांची आई प्लेगने रानातच लागली. दोन दिवसात ती अर्धमेली होऊन पडली. खालचा भाग साफ मेलेला, पण तोंडाशी थोडा श्वास. तिच्या मुलांबाळांना तरी स्पर्शजन्य रोगापासून वाचवावे म्हणून तिला दूर एका झाडाखाली भोवती कपडा बांधून टाकली. तो रातोरात तिच्या मेलेल्या अर्धांगास मुंग्या आणि उधगीने खाऊन भोके पाडली ही बातमी ऐकली. बाळ संध्याकाळीच अण्णांपाशी जाण्यासाठी तळमळू लागला. तेव्हा अण्णा आजारी ते लोकांस कळवायचे नाही, तर रडू नकोस असे त्यास सांगितले. त्या मुलाने एकाद्या समंजस माणसाप्रमाणे चटकन रडे आवरले इतकेच नव्हे तर मला पाणी, कांजी, दूध, वर नेण्या-आणण्यांत रात्रभर सहाय्य दिले. पहाटे अण्णा मोठमोठ्याने कण्हू लागले. लोकांस गुणगुण पसरली. सकाळी बापूकाकांस कळले. ते फारच घाबरले. पण घरी आले नाहीत. पोलिसांना चूप राहण्यास सांगून येतो म्हणून जे बाहेर गेले ते गेलेच. पण त्यांनी पाटील कुलकर्ण्यांस इतके मात्र सांगून ठेवले की अण्णा आजारी आहेत. तो त्यांनी ती बातमी समजलीच नाही असे दाखवून चौकशी करू नये आणि घरातून आम्हास शक्य तो बाहेर काढू नये. एक दोघांनी येऊन जळवा लावण्याचे ठरवून जळवा आणल्या. त्या अण्णांच्या जांघेत लावताच त्यांनी गोळा शोषून घेतला. पण मग रक्त वाहू लागले, ते थांबेना आणि दुपारी गोळा पुन्हा अधिकच फुगून आला. वहिनीने कसाबसा सैपाक केला. बाळ नि मी जेवलो. तो अण्णा फारच घाबरले. बाळाला खाली पुढच्या अंगणात पहाऱ्यावर बैस, कोणी आले तर घरात नाहीत सांगून परत धाड, असे सांगून मी मागच्या बागेत सावरीच्या बोंडांचे एक औषध कोणीसे सांगितले ते करण्यासाठी बोंडे तोडीत होतो. इतक्यात बाळ तिथे आला. मी रागावून म्हटले “तू आपले काम सोडून इकडे का आलास? जा परत तिकडे!’ तसे ते मूल परत जाऊ लागले पण मी त्याच्या डोळ्यास पाणी आलेले पाहिले. तेव्हा अण्णाकरिता तो रडतो आहे असे वाटून मी त्यास जवळ घेतले आणि समजावू लागलो. तेव्हा अगदी लाजत लाजत ते मूल म्हणाले “तात्या! रागावणार नाहीस तर एक सांगावयाचे आहे तुला.” “सांग”, म्हटले तेव्हा बाळ म्हणाला “अण्णासाठी तुला आधीच किती त्रास पडत आहेत, म्हणून मी सकाळपासून चोरून ठेविले. पण मला आता उभेच राहवत नाही. माझ्या जांघेत फार दुखत आहे!” आणि बाळ रडू लागला. त्या एवढ्याशा मुलाने माझ्या त्रासाकरिता इतका वेळ आपले असले दुखणे चोरून ठेविले होते तर! केवढा समंजसपणा नि धीर! मला गहिवरून

आले. मनास धक्का बसला. पण न घाबरता मी बाळास म्हटले “हात्तेच्या? इतकेच ना! चल मी तुला ते शेंदराचे औषध लावतो. अण्णाना मात्र कळवायचे नाही अं हे! अण्णाकडे जाणार नाहीस ना?” “छे मुळीच नाही जाणार, ते घाबरतील.” लगीच बाळास घेऊन पुढच्या बंगल्यात निजविले. वहिनीला सांगितले ‘तू बाळाची शुश्रूषा कर. मी अण्णांची करतो. कोणास कोणी बातमी द्यायची नाही अं!’ “बिचारी वहिनी! मी सांगेन ती पूर्वदिशा असा तिचा विश्वास. खरे पाहता तीही लहानच. पण कोण धीर. चुपचाप बाळापाशी बसून राहिली. प्लेगच्या रोग्याच्या श्वासोछ्वासानेही दुसऱ्यास प्लेग होतो हे आम्हास पाठ होते. त्यामुळे मधूनमधून मी स्वतःची जांघ दाबून पाही दुखते का ते! आणि वहिनीस वरचेवर विचारी, ‘तुझे डोके बिके दुखत नाहीना? असेल तर लगेच सांग हो! चोरू नकोस” ते प्लेगप्रतिबंधक औषध तिला देई. मी घेई आणि सारखी वाट पाही-बहिणीस आणण्यास गेलेले बाबा-माझे वडील बंधू केव्हा येतात! संध्याकाळी बाळ आणि अण्णा मोठमोठ्याने कण्हू लागले, त्यांना पाण्याचा शोष भारी. पण पाणी देऊ नको म्हणून लोक सांगत, बंगल्यात बाळ - मागच्या माडीत अण्णा. सोबत कोणी नाही. त्या रात्री सोबतीस, आमच्या दाराशी कुत्र्यासारखे जे नेहमी पडलेले असत अशा एका दोघां कुळास बोलाविले. पण त्या संकटी कोणी येईना. आमच्या नातलगात खरा आधार असा एक मामांचा. म्हणून त्यांना कोठराहून येण्यासाठी तार केली. अण्णांच्या दुखण्याची ती दुसरी रात्र. नऊ दहा वाजता वायूचा भयंकर झटका त्यांना आला. मी पाणी देईना म्हणून संतापू लागले. उठून धावू लागले. माझ्यासारख्या केवळ एका मुलास ते कुठचे आटपणार. इतक्यात, झाले काय की दिवा धाडकन खाली पडून मालवला आणि मला अण्णा मारावयास धावतात असे भासले. तेव्हा घाबरून अंधारातच मी धड धड खाली आलो. सुदैवाने ते मात्र येऊ शकले नाहीत. तर पुन्हा अंथरुणापुढच्या दारापाशीच कण्हत पडले. आणि ‘तात्या! बाळ! अरे पाणी द्या!’ म्हणून विव्हळू लागले तेव्हा माझा जीव त्यांच्याकडे जाण्यासाठी झटपटू लागत असतानाही भयाने त्या काळोखात जाववेना. इकडे बाळही ‘तात्या’ म्हणून मोठ्याने ओरडत होता. वहिनी त्याचेपाशी होती. मी बंगल्यात त्याच्याकडेच गेलो. त्यासही वायूचा झटका येत होता. “पण बाळ, ओरडू नकोस; नाही तर अण्णांना तूही आजारी आहेस हे कळेल ना!” असा मी धाक घालताच तशा अर्ध बेशुद्धीतही ते मूल थोडा वेळ चूप राही! वहिनीला मी येताच दाबून ठेवलेले रडू कोसळले. माझ्या मनात चर्र झाले, की हिला तर काही झाले नाही ना! तेव्हा प्रेमाने तिला गोंजारून विचारले, “तुझे तर काही दुखत नाही ना?” ती म्हणाली- “माझे कशात काय, पण तुमचे ते क्लेश पाहून मला तुमची चिंता वाटते. तुम्ही थोडे तरी निजा.” मी म्हटले “अशा वेळी असे रडून कसे चालेल. धीराने संकटाशी झुंजच घेतली पाहिजे.” मग आम्ही असे ठरविले की अण्णा वायूसरशी जिन्यातून पडतील तर त्या माडीची दारे लावावी म्हणून दिवा घेऊन दोघे तिकडे गेलो तो अण्णा पुन्हा धावून आले. आणि खाली जाऊ लागले. मी शेवटी थोडे पाणी दिले आणि ते ते पाणी पितात तो दारे लावून घेतली. पण अण्णा ओरडतच होते. “पाणी, तात्या पाणी!” अण्णांच्या त्या अत्यंत आतुर किंकाळ्या ‘तात्या! बाळ! अरे कोणी या!’ या मला अजून ऐकू येतात. आणि ओ देऊन असेच आता त्यांना तडक जाऊन भेटावे असे वाटते! ती रात्र वहिनीने नि मी बाळाच्या उशाशी आळीपाळीने डुलक्या घेत काढली. बाळ वायूत असला तरी ते लहान मूल आटपून धरता येई.

पण अण्णांना जिन्यापाशी रोखता येणे आम्हास अशक्यच होई. ती भयाण रात्र! ते कण्ह, त्या किंकाळ्या! माझ्या प्रेमळ वडिलांचे आणि लाडक्या भावाचे ते भयंकर क्लेश-ते पाहून होणारे दुःख! ती भीती!--एकदांची ती रात्र संपली. आणि ज्यांची आम्ही सारखी वाट पाहत होतो ते बाबा- माझा वडील भाऊ- धाकट्या बहिणीस आणि मेहुण्यास घेऊन एकदाचे आले. तो काय! मेहुण्यांना आनंदाने आंब्याच्या पाहुणचाराकरिता म्हणून बंधू तेव्हा आणावयास गेले- येतात तो हा भयंकर प्रकार! माझ्या धाकट्या बहिणीचे वय केवळ तेरा चवदा वर्षांचे! अण्णांपाशी गेली पण त्यांनी तिला धड ओळखलीही नाही! स्पर्शजन्य प्लेगच्या घरी खाणे-पिणे घातकच म्हणून बहिणीला नि मेहुण्यांना दुसरीकडेच जेववून लगेच दुपारच्या गाडीने दुसऱ्या गावी त्यांच्या संबंधीयांकडे धाडून दिले. अण्णांस तशा स्थितीत सोडून जातांना बहिणीला कोण दुःख झाले- पण उपाय हरला. तिला घेऊन मेहुणे तत्क्षणी जायचेच म्हणाले. आणि तेच ठीक होते.

बाबा आल्यामुळे मला हायसे वाटले. आता गावात आमच्या कुटुंबावरील संकटाची बातमी सर्वत्र फैलावली होती. पण जिकडेतिकडे घरोघर रडारड आणि धावपळ चालू. तिथे कोणकोणासाठी रडणार! एकदोन वैद्य आले गेले. नाशिकहून मोठा डॉक्टर आणविण्याचा बेत चालला- पण अण्णांच्या जीवनाचा धागा त्या तिसऱ्या दिवशीच जवळजवळ तुटला. वास्तविक ज्या घरी प्लेगचा आजारी असे त्या घरातून आजाऱ्यासुद्धा सर्व मंडळीस बहुधा सरकारी हुकमाने ताबडतोब बाहेर घालविले जाई. पण पाटील कुलकर्ण्यांनी तेवढे काही केले नाही. संध्याकाळी मामा आले. पण ते दुसरीकडेच उतरले. "अण्णांना पूर्वीच गाव सोडण्यास सांगी. तो ते त्यांनी ऐकले नाही; माझ्या मुलांना जिवे मरणाच्या तोंडी दिले." म्हणून अण्णांना पोटभर शिव्या देत मामा अंगणात येऊन सर्व माहिती विचारून गेले. रात्री अण्णांचे देहावसान झाले. ते कोणास कळलेही नाही. पहाटे पाहतो तो अण्णा आम्हास टाकून गेलेले. तो दिवस शके १८२१ च्या अधिक श्रावणाच्या अमावस्येचा होता. आणि बाळही मरणासन्न, मान ढिली पडलेली, तोंडातून रक्ताचे ओघळ निघालेले, केवळ धुगधुगी बाकी! बापूकाकाही कुठेसे गेले होते ते आले. चार इष्टमित्र कसेबसे येऊन अण्णांचा अंत्यविधि झाला. तेव्हा आता तत्काळ घर सोडून आम्ही जावे हे ठरले. मी, वहिनी, वडील भाऊ अशी उरलेली आम्ही तीन मुले तरी आता मृत्यूच्या जबड्यातून वाचवावी अशा तळमळीने कावून गेलेले मामा म्हणाले - 'आता हे लहान मूल- बाळ- क्षणाचे सोबती. आता त्यास दैवाच्या स्वाधीन करून तुम्ही तिघे एकदम कोठूरला आजोळी चला - निघा आता निघा. ' पण बाबांचे एकच उत्तर पडले- 'बाळाच्या जीवात जीव आहे तो मी येथून हलणार नाही. ' मग मामा प्लेगच्या त्या कहरात आम्ही तत्काळ हलत नाहीसे पाहून आम्हास सोडून त्याच दिवशी कोठूरला निघून गेले. कारण प्लेगच्या गावी कुठेही अन्नपाणी घेणे त्याकाळी खरोखरच भयंकर धोक्याचे असे. अण्णांच्या देहास अग्नि देऊन येतो तो दुपार होताच घर सोडले. पोलिसांचा तगादा होता. खरोखर रडावयास देखील अवसर मिळाला नाही. मला तर रडू येईनासेच झाले. मन, नुसते सुन्न झाले. आणि इतर स्फुंदत असता आपल्या डोळ्यास पाणी येईना याविषयी मनालाच खाऊ लागले. एक पळभरही विसावा न घेता मोठ्या प्रयासाने एकदोन गडी मिळवून गावाबाहेर एक झोपडे बांधण्यास दिले आणि ते एकदोन दिवसात

होईतो गावशिवेपाशीच महादेवाच्या आणि गणपतीच्या दोन देवळात जाऊन रात्रीपुरते राहिलो. आता मात्र काका आमच्यात ममत्त्वाने येऊन राहिले. पण मधूनमधून भाऊबंदकीची चीडखोर लहर येऊन एकदादोनदा अण्णांविषयी टाकून बोलले. तेव्हा मला ते सहन न होऊन मी सांगितले की, ‘वडिलांमागे आता आम्हांस आपणच वडील. जे सांगाल ते प्रमाण पण मागे तुमचे आपसात काही जरी वाकडे असले तरी आता अण्णा गेल्यावर त्यांच्या मागे आपण त्याचा उल्लेख करू नये. वडिलांच्या मृत्यूच्या पहिल्याच दिवशी त्यांच्याबद्दल कोणचाही अपशब्द काढणे आम्ही सहन करणार नाही. पाहिजे तर पूर्ववत आपण निराळे राहावे.” तेव्हा ते ओशाळले नि म्हणाले, “अरे, पण मी मला बुडविले म्हणून का त्याला दोष देतो. त्यांनी तुम्हा चिमुकल्यांना भिकेस लाविले रे! म्हणून, माझा जीव तुटतो. कसे ते तुम्हा मुलांस काय माहीत!” मी म्हटले, “चिंता नाही; आम्ही भीक मागू- पण वडिलांस तो दोष देऊ देणार नाही!” तेव्हा बापूकाका चूप बसले. आणि अगदी ममतेने सर्व काम करू लागले.

बापूंनी पोलिसांचा उपद्रव टाळला. झोपडीकडे जाऊन काम चालू केले. बाबांनी संध्याकाळी आमच्या आसन्नमरण बाळास खांद्यावर टाकून त्याची लुळी पडलेली मान सावरीत सावरीत गणपतीच्या देवळात आणून ठेवले. तिथे मी, वहिनी व बाबा अशा तिघांपैकी कोणी तरी दोघे आळीपाळीने रात्रभर बसून पाळीपाळीने महादेवाच्या देवळात बापू होते तिथे निजू. आता वहिनीला त्या लहान मुलीला आणि मला भयंकर थकवा आला. वाटे चालताचालता देह निश्चेष्ट पडतो की काय. पण बापूकाका सोबतीस आल्याने फार धीर आला. रात्रीची भीति कमी वाटे. पण तो अंधारही टिकावयाचा नव्हता! कारण दोन-चार दिवस जातात तोच बापूकाकांसही अकस्मात् ताप चढला- संध्याकाळच्या आत प्लेगची गाठ बळावून त्या महादेवाच्या देवळात- बापूनीही अंथरूण धरले. आणि रातोरात वायूने त्यास पछाडले.

संकटाचा कळस झाला. महादेवाच्या देवळात चुलता वायूने बेभान- शेजारच्या गणपतीच्या देवळात धाकटा भाऊ मरणासन्न. रात्री त्या रानात जिकडे-तिकडे ओसाड, आजूबाजूस कोल्हे. आणि घुबडे ओरडताहेत. मी, वहिनी नि बाबा कोणी चुलत्यापाशी, कोणी भावापाशी त्यांच्या वायूच्या झटक्याशी झगडत आणि भयाने, चिंतेने दुःखाने थरकापत जागत आहोत. गावात झोपड्यातून चोरांचा सुळसुळाट झालेला. त्यात आम्ही सावकार. त्या भपक्यानेच आमच्यावर चोरांचा केव्हा घाला पडेल याचा नेम नव्हता. जात्यायेत्या प्रेतांच्या यात्रेचा तो भयंकर बोलो भाई राम! मधून उठे - कारण शेजारीच स्मशान. त्यात चिता भडकलेल्या! सोबतीस चिटपाखरू नाही - मात्र एक कुत्रे कुठून काय की येऊन आमच्यापाशी त्या रात्री बसले. तीच एक सोबत. कोठे काही पान जरी हलले की भुंकून-भुंकून त्याने रान गर्जवावे. त्या भयंकर दोन-चार रात्री आम्हास या जगात त्या प्रसंगी उपयोगी पडला असा तोच एक सुहृद्! मला वेड्यासारखे होऊन बाबा आणि वहिनी हेही केव्हा अंथरूण धरतात याची क्षणोक्षणी चिंता वाटे. हा क्षण आम्ही तिघे एकत्र आहोत- दुसऱ्या क्षणी कोणाची पाळी, कोणी सांगावे! निश्चिति अशी मरणाची काय ती, जीवनाची निश्चिति अशी क्षणाचीही वाटेना. आश्चर्य हेच की त्या उभ्या आठवड्याच्या भयंकर मानसिक तापात आणि असह्य शारीरिक क्लेशात मला काहीही झालेले नाही. मी

पायावर उभाच उभा होतो. कोण भयंकर स्पर्शजन्य तो रोग! मी नि वहिनी सारखे रोग्यापाशी; पण डोके देखील दुखले नाही! जगावयास झोप देखील अवश्य नाहीसे झाले.

आता आमच्या कुटुंबावर कोसळलेल्या आपत्तीची बातमी नाशिकपर्यंत देखील पोचली होती. नाशिकच्या दातारांच्या रामभाऊंना ती कळताच, मागे त्यांच्या कुटुंबावर नाशिकला हेच संकट आले असता त्यांच्या मंडळींना बाबांच्या सांगण्यावरून अण्णांनी भगूरला आणून स्वगृही आधार दिला होता. नाशकास रामभाऊंचे वडील प्लेगने आजारी असता बाबांनी केवळ स्नेहास्तव स्वहस्ते, त्यांची शुश्रूषा जिवाकडे न पाहता केली होती. हे उपकार आणि तो स्नेह आठवून आम्हास या संकटात साहाय्य देण्यासाठी ते नाशिकहून भगूरला आले. बाबांचे आणखीही एकदोन तरुण मित्र त्यांच्याबरोबर होते. नाशिकला प्लेग होताच. पण सरकारी मोठे प्लेग रुग्णालय असल्याने रोग्यांची चांगली सोय होती. रामभाऊ आणि त्यांच्या आजूबाजूची मंडळी प्लेगच्या दोन-तीन वर्षांच्या अनुभवाने आता चांगलीच निर्ढावली होती. आणि रानावनात न जाता आपल्या घरातच यावर्षी राहिले होती. चाफेकरांनी रँडला मारल्यानंतर बळाने लोकांस हुसकून देण्याचा किंवा नासधूस करण्याचा सरकारी धूडगूस पुष्कळ कमी झाला होता. पण तरीही रोग्यांना या गावाहून त्या गावी नेण्याआणण्यावरील आडकाठी, प्रवाशांची कडक परीक्षा, नाकेबंदी, कोंडमारे (सेग्रीगेशन) इत्यादी बंदोबस्त कडेकोट असे. रामभाऊ बाबांच्याच वयाचे. पण फार धाडसी. कोणत्याही संकटी जिवाची चिंता न करणारा, उपकार करण्यास तत्पर, त्या दिवसापुरती जागा त्यांनी दिली. तरी शिव्यांचा भडिमार आम्हा आगंतुकांवर चालेला होता. बापूंचीही व्यवस्था इकडे लावतो तो तिकडे बाळासुद्धा आमची मंडळी रामभाऊंच्या घरी उतरली. हे पाहताच रामभाऊंवरही त्या आळीतील लोक चवताळून उठले. त्या काळी प्लेगने लागलेल्या आईबापांसही घरी ठेवण्याची चोरी-कारणही खरेच. तो भयंकर रोग स्पर्शजन्य. एकाच्या घरी रोगी असला की उभ्या आळीचे मरण ओढवण्याची भीति! पण रामभाऊंनी तशाही आपत्तीस न भिता बाळास घरी उतरविले. आणि आम्ही ती रात्र तिथेच काढली. दुसऱ्या दिवशी बापूंनीही देह ठेवला. मित्रांच्या साहाय्याने बाबांनी अंत्यविधि केला. त्यांची बरीच मोठी रक्कम त्यांनी एका वकिलापाशी अनामत ठेविली होती. बापू निपुत्रिक. अनेक वेळा पत्ता देतो म्हणतही. पण त्यांनी शेवटपर्यंत त्या गृहस्थाचे नावे चिट्ठी दिली नाही. आम्हा पुतण्यावर विश्वास टाकला नाही. अर्थात् ते तीन-चार हजार रुपये तरी तसेच बुडाले.

झाले. बापाच्या दहा दिवसांच्या आत चुलत्याचाही आधार तुटला. उरलो ती आम्ही चार मुले. बाबा, मी, बाळ, आणि वहिनी. त्यात बाळाचाही काहीच भरवसा नव्हता. दोनचार दिवसातच त्या आळीतील मंडळींच्या विचारे बाळास सरकारी प्लेग रुग्णालयात नेऊन दाखल केले. पण ते केवळ अर्भक मूल. त्यास एकटे तिथे टाकून येणे म्हणजे त्यास जवळजवळ गिळून टाकीत आलेल्या काळाच्या दाढेत पुरतेपणी स्वहस्तेच ढकलणे होते. यास्तव इष्टमित्रांच्या “आता आहात ते तरी सुखरूप रहा. एकामागे दुसऱ्याने काळाच्या दाढेत व्यर्थ उडी घेणे वेडेपणा आहे.” अशा एका अर्थी वास्तविक असेणाऱ्या उपदेशास न जुमानता बाबांनी बाळाच्या शश्रूषेसाठी स्वतःही त्या प्लेग हॉस्पीटलमध्येच राहण्याचा जिवावरचा बेत केला. स्पर्शजन्यतेमुळे शुश्रूषेस राहणाऱ्या मनुष्यासही त्या रुग्णालयाबाहेर येता येत नसे. त्या प्लेगच्या

भयंकर रुग्णालयातच त्या मृत्युच्या गुहेतच सदैव राहावे लागे. त्याचा बाहेरच्या माणसांशी कसलाही संपर्क होऊ देत नसत. त्याप्रमाणे बाबा नि बाळ प्लेग रुग्णालयात बंद झाले आणि मी नि वहिनी रामभाऊंच्या घराच्या मागच्या माडीवर बिऱ्हाड करून राहिलो.

रुग्णालयात बाबांना रात्रंदिवस प्लेगच्याच रोग्यात राहावे लागल्याने त्यांच्या जिवाची मला अत्यंत चिंता वाटे. बाळाची प्लेगची गाठ दोनदा कापली; पण तो घाव शिवल्यानंतर त्याच्या चळवळीने पुन्हा फाटला. त्यामुळे अगदी सतावल्यासारखे होई. रात्री तर त्यांना पुराणात वर्णितात त्या प्रकारच्या स्मशानातील भूतप्रेतांच्या भीषण बीभत्स हलकल्लोळातच राहावे लागे. कोणी वाळूत पळताहेत, कोणी खाटेस बांधून टाकल्यामुळे वातात शिव्या देत ओरडत आहेत, कोणास मृत्यूचा कण्ह लागला आहे, कोणी असह्य ठणक्याने किंकाळताहेत, कोणी ओक्साबोक्सी आई, बहिणी, मुलाबाळांच्या आठवणी काढून रडताहेत, अशा स्थितीत आणि त्या रोग्याच्या आकस्मिक श्वासासरशी मनुष्य प्लेगने पछाडे; त्या रोगाच्या वातावरणातच सतत राहणे! याचा बाबांच्या मानसिक आणि शारीरिक शक्तीवर केवढा ताण बसत असेल. या चिंतेने मी सदोदित व्याकुळ असे. बाबांना कपडे आणि जेवण घेऊन प्रत्यही दोनदा मी रुग्णालयात जाई. तिथे आत जाण्याची बंदी असे. बाबा बाहेर आले तरी बाहेरच्या माणसास आतील कोणास शिवू देत नसत. दुरून जेवण द्यावे, बोलावे, परतावे. तिथे जाताच प्रत्यही धास्ती वाटे की बाबा या मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर येतात ना! त्यांना क्वचित् उशीर लागला की मनात धस्स व्हावे- तेही प्लेगने लागले अशी बातमी तर मला आज ऐकावी लागणार नाही ना! आणि तरीही ही बातमी गृहीत धरून माझ्या एका पक्षी अशा प्रेमभीरू असेणाऱ्या मनाने बाबाही प्लेगने पछाडले तर काय व्यवस्था करावयाची, याची योजना शांतपणे आगाऊच करून ठेवण्याचा निर्दय धीर दुसऱ्यापक्षी करीत असावे! नाशिक नगरातही प्लेगच. बहुतेक घरे ओसाड. रात्री मी जेवण न्यावे तेव्हा त्या अंधेरात त्या ओसाड रस्त्यातून जाताना घाबरे व्हावे. जर सोबत कधी भेटलीच तर ती बहुधा प्लेगला बळी पडलेल्या कोणा मनुष्याची प्रेतयात्रा आणि तिचा तो विकृत भीषण “राम बोलो भाई राम!!” यांचीच काय ती. मनात यावे आज यांचा रामबोलो भाई राम मी ऐकत आहे. उद्या क्वचित् माझ्या प्रिय बंधूची किंवा माझीही तिरडी अशीच जात असता तिचा हा- रावणी राम बोलो भाई राम दुसरे कोणी ऐकणार नसतील म्हणून कशावरून! तो एक दिवस जिची अशुभ अपेक्षा त्या ऊग्र रुग्णालयाच्या दाराशी जाताच मला प्रत्यही थरकापवी. ती बातमी ऐकू यावयाची ती आलीच. रुग्णालयाशी बाबांचे जेवण घऊन वाट पाहत उभा होतो. नेहमी बाबा बाहेर येऊन मला दिसले की त्या दिवसापुरता तर मला केवढा आनंद होई, चिंता क्षणापुरती तरी दूर होई. पण त्या दिवशी बाबांस उशीर लागला. उत्सुक चिंतेने वाट पाहत किती तरी वेळ उभा राहिलो. शेवटी एक ओळखीचे अधिकारी बाहेर आले आणि सदय आवाजात म्हणाले, “तुमच्या वडील बंधूंनाही काल ताप भरला आहे. ते आज बाहेर येणार नाहीत.” हे ऐकताच वज्रपात झाल्यासारखे वाटले. खोचूनखोचून विचारले तेव्हा त्याने पूर्वी सद्हेतूनेच गाळलेली गोष्टही सांगितली की ताप प्लेगचाच आहे. तो गेला. मला बाबांस पाहणे नियमाप्रमाणे अशक्यच होते. अत्यंत विष्ण्ण मनाने परतलो. वाटले आज मात्र खरा पोरका झालो. जगात आज एकटा उरलो आणि वहिनी! तिला हा धक्का

सध्या तरी बसू नये, म्हणून ती गोष्ट तिला कळविली नाही. केवळ रामभाऊंना सांगितले. तो दिवस म्हणजे माझ्या कुटुंबावर कोसळलेल्या या प्लेगच्या मारक आघातांच्या निर्वाणीचा वज्राघातच होता. या सर्व आघातांनी आणि क्लेशांनी माझी जीवनशक्ति खचून मलाही प्लेग कसा झाला नाही याचे आश्चर्य वाटते. पण प्रकृतीने टिकाव धरला खरा.

पण त्या दिवसानंतर हळूहळू सुदैवाची चढाई होण्यास आरंभ झाला. कारण बाबांचा प्लेग विकोपास न जाता थोडक्यातच निभावले. आणि बाळही बरा होऊन दोनतीन महिन्यात ते दोघेही घरी आले. नाशिकलाही प्लेग थंडावला. आम्ही तिघे बंधू वहिनीसह शिक्षणादिक सोयीसाठी नाशिकलाच स्थायिक होण्याचा निश्चय करून रामभाऊंच्या त्या बिऱ्हाडीच नित्याचे राहिलो. या सर्व कौटुंबिक चिंतेत आणि क्लेशात मी माझ्या अंगीकृत अशा राजकीय व्रताची चळवळ सोडली नव्हती; पण तिचा वृत्तांत सुसंगतपणास्तव पुढच्या प्रकरणीच देऊ. यापुढे भगूरचा माझा संबंध सुटल्यासारखा होऊन नाशिक हेच माझे आणि माझ्या कुटुंबाचे वास्तविक वसतिस्थान झाले. आणि अशा रीतीने अण्णा वारल्यानंतर आसन्नमरण बाळला घेऊन ज्या रात्री आम्ही प्लेगसाठी गुप्तपणे भगूर सोडले त्या रात्रीच भगूरला- त्या माझ्या जन्मभूमीला- मी नित्याचाच रामराम ठोकल्यासारखे झाले!

# भाग २ : नाशिक

नाशिक-पंचवटी हे संयुक्त नगर आणि क्षेत्र आपल्या या भरत खंडात प्रसिद्ध आणि अत्यंत पुरातन असलेल्या नगरांपैकी एक आहे यात शंका नाही. रामायणकालीन दंडकारण्यात ज्या गोदावरीचे काठी राम-सीता पर्णकुटी बांधून वनवासात निवासत असत, आणि ज्या स्थळी पुढे राक्षसांशी कटकट होऊन राम-लक्ष्मणांनी त्राटिकेचे "नासिक" कापून खर-दूषणास मारले त्याच स्थळी आणि त्याच पराक्रमाचे स्मारक म्हणून हे नगर निवसले आणि नाशिक हेच नामाभिधान पावले. ही पुरातन दंतकथा विख्यातच आहे. तिला अनुसरून नाशिक-पंचवटीचा प्रत्येक कानाकोपरा रामाच्या आणि सीतेच्या स्मृतीने भारलेला आहे. पंचवटीच्या जवळच 'सीता देवी हीत राही' म्हणून दाखवितात ती सीता गुंफा, राम निवास असे तेथे उभारलेले ते काळे रामाचे मंदीर. तीन राक्षस मारले तो तिबंधा. नाशिक आणि पंचवटी यामधून वाहणारी ती गोदावरी, तिची ती राम - लक्ष्मण - सीता कुंडे, रामचंद्राच्या पदरजांनी पुनीत झालेल्या त्या पुण्यभूमीच्या दर्शनार्थ सिंहस्थी उभ्या भरतखंडातून तिथे येणाऱ्या सहस्रावधी भाविक भक्त, साधुसंत, गोसावी, बैरागी यांच्या प्रचंड यात्रेचा तो मेळा, आणि त्या दिवसात लक्षावधी कंठातून शतकावधी भाषेत ऐकू येणारा तो सीता-रामाचा जयजयकार! नाशिकचे सारे वातावरण रामाच्या आणि सीतेच्या स्मृतीने नुसते भारलेले असते.

परंतु ही पौराणिक आख्यायिका जरी क्षणभर बाजूस सारली तरीही अगदी ऐतिहासिक काळांतही नाशिकची गणना प्राचीन आणि प्रसिद्ध नगरातच करावी लागते. राष्ट्रकुटांच्या काळीही ते प्रख्यातच होते. काही राजांची तर राजधानीच होते. अगदी अर्वाचीन काळी आमच्या हिंदु संस्कृतीचे अक्षरशः अगदी नाव देखील उरू द्यावयाचे नाही, अशा दुष्ट महत्त्वाकांक्षेने मुसलमानांनी आमच्या अनेक प्राचीन नगरांची आमची नावे पालटून त्या स्थळी मुसलमानी नावे पाडण्याचा जो क्रम चालविला होता त्यात नाशिकचे नावही बदलून त्याला 'गुलछनाबाद' असे नाव ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण गाठ होती त्राटिकेशी. तिची पुण्याई बळकट. उगीच का रामाच्या हातून नाक कापून घेण्याचे भाग्य तिला लाभले! ह्या पुण्याईमुळे मुसलमानांचेच नाक शेवटी खाली होऊन तिच्या खंडित नासिकाचे नावच अखंडित राखले गेले. एकदा आमच्या रावबाजींच्या - दुसऱ्या बाजीरावांच्या मनातही म्हणे नाशिकलाच आपली राजधानी करण्याचे आले होते. त्यांनी बांधलेला एक उत्कृष्ट वाडा पेशव्यांचा वाडा म्हणून नाशिकला (मी नाशिकला आलो तेव्हा) प्रख्यात असे. तो वाडा आत जाऊन पाहताना माझ्या मनात कितींदा तरी पूर्वजांच्या आणि पूर्व वैभवाच्या स्मरणाने कालवा-कालव व्हावी, मनात क्रांतीची ज्वाला भडकावी, आणि योगायोग असा की ह्या वाड्यास पाहताच आमच्या मनात भडकणारी ही क्रांतीची ज्वाला विझविण्यासाठीही पुढे ह्याच वाड्याचा उपयोग इंग्रजांनी केला. आम्ही पुढे स्थापलेल्या क्रांतिकारक मंडळीची (नाशिकचा इंग्रजी कलेक्टर मारला गेल्यानंतर) जेव्हा धरपकड चालू झाली तेव्हा आमच्या "अभिनव भारताच्या" कित्येक क्रांतिकारक तरुणास धरून आणि त्याच वाड्यात बंद करून, इंग्रजांनी त्यांचा छळ केला. नाशिकची ही पौराणिक आणि प्राचीन माहिती सोडली, तर गेल्या दोन-तीन शतकात तरी त्याचे नाव घेण्यासारखे असे

महत्व उरलेले नव्हते. मी तिथे सन १८९९ च्या संधीस नित्याचा राहावयास आलो तेव्हा तर हे नगर महाराष्ट्रातील एक अगदी मागासलेले नगर होते. काही संस्कृत विद्या मात्र जिवंत होती. बाकी सार्वजनिक नूतन जीवन असे किंवा राजकीय तेज असे त्यात लवलेशही वसत नव्हते. यात्रेचे ठिकाणी म्हणून शेकडो धंदेवाइक भटा-भिक्षुकांचा कलकलाट, नसत्या उनाडक्यात आणि घरगुती भानगडीत दंग झालेल्या पोरांचा आणि प्रौढांचा बुजबुजाट यापलीकडे त्यावेळच्या नाशिकात काही एक सहसा ऐकू येत नसे. पूर्वीच्या अरुंद आणि गदळ दगडी फरशीच्या बोळांचा आणि गल्ल्यांचा त्यात सुकाळ असे. रुंद, सरळ सडक अशी त्या वेळी एकाद दुसरीच झालेली होती. एकंदरीत पुढे नाशिकमधल्या तिळभांडेश्वराच्या बोळाची आणि त्यातील मंडळींची माहिती या पकरणात जी लवकरच येणार आहे, त्यातील वर्णन हे अपवादात्मक नसून, नाशिकच्या त्यावेळच्या एकंदर जीवनक्रमासही तेच वर्णन मोठ्या प्रमाणावर केले की लागू पडणारे आहे. त्यावेळची ती तिळभांडेश्वराची आणि नगरकरांची गल्ली म्हणजे एकंदरीत त्यावेळच्या नाशिकच्या रचनेचा आणि चारित्र्याचा एक यथावत् आदर्शच (नमुनाच) असे. अशा स्थितीत असलेल्या या नाशिकास मागच्या भागात सांगितल्याप्रमाणे प्लेगच्या धामधुमीत भगूर गावास नित्याचे सोडून आमचे कुटुंब राहावयास आले. कारण आमच्या भगूर गावापासून अगदी जवळ आणि त्यातही आमच्या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असल्यामुळे इंग्रजी शिक्षणाच्या सोयीसाठी नाशिकासच राहणे अवश्य आणि सोइस्करही होते.

### श्री. म्हसकर

प्लेगच्या सरकारी रुग्णालयात बाळ नि बाबा बंद असता त्यांचा तेथील लेखकाचे कामावर नोकर असलेल्या, श्री. म्हसकर नावाच्या एक राहणीने बापड्या, पण मनाने फार मोठ्या माणसाशी परिचय झाला. श्री. म्हसकर ह्या रुग्णालयात एक लहानसे अधिकारीच असल्याने आणि त्यांचा वरच्या अधिकाऱ्यांशी बराचसा परिचय असल्याने त्यांच्या सहाय्याची बाबांस वारंवार आवश्यकता पडली आणि म्हसकरही शेवटपर्यंत बाबांसाठी आपल्या एखाद्या जिव्हाळ्याच्या स्नेहयासाठी झटावे तसे झटले. त्यांचा स्वभाव मूळचाच दयाळू, कोणत्याही संकटी उपयोगी पडणारा, देवलसी, साधा पण मर्मज्ञ असे. त्यातच बाबांचे आणि त्यांचे विशेष सूत्र जमण्यास कारण म्हणजे ह्या रुग्णालयात म्हासकरांच्या आवडीच्या स्वधर्म आणि स्वराज्य या विषयावर त्यांच्याशी मनःपूर्वक बोलता येईल असा सुशिक्षीत आणि उदारमनस्क मनुष्य बाबांहून दुसरा कोणीही नव्हता. बाबांनी येताजाता म्हसकरांजवळ माझे नाव काढावे आणि म्हसकरांपाशीही माझ्या राजकीय मतांची आणि प्रवृत्तीची चर्चा करावी. मागे वक्तृत्व समारंभात झालेल्या माझ्या भाषणामुळे म्हसकरांसही माझी अप्रत्यक्ष ओळख होतीच. हळूहळू त्यांचे माझे राजकारणावर बोलणे चालू झाले. बाबांनी त्यांना मी चाफेकर-रानड्यांवर पोवाडा केला होता तो वाचण्यास अनुरोध (शिफारस) वारंवार केला होता. म्हसकरांची राजकीय मते "काळा"च्या वळणाची होत चालली होती. आणि ते स्वतः अंतस्थ रितीने काळातून टोपण नावाखाली काही लेखही आधीपासूनच लिहीत असत. शेवटी माझ्या चाफेकर-रानड्यांचा पोवाडा जेव्हा त्यांनी वाचून पाहिला तेव्हा त्यास तो फारच आवडला. त्यांच्या मनात तो छापावा असे होते. तेवढ्यासाठी त्यातील काही अत्यंत तिखट वाक्ये फिरवून

आणि गाळून त्यांची छापण्यासारखी एक प्रत करावी, असे बाबा, म्हसकर आणि म्हसकरंचे एक स्नेही श्री. पागे यांचे म्हणणे पडल्यामुळे मी थोडी फिरवाफिरव केली. पण कितीही गाळले तरी उरावे ते पुन्हा छापखान्यास झेपू नये इतके तिखटच! ‘काळ’कर्त्यांकडेच एक गाळीव प्रत धाडून पाहिली. पण अर्थातच तेही त्यास छापू शकले नाहीत. हळूहळू तो बेत तसाच थंड झाला. अशा प्रकारचे आमचे राजकीय विषयाचे खल जो जो होऊ लागले तो तो आमचा परस्पराविषयींचा आदर नि विश्वास वाढत चालेला. म्हसकरांचे वय त्यावेळी तीस वर्षांचे असावे. सरकारी नोकरीत असूनही नाशिकच्या लहानमोठ्या सार्वजनिक उत्सव, सभा प्रभृती चळवळीत गाजावाजा न होता ते करण्यासारखे ते ते करीत. नाशिकचे त्या काळचे पुढारी, वयोवृद्ध नि ज्ञानवृद्ध बापूराव केतकर, वयोवृद्ध दाजीराव केतकर, लोकसेवाकर्ते बर्वे, रावबहादूर वैद्य, कवि पारख प्रभृती मंडळीत म्हसकरांची चांगली ओळख असे. त्या पुढाऱ्यांच्या मते म्हसकर हा एक प्रामाणिक, संग्रहणीय, आतून पुष्कळ झटणारा असा सार्वजनिक कार्यी उपयुक्त हस्तक असे. म्हसकरांच्या मते पुढारी म्हणविणाऱ्या वकील वर्गातले बहुतेक लोक दिखाऊ चळवळे असून त्यांच्या हातून जर काही कार्य होत असेल तर ते आपणासारख्या आतून सर्व गोष्टी जमवून आणून अगदी वेळेवर सहीपुरता आणि शोभेपुरता त्या बड्या नावाचा उपयोग करून घेणाऱ्या अंतस्थ कामकऱ्यांमुळेच होत होते. अर्थात पुढारी म्हसकरांस हे आपले दुय्यम हस्तक समजत; तर म्हसकर त्यांस आपले दिखाऊ हस्तक समजत. एकंदरीत म्हसकर म्हणजे विद्वान नसला तरी सुविद्य, श्रीमंत नसला तरी परोपकाररत, धाडसी नसला तरी निर्भीड, प्रबळ नसला तरी प्रामाणिक, देशभक्त सज्जन आणि अगदी निस्वार्थी कार्यकर्ता होता. ते स्वतः प्रत्यक्ष क्रांतिकारक कट करण्यास पुढे आले नसले तरी त्यांचा राजकीय कल स्वदेशास वेळी सशस्त्र क्रांतीच्या मार्गेही स्वतंत्र करण्याच्या यत्नास शक्य ते अंतस्थ साहाय्य देण्यास मागे न घेण्याचाच होता. त्यांची राहणीही त्यांच्या स्वभावाच्या साध्या, सच्छील आणि निष्कपट सरळपणास शोभेशीच होती. ते स्नान, ती गुढगाभर धाबळ, ते भस्माचे भव्य पट्टे, तो भुरका गोरा रंग, ती धाबळ नेसून पूजापात्र घेऊन देवळा-देवळातून नियमाने पूजा करीत हिंडण्याची धांदल, त्यांच्या सौम्य शब्दास सहजच साहाय्य करणारी ती दातांची किंचित पुढे आलेली वरची कवळ, संकटचतुर्थी प्रभृती ती व्रतवैकल्ये, तो साधासीधा, जवळ जवळ गवळ्यासारखे आखुड धोतर, बिनपरटी कोट-टोपीचा वेष, आणि ती पुष्कळ करूनही थोडे बोलण्याची उपजत सवय- म्हसकर म्हणताच अशी व्यक्ति डोळ्यासमोर उभी राहते.

### श्री. पागे

म्हसकरांचे मित्र म्हणून ज्या श्री. पागे यांचा उल्लेख वर केला आहे तेही सरकारी नोकरच होते. श्री. पाग्यांचे वय तेव्हा तीशीजवळच होते. त्यांच्या स्वभावात आणि म्हसकरांच्या स्वभावात जो फरक असे तो एकमेकास बव्हंशी पूरकच असे. त्यामुळे त्यांचे सहकारित्व आणि स्नेह आजन्म टिकला. श्री. पागे दिसू पाहता, पुढे पुढे होत. म्हसकरांचा स्वभाव संकोची, मागे मागे राहण्याचा. पाग्यांस घरच्या तुटपुंज्या आर्थिक परिस्थितीतही शक्य त्या डामडौलाची आणि दहा मंडळींच्या बैठकीची हौस असे. स्वतःचे आत्मवृत्त पाग्यांनी लिहिले होते. वर्तमानपत्राचे वाचन दोघांचे एकत्र होई. पागे पत्रांची कात्रणे काढून फार मेहनतीने लावून टाचून ठेवीत. लेख म्हसकर लिहित पण पागे माहिती पुरवीत. पाग्यांनी

मुलांस शिकविण्यासाठी घरगुती शाळाही ठेविली होती. तीत म्हसकरही केव्हा केव्हा शिकवीत. पाग्यांचा बांधा फारच ठेंगू, तोंड आणि डोळे अगदी लहान नि वाटोळे, शरीर अगदी कृश, सुरकुतलेले, निस्तेज, पण, त्यांच्या चटपट बोलण्याच्या मोडीचीही बऱ्याच माणसांवर छाप बसे. त्यांच्यापाशी चार मंडळी अनुयायी म्हणून पडलेली असत. ही ना ती सार्वजनिक चळवळ करण्यात दोघेही त्यांच्या अल्प शक्तींच्या मानाने सर्वदा व्यग्र असत. नाशिकच्या सार्वजनिक कार्यांतील अनेक लहानसहान उलाढालीत अंतस्थ रीतीने त्यांचाही हात असेच, म्हसकर आणि पागे हे दोघेही राजकारणात “काळ”कर्त्यांच्या राष्ट्रास स्वातंत्र्यगामी, क्रांतिकारक मार्गावर न्यावे अशा मताचे असताही त्या दिशेची वा साधनांची कोणतीही स्पष्ट कल्पना, योजना वा विचारही त्यांस या वेळेपर्यंत आलेला नव्हता. त्यांच्या सार्वजनिक चळवळी गणेशोत्सव, शिवाजी उत्सव प्रभृती-टिळकपंथीय धोरणाच्याच असत. वकिलांत कोणी मवाळ भाषा वापरली तर तिचा निषेध करून ज्यास राष्ट्रीय ‘जहाल’ धोरण म्हणत त्या परकीय सरकारविरुद्ध लोकांत खळबळ उडवू अच्छिणाऱ्या परंतु निर्बंधाच्या (कायद्याच्या) कक्षेबाहेर आपण होऊन पाय टाकण्याच्या साफ विरुद्ध असेणाऱ्या धोरणाचे ते तोपर्यंत सहजगत्याच अवलंबन करीत होते.

प्लेग रुग्णालयात असताना बाबांची म्हसकरांशी मैत्री जमल्यामुळे त्यांच्या वतीने पाग्यांशीही बाबांची दाट ओळख झाली. म्हसकरांना माझ्या भविष्याविषयी फार मोठी आशा वाटू लागली, मी अवघा सोळा वर्षांचा त्यामुळे त्यांना माझे क्रांतिकारक विचार ऐकून एक प्रकारची चिंता वाटे, आणि माझ्या ह्या विचारांच्या पायी अकाली नाश होऊ नये म्हणून मला चुचकारून घेत, न बिचकविता शक्य तो पायबंद घालणे हे आपले एक वडीलपणाचे कर्तव्य आहे, अशी त्यांची त्यांनी पक्की समजूत करून घेतली. मला थोड्याच सहवासाने म्हसकरांविषयी फार आदर वाटू लागला. त्यांची देशभक्ति एकाद्या सुहृदासारखी अगाध आणि खोल भासे. प्लेगच्या संकटात माझ्या कुटुंबाची मागे वर्णिल्याप्रमाणे वाताहत होत असताही मी माझ्या राज्यक्रांतिकारक विचारांचा जो येई त्याच्याशी वादविवाद घालून प्रचार करी. म्हसकरांशीही मी तो वाद घालण्यास आरंभ केला. मी भगूरला घेतलेली शपथ त्यांना सांगितली. अशा शपथेने बद्ध झालेले एक गुप्त मंडळ स्थापावे म्हणून सुचवीत चाललो. प्रथम त्यांनी मला असे भासवावे की मी म्हणतो यात नवीन काही नसून तशी मंडळी त्यांनी स्थापलेली आहे. पण लवकरच त्यांना त्यांच्या स्थापलेल्या ह्या विद्यार्थी संगात आणि मी सुचवीत होतो त्या गुप्तमंडळात आकाशपाताळाचा फरक आहे असे मानावे लागले. मी म्हसकरांनी स्वतः तशी शपथ घ्यावी असे म्हणे, म्हणजे नुसत्या शपथेने काय व्हावयाचे आहे असे ते केव्हा उत्तरत; तर केव्हा आम्ही तशी शपथ घेतलीच आहे म्हणून सांगत. म्हणजे मी या त्यांच्या दोन वाक्यांतील परस्पर विरोध दाखवून, समजा घेतली आहात तर ती माझ्यासमोर पुन्हा घेण्यात काय हानी आहे? उलट एकमेकांचा विश्वास एकमेकांच्या साक्षीने एकमेकांवर अधिक बसेल! असा सारखा पिच्छा पुरवी. पण इतक्या स्पष्टपणे पाग्यांशी मात्र मी ही चर्चा तोवर केली नाही. तथापि म्हसकर पाग्यांस हे सर्व सांगत असत. त्यांच्या उत्सवादी नैर्बंधिक चळवळींवर त्या अगदी अपुऱ्या आहेत म्हणून माझ्या होणाऱ्या टीकेचा परिणाम त्या दोघांवर सारखा होत राहून क्रांतीची, सशस्त्र क्रांतीची स्पष्ट कल्पना आणि उत्कट इच्छा ही त्या दोघांच्या मनात हळूहळू मूर्तिमत्व धरीत चालली होती. नुसत्या

एकट दुकट सुधारणांसाठी खटपट करून काय होणार? विषवृक्षाच्या मुळावरच घाव घातला की फांद्या आपोआपच खाली येतील. तेव्हा पूर्ण राजकीय स्वातंत्र्य हेच ध्येय पुढे ठेवून त्याचीच निर्भयपणे घोषणा करीत राहिले पाहिजे. सर्व उघड चळवळीत ते वारे संचरविले पाहिजे. ह्या माझ्या मतास त्यांची स्पष्ट संमति हळूहळू मिळत चालली होती. परंतु काही केल्या चाफेकर पकरणाच्या भयंकर धक्क्याने हादरलेली त्यांची मने शेकडो जणास पोळविलेल्या त्याच गुप्त कटाच्या विस्तवात आपला हात घालण्यास तोवर धजत नव्हती. इतकेच नव्हे तर तसे व्यर्थ साहस करू देण्यास ते मलाही ममत्त्वानेच पण कसून विरोध करीत होते. आणि तरीही असे काही तरी केलेच पाहिजे असी टोचणी त्यांच्या ह्रदयास आतूनआतून सारखी लागलेली होती.

गेल्या प्रथम खंडाच्या शेवटी सांगितल्याप्रमाणे प्लेग रुग्णालयातून बाबा आणि बाळ सुखरूपपणे घरी परत आल्यावर आम्ही श्री. रामभाऊ दातार यांचे घरीच त्या तिळभांडेश्वराच्या बोळात बिऱ्हाड करून राहू लागल्यापासून त्या गल्लीतील मंडळीतही माझ्या राजकीय मताचा प्रसार मी वेगाने चालू केला. पुढे या बोळास एका भारतभर विस्तारलेल्या प्रबळ क्रांतिसंस्थेच्या जन्म-स्थानाचे महत्व प्राप्त होणार होते; आणि त्या राज्यक्रांतीय उठावात या आळीतील जवळजवळ प्रत्येक स्त्रीपुरुष आपापल्या प्रमाणात स्वतः प्रत्यक्षपणे काही तरी कष्ट सोसून भाग घेऊन काही काळ पावेतो तरी राजसत्तेसही ज्याचा वचक बसावा असे एक क्रांतिकेंद्र निर्माण करणार होते. ही गोष्ट ह्या वेळेस जरी कोणासही स्वप्नांत देखील खरी वाटली नसली, तरी आता सत्य ठरली असल्यामुळे ज्या व्यक्तीस घेऊन ज्यांच्या निगूढ तेजांशास प्रज्वलून आणि परिस्थितीस पालटवून, अभिनव भारतीय क्रांतीची ती पहिली ठिणगी आम्ही पेटवू शकलो त्यांची, त्या आमच्या अगदी पहिल्या सहकाऱ्यांची त्या या तिळभांडेश्वराच्या बोळाची, ओळख करून देणे, ह्याची स्मृति जागृत ठेवणे हे त्यास आलेल्या या आताच्या महत्त्वाच्या दृष्टीने अवश्य आहे, म्हणूनच नव्हे तर त्यांनी केलेल्या लहानमोठ्या देशसेवेचे उतराई होण्यासाठीही, एक कृतज्ञ कर्तव्यच ठरत असल्याने ह्या आळीतील त्या मंडळींचे थोडेफार पूर्ववृत्त आम्ही खाली देत आहो. माझे ह्या काळचे स्नेहीसोबती आणि लोभाचे ऋणानुबंधी म्हणूनही माझ्या आत्मचरित्रात उल्लेखिले जाण्याचा ह्या सर्वांचा वैयक्तिक अधिकारही आहेच आहे.

### तिळभांडेश्वराचा बोळ

या बोळात प्रथमतः १८९८ चे संधीस मी आणि माझे वडिल बंधू वर्तकांचे वाड्यात राहावयास आलो हे मागे सांगितलेच आहे. बाबा, बाबांच्याच वयाचे असलेले श्री. रामभाऊ दातार हे तिघेही ह्यावेळेस हायस्कूलात एकाच यत्तेत शिकत होते. ह्यामुळे त्यांच्या ओळखीने आम्हा दोघांस आमच्या वडिलांनी वर्तकांच्या वाड्यातच माडीवर एक खोली भाड्याने घेऊन शिकण्यास ठेवले. नाना वर्तकांचे वडील पूर्वीच निवर्तल्यामुळे त्यांच्या मातोश्री श्रीमती माई वर्तक ह्याच त्या ३-४ मुलांस घेऊन घरची सर्व व्यवस्था पाहत असत. श्रीमती माई वर्तक ह्या एक मोठ्या धीट, दयाळु आणि कर्तृत्ववान बाई होत्या. माझ्या वडिलांनी आम्हा दोघां बंधूंस त्यांच्या घरी ठेवले तेव्हा माईस सहज आम्हास फार जपण्यास सांगितले आणि माईंनीही आम्हास सांभाळीन म्हणून म्हटले. त्या सहज वचनास त्या केव्हाही विसरल्या नाहीत.

त्यास मुलगे तीन, नाना, त्रिंबक, श्रीधर आणि एक लहान मुलगी. त्यावाचून त्यांची एक मोठी सावत्र मुलगी पुण्यास दिलेली असे. तिच्यासुद्धा या सर्व कुटुंबाचा आम्हा दोघांवर फार लोभ असे. त्यांच्या घरी आम्ही वर्षभर देखील राहिलो नाही. प्लेगमुळे वारंवार भगुरास शाळा सोडून परत जावे लागे. पण ह्या थोड्या दिवसातही या सर्व मंडळीचा आमच्याशी कधीही न सुटणारा घरोबा जुळला. स्वतः माईंनी आम्ही आजारी असता आमची स्वतःच्या मुलाप्रमाणे शुश्रुषा केली. आम्ही खानावेळीत जेवत होतो, म्हणून येताजाता किती कळकळीने आम्हास फराळास द्यावे. आमच्या हिताहिताची चिंता वाहावी. माझ्या गुणांचे किती तरी कौतुक करावे. नाना वर्तक बाबांच्या वयचा. त्रिंबक माझ्या वयाचा आणि श्रीधर बाळाच्या वयाचा असल्यामुळे आम्हा तिघा बंधूंचा ह्या वर्तकबंधूंशी ह्या लहानपणापासूनच फार स्नेह जमला. दातारांचे घर आणि हे वर्तकांचे घर पाहिल्यापासूनच शेजारी. ह्या दोघा कुटुंबांचा फार दिवसांचा परस्पर ऋणानुबंध, ह्यामुळे आम्ही वर्तकांच्या घरून दातारांकड प्लेगनंतर सन १८९९ या वर्षी राहू लागलो, तरी वर्तकांकडे रात्रंदिवस जाणेयेणे असेच. नव्हे दिवसैंदिवस तो घरोबा वाढतच जात होता.

दातारांची दोन मुले, रामभाऊ व दुसरा माझ्या वयाचा वामन, (आताचे वैद्यभूषण वामनशास्त्री दातार) ह्यास एक चुलतभाऊ असे. तो किशोरावस्थेत प्लेगने वारला. वडिलांचे मृत्यूनंतर रामभाऊ दातार त्यांचे सर्व कुटुंब चालवीत. वर्तकांचे घर खाऊनपिऊन साधारण सुखी. पण रामभाऊंना पूर्वापार आलेल्या ऋणाचा फार त्रास. त्यांचे घराशेजारीच एक विष्णूचे देऊळ असे. तेही ह्यांचे घरच असे. त्यांची पूजा उत्सव प्रभृती सर्व व्यवस्था दातार ठेवीत. ह्या देवळातही आम्ही कित्येकदा राहावे, बसावे, निजावे. रामभाऊ कुठे नोकरी कर, कुठे धंदा काढ अशा विवंचनेत नेहमी असत. पण त्यामुळे त्यांच्या आनंदी स्वभावाच्या दुधात केव्हाही उद्विग्नतेचा मिठाचा खडा पडलेला नसे. रामभाऊ संकटास भीत नसत. अगदी एकाद्या विरागी तत्वज्ञाप्रमाणे हा अतत्वज्ञ हौशी प्राणी सहजगत्याच निर्मल, निर्भीड असे. एकदा त्यांच्या कुटुंबियांना प्लेगने अगदी पिसाळून सोडले. मी म्हटले-- “आता तरी गाव सोडा. आज आपण आहो उद्या नाही. आता या भयंकर साथीच्या विषाची परीक्षा याउपर पाहू नका.” रामभाऊ म्हणाले- त्यात काय, उद्या मी मेलो. कुटुंबाचा भार हलका होईल. कुटुंबातले कोणी मेले- माझा भार हलका होईल. आणि खरोखर तसेच अविचल त्यांचे वर्तनही राहिले. पण हा निर्मळ मनुष्य इतका मायाळू होता की वाटच्या चोरासही संकटी उपयोगी पडावा! त्यांना गायनाचा फार छंद. गाणी, तबला, नाटके यात मजा. स्वतःही गात. त्यांच्याच संगतीने नाना वर्तकाना आणि बाबांनाही तो नाद लागलेला असे. त्याचा परिणाम त्या तिघा तरुणांच्या हायस्कूलमधील अभ्यासावरही सारखाच झाला. ह्या तिघांनीही अभ्यासाची हेळसांड करीत मॅट्रिकपर्यंतचा टप्पा कसाबसा गाठला. पुढे कौटुंबिक अडचणीही उत्पन्न झाल्यामुळे त्यांनी मॅट्रिक न होताच शाळेस रामराम ठोकला. दुसरे श्री. वामनशास्त्री दातार यांच्या लहानपणी त्यांना संस्कृतमध्ये घालावे असा त्यांचा जुन्या वळणाच्या आजोबांचा विचार होता. कारण ह्यांच्या घरी दोन पिढ्या संस्कृत विद्येचा व्यासंग असून थोडीफार पुरोहितपणाची वृत्तीही असे. संस्कृतात जायचे म्हणून वामनला मराठीही ठीक शिकविलेले नव्हते. इंग्रजी तर मुळीच नाही. आणि ज्या संस्कृतासाठी ही प्राकृत विद्या सुटली त्या संस्कृतातही तोवर त्यांची विशेष गति झालेली नव्हती. त्यांच्या विद्यार्जनाची फारच हेळसांड

चाललेली होती. बहुतेक दिवस घरच्या घरीच इकडेतिकडे करण्यात जात. त्या बोळांतील त्यांच्या आसपासची सर्व तरुण मंडळी ज्या टिवल्याबावल्या करण्यात काळ घालवीत होती त्यातच वामनही रमलेला असे. आणि त्या गावकीच्या सामान्य उलाढालीपलीकडे कोणचेही उच्चतर ध्येय व जीवनक्रम त्यांच्या दृष्टिपथात तोवर पडलेला नसल्यामुळे त्या तुच्छ परिस्थितीतून सुटून जीवनाचा विकास करणारी उच्च आकांक्षाही त्या बोळातील कोणाच्याही मनात उगम पावली नव्हती. पावण्याचा त्या परिस्थित्यनुरूप काही संभवही नव्हता. मग वामन तर त्या सर्वांतही अगदी अडाणी ठरलेला. त्यातही जितका सरळ आणि निष्कपट तसाच तामसी आणि एकांडा. म्हणून मंडळी अशी. त्यांच्याभोवती कोणी नव्हती. पण हा सगळ्यात मागासलेला आणि हेळसांडलेला वामनच त्या बोळात माझा पहिला आणि अत्यंत प्रामाणिक मित्र झाला. आमचे वय जवळजवळ सारखेच. त्यांच्या घरीच माझे राहणे पडल्यापासून तर त्याची मजवर एकनिष्ठ भक्ति जडली. पहिल्या पहिल्याने माझा थोडा मत्सर वाटणाऱ्या ह्याच्या इतर पूर्वपरिचित जनांकडून आणि नातलगांकडूनही वामनला ह्याविषयी दोष देण्यात येई, की आता काल इथे आलेला तात्या तुला आमच्यापेक्षा इतका जवळ का वाटतो, त्याच्या मतानेच तू का चालतोस? पण वेळी त्रास झाला तरी वामनने माझ्या स्नेहात मी तिथे असे तो केव्हाही अंतर पडू दिले नाही. माझ्या संगतीने आणि टोचणीने लौकरच विद्यार्जनाचा छंदही त्यास लागला. त्याने मराठी अक्षर घटवावे. शुद्ध लिहिण्यास शिकावे, पुस्तके कशी वाचावी, कविता कशा कराव्या, बोलावे कसे, चालावे कसे- त्याने स्वतः काही विद्या संपादून आपला चरितार्थ चालविण्यास स्वतः कसे समर्थ व्हावे- अशा प्रत्येक गोष्टीत माझ्या धाकट्या भावासारखा मी त्यास सांगत सवरत आणि शिकवीत गेलो. लवकरच त्याची मूळची बुद्धिमत्ता सुसंस्कृत होत जाऊन आणि कर्तृत्व विकसत जाऊन माझ्या त्या काळच्या सर्व चळवळीत दिवसेंदिवस वामन माझा एकनिष्ठ भक्तच नव्हे तर कर्तृत्त्वान सहकारीही बनत चालेला. त्यावेळी दातारांचे आणि माझे कुटुंब ही दोन कुटुंबे अशी नव्हतीच. इतकी की आम्ही स्वयंपाक एकत्र करू, पैसे देखील एकत्र ठेवून खर्च-वेच एकत्र चालवू. दोघांच्याही वडीलधाऱ्या नातलगास ते संमत नसताही बाबांच्या आणि रामभाऊंच्या उदारमनस्क स्वभावामुळे निष्कपट स्नेहामुळे, आणि माझ्या संगतीने ज्या प्रत्युदात्त राजकीय ध्येयाच्या तंद्रीत आम्ही सर्व तरुण दिवसानुदिवस आपल्या आकुंचित व्यक्तितत्त्वास विसरून एका मोहक अशा विस्तृत समष्टीत विलीन होत चाललो होतो, त्याच्या निशेमुळे एकमेकास आम्ही जन्माच्या स्वकीयाहूनही स्वकीयेतर असे वाटत होतो.

त्या मंडळीतील माझे दुसरे स्नेही त्र्यंबकराव वर्तक, त्या वेळच्या आमच्या सवंगड्याच्या भाषेत 'वर्तकांचा त्र्यंबक'. त्या आळीतील सर्व तरुण पिढीत शिक्षणाकडे मनापासून ओढा असलेला असा हाच युवक असेल्यमुळे त्या सर्वांत होतकरू म्हणून तोच समजला जाई. अभ्यास मेहनतीने करी. वाचनाचाही नाद असे, आपण मोठे व्हावे, काहीतरी वैशिष्ट्य संपादावे अशी सदिच्छाही असे. मी तेथे असेतो केव्हा केव्हा हायस्कुलात आम्ही एकाच वर्गात असू. मागे सांगितल्याप्रमाणे त्यांच्या घरी आमचा प्रेमळ घरोबाच जडलेला होता. त्यातही त्र्यंबकाचा आणि माझा वैयक्तिक स्नेहही पुष्कळ असे. आम्ही अभ्यास एकत्र करावा, हिंडावयास एकदम जावे, व्यायाम एकदम घ्यावा, राहावे एकत्र. कविता करण्यात, व्याख्याने

देण्यात, बोलण्यात माझ्याशी त्याची लाभकारक स्पर्धाही चालावी. वर्तमानपत्रे वाचण्याचा त्रिंबकला प्रथमपासूनच थोडाबहूत नाद असे. त्यामुळे माझ्या राजकीय चळवळीस त्याची सहानुभूति त्वरित मिळाली. मी मॅट्रिक होईतो तिथे असता आमच्या सर्व चळवळीत त्रिंबकही तनमनधनेकरून माझ्याबरोबर झटत असे, झिजत असे. त्या मंडळीतील पूर्वीच्या साधारण पद्धतीच्या आकुंचित वातावरणात जे गुण बहुधा कोंदटून गेले असते ते देशभक्ति, धाडस, आकांक्षा प्रभृति गुण माझ्या राजकीय आणि वाङ्मयीन चळवळीच्या आणि ह्यातील दिव्य ध्येयाच्या चैतन्यप्रद स्पर्शासरशी त्रिंबकमध्येही विकास पावले; पुढे स्थापन होणाऱ्या आमच्या संस्थेस तिच्या त्या प्राथमिक महत्त्वास पोचविण्यास त्याचे साहाय्य व्हावे इतके विकास पावले.

त्या मंडळीतच एक पुण्याचे सुशिक्षित गृहस्थ वयाने तिशीजवळचे श्री. * * हे रंगलेले असत. पण त्या मंडळींच्या उनाडक्यांत त्यांचा भाग हौसेने असला तरी चोरून चोरून घेतलेला असे. ते आणि त्यांचे दोघे भाऊ आमच्यात शेवट-पर्यंत उठूनबसून असत. ह्या नगरकरांच्या आळीतील मंडळीस मी येण्याच्या आधी थोडीबहुत राजकारणाची चटक ह्यांच्या संगतीने लागली होती. पण ती केवळ गप्पांपुरती. पुण्याच्या सन्मित्र समाज मेळ्याची ह्या वेळी अत्यंत नावाजलेली सामाजिक आणि राजकीय पदे हे तेथे म्हणून दाखवीत. मीही ती फार आवडीने ऐके. टिळकांच्या आणि चाफेकरांच्या गप्पा हे सांगत म्हणून मी त्यांच्याशी तोही विषय नेहमी काढी. बाबांच्या स्नेहास्तव त्यांनी एकदोनदा संकटी मेहनतही घेतली. ते सरकारी नोकर म्हणून मित्रमेळ्यात गुप्तपणे काय ते असत. माझा गौरव पाहून केव्हाकेव्हा निष्कारण मत्सरही करीत आणि पुढे तर पोलिसांच्या भीतीने त्यांनी संस्थेचा संबंधच सोडला.

वर्तकांच्या आणि दातारांच्या घरामध्ये श्री. धोंडोभट विश्वामित्र यांचे घर आहे. धोंडभट हे नाशिक येथील भिक्षुकवर्गातील एक अगदी दाखविण्यासारखे भिक्षुक असत. शरीराने प्रचंड, रंगाने गोरापान, रूपाने देखणा, स्वभावाने आडदांड, मनाचा मायाळू, वृत्तीच्या वेळेस सोवळ्यांतला सोवळा आणि वृत्तिकार्याचा मुकटा सोडून धोतर नेसला की पान, तंबाखू, चहाचिवडा, पत्ते, सोंगट्या, सोडा, लिमलेट काय पाहिजे त्या हौसेत मौजेत रंगलेला रंगेल! या धोंडोभट विश्मामित्रांच्या पडक्या आणि अंधेऱ्या भागात राहात असे एक मराठीण बाई, शेजारपाजारच्या ब्राह्मणांच्या घरी कुळंबिणीचे काम करणारी, आणि तिचा एकुलताएक, लाडकावलेला पांगळा मुलगा! हेच ते 'आंबा पांगळे' आबा दरेकर! गुढग्यापासून पाय लुळे झाल्यामुळे बेडकासारख्या हात टेकून उड्या मारीत त्या गल्लीच्या गुहेत राजासारखे वावरत असत. कारण त्या गल्लीतल्याच तरुण मंडळीवर नव्हे तर त्यांच्याकडे येणाऱ्या आणखी ८-१० अडाणी कामकरी वर्गातल्या मंडळीवरही जर कोणाचे राज्य चालत असेल तर ते या पांगळ्याचेच. पूर्वी ते त्यांच्या गावी असता लावण्या करीत, नाच्यापोरांच्या फडात दंग असत. पुढे त्यांची बापडी आई, भांडी घासणे, दळणकांडण इत्यादी कामावर आपल्या पांगळ्या मुलाचे व स्वतःचे पोट भरीत जेव्हा या बोळात आली तेव्हा आबा पांगळ्याची प्रगति तमाशाच्या पायरीवरून ब्राह्मण मंडळीच्या संगतीत नाटकाच्या पायरीपर्यंत आली. लग्नकार्यात मिरवणुकीपुढे मिरवत नेतात त्या कागदांच्या फुलांच्या माळा आणि काचेचे आणि रेगीबेरंगी कागदांचे 'बाग' करण्याची कलाही त्यांनी अवगत केली होती. 'बागेचे' कागदी काम करून ते

मधेमधे पोटापुरते पैसे मिळवीत असत. बाकीचा त्यांचा सारा वेळ त्यांच्या त्या बोळातील आणि बाहेरच्या नावाजलेल्या खोडकर पोराटोरांचे धुरीणत्व सांभाळण्यात जाई; त्यांचा शब्द त्या मंडळीत सहसा कोणी मोडीत नसे. गंगाराम आणि गणपत न्हावी, श्रीपत आणि सखाराम गोरे, काशिनाथ अनंतराव वैशंपायन प्रभृति अनेकजण आबांच्या ह्या प्रभावळीत असत. आमच्या दातारांचे रामभाऊ आणि वामन, वर्तकांचे नाना आणि त्रिंबकही आबा पांगळ्यांच्या प्रमुख सरदारांतच मोडत. या इंग्रजी शिकलेल्या सुशिक्षितांवरही आबांची छाप पडे ती उगीच नव्हती, आबांची बौद्धिक श्रेष्ठता होतीच तशी. अक्षरही लिहिता येत नसता ते नाटके रचीत -- लिहिणारे कारकून ही साक्षर मंडळी. जर 'पांगळे' पदे रचीत, तर गात आमचे रामभाऊ दातार. जर रामभाऊ पदे गात तर तबला वाजवीत 'पांगळे. ' प्रत्यहीचा मंडळाच्या नव्या पराक्रमाचा कार्यक्रम ठरविणार पांगळे आणि चालविणार त्यांचे हे सरदार मंडळ. या कार्यक्रमाची विविधता इतकी विक्षिप्त असे की शेजारच्या तिळभांडेश्वराच्या देवळास जे अनेक स्त्रीपुरुष तिकडून प्रत्यही जात येत, त्यांना आज कोणती खोडी केव्हा काढली जाईल याचा काही नेम लागत नसे. खोड्या असत निरुपद्रवी-पण अगदी टारगट. एक दिवसाचा पराक्रम त्या पांगळ्यांच्याच राजसभेत मंडळींनी अनेक वेळा सांगितलेला आणि त्यांच्या स्मरणानेही खदखदा हसत त्यांनी उपभोगिलेला जो मला स्पष्ट आठवतो, त्याचेच संकीर्तन इथे करणे पुरे आहे. गोऱ्यांच्या त्या सज्जावर तो बेत ठरवून ही मंडळी उभी राहिली. खालून मोठ्या भटशाही पागोट्याचे गृहस्थ जात येत असता वरतून या मंडळींनी अनुक्रमाने थुंकावे. ते असे की, त्या पागोट्यावर तो खाकरा बत्ताशासारखा चमकत त्या गृहस्थाला न कळण्याइतका अलगत पडावा. ते गृहस्थ अजाणतेपणे पागोट्यावर तो 'बत्तासा' धारण करून देवळास प्रदक्षिणा घालीत राहत! खो खो करून बाजूस मंडळींचा हंशा पिकावा. कारणाचा अर्थातच कोणी उच्चार करू नये. त्या गृहस्थास आपले काय हास्यास्पद होते आहे हे न कळून वेड लागेतो हंशा चाले. केव्हाकेव्हा जर प्रकरण विकोपास गेले आणि तो गृहस्थ भांडणावर आला तर ह्या टोळक्याने एकदम एक फळी धरून त्यास 'तोंड' द्यावे. म्हणजे भीक नको पण कुत्रा आवर असे होऊन त्या बिचाऱ्या गृहस्थास ह्या भुंकत्या बोळातून चावा घेतला जाण्याचे आधी केव्हा बाहेर पडेन असे होई!

बरे विश्वामित्र्याच्या घराच्या शेजारच्या ह्या गोऱ्यांच्या सज्जामधील आबा पांगळ्यांच्या या टोळीपासून सुरक्षित बाहेर पडून मनुष्य जो ह्या तिळभांडेश्वराच्या देवळात उतरतो तो त्यास दुसऱ्या एका टोळीचा सामना करावा लागे. त्या गल्लीतली ही त्या वेळची दुसरी प्रसिद्ध संस्था म्हणजे 'देवीचा मठ'! त्या देवळास लागूनच असलेल्या देवीच्या देवळास मठ म्हणत. तिथे असे भिक्षुकांचा अड्डा, आणि त्यांचे राजे असत आम्ही वर सांगितलेले रंगेल भिक्षुकाधिकपति धोंडोभट विश्वामित्रे! खोड्या करण्यात आणि चैन उडविण्यात आबा पांगळ्यांचे ते राज्य आणि धोंडोभटाचे हे राज्य ही दोन्ही मिळून एक संयुक्त राज्य होई. ह्या भटांच्या अड्ड्यात कोजागिरीचे दूध, शिवरात्रीची भांग, सणांचे लाडू, नि प्रत्यहीच्या सोंगट्या यांचा केवढा गलबला! 'मारली' 'पोबारा' 'दहा' 'पंचवीस' 'आणखी घोटा!', 'आणखी घ्या!' 'आणखी वाढा!' अशा पाचपन्नास भटांच्या आरडाओरडीने गाव गर्जून उठे! एखादे वेळी दुसरा कार्यक्रम नसलाच तर निदान येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या केलेल्या कुचेष्टांमुळे लागलेली भांडणे नाही तर आपसातील कुचेष्टांमुळे

चिरडीस गेलेल्या कलागती ह्यांचा कोलाहल तर कुठे गेला नव्हताच! ह्या भांडकुदळ वेताळांच्या अड्ड्याची ती अधिष्ठात्री देवता होणार असे माहीत असते तर या देवळाचे नावही त्याच्या संस्थापकांनी तिळभांडेश्वर असे न ठेवता वेताळभांडणेश्वर असेच ठेवले असते. तरी पण हे ध्यानात ठेवले पाहिजे की, ज्या जुटीने आणि चिकाटीने ह्या गल्लीतील ही मंडळी अशा उनाडक्या आणि चैनबाजी करीत, लहर आली तर परोपकारांची कामेही त्याच जुटीने आणि चिकाटीने ते करीत असत. कोणा अनाथाचे रक्षण, एखादा दुर्जन त्यांचे डोळ्यावर आला तर त्याचे दंडन. त्यांच्यातील कोणा कुटुंबावर विपत्ति आली तर त्याचे परिश्रमपूर्वक साहाय्य, कुठे आग लागली तर ती विझविण्यासाठी जिवापलीकडची धावपळ इत्यादी प्रकारे वैयक्तिक परोपकाराची कामेही ही मंडळी मनःपूर्वक करीत. ह्या वेळचा त्यांचा जीवनक्रम एकंदरीत निष्कपट आणि निष्काळजी, फुटकळ आणि फुकट, हौसी आणि रंगेल, अव्यवस्थित आणि असंयत, बहुधा निरुपद्रवी आणि बहुधा निरुपयोगी, क्वचित् उपद्रवी आणि क्वचित् उपयोगी असा असे.

**आबा पांगळे**

यांच्याशी माझी साधारण ओळख मी वर्तकांच्या वाड्यात १८९८ वर्षी प्रथम राहावयास आलो तेव्हापासूनच झाली. पण त्यांच्या या राजसभेत मी केव्हाही जात-येत नसल्याने प्रथमप्रथम त्यांच्या मंडळींनी मला अगदी टाकावू माणसात काढले. पुढे काही दिवसांनी माझे वाचन, लिखाण, वक्तृत्व यांची नाशिकला मोठ्या मंडळीत चर्चा होत चालली तेव्हा मला अगदी टाकावू समजण्याच्या अलिकडे येऊन ती मंडळी मला एक बुकवर्म -एक ग्रंथकीटक -म्हणून उपहासास्पद मानू लागली. उपहास करताकरताच माझ्याविषयी चोरून त्यापैकी काहींच्या मनात आकर्षण आणि त्यांच्या मानाने बाकीच्यांच्या मनात मत्सर वाटू लागला. कारण माझ्या जीवनक्रमाकडे पाहिले की, त्यांच्या जीवनक्रमाचे त्यांचे त्यांनाच वैगुण्य भासू लागावे. पण त्या आकर्षण वाटणाऱ्यांतच 'आबा पांगळे' होते. त्यामुळे त्यांच्या वजनातील त्या मंडळीच्या मत्सराचा मला फारसा विरोध होवू शकला नाही. ते सर्वच माझ्यापेक्षा वयाने मोठे. आबा तर माझ्याहून चांगले १२-१३ वर्षांनी मोठे असत. मी कविता करी; आबा तर त्या टोळक्यांतील राजकवीच. तेव्हा त्यातील काही मंडळींनी आबांच्या अभिमानाची ढाल आपल्या मद्विषयक मत्सरास उपयोगी आहे असे पाहून आबांना नेहमी म्हणावे, "हा सावरकरांचा मुलगा म्हणे कविता करतो! आमच्या आबांच्या पदांच्या पासंगासही ते त्यांचे भारूड टिकणार नाही!" पण त्यांच्या त्या उनाड टीकेचा परिणाम कवितेची ओळख असेणाऱ्या आबांच्या सद्वृत्त मनावर उलटाच होत गेला. माझी कविता त्यांच्या त्या वेळच्या लावण्या-ठुंबऱ्या पदापेक्षा काही विषयात सरस आहे असे मनातल्या मनात वाटू लागून --त्याचे कारण माझ्यापाशी असलेला शब्दांचा भरणाच असावा, असा तर्क त्यांनी केला. कोणच्या पुस्तकातून हे शब्द मी काढतो? ती पुस्तके, कवितेची किल्ली, मी त्यास देणार कसा? कारण माझा त्यांचा व्यवसाय एक आणि भिक्षुको भिक्षुकं तसाच कविः कवीं दृष्ट्वा या न्यायाने ती पुस्तके मी अधिकच दूर नेऊन लपवीन कदाचित्! अशा चिंतेत आबा एक दिवशी त्या त्यांच्या उंबऱ्यावर नेहमीप्रमाणे विराजीत होऊन बसले असता त्यांच्या मते निष्णात असलेल्या एका त्रयस्थाने मी एक सुंदर पोवाडा रचला आहे, म्हणून त्यास सांगितले. तेव्हा तो पोवाडा मागण्याचे निमित्त करून आबा पांगळ्यांची स्वारी स्वतःच माझ्या त्यांच्या शेजारी असलेल्या

वर्तकांच्या खोलीत एकदाची आली. पाहतात तो सगळेच विपरीत. त्या 'कवितेच्या किल्ल्या' मी लपवून ठेवण्याचे स्थळी उलट आबांचे हाती आपण होऊन देऊ लागलो, नि हे वाचा, ते वाचा असे माझ्या परिपाठाप्रमाणे त्यांस सांगू लागलो. ते शब्दसंपत्तीचा प्रश्न आबांनी काढताच मी म्हटले, 'हा पहा एक मराठी कोष. हा तुम्हास फार उपयोगी पडेल'. आबांना झाले की, या जादूच्या किल्लीस केव्हा पळवीन. मी त्यास इतर लोक पुस्तके परत देत नाहीत, दडपतात, तसे न व्हावे एवढ्याच अटीस पुन्हापुन्हा सांगून तो कोष त्यांना दिला. काही वाचून शब्दाचे धातु, प्रतिशब्द इत्यादी कशी व्यवस्था असते ती दाखविली. कारण आबांना कोषबिश पाहण्याचा कधीच प्रसंग नव्हता. तो एक अगदी उपजत कवि होता. हीच त्याची माझी मला आठवते अशी प्रत्यक्ष भेट. त्या भेटीत आबांच्या मनात माझ्या सरळपणाचा आणि मोहक भाषणाचा जो परिणाम झाला तो ते पुढे स्वतःच मोठ्या मौजेने सांगत असत. त्या दिवसा-पासून आबांना माझ्याविषयी जो आदर वाटू लागला तो पुन्हा कमी न होता दिवसेंदिवस प्रेमळ स्नेहात, पूज्य बुद्धीत आणि एकनिष्ठ अनुयाअत्त्वात परिणामित होत गेला.

आबांना आमच्या वामन दातारांप्रमाणेच मी शुद्ध कसे बोलावे आणि शुद्ध कसे लिहावे हे शिकविले. वामनला संस्कृत तरी येत होते, आबांस कोणत्याच विद्येचा संस्कार नसे, म्हणून कवितेत समास कसे साधावे, शब्दांची घडण कशी करावी, गणवृत्ते, मालावृत्ते अलंकारप्रभृति कलाविषयक शिक्षण मी त्यांस चालचलाऊ कवितेपुरते तरी सारखा देत राहिलो. आबांत गुणग्राहकता फार. सांगावे ते विनयपूर्वक ऐकत. वारंवार आभार मानीत. त्यांचे अक्षर सुधारावे, म्हणून मी त्यांना ते वळवावयास सांगे. त्यांच्या कविता पाहून, आपल्या दाखवून फेरफार सुचवी. मोरोपंत आणि वामन यांची काव्ये ते मजपाशी वाचीत, समजून घेत. या वैयक्तिक शिक्षणासहच माझ्या संगतीने त्यांच्या जीवनाचा क्रम एकसहा आणि अकस्मात् बदलून टाकणाऱ्या चैतन्यमय स्वातंत्र्याच्या ध्येयाचे दर्शन त्यांस घडताच आबांचा आत्मा एकाएक प्रज्वलित होऊन उठला. त्यांचे सुप्त गुण प्रकट झाले, त्यांचे जीवन विकसित होतहोत एक पांगळ्याचे ते महाराष्ट्रातील एक अत्यंत उज्ज्वल देशभक्त आणि पहिल्या प्रतीचे स्वातंत्र्यकवि गोविंद झाले.

आधी त्या वेळचे नाशिक नगर हेच घरगुती वृत्तीत गुरफटलेल्या भटभिक्षुकांनी गजबजलेले आणि राजकारणात अत्यंत मागासलेले असे महाराष्ट्रातील एक दुय्यम प्रतीचे जीवनशून्य नगर समजले जात होते. त्यातही नगरकरांची ती आळी अगदी एका कोपऱ्यातील गदळ, आकुंचित आणि अरुंद अशी एक वसति आणि तिचा एक बोळ म्हणजे हा तिळभांडेश्वराचा बोळ. त्यात सारी नऊ-दहा घरे, नि त्यापुढे एक मनुष्यच नीट जाऊ शकेल इतका अरुंद, त्या तिळभांडेश्वराच्या देवळाच्या आवारातील त्या देवीच्या मठासमोर येऊन ठेपलेला. एक पोटबोळ, अशा त्या वेळच्या एका अत्यंत दुर्लक्षित बोळात आमची ही वर वर्णन केलेली मंडळी वर वर्णन केलेल्या प्रकारे राहत असे. अशा स्थळी आणि अशा सवंगड्यांना घेऊन मी माझ्या क्रांतिकारक आंदोलनाला आरंभ केला.

## गुप्त मंडळाची स्थापना

प्लेग हॉस्पिटलातून माझे दोघे बंधु सुटून येताच मागे उल्लेख केलेले श्री. म्हसकर आणि पागे यांचे माझ्याशी राजकारणाविषयी नेहमी बोलणे होऊ लागले. ते दुसरीकडे गोऱ्या रामापाशी राहत, पण

आमच्यासंबंधाने आमच्या घरी त्यांची ये-जा वाढून त्या नगरकरांच्या गल्लीतील वर वर्णिलेल्या मंडळीशीही त्यांची दाट ओळख होत चालली. मागे मी वर्णिलेल्या चर्चेप्रमाणे त्यांच्यामाझ्यात चर्चा होता होता शेवटी एस ठरले की, प्रथम आम्ही तिघांनीच मी सुचविली तशी देशस्वातंत्र्यार्थ शपथ घ्यावी आणि एक गुप्त मंडळ सशस्त्र क्रांतीच्या कार्यासाठी स्थापावे; परंतु माझ्या आग्रहार्थ त्यांनी हे जसे मान्य केले तसे मीही हे त्यांचे म्हणणे मान्य करावे की या गुप्तमंडळात काळकर्ते परांजपे यांचा अभिप्राय घेईतो आणखी कोणासही घेऊ नये. इतकेच काय, पण काळकर्त्यांच्या अनुमतीवाचून कोणतेही क्रांतिकारक कृत्य करू नये. वास्तविक काळकर्त्यांस आमच्यापैकी कोणीही पाहिले नव्हते. म्हसकर काळात लिहीत आणि त्यांच्याशी पत्रव्यवहार ठेवीत. परंतु मी जाण्यापूर्वी एखादी प्रत्यक्ष क्रांतिकारक संस्था स्थापण्याची कल्पनाच त्यांच्या मनात नसल्याने त्याविषयी काळकर्त्यांशी त्यांचा असा निकडीचा कोणताच प्रत्यक्ष बेत ठरणे शक्य नव्हते. तेव्हा आम्ही जे काळकर्त्यांस पुढारी मानून त्यांची अनुज्ञाच नव्हे तर संबंधही अशा क्रांतिकारक संस्थेस लाभेल हे गृहित धरले ते “काळातील” लेखाच्या धोरणावरूनच होय. गुप्त संस्थांची माहितीच नव्हे तर काळातून वरचेवर वाखाणणीही येई. चाफेकर-रानड्यांना तर त्यांनीच चक्क Martyr हुतात्मे, म्हणूनच म्हणून टाकले होते. लोकमान्य टिळकांविषयी आम्हा तिघांसही अत्यंत अभिमान असता आणि त्यांचेही आम्ही सर्वसाधारणतः उत्कृष्ट अनुयायी असता या सशस्त्र क्रांतीच्या गुप्त संस्थेचा प्रकट पुरस्कार केला तर काळकर्तेच करतील, केसरीकार नाही ही गोष्ट आम्हास जी न सांगताच समजली ती खरी होती. इतकेच नव्हे तर लोकमान्य टिळक त्या वेळी अलीकडेच कारागारांतून मुक्त होऊन आल्याने त्यांना पुन्हा लगेच असा एखादा कार्यभार घेण्याची विनंती करणे हे मूलतःच अयोग्य होय अशी आमची स्पष्ट चर्चाही झाली होती. पुन्हा त्या वेळची आमची योग्यता आम्ही जाणून होतो. तीन यःकश्चित माणसे- दोन सरकारी नोकर नि एक सोळा सतरा वयाचा विद्यार्थी- स्थापणार गुप्त संस्था जिंकायला हिंदुस्थानचे स्वातंत्र्य. सशस्त्र समरी लढून प्रत्यक्ष इंग्रजांशी! आमच्या आम्हाला निदान मला तरी ते अगदी विश्वासार्ह, सुसंगत, न्याय्य किंबहुना कोणाही सुज्ञ नि जीवंत माणसाचे एक अपरिहार्य कर्तव्य वाटत होते तरी टिळकांना ते कसे दिसेल, किती मोथेफिरूपणाचे भासेल; ते कसे हसण्यावारी ते सर्व नेतील हेही मी आणि आम्ही जाणून होतो. पण तो चाणक्यही माथेफिरू नव्हता का? आणि तो मॅझिनी! त्या त्याच्या कार्यारंभाच्या पहिल्या दिवशी? तेव्हा दादोजींच्या उपहासण्यास टाळण्याचा मार्ग म्हणजे त्यास आरंभाला फारसा बेत न सांगणे हाच. त्याचप्रमाणे आपणही आधी न विचारताच काय ते करून दाखवू नि मग टिळकांना भेटू एस आम्ही ठरविले. पण काळकर्ते अशा “वेड्यापीरा”च्या हातूनच क्रांतीच्या काळात खरी शहाणपणाची कृत्ये घडतात असे म्हणणारे; तशी चेतना आणि आग तरुणांच्या हृदयास सावण्यासाठी “काळ”च्या पोलादी सुपातून विजेचा विस्तव उत्क्षोभाच्या गंजीवर बसून सारखा पाखडीत राहिलेले! ते आम्हास मिळतीलच. दुरूनदुरून तरी “भले वीर” म्हणतीलच. असा आमचा आम्ही पक्का ग्रह करून घेतला. पुढे म्हसकरांनी स्वतः काळकर्त्यांस जाऊन भेटून यावे असेही घाटत होते. पण त्याप्रमाणे त्या वेळी म्हसकर तसे जाऊन आले की नाही ते आठवत नाही. काळकर्त्यांच्या सांगण्याप्रमाणे हे गुप्त मंडळ चालेल अशा अटीवरच म्हसकर नि पागे त्यात पाऊल टाकावयास सिद्ध झाले. पण जर क्वचित

इतर अनेक परोपदेश पंडितांप्रमाणे काळकर्तेही तसे लिहिण्यापुरते क्रांतिलेखक काय ते ठरले- पण प्रत्यक्ष क्रांतिकारक होण्याचे किंवा तशांशी दुरून गुप्त संबंधही ठेवण्याचे त्यांनी नाकारले तर?- मी म्हणे. तरी देखील मी एकटा अशा गुप्त संस्थांस स्थापून सशस्त्र क्रांतीचा मार्ग चोखाळणार. माझ्या देशास स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा जी मी चाफेकर-रानड्यांच्या राखेला स्मरून देवीपुढे, काळपत्र हाती पडण्यापूर्वी घेतली तिला दिवसेंदिवस अधिकच प्रज्वलित करण्याचे जे कार्य 'काळ' करीत आहे तितके जरी त्यांचे साहाय्य झाले तरी आभारच! अधिक झाले तर त्यांच्यासह न झाले तर त्यांस सोडून- ती प्रतिज्ञा, ते व्रत, मी तरी आजन्म, आमरण आचरणार!

आम्ही तिघांनी ज्या दिवशी ही शपथ घेतली त्या दिवशी माझे अशा अर्थाचे भाषण झाले. ते ऐकून म्हसकर माझे अधिकच चाहते झाले. ते मला अत्यंत वाखाणीत! पण अत्यंत भीत; की मी अकालीच काही धाडसी कृत्य करून सर्वांसच गोत्यात तर आणणार नाही! म्हणूनच त्यांनी काळकर्त्यांच्या अनुज्ञेचा पायबंद अशा युक्तीने घालून ठेविला होता. त्या बैठकीत हेही ठरले की, आम्हा तिघांवाचून ही गोष्ट काळकर्त्यांच्या संमतीचा निकाल लागेतो कुठेही फोडावयाची नाही. बाबांना देखील कळवायची नाही. कारण एक तर अशा गोष्टीत त्या काळी बाबा जे लक्ष घालीत ते केवळ माझ्या संगतीने- स्वतःचे त्यांचे ते वळण नसे. दुसरे म्हसकर म्हणत, बाबा हे रामभाऊ दातार प्रभृतींच्या त्या नाचगाणे चहाचिवडा मंडळात रंगलेले. तेव्हा त्यांच्या तोंडून स्नेहामुळे ती गोष्ट त्या चैनी मंडळीत फुटावयाची. तिसरी गोष्ट ठरली ती अशी की, या गुप्त संस्थेच्या मतप्रचारास युक्तीने करण्यासाठी दिसण्यात अगदी निरुपद्रवी अशी एक उघड संस्था स्थापून तीत तरुण मंडळीस एकत्र करावे; आणि नाशिकच्या उघड अशा या सार्वजनिक चळवळींना आपल्या वळणात ओढण्यासाठी आपल्या हाती घ्याव्या. विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व सभा, संघ वगैरे लहानलहान मंडळे पागे प्रथमपासूनच काढीत मोडीत असत. त्या सर्वांस या उघड संस्थेत घ्यावे आणि या उघड कार्यक्रमात जे अत्यंत विश्वासू ठरतील त्यास पारखून मग वरील गुप्त संस्थेत घेत चलावे.

ही आमची तिघांची गुप्त संस्था १८९९ च्या नोव्हेंबरच्या शेवटच्या कोणच्या तरी दिवशी स्थापन झाली. हिचे पहिले नाव 'राष्ट्रभक्त समूह' असे ठेविले. मी यापेक्षाही स्पष्टपणे क्रांतिकारक ध्येय आणि मार्ग सुचवील असे नाव असावे असे म्हणत होतो. पण शेवटी म्हसकरांच्या म्हणण्याप्रमाणे हेच नाव मान्य केले. त्याच राष्ट्रभक्त समूहाचे आद्य आणि अन्त्य अक्षर घेऊन कोणास अगदी धार्मिक दिसावे पण तरीही व्यवहारात सहसा नसलेले पद व्हावे अशा धूर्ततेने या संस्थेचे लेखी आणि तोंडी प्रकट उपयोगाकरिता "राम हरि" हे सांकेतिक नाव ठरविले. या नावाचा उपयोग आम्ही सर्वजण वर्षानुवर्षे पत्रोपत्री देखील करीत असू. जसे आज "रामहरि" भेटला; आज रामहरि असे म्हणाला; अमुक दिवशी रामहरि येणार; रामहरि अमक्या ठिकाणी भेटेल- म्हणजे "गुप्त संस्थेची बैठक आज झाली; अमुक ठरले; अमक्या ठिकाणी गुप्त संस्थेची बैठक आहे" इत्यादी.

## मित्रमेळ्याची स्थापना

आता ठरल्याप्रमाणे या गुप्त राष्ट्रभक्त समूहाची उघड शाखा केव्हा काढावयाची याची बोलणी चालली. तोच १८९९ च्या डिसेंबरात अकस्मात नातूबंधु सुटल्याची वार्ता नाशिकला येऊन थडकली. त्या वेळी मी, म्हसकर, श्री. पागे आणि मला वाटते बाबा, दातारप्रभृति मंडळी नाशिकच्या नाटकगृहात कोणचासा प्रयोग पाहण्यास गेलो होतो. तिथे बातमी ऐकताच ते नाटक बंद करून तात्काल नातूबंधुंचे अभिनंदन करणारी एक सभा करावी अशी त्या आलेल्या बातमीसह आम्हा सर्वांस ऊर्मि आली. पण नाटकगृहात असलेल्या त्या वेळच्या एक-दोन ठराविक सार्वजनिक पुढाऱ्यांनी भीतीमुळे आमच्या हेतूस खो घातला. आमचे काही चालेना. तेच निमित्त झाले. आम्ही सर्वजण बाहेर आलो आणि त्या अनेक मंडळींच्या तात्कालिक उत्क्षोभाचा पुरेपुर फायदा घ्यावा म्हणून नाशकास असल्या सभा वगैरे सार्वजनिक प्रकट कामे पूर्वीच्या अशा कामी भित्र्या पुढाऱ्यांच्या साहाय्यासाठी अडत. तशी न अडविली जाता स्वतंत्रपणे करता यावी म्हणून लगेच एक मंडळ स्थापावयाचे ठरले. यावेळी माझ्या त्या तिळभांडेश्वराच्या बोळातील तरुणांच्या मनात माझ्या नित्याच्या राजकीय वादविवादांनी आणि चळवळींनी मोठाच फरक होत चालेला होता. त्यातील काहींचे मत राजकारणात माझ्या मताचे होत आले होते. अर्थातच त्यांचे सहकार्य या कामी तात्काळ मिळाले. आणि दोन-चार दिवसात काही चालचलाऊ नियम ठरवून- मला वाटते १ जानेवारी सन १९०० ला वर्षारंभ साधून आम्ही पूर्वनिश्चित प्रकट मंडळ स्थापन केले. आणि त्याचे अगदी निरुपद्रवी पण अत्यंत व्यापक, सरकारी नोकरांना आत येता यावे असे. पण क्रांतिकारकांच्या जहाल तत्वनिष्ठेसही सुसंगत असलेले, आणि दोन्ही पक्षी वाटेल तितके ताणता येईल एस "मित्रमेळा" की ज्याचे नाव पुढे नाशिकचे खटल्यात हिंदुस्थानभर गाजले.

हा मित्रमेळा मी, म्हसकर आणि पागे या तिघांनी पूर्वीच स्थापलेल्या राष्ट्रभक्त समूहाच्या गुप्त संस्थेची एक प्रकट शाखा होती. तीत थोड्याच महिन्यांच्या आत एक एक करून तिळभांडेश्वराच्या आणि नगरकरांच्या आळीतील दातारबंधु, भिडे, दाते, वर्तक बंधु, आबा दरेकर वगैरे बहुतेक तरुण मंडळी समाविष्ट झाली. आबांच्या कक्षेत असणारी त्यांची ती गणपति न्हावी वगैरे मंडळीही आली. माझे वडील बंधू तर प्रथमपासूनच सभासद होते. मंडळींच्या बैठकी दर शनवारी व रविवारी भरत. कोणी तरी एक विषय घेई. त्यावर मुख्य भाषणानंतर सर्वजण काही तरी चर्चात्मक बोलत. या मित्रमेळ्यात प्रथम विषय अगदी साधेच ठेवण्यात येत. पण त्यांचा संबंध मी राजकारणाशी अकस्मात जुळवून देई. आणि त्या वेळच्या राजकारणाचे विषय मी घेई, तेव्हा राजक्रांतिकारक विचारांचा ओघ माझ्या भाषणातून प्रथमपासूनच दुर्दांत वेगाने चालू होई. मी म्हणे नुसता हा निर्बंध (कायदा) वाईट आहे, तो बदला, हा कर जाचक आहे, तो काढा, अशी किरकोळ रडवी गाऱ्हाणी किती दिवस करावयाची. विषारी झाडांची नुसती पाने कुठपर्यंत खुडत बसायची! त्याच्या मुळावरच घाव घातल्यावाचून तो वृक्ष नष्ट होणार नाही. मग जर केव्हा तरी तो घाव घालावाच लागणार तर त्यास आरंभ आजच का करू नये? जो कोणी आरंभ करील त्यास आपल्या प्राणाचे मूल्य द्यावेच लागणार. मग तो आरंभ आणखी शंभर वर्षांनी करा ना का? तेव्हा तो आरंभ आजच करून आपणच ते प्राणदानाचे मूल्य का देऊ नये? या विषारी वृक्षाची पाने तेवढी वाईट

आहेत, ती खुडली पाहिजेत, मुळाशी आमचा वाद नाही हे म्हणण्यात 'राष्ट्रीय' पक्षाची चूक आणि त्या वृक्षाला जर आपण न दुखविता नुसत्या प्रार्थनांचे ओशाट दूध घालीत राहिलो तर तो आपण होऊन अमृतवृक्षात रूपांतरित होईल हे म्हणणाऱ्या 'नेमस्तांची' चूक. ह्या दोन्ही चुका सारख्याच बुद्धिभ्रष्ट आहेत. त्या दोन्हीही सुधारल्या पाहिजेत. त्यास ते शक्य वाटत नसेल तर आपण ते शक्य करूया. कारण तो परवशतेचा विषारी वृक्ष सुधारण्याचा एकच मार्ग आहे. नि तो म्हणजे त्याचे आमूलात् उन्मूलन. त्या वृक्षाच्या मुळाशीच आमचे खरे भांडण आहे. इंग्रजांचा इकडे येणारा अधिकारी वर्गच नव्हे तर इंग्रजी सत्ताच उलथून पाडली पाहिजे. आणि ही गोष्टी स्पष्टपणे ज्वालाग्राही भाषेत, बंदीगृहाच्या छपरावरून नि फाशीच्या खांबावरून गर्जत राहिल्यावाचून लोकांची हीन आणि क्लीन उपेक्षावृत्ति मावळून ते केव्हाही उठावयाचे नाहीत. कोणच्या तरी अत्युच्च, अतिभव्य, अतिदिव्य ध्येयास त्याभोवती त्यागाची आणि पराक्रमाची जाज्वल्य प्रभावळ पेटवून ती लोकांच्या दृष्टीसमोर धरल्यावाचून लोकांची मने आकर्षित होणार नाहीत. वैयक्तिक संसाराच्या चाकोरीतून ते तसल्या कोणा बेभान दिव्य उर्मीवाचून बाहेर येणार नाहीत, महान ध्येयाच्या प्रेमाने उन्मत्त झाल्यावाचून ते उसळून उठावयाचे नाहीत. आज हा धाडसी आरंभ केलात तर समजा शंभर वर्षांनी ते महान कार्य यशस्वी होईल- परंतु आरंभ उद्यावर लोटाल, जितका उशीर कराल तितकेच यशही दुरावत जाईल. यास्तव निर्भेळ आणि संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हेच आमचे ध्येय होय. या राजकीय परवशतेचा बट्टा नावापुरता देखील, आमच्या नाण्यावर देखील लागता कामा नये. ते स्वदेशस्वातंत्र्य हेच आमचे ध्येय. ते स्वदेशस्वातंत्र्य हाच आमचा राजकीय धर्म. ते स्वदेशस्वातंत्र्य हीच आमची राष्ट्रीय देवता. आमचा राजकीय देव; आमची ऐहिक उन्नति; आमचा मोक्ष!

आणि ध्येय जर हे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य होय तर अर्थातच त्याची साधना सशस्त्र क्रांतीवाचून दुसरी कोणती असणार! गोखलेप्रभृति नेमस्तांची विनंति, याचना, अर्ज यांनी काही नोकऱ्या देण्यात येतील स्वामित्व नाही. टिळकप्रभृति राष्ट्रीयांच्या निषेध, स्वदेशी, असंतोष, बंदिवास यांनी काही अधिकार देण्यात येतील- पण तो अधिकार देण्याचाच अधिकार, ती मूळ सत्ता मिळणार नाही. पण त्या दोहीनाही पायऱ्या करून त्यावर चढून त्या 'विनंत्या'च्या वैयर्थ्यामुळे उत्पन्न झालेल्या त्या 'असंतोषा'च्या म्यानांतून तो खड्ग, ती सशस्त्र क्रांतीची तरवार, उपसल्यावाचून ते स्वातंत्र्य, ते सिंहासन, तो मुकुट मिळणार नाही. यास्तव नेमस्त आणि राष्ट्रीय यांना जे करवते ते करू देऊन त्या त्यांच्या देशकार्याविषयी त्यांचे आभार मानून त्यांना जे करवत नाही ते आपण केले पाहिजे, निर्घोषिले पाहिजे. अर्थात्

स्वातंत्र्य हेच साध्य : सशस्त्र क्रांति हेच साधन! असे वक्तृत्त्वाचे वादळ मी मित्रमेळ्याच्या पहिल्याच बैठकीपासून उसळवून देत चाललो. मित्रमेळ्याच्या प्रत्येक बैठकीस चर्चेचा विषय कोणताही असला- स्वभाषा, साहित्य, व्यापार, इतिहास, व्यायाम, गोरक्षण, वेदान्त-तरी त्याचा निष्कर्ष मी हाच काढी. राजकीय स्वातंत्र्या-वाचून राष्ट्रीय जीवनाच्या ह्या कोणत्याही घटकांचे अस्तित्वही शक्य नाही, मग परिपोष कुठला. मंडळाच्या बैठकी प्रथम फिरत्या ठेवण्यात येत. कधी पागे, कधी म्हसकर, कधी आणखी कोणी असे आपल्या घरी बैठका बोलावीत; पण पुढे लौकरच आबा दरेकर यांच्या माडीवरच मंडळाचे स्थान स्थायी झाले. कारण ती माडी गुप्त मंडळाच्या शास्त्रोक्त परंपरेस अनुरूप होती. मूळ नगरकरांची

आळी हीच अरुंद, त्यात तिळभांडेश्वराची पट्टी म्हणजे एक बोळ, त्यात विश्वामित्र्याचे घर म्हणजे एक पाहू गेले तरी न सापडणारे भुयार आणि त्याच्या अंधेऱ्या भागातील एका तिरप्या कोपऱ्याच्या लहान दाराच्या आतून बरेच आत जाऊन लागणाऱ्या जिन्यावरची ही बाबांची माडी केवळ एक बीळ. जणु काय कोण्या गुप्त कटासाठीच आधीपासून शास्त्रोक्त पद्धतीने नियतीने ती बांधविली होती. ती उदास जागा पाहताच आमचे मन रमले. तिथे गुप्त कटास साजेसा शृंगार आम्ही चढविला. शिवछत्रपतीची रविवर्माचित्रित छापील तसबीर मुख्य स्थानी विराजे. माझ्या भगूरच्या घरी टाइम्समधले एक अत्यंत जुने नानासाहेब बंडवाल्यांचे छायाचित्र माझ्या वडिलांनी फार जपून ठेवलेले असे. ह्या छायाचित्रास पाहतपाहत माझ्या मनात भगूरला मी चौदा-पंधरा वर्षांचा होतो तेव्हापासून सत्तावनच्या स्वातंत्र्य युद्धाविषयींची जिज्ञासा प्रथम उत्कटपणे उगवली होती. त्या छायेस (फोटोस) चौकट बसवून ते नानासाहेबांचे, दुसरे एक झाशीच्या राणीचे आणि तात्या टोपे यांचे अशी चित्रे. आमच्या होतकरू बंडाची आदर्श दैवतेच तशी भिंतीवर लावली. त्या पुढे एका शिंप्याच्या दुकानी आढळले ते वासुदेव बळवंतांचे नाशिकला दुसरे कोठेही नसलेले एक थोरले हस्तचित्र मोठ्या प्रयासे आणून लावले. त्यापुढे चाफेकर रानड्यांची छायाचित्रे! अशा रीतीने महाराष्ट्रीय “बंडवाल्यां”ची पूर्वपरंपरा आमच्या डोळ्यासमोर अशी अक्षरशः चित्रासारखी उभी ठाकली. लोकमान्य टिळकांची तसबीरही अर्थातच तिथे होती. काळकर्त्यांचे चित्र तेव्हा बाजारात आलेले नव्हते. म्हणून मुद्दाम ते परांजप्यांकडून मागवून आणून तिथे लावले. तेव्हा कोणीकोणी सूचना केली जर या माडीवर एखाद्या वेळी पुलिस-बिलिस आला तर ही एकाच पंथाची बंडखोर चित्रे पाहून ही संस्था राजद्रोही आहे असा एक पुरावा मिळू शकेल. म्हणून तिथे एक इंग्रजांच्या “राणीचे” वा “राजाचे” चित्रही लावावे - पण त्या गोष्टीस म्हसकरांचे अनुमोदन असताही माझ्या तरुण पक्षाने अत्यंत तिरस्काराने ती सूचना फेटाळून लावली. आम्हास राजद्रोहाची शिक्षा झाली तरी चालेल; पण आमच्या देशाच्या प्रत्यक्ष शत्रुंचीच चित्रे आम्ही वंदनीय मानणार नाही. तिथे ढोंगासाठी देखील लावणार नाही, असे चक्क प्रत्युत्तर आम्ही दिले. इतकेच काय आमच्या कोणाच्याही शाळेच्या पुस्तकात देखील इंग्लंडच्या राजाचे वा राणीचे चित्र हिंदुस्थानाचा सम्राट वा सम्राज्ञी म्हणून आम्ही राहू देत नसू. मी म्हणे - इंग्रजांचा राजा म्हणून त्यास मानू, पण हिंदुस्थानचा सम्राट म्हणून मानणार नाही. तेव्हा देवदेवतांची चित्रे तेवढी केवळ राजकीय वास येऊ नये म्हणून लावली. या माडीवरच पुढे पुढे आमच्या सर्व चळवळी घाटू लागल्या. ही माडी मित्रमेळ्याचे आणि पुढे त्याचेच रूपांतर झालेल्या सुविख्यात अभिनव भारताचे मुख्य केंद्रस्थान झाले. तीच माडी शेवटी स्वदेशस्वातंत्र्यास्तव झुंजलेल्या महाराष्ट्रातील अत्यंत प्रमुख आणि हिंदुस्थानातील जवळजवळ पहिल्या आणि युरोपपर्यंत व्याप असलेल्या क्रांतिकारक गुप्त संस्थेचे जन्मस्थान म्हणून उभ्या महाराष्ट्रास वंदनीय नि उभ्या भारतास दर्शनीय असे एक राष्ट्रीय पुण्यक्षेत्र व्हावयाचे होते.

ही माडी तीन घरांच्या मागच्या भिंतीत पाचरी-सारखी दडलेली असल्यामुळे तीत आम्ही देऊ ती व्याख्याने रस्त्यावर सहसा ऐकू जात नसत. आमचा मित्रमेळा पोलिसांच्या डोळ्यात एकाएकी भरू नये म्हणून आम्ही काही काही गोष्टीत बरीच सावधानताही ठेवीत होतो. रस्त्यावर व्याख्याने ऐकू येत नसत तरी देखील बैठका चालू असता रस्त्यावर एकदोन सभासद टेहळणीस बसत. की काही ऐकू येत का वा

कोणी अगदी लक्ष देऊन ऐकू बसतो की काय; तसे काही होताच आम्ही विषय बदलावा किंवा आवाज उतरवावा. काही मंडळी लेखी निबंध लिहून आणीत. त्यात व्यापार, व्यायाम, स्वदेशी शिक्षण, वेदान्त, कविता असे विषय असले तर ते ते निबंध आम्ही प्रथम प्रथम राखून ठेवावे. पण माझ्यासारखी स्वातंत्र्यात्मक क्रांतिकारक कडक व्याख्याने असली की त्यांचा लेखी उल्लेख ठेवीत नव्हतो. हेतू हा की, कधी चौकशी झालीच तर ते राखून ठेविलेले निबंध दाखवून सिद्ध करता यावे की आमचे मंडळ एक निरुपद्रबी, राजकारण शून्य, साधारण वक्तृत्वसभा आहे. पहिली एक-दोन वर्षे सभासदांच्या नावांची टिपणी ठेविलेली असे. पण तीवर मथळा 'मित्रमेळ्याच्या सभासदांची टिपणी' एवढाच असून मित्रमेळ्याचा उघड उद्देश स्वदेशाची सर्वांगीण उन्नति करणे असा मोघम दिलेला असे. नवीन सभासद घेणे तो प्रस्तुत सभासदांच्या बहुमताने पसंत ठरला तरच घेण्यात येई. प्रथम वार्षिक आय-व्यय आणि प्रतिवृत्त लिहून वार्षिक सभेत वाचले जाई. पण पुढे जेव्हा मित्रमेळ्याचे अंतःस्वरूप सरकारी अधिकाऱ्यांस संशयास्पद वाटून पोलिसांची गुप्त चौकशी जोराने चालू झाली तेव्हा ती प्रतिवृत्ते, ते निबंध, त्या टिपणी-लिखाण तेवढे सर्व नाश करून टाकले. आणि पुन्हा लिखाण असे ठेवावयाचेच नाही, असे ठरविले. सभासदांची नावे तेवढी कोणा एकापाशी असत. पण त्यावर मथळा असा नसेच. त्यामुळे ती कशाविषयींची टिपणी ते सिद्ध करणे पोलिसांस कठीण जाई. किंवा वर्तमानपत्राचे ग्राहक अथवा अमक्या पुस्तकाच्या प्रति अभिप्रायार्थ धाडल्या त्यांची नावे असा काही तरी निरुपद्रवी मथळा देऊन खाली नावे आणि शाखांची गावे दिली जात.

मित्रमेळा जानेवारी सन १९०० च्या आरंभी स्थापन झाल्यावर आणि त्याच्या साप्ताहिक बैठकी अगदी नियमितपणे भरू लागल्यावर लवकरच शिवोत्सवाचा प्रसंग आला. त्यानिमित्ते नाशिकच्या सार्वजनिक चळवळीत प्रकटपणे भाग घेण्याचे मेळ्याने ठरविले. नाशिकला शिवाजीउत्सव केव्हा केव्हा होत होता. पण तो जुन्या पुढाऱ्यांच्या वतीने असल्यामुळे त्यात तेज असे मुळीच नव्हते. पण या वर्षी मित्रमेळ्याने तो उत्सव करण्याचे ठरविताच त्याचे स्वरूप आमूलात बदलले. आम्ही बहुतेक मुलेच होतो. ती अडचण इतकी भासली की पालखीबरोबर पागोटे असे कोणाचेच नसल्यामुळे नगरावर मिरवणुकीचा वचक कसा बसणार, याची चिंता आम्हास पडावी! शेवटी आमच्यातले नाना वर्तक यांचा तो धष्टपुष्ट देह, त्यातल्यात्यात बऱ्याचशा फुटलेल्या त्या मिशा, ते सभ्य पोट आणि मोठ्या मनुष्याप्रमाणे बोलण्याचालण्याची डोलती ढब पाहून त्यांनीच पगडी घालावी. मोठे घोळाचे रेशीमकांठी उपरणे पांघरावे आणि पालखीबरोबर चालावे, अशी कोण्या मोठ्या गृहस्थाचे पात्र करण्याची भूमिका त्यांच्याकडे नित्याचीच सोपविण्यात आली आणि ती भूमिका त्यांनी पाचसहा वर्षेपर्यंत अगदी प्रामाणिक एकनिष्ठेने वठवून दाखविली. इतक्या एकनिष्ठेने की मित्रमेळ्याच्या इतर कोणत्याही चळवळीत जरी ते फारसे पडत नसत तरी मिरवणुकीचा प्रसंग आला की पागोटे घालून पुढे चालण्याचा मान अगदी मत्सरपूर्ण ममत्त्वाने ते इतर कोणासही लाभू न देता स्वतः बिनीवर हटकून उभे राहत. त्या मानाच्या भानांत राष्ट्रविषयक असे आपले एवढेच कर्तव्य नसून मेळ्याच्या सभासदांस आणखीही काही कर्तव्ये असतात ह्याचादेखील त्यांना बहुधा विसर पडे. उत्सवाचा तो थाट, तो आवेश नाशिककरांस अगदी अपूर्व वाटला. शेवटी त्या उत्सवाची आमची व्याख्या जेव्हा मुख्य व्याख्यानात मी सांगितली तेव्हा त्या उत्सवाचे स्वरूपच

बदलल्यासारखे झाले. मी त्या सार्वजनिक व्याख्यानात म्हटले- "आजवर आपण महाराष्ट्रीय लोक असे सांगत होतो की, हा शिवोत्सव ऐतिहासिक आहे; यात आमचा राजकीय असा हेतु नाही. पण आम्ही जो हा उत्सव आज करीत आहो तो तो उत्सव राजकीय आहे म्हणूनच करीत आहो. किंबहुना शिवाजी उत्सव करण्याचा अधिकार त्यांनाच आहे की जे शिवाजीसारखे आपल्या या परतंत्र मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी झुंजण्यास सिद्ध आहेत. शिवाजी-उत्सवाचा मुख्य उद्देश इंग्रजांच्या बेड्या तोडून स्वदेशाला स्वतंत्र करण्याची स्फूर्ति आम्हाला उत्पन्न व्हावी हाच. जर परवशतेत समाधानाने राहणे असेल, जर केवळ भारी पगाराच्या जागा मिळविणे, परदास्याचे पट्टेवाले होणे, हा कर हलका व्हावा, तो निर्बंध ढिला व्हावा, इतकेच ध्येय असेल तर त्या ध्येयास शिवाजीचा उत्सव सुसंगत होणारा नसून, त्या ध्येयास शेवटच्या बाजीरावाचा उत्सव अधिक सुसंगत होईल. इंग्रजी राज्याविरुद्ध आमचे काही म्हणणे नाही, केवळ आम्हास पेन्शने हवीत, पोटभर खावयास हवे, सवतली हव्यात इतकीच ज्यांची महत्त्वाकांक्षा आहे त्या पारतंत्र्याशी राजनिष्ठा असेणाऱ्यांना पावला तर ब्रह्मावर्ताचा शेवटचा बाजीराव पावेल, रायगडचा शिवाजी नव्हे. ती स्वातंत्र्याची देवता आहे. आम्ही तरी आज तिचे अशाचसाठी आवाहन करतो आहो की, ती आमच्या अंगात संचरून आम्हास त्या स्वदेशस्वातंत्र्याच्या कर्मक्षेत्री झुंजण्याची आणि जिंकण्याची शक्ति यावी! परिस्थित्यनुरूप साधने बदलतील- पण साध्य तेच. बाण बदलतील पण लक्ष्य तेच!!" अशा अर्थाचे अत्यंत उद्दीपक आणि अत्यंत सरस व्याख्यान होताच त्या सार्वजनिक सभेत आतूनआतून पूर्वी कधीही न अनुभवलेली खळबळ उडाली. उभ्या नगरात सातआठ दिवस तीच चर्चा चालू होती.

या शिवोत्सवापासून मित्रमेळ्याची नाशिक-करांवर जी छाप पडली ती उत्तरोत्तर वाढतच गेली. शिवाजी-उत्सवानंतर लगेच गणेशोत्सवही आला. मित्रमेळ्याने तो उत्सवही स्वतंत्रपणे करण्याचे ठरवून गणपति स्थापला. म्हसकर आणि पागे यांच्या नाशिकच्या त्या वेळच्या सर्व पुढाऱ्यांत पूर्वीच्याच ओळखी होत्या. त्यांनी त्यापैकी काहींना व्याख्यानास बोलाविले. माझीही भाषणे झाली. आम्हा मंडळींच्या भाषणात जे नवतेज दिसून येई त्याची चटक नाशिककारांना अशी लागून राहिली की या प्रसंगी श्रोत्यांच्या झुंडी लोटत. या उत्सवातच आबा दरेकरांनी स्वदेशविषयक पदे रचण्यास प्रथमच आरंभ केला. आणि पहिली दोन-तीन पहिल्यानेच नाशिकला म्हटली गेली. ह्या पदातून, माझ्या व्याख्यानातून, आमच्या मिरवणुकीतून, स्वातंत्र्याच्या, स्वदेशाच्या स्फूर्तिदायक संदेशावाचून दुसरे बोलणे नव्हते. याच वेळी मी प्रचारात आणलेल्या "स्वातंत्र्यलक्ष्मीकी जय!" च्या जयजयकाराने नाशिक निनादू लागले.

मेळ्याची स्थापना होण्यापूर्वीच नाशिकचे एक थोर गृहस्थ श्री. गंगाधरपंत अर्थात बापूराव (बापूसाहेब) केतकर वारले होते. नाशिकलाच काय, पण महाराष्ट्रातही थोड्याफार प्रमाणात नावाजला जावा असा तो पुरुष होता. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानड्यांच्या पिढीतल्या बहुतेक चळवळी नाशिकला ते चालवीत. ते समाजसुधारक होते आणि तरीही त्या काळच्या काही सुधारकांप्रमाणे पाश्चिमात्यांच्या वैभवाने दिपून जाऊन स्वाभिमान्यशून्य बनून इंग्रजांच्या राज्यास देवराज्य मानणारे नव्हते. टिळकांचे ते व्याही, त्यांच्या पुत्रास टिळकांची मुलगी दिलेली. त्यांच्या स्मृतिस्तव एक नगरगृह बांधावयाचे ठरले होते. त्या नगरगृहाचा पाया घालण्यासाठी न्यायमूर्ति रानडे हे नाशिकला येणार असल्याने त्यांच्या स्वागतार्थ

कविता रचावयाच्या ते काम कोणास द्यावे असा नाशिकच्या नेक पुढाऱ्यांच्या नेमलेल्या स्वागतमंडळात प्रश्न आला असता मागे उल्लेखिलेल्या श्री. अनंतराव बर्वे संपादक "लोकसेवा" यांनी माझे नाव सुचविले. मी त्या वेळी हायस्कूलमधील एक विद्यार्थी होतो; पण मागे सांगितलेल्या वक्तृत्वसभेतील व्याख्यानाने माझ्याकडे आधीच सर्व पुढाऱ्यांचे लक्ष आतूनआतून वेधलेले असे. तेव्हा ते काम मला सांगण्याने ठरले नि तसे स्वागतमंडळाने श्री. म्हस्कर यांस कळविले. आपल्या संस्थेतील एका युवकाचा होत असलेला हा गौरव पाहून म्हसकरांनी मोठ्या अभिमानाने ते काम स्वीकारले नि मला त्या कविता करण्यास सांगितल्या. न्यायमूर्ति रानडे आले त्या प्रसंगी त्याच्या प्रति छापून स्वागतमंडळाने वाटल्या. त्यावेळची माझी कविता कशी असे याचे एक उदाहरण म्हणून त्यातील अधूनमधून जे दोन-तीन श्लोक आठवतात ते येथे देतो :-

*सत्कीर्ति विमला वरूनि रमला जो मायभूला भला*
*औदार्ये भरला भवास तरला सत्पुत्र तो शोभला*
*देशार्थ श्रमला कधी न दमला सद्यशोमंदिला*
*श्रीमत्केतकरा स्वभूहितकरा साष्टांग त्या वंदिला।।*
*आधी देशहितार्थ यत्न करिती ऐसे किती जन्मती*
*त्यामाजी परतंत्र देश आमुचा कुंठीत जेथे मती*
*ऐशाही समयी कसे हरिशि त्या मृत्यो समुद्धारका*
*आर्यांचे कलिजे कसे हिसडशी दीनावरी मारका!।।*
*ज्या ज्या सत्कृति थोर थोर करीती त्यांची वसावी स्मृति*
*साधुंची करितात ह्यास्तव जनी ही स्मारके सन्मती*
*आजी नाशिकवासि केतकर जो दैवे आम्हा लाभला*
*त्याचा स्मारक योग हा जुळतसे आनंद झाला भला।।*
*बांधावे नगरगृहास ठरले पाया तया घालण्या*
*येती सन्मति रानडे जनहिती मानूनि बोलावण्या*
*थोरांचे स्तवनार्थ थोरचि भले आम्हासि या कारणे*
*झाले दर्शन साधुचे फिटतसे या चक्षुचे पारणे।।*

कै. बापूराव केतकरांच्या मागे त्यांचे चिरंजीव, टिळकांचे जावई, श्री. विश्वनाथपंत केतकर वकील ह्यांनीही वडिलांचा सार्वजनिक पुढारीपणाचा लौकिक आपल्यापरी पुढे चालविला. नाशिकला अनेक संस्थांस आणि अनेक प्रसंगी त्यांचा मोठा आधार असे. त्यांस स्वतः जरी एखादे कठीण देशकार्य करवले नाही तर ते करण्याचे सामर्थ्य किंवा धाडस ज्यास असेल त्यास निर्मत्सरपणे यथाशक्य साहाय्य ते देत. निदान विरोध तरी केव्हाही करीत नसत. मित्रमेळ्याच्या अंतरंगाशी जरी त्यांचा नेहमीचा प्रत्यक्ष संबंध नसे तरी त्या आम्हा तरुण मंडळीची उत्कट देशभक्ति, त्याग आणि तेज पाहून त्यास फार आनंद होई आणि आमच्या प्रकटपणे होणाऱ्या स्वदेशी-सभा- उत्सवादिक नैर्बंधिक चळवळीस पाठिंबा देण्यास ते केव्हाही

कचरत नसत. नाशिकच्या जनतेचे पुढारीपण, नगरसंस्था, राजकीय चळवळीप्रभृतीच्या नैर्बंधिक कक्षेत तरी या केतकर घराण्याकडे आज दोनतीन पिढ्या अविच्छिन्नपणे नांदत आहेत.

### हायस्कुलातील शिक्षण

त्या सार्वजनिक चळवळी चालल्या असताही त्यामुळे तिकडे माझ्या शालेय विद्यार्जनात खंड पडू दिला नाही. वडील वारल्यानंतर माझे दोन्ही बंधू प्लेग रुग्णालयात आजारी असेतो प्लेगमुळे गावातील शाळाच बंद होत्या. पण पुढे हायस्कूल उघडले त्या वेळेस मी पूर्वी ज्या राष्ट्रीय म्हणून समजल्या गेलेल्या शिवाजी शाळेत जात होतो. तीत चवथीपुढे वर्ग नव्हते. त्यातही ती शाळा मोडल्यासारखी झाली होती. यास्तव मी सन १८९९ वर्षाच्या शेवटी हायस्कुलात पाचवीत बसलो. दोन-तीन महिन्यात हायस्कूलच्या वार्षिक परीक्षेस बसून तीत उतरून सन १९०० मध्ये सहावीत गेलो त्या वेळी नाशिक हायस्कूलवर रा. ब. जोशी हे मुख्य शिक्षक (Head Master) असत. त्यांची विद्वत्ता आणि राजकीय उपयुक्तता महाराष्ट्रात प्रसिद्ध होती. नामदार गोखले जेव्हा इंग्लंडमध्ये हिंदुस्थानच्या वतीने एका 'कमिशन'मध्ये आर्थिक परिस्थितीविषयी साक्ष देण्यास गेले, तेव्हा गोखल्यांना अर्थशास्त्राची लागेल ती माहिती देऊन त्यास त्या साक्षीच्या विषयात सज्ज करण्याचे कार्य रा. ब. जोशी यांनीच केले होते. ते विश्रुतच आहे. पुढे सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी लोकमान्यांच्या राजकारणास वाहून घेतले. आणि स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीच्या दिवसांत बरेच काम केले. असला गाढा विद्वान आणि देशभक्त शिक्षक जरी त्या वेळी नाशिक हायस्कूलेला लाभला होता तरी आम्हा विद्यार्थ्यांना त्यांचा इतर कोणाही साध्या मुख्य शिक्षकाहून राष्ट्रीय वृत्तीच्या दृष्टीने फारसा लाभ झाला नव्हता. कारण शिक्षकवर्गावर सरकारची इतकी कडक दृष्टि असे की, चाफेकर पकरणानंतर तरी त्यास वर्गात अभ्यासाच्या धोकंपट्टीपलिकडे चकार शब्द काढता येत नसे. तरीदेखील केव्हाकेव्हा कवितापाठ म्हणून दाखविण्याची चढाओढ करण्याच्या निमित्ते देशभक्तीस पोषक अशा कविता- अर्थातच अग्रजी देशवीरांच्या तोंडच्या आणि त्यांच्या गौरवाच्या- ते आमचे मुख्य शिक्षक निवडीत. अशा एका कवितापाठाच्या स्पर्धेत त्यांनी मला निवडले होते. इंग्रजीतील त्यावरील रसरसीत देशवीरत्त्वाच्या कवितेचा आरंभ चुकतमाकत असा काहीसा होता :-

*We are the sons of sires of old*
*who crushed crowned and mitred tyrrany*
*they defied the field and scaffold*
*for their brithright so will we.*

या कविता-पाठाच्या स्पर्धेत माझा क्रमांक पहिला आला. माझ्या सार्वजनिक चळवळीची माहिती शिक्षकवर्गास अर्थातच असे. त्यामुळे वर्गात माझा अभ्यास उत्सवसभादिक धांदलीच्या दिवसात उणा पडताच त्या माझ्या सार्वजनिक चळवळीवर शिक्षकवर्गाच्या टीकेचे आडून हल्ले होत. परंतु माझ्याविषयी प्रत्येक शिक्षकाचे जो मनातून आदर आणि कौतुक वाटे ते अनेक प्रसंगी उघडपणे भर वर्गात व्यक्त केल्यावाचून त्यास राहवत नसे. आमच्या उभ्या हायस्कुलमध्ये जर कोणी पाणीदार आणि नाव

गाजविण्यासारखा विद्यार्थी असेल, तर तो सावरकरच होय, असे स्पष्टपणे सर्व शिक्षकवर्ग गावातून आणि वर्गातूनही सांगत असे. 'पण ह्याला आवरणारा कोणी तरी हवा, नाही तर हा वाया जाईल', हे त्यांचे ममतेचे पालुपद अजूनही माझ्या कानात गुणगुणत आहे. आणि खरोखर मला देखील आश्चर्य वाटते की, ज्यावेळी माझे वडील वारले आणि मी तिळभांडेश्वराच्या त्या आळीत राहावयास आलो तेव्हा त्या उनाड आळसाच्या ओघात मी कसा वाहून गेलो नाही! शाळेस जे बंदीशाळेसारखे मानीत, नाटकतमाशे, पत्तेगंजिफा-सोंगट्यात ज्यांचा सर्व काळ जाई, अशा संगतीत मी सारखे वाचन, लेखन करीत असलेला पाहून ते मला Book-worm ग्रंथकीट म्हणून हिणवीत आणि मी छचोर नव्हतो म्हणूनच मला टाकाऊ समजत. अशा स्थितीत त्या मंडळीत तशा आळशी उनाडकीच्या सोईस्कर मार्गाने लौकिक पावण्याचा सहज मोह मला न होणे अगदी दुर्घट होते. पण योगायोगच म्हणून ते दुर्घटच घडले खरे. त्यावेळी माझे वय १६, १७ चे, भर उच्छृंखळपणाचे, त्यात न मला कोणाचा दाब, न मार्गदर्शन, न माझ्या उपजत प्रवृत्तीच्या बळावाचून माझ्या वैयक्तिक आणि राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेस बरे म्हणणारा कोणी सोबतीसवंगडी- उलट त्या गुणासच दुर्गुण म्हणून टाकाऊ समजणाऱ्यांचाच मजभोवती गराडा पडलेला. पण सुदैवाने त्या उपजत प्रवृत्तीचेच बळ शेवटी अधिक ठरले. आणि माझे विद्यार्जन आणि राष्ट्रीय वळण सुटण्याच्या स्थली त्या सर्वांचेच सुटलेले विद्यार्जन सुधारले. आणि त्यांच्याच जीवनास एक नवे दिव्य, भव्य नि गंभीर वळण लागले. एका म्हसकरांनी मला छचोरपणाकडे झुकविण्याचा यत्न केव्हाही केला नाही. ते स्वतःच मुळी त्या उनाड ओघात कधी सापडले नव्हते. इतकेच नव्हे, तर मित्रमेळ्यात बहुतेक तरुणांचाच भरणा असल्याने सार्वजनिक चळवळीमुळे त्यांचे विद्यार्जन खुरटू नये तर उलट राष्ट्रीय सेवेच्या त्या ध्येयास साजेल अशी योग्यता, विद्वत्ता आणि शिस्त त्या तरुणांनी अधिकतम प्रमाणात संपादावी म्हणून म्हसकरसारखे नेट लावीत आणि माझे उदाहरण आदर्श म्हणून सर्वांपुढे धरीत. त्यामुळे म्हसकर, पागे आणि मी या तिघांनी मित्रमेळ्यातील प्रत्येक विद्यार्थ्याने आपली शालेय परीक्षा उतरलीच पाहिजे अशी कडक शिस्त प्रथमपासून ठेवलेली असे आणि दर सहामाहीत आणि दर वर्षास आमच्या सभासदांपैकी किती विद्यार्थी परीक्षा उतरत त्यांची नोंद आणून त्यांचा गौरव करावा. आणि जे न उतरत त्यांचा कच्चा विषय कोणता ते पाहून आमच्या आमच्यातच फुकट शिकवण्या लावून घ्याव्यात.

शालेय अभ्यास करण्याची आणि परीक्षा उतरण्याची या वेळेपासूनच माझी जी एक पद्धत ठरली ती अगदी शेवटपर्यंत राहिली. प्रत्येक दिवसाचा माझा बहुतेक वेळ वर्तमानपत्रे आणि ग्रंथ इत्यादि शालेतर वाचनात, राष्ट्रीय वादविवादात आणि सार्वजनिक चळवळीत जाई. त्यामुळे वर्गातील प्रत्यहीच्या अभ्यासात कसाबसा टिकाव धरावा. केव्हाकेव्हा तर क्रमांक अगदी खाली घसरायचा. शिक्षकांनी जाता-येता भविष्य वर्तवून मला सांगावे की "काही झाले तरी तू या वर्षी उतरणार नाहीस!" पण सहामाही किंवा वार्षिक परीक्षा आली की मी तेवढ्यापुरते एक किंवा दोन महिने मात्र अगदी खोलीत कोंडून घेतल्यासारखे करावे आणि सर्व विषय अगदी पहिल्यापासून जे अभ्यासावे ते परीक्षेपर्यंत. की तेवढ्या एक-दोन महिन्यांत माझा अभ्यास चक्क होऊन जाई आणि परीक्षेत मी निरपवाद उतरलेला पाहून शिक्षकांबरोबर साऱ्यांना

आश्चर्य वाटू लागे. माझ्या बाबांना तर पोटात मावेनासा आनंद व्हावा नि मी नकोनको म्हणत असता त्यांनी घरोघर पेढे वाटावे. 'उतरलास बरे परीक्षा' म्हणून बाबांनी किती ममतेने माझ्या पाठीवरून हात फिरवावा! असा क्रम मी बी. ए. होईतो चालेला. बाबांचा तसा हात फिरवून घेण्यासाठी शाळांच्या आणि युनिव्हर्सिटीच्या नऊ-दहा परीक्षांच्या स्थली बी. ए. पर्यंत पंचवीस परीक्षा असेत्या तरी मी आनंदाने तोंड दिले असते.

## वडील वारताच कुटुंबावर आलेले आर्थिक संकट

वडील वारल्यानंतर आमच्या घरी केवळ पोरवडा झालेला आणि नाशिकास राहू लागलो, असे पाहून आमच्या मूळच्या भगूर गावाकडे असलेल्या आमच्या मत्तेची एकच लूट झाली. वडील असतानाच आमच्या घरी चोरांचा उपद्रव असे. वारण्याच्या आधीच एका रात्री मागच्या दाराच्या बाहेरच्या पायऱ्या उखडून, एक भुयार रातोरात खणून त्यातून आत स्वयंपाकघरात तोंड पाडून चोर वर आले. भुयारावर दार जसेच्या तसे बंदच! त्या टोळीने वडील निजले होते त्यांच्या पायाशी थोरला एक दगड घेऊन एका चोरास उभे केले, की कुणी जागे झाले तर कपाळात तो दगड घालून ठार करावा. वडील उशाखाली एक तलवार ठेऊन निजत, हे चोरास ठाऊक असले पाहिजे. कारण त्या टोळीत घरचा एक गडीच भेद्या होता. पण कोणी जागण्याच्या आधीच त्यांनी माडीवरील नेमक्या फडताळास हात घालून रोकड आणि दागदागिने लांबविले. सकाळी सर्व गोष्टी उघडकीस आल्या. अंथरुणाच्या पायापाशी थोरला दगड पाहून पोलिसांनी तर्क केला. अण्णा उठते तर ठिकच्या ठिकाणी ठार होते. पण या तर्कापलीकडे पोलिसांना चोराचा दुसरा कसलाही सुगावा काढता आला नाही, आणि दगडाविषयी त्यांनी केलेला तर्क बायाबापड्यांनीही आधीच केलेला होता. या चोरीत झालेल्या आर्थिक हानीमागोमाग वडील प्लेगने वारले. त्यावेळी नाशिकास रातोरात निसटून जाण्याच्या धांदलीत आम्ही घरातील शंभर पात्रांची भांडी - तितकी ताटे, वाट्या, पेले, मोठाली पातेली, तपेली सर्व एका बळदात भरून टाकलेली होती. तो सुगावा असलेल्या एका शेजाऱ्याने ते आमचे पत्र्याचे नवे घर ओसाड नि बंद पाहून ती सर्व भांडी चोरून नेली. घरचे सावकारीचे येणे, शेती, मळे, आंबराया, ज्याच्याकडे जे जे होते ते ते सावकार नि ती ती कुळे ते ते दाबून बसली. आम्हा मुलांना ना फारसा अनुभव ना माहिती, त्यात बाबा प्लेग हॉस्पिटलमधून सुटून येतात तो भगूरलाच पडलेले. व्यवहाराचे कित्येक कागदही गहाळ झाले. वडिलांनी काढलेले ऋण मात्र सुटेना. अशा पेचात कुटुंबाच्या पोषणाची बाबांस फारच चिंता पडली. त्यांनी त्यापायी सावकारांचा नाना प्रकारचा त्रास सोसला. बरे सरकारी नोकरी कुठे धरणे तर त्याचा त्यांना अगदी तिटकारा. सरकारी नोकरीच्या मी केव्हाच विरुद्ध नसे, मित्रमेळ्यात सरकारी नोकरही असत. इष्टमित्रांच्या आणि माझ्या आग्रहे मधूनमधून बाबांनी नोकरी धरली, तरी पहिल्या दोन महिन्यांत काही तरी खटका उडून किंवा निमित्त काढून सोडून देत. त्यातही तेव्हा दुष्काळाची पीडा आलेलीच असे. दुष्काळनिवारणार्थ कामे निघाली. त्यातही त्यांनी निरुपायाने एकदा नोकरी धरली. तीही तशीच सोडली. सावकारांचा तगादा लागे. वाण्याची बाकी थके. बाबांचा ते अपमान करीत. पण काही झाले तरी बाबा ते स्वतः सोशीत. त्यांना मोठी विवंचना एवढीच की, मला मात्र कोणाचाही शब्द न लागावा. त्यांच्या या ओढीतही त्यांनी मला किंवा बाळाला काहीही कमी पडू दिले

नाही. आमच्या दुधाजिलबीचा उकाडा खंडला नाही. मग त्यांस कधीकधी अर्धपोटी राहावे लागले तरी न कळू देता राहत. आमच्यापासून ही ओढ चोरून ठेवीत. या आर्थिक त्रासाचा वाटा जर त्यांनी कोणास भोगावयास दिला असेल तर तो माझ्या वहिनीला तेवढाच. घरात सामान केव्हाकेव्हा अगदी नसे. ती सांगायला भिई. मग अगदी गळ्याशी आले तर कधी तिने मला तो निरोप बाबांना सांगावयास सांगावे कारण बाबा मजसमोर सहसा कधी रागवायचे नाहीत. मला शंभर अपराध क्षमा असणार. पण मी "तांदुळ नाहीत वा मीठ नाही ना रे घरात. तेवढे आणले पाहिजे" असे कधी सुचविले तर 'आणतो' म्हणत, पण माझ्या मागे वहिनीला दटावीत की घरच्या अडचणी त्याला का सांगितल्यास! बाबांचे जुनेपुराणे कपडे बळे टाकून द्यावेत, तेव्हा नवे घेत आणि तिची फाटकी लुगडी पाहून जेव्हा मी अगदी धरणे घेईन किंवा माझ्या कोटाला पैसे मागून त्याचे लुगडे आणीन तेव्हा नवे लुगडे येई. देणेदारांच्या जप्त्यांसाठी शेवटी तिने आपले माहेरचे दागिने देखील उतरून दिले. तिच्या अंगावर सुतळीचा तोडा उरला नाही. तिच्या अंगावर दागिना असा जर उरला असेल तर तो तिचे ते आमच्या संगतीत कधीही न कंटाळलेले संतोषाचे प्रसन्न हसतमुख! आमच्याशी हसण्यात खेळण्यात आणि आमचे लालन-पालन करण्यात तिला स्वर्गासारखे सुख वाटे. तिला मूल असे त्याच वयात एक झाले पण; ते बाळंतपणाच्या हालअपेष्टातच वारले. त्या बाळंतपणात नीट जोपासना न झाल्यामुळे तिच्या प्रकृतीवरही परीणाम झाला. पण त्या दैहिक कष्टांचे वा या घरातील दारिद्र्याच्या त्रासाचे तिला भानच नसे. आम्हीच तिची मुले, तिची संपत्ति, तिचा आनंद, तिचा स्वर्ग होतो. त्यात ती मग्न असे, सुखी असे, रमलेली असे. बाबांचा स्वभाव मूळचाच देवलसी, भारी श्रद्धाळू. या पैशाच्या ओढीने नाही नाही ती आशा कोणी दाखविली ती त्यांना खरी वाटे. या पायी कितीकदा ते सपशेल फसत. त्यांचा जपावर विश्वास, नवसावर विश्वास, शकुनावर विश्वास, देवाला संकटी घालण्यावर विश्वास, किमयेवर देखील विश्वास, दृष्ट उपाय खुंटल्यावर मनुष्य सहजच अदृष्टाच्या मागे लागतो. आशा आहे तर आयुष्य आहे. मानवी आशा जिथे नाही तिथे दैवी आशा तरी धरल्यावाचून त्यास गत्यंतरच नसते. त्या कावलेल्या स्थितीत बाबांचे मन अधिकच श्रद्धाळू बनले. आम्हा दोघा भावांच्या प्रेमाचा धागा तेवढा त्यांना संसारास बांधून धरीत होता. नाही तर ते केव्हाच राख फासून चालते होते. पण माझ्या भाग्योदयावर त्यांची पूर्ण निष्ठा. तो भाग्योदयाचा दिवस येईतो आमचे पालनपोषण कसेही करून केले की झाले, अशा धीराने ते त्या दिवसांना तोंड देत गेले. काडीचा देखील आधार त्यांना पुरे. आणि जर कोण्या संकटी ती काडी देखील त्यास हाताशी लागेनाशी झाली तर देवाला संकट घालण्याचा मार्ग तर कोणी बंद केला नव्हता! असाच प्रकार एकदा घडला.

### दहा हजारांचा दैवी गुप्त ठेवा

बाबा तेव्हा एकवीस-बावीस वर्षांचे होते. त्यांना सावकारांच्या आणि संसाराच्या पेचात येऊन पैशासाठी ते अगदी नडीत असतात हे सर्वांना माहितच होते. अशा वेळी भगूरहून काही तरी वसूल जुन्या कुळाकडून झाला तर पाहावा म्हणून ते भगूरला गेले. तिथे आमच्या वडिलांच्या वेळेस एक अगदी घरोब्याचे म्हणून समजले गेलेले आणि ज्यांच्या अडल्यापडल्यास आम्ही शेकडो रुपये द्यावे-घ्यावे असे कारंजकर नावाचे कूळ असे. त्यातील एका मनुष्याने बाबांच्या अडचणीमुळे अगदी कासावीस झालेल्या

स्वराने म्हटले, “बाबा! तुम्ही पालखीपदस्थ कुटुंबातील मुले. आमचे जहागिरदार. पण आज तुमच्यावर ही अकस्मात विपत्ति ओढवली! तुमच्या अन्नाने वाढलो- आता तुम्हास असे संकटी पाहून आम्ही स्वस्थ कसे बसू. हे पाहा एक घबाड चालून माझ्या दाराशी आले आहे. पण मी ते आपल्या पायी अर्पितो. आमचे काय, आम्ही भीक मागितली तरी कोण हसणार? पण तुमचा लौकिक आम्ही राखला तर तुमच्या अन्नाचे आम्ही खरे उतराई! हे पाहा दोन दिवसात जवळजवळ दहा हजार रुपये मला मिळताहेत! कसे ते विचारू नका. हा पुरातन ठेवा नदीच्या काठच्या शेतात आहे. सुमुहूर्ती परवा रात्री बारा वाजता मी तो काढणार. तेव्हा आपणास बरोबर नेईन. रातोरात मी तुमच्या हाती तो देऊन जसा मला मिळालाच नाही असे समजेन. पण प्रथम त्या ठेवण्यास हात घालण्यापूर्वी मला काही आमच्या देवतास भोग-बळी देणे वगैरे विधि करावे लागतील. त्यास दोनशेतिनशे रुपये आता कुठून तरी जुळवून द्या” बाबांना हे ऐकताच तो मनुष्य कोणी देवच भेटल्यासारखे वाटले. पुरातन ठेवे असणे, त्यावरच्या तक्षक नागास बळी वगैरे दिल्यास ते मिळू शकणे, असे चमत्कार घडल्याच्या गोष्टी आमच्या पुराणात तर काय, पण बखरीबिखरींच्या इतिहासातही खचून भरलेल्या. असे ठेवे आपणास मिळाले म्हणून स्वानुभवाचे शपथेवर सांगणारे चालू पिढीतील लोकही तेव्हा पुष्कळ. आताही थोडे नाहीत. बाबांनी म्हणतात तसा अगदी जीव गहाण ठेऊन ते तीनशेएक रुपये काढले. एका त्यांच्या मित्राने बाबास एक नोकरी मिळावी म्हणून अवश्य ती हमी भरण्यासाठी ते पैसे बाबांस दिलेले होते. हेच त्यांनी त्या मनुष्यास दिले. आणि अत्यंत उत्कंठेने आपल्या मागचा हा देणेदारीचा सर्व सेसेमिरा एका झटक्यासरशी आता निश्चितपणे दूर होणार अशा अशक्य आनंदात गर्क होऊन त्या रात्रीची वाट पाहत बसले. रात्र झाली पण तो मनुष्य येईना- रात्र गेली पण तो आला नाही. बाबांस धीर निघेना. तो मनुष्य फसवितो की काय?- छे; पण तो किती कळवळून ते बोलेला. काही दुसरीच अडचण असेल! तोच तो मनुष्य दुसऱ्या दिवशी सकाळी आला. आता त्याच्यावरचा संशय व्यर्थ ठरला. मात्र “ती रात्र शुभ नव्हती. आणखी अकरा दिवसांनी पक्का शुभ मुहूर्त येणार. आणि थोडी अधिक रक्कम मंत्रतंत्रार्थ हवी.” असे त्यांनी सांगितले. त्याचीही सोय करण्याचे बाबांनी ठरविले. मध्यंतरी काय कारणासाठी काय की मीही कधी न येणारा पण भगूरला आलो. पाहतो तो आमच्या घरी एक पंधरा घागरीची भली मोठी दगडाची पुरातन अशी विहीर असे. तीत पाणी भरलेले असून त्यात ती आमची कुलस्वामिनी देवी आकंठ बुडवून ठेवली आहे. मी हे काय विचारले. पुष्कळ वेळ अळंटळं करताकरता शेवटी बाबांनी सर्व वृत्त सांगितले. मी लगेच म्हटले हा सारा लुच्चेपणा आहे. त्याच मनुष्याचा आपल्या घरी चोरी झाली तेव्हा अण्णांनी संशय धरला होता! त्याने तुम्हास साफ फसविले. आता हे आणखी पैसे तरी देऊ नका. पण बाबा तरीही म्हणाले, पैसे देत नाही, पण तो मुळीच तसा नाही आणि जरी त्याच्या मनात कपट येण्याचा संभव असता तरी तोही असंभव व्हावा म्हणून तर मी देवीस हे अकरा दिवस अशी पाण्यात आकंठ बुडवून संकट घातले आहे आणि जर अकराव्या दिवशी तो मनुष्य न आला तर देवीला मी सगळीची सगळी पाण्यात बुडून ठेवी.” मी म्हटले, “या दगडीच्या पाण्यात तर काय, पण त्या खोल विहिरीत जरी बुडवून ठेवलीत तरी ही झालेली फसगत भरून येणार नाही!” तरीही बाबांचा धीर पुरा खचला नाही. पण तो मनुष्य अकराव्या दिवशीही जेव्हा आला नाही तेव्हा बाबा घाबरले.

www.savarkarsmarak.com

बोलावण्यावर बोलावणी गेली. पण आता त्याला अधिक पैसा आगाऊ म्हणून लाटण्याचा संभव उरला नसल्याने तो कसचा येणार? पुढे काही दिवसांनी त्याला बाबांनी गाठलाच. तेव्हा म्हणाला की, 'अहो! त्या रात्री मी तिथे जाताच दहाबारा माणसे अकस्मात तेथे उद्भवली नि तलवार उपसून माझ्यापासून ते तुमचे सर्व पैसे छिनावून पुन्हा येशील तर ठार मारू म्हणून धमकावून मला हुसकून देती झाली. मी जीव घेऊन निसटलो हेच भाग्य! आता कुठे अवाक्षर काढू नका. नाही तर तुमचीही हीच गत होईल!" पण त्याच्या या भितीवाचूनही आम्ही ते अवाक्षर कुठेही काढणार नव्हतोच. पण ते स्वतःच्या फसवणुकीचा डांगोरा होऊ नये याच भीतीने! याच वेळी ती देवी पूर्वी ज्या खंडोबाच्या देवळात असे त्याच देवळात बाबांनी परत पोचविली. ती अजूनही तिथेच आहे.

## पब्लिक सर्व्हिसची परीक्षा

बाबांना फसगतीने ही दोनशेतीनशेची ठोकर बसली त्याचे मला फार वाईट वाटले. आमच्या बऱ्याकरिता यांना हा त्रास वारंवार पडतो, अशी खिन्नता सोसावी लागते, ते पाहून मला वाटले आपण शाळेचे शिक्षण सोडून कुठे तरी नोकरी करावी म्हणजे बाबांचा हा त्रास टळेल. त्यावेळी मॅट्रिकपर्यंतच माझ्या फीची सोय कशी होईल ही चिंता असे. तेव्हा नोकरीची म्हणून एक "पब्लिक सर्व्हिसची" परीक्षा हायस्कूलच्या सातवीच्याच मानाची पण बुक कीपिंग (आयव्यय) इत्यादी कचेऱ्यातून लागणारे विशिष्ट विषय अधिक असलेली अशी असे. त्यामुळे मॅट्रिकला एखादे वेळी नोकरी मिळाली नाही तरी ती पब्लिक सर्व्हिसला पंधरा-वीसांची नोकरी मामलेदार कचेरी वगैरे ठिकाणी मिळे. तेव्हा पुढचे शिक्षण करावयाचेच, सोडावयाचे नाही, असा दृढनिश्चय असूनही कुटुंबाच्या पोषणासाठी निकरावर गोष्ट आलीच तर चटकन नोकरी मिळविण्याचे हेही साधन जवळ असावे म्हणून मी हायस्कूलात सातवीत जाताजाता त्या पब्लिक सर्व्हिसचा अभ्यास घरीच केला. त्या कामी माझा सहाध्यायी माझा मित्र डांगे असे. त्याची मजवर फार भक्ति असे. रामभाऊ दातारांचा मेहुणा मोनू कोल्हटकर हाही त्या परीक्षेस बसणारा होता. शेवटी आम्ही तिघेही परीक्षेस बसलो आणि तीत उतरलो. आमच्या जुन्या आप्तेष्टांच्या व्यावहारिक दृष्टीने ती फार चांगली गोष्ट झाली. आता आपला कुठे तरी नोकरी धर नि हो मोकळा- हा त्यांचा आशीर्वाद मिळाला. कारण त्यापलीकडे त्यांची आकांक्षाच नव्हती-माझ्या त्या वेळच्या परिस्थितीत वीसपंचवीस रुपयांपेक्षा अधिक नोकरी मिळण्याइतके शिक्षण मला मिळू शकेल असा फारसा संभवही नव्हता. म्हणून ही परीक्षाच त्यांना महत्वाची वाटली. कारण ती पब्लिक सर्व्हिस परीक्षा म्हणजे आमच्या मामलेदार कचेरीची प्रत्यक्ष सिव्हिल सर्व्हिस परीक्षाच!

पण बाबांस शुभाशुभ काहीच वाटेना. कारण तात्याने आणि वीस रुपयांची नोकरी धरावयाची, ही कल्पनाच त्यांना शिवत नसे. "वाटेल तो त्रास मी सोशीन, पण तात्याचे शिक्षण बंद पडू देणार नाही" अशी त्यांची नेहमी प्रतिज्ञाच असावयाची!

## माझे वाढते अनुयायी आणि स्नेहीमंडळ

तिकडे मित्रमेळ्याची प्रगति झपाट्याने चालली होती. माझ्यावर व्यक्तिशः निःसीम प्रेम करणारे माझे स्नेहीमंडळही वाढत चालले होते. त्या वेळच्या माझ्या सहाध्यायी मित्रांत जयवंतबंधुंचा आणि माझा

स्नेह अगदी निःसीम असे. त्यांचे वडील एक प्रतिष्ठित गृहस्थ आणि वरच्या प्रतीचे सरकारी नोकर असून त्यांचे वडील बंधू बी. ए. होऊन त्या वेळेस वकिलीचा अभ्यास करीत. पुढे ते एल्. एल्. बी. ही झाले. त्यांना दोनतीन बहिणीही असत. मी नाशिकला असेतो ही सर्व बहिणभावंडे अगदी एखाद्या कुटुंबीयाप्रमाणे मजवर लोभ करीत. त्यांची आई तर मला किती ममतेने वागवी. त्या सर्वांसह मी खेळत, बसत, हसत, अभ्यास करीत, किती तरी प्रेमळ दिवस घालविले आहेत. ते जातीचे प्रभु. -ब्राह्मणाने त्यांच्या हातचे खाणे अशक्य- पण मी आनंदाने त्यांनी जे काही गोडधोड करावे ते खावे. माझ्या मनात जातीचा किंतु असा नसेच. पण माझी मैत्री म्हटली की तिचा मुख्य कटाक्ष माझ्या मतांचा प्रचार हाच. माझ्या खेळात, हसण्यात, अभ्यासात देखील सारी चर्चा ती माझा मित्र म्हटला की स्वदेशी वस्तू वापरणारा, स्वदेशाभिमानात रंगलेला, स्वातंत्र्याची निदान मानसिक तळमळ तरी लागलेली- बहुधा मित्रमेळ्याचा सभासद झालेला असायचा. कोणी सभासद झाले म्हणून आवडते मित्र झाले. कोणी आवडते मित्र झाले म्हणून सभासद झाले. एवीतेवी माझी मैत्री म्हणजे त्या व्यक्तीच्या राजकीय प्रगतीची एक खूणच ठरलेली असे. जोवर मी लहान, माझ्यामागे इंग्रजी सत्तेच्या संशयाचे पिशाच्च लागलेले नव्हते तोवर या दोन्ही गोष्टी एकत्र नांदू शकत. पण पुढे मजवर इंग्रजी सत्तेचा प्रथम संशय नि नंतर कोप जेव्हा झाला तेव्हा अशा कित्येक सरकारी नोकरांच्या आणि तदितरांच्याही कुटुंबांच्या प्रेमास मला अंतरावे लागले. मी अंतरलोही. दुःखाने वैयक्तिक प्रेमाचा त्याग केला,पण राष्ट्रीय कर्तव्याचा नाही.

याच वेळी शंकर वाघ याची ओळख झाली. मजवर अगदी एखाद्या देवासारखी निष्ठा ठेवणाऱ्या माझ्या त्या वेळच्या अनुयायांत ज्यांचा उल्लेख करावा, असा हाही एक किशोर होता. म्हटले तर एका यःकश्चित न्हाव्याचा मुलगा. काही दिवस इंग्रजी शिकला; पण किती साहसी, कर्ता, हौशी आणि मजबरोबर होता तोवर तरी स्वातंत्र्याच्या माझ्या चळवळीत अत्यंत विश्वासाचे ते ते काम अचुक करणारा असे तो! मित्रमेळ्याचा मोठा अभिमानी आणि सर्व कार्यात झटून मेहनत करण्यास कधी मागे न राहणारा. त्याचे वाचनही माझ्या देखरेखीखाली पुष्कळ वाढले. बाहेरच्या एखाद्या विद्वानासही राजकारणाचे, इतिहासाचे चार शब्द ऐकावेसे वाटावे असा बोलका झाला होता. त्याच्या न्हाव्याच्या कलेतही तो निष्णात असे. पुढे मी पुण्यास गेल्यावर काही भाग्योदय करावा म्हणून एक दिवस तो अठरा-एकोणीस वर्षांचा न्हाव्याचा मुलगा एकाएकी घर सोडून नाहीसा झाला-- तो एक वर्षाने बडोद्यास राजवाड्यात प्रत्यक्ष गायकवाडांचा न्हावी नेमला गेल्यानंतरच प्रगट झाला. बडोद्यास जाऊ देण्याचा जो माझा अंतस्थ हेतु होता तो त्याने आपल्या गुणाने राजवाड्यातच प्रवेश करून घेऊन कल्पनेबाहेर साधला. तेथे प्रचार करण्यास आणि बातमी घेण्यास सोय झाली. मी विलायतेस जाईतो तो मुंबईस भेटे. पुढे बडोद्यास असलेल्या 'अभिनव भारताचे' मंडळीचा इंग्रजी सत्तेने जेव्हा सारखा पाठलाग नि धरपकड चालविली त्यावेळी सुदैवाने तो बचावला. शेवटी त्याच्या राहत्या घरास आग लागून तो त्या आगीत अपघाताने जळाल्याचे दुःखदायक वृत्त पुढे एक दिवस ऐकू आले. स्वदेशस्वातंत्र्यासाठी काही काळ तरी मनःपूर्वक झटणाऱ्या या देशभक्त तरुणाच्या आणि माझ्या एका निःसीम भक्ताच्या या परिचयाचा असा शेवट झाला. माझ्या सहवासाच्या कक्षेत सापडताच ज्या अगदी सामान्य व्यक्तींचा अकस्मात् गुणविकास

होऊन ते अन्यथा होते त्याहून आपापल्या परी अधिकाधिक राष्ट्रोपयोगी झाले आणि काही तरी थोरवी पावले त्या व्यक्तीत शंकराचीही गणना केली पाहिजे.

या वेळी मित्रमेळ्यात आम्ही असलेल्या सभासदांनी त्यांच्या-त्यांच्या आवडीप्रमाणे त्या त्या विषयाचा पूर्ण अभ्यास करून तज्ज्ञता मिळवावी म्हणून विषय वाटून घेतले. काही मंडळी त्याप्रमाणे अनेक ग्रंथ वाचून त्यावरचे निबंध लिहून वाचीत किंवा भाषणे करीत. त्यायोगे सभासदांचे सर्वसाधारण ज्ञान वाढण्यास पुष्कळ साहाय्य झाले. दर शनिवारी वा रविवारी बैठकी अगदी नियमाने होत. मी तरी प्रत्येक बैठकीस उपस्थित असेच असे. पुष्कळ मंडळींना या साध्या बैठकीत काहीच उत्साह वाटत नसे. कोणी परस्थ मोठे माणूस भेटीस बोलाविले असेल किंवा सार्वजनिक मिरवणूक उत्सवादिक प्रसंग आले म्हणजे तेवढी ही मंडळी जमे. पण प्रतिसप्ताह तेचतेच चिंतन, मनन, ज्ञानार्जन करण्याची चिकाटी त्यांच्यात नसे. पण मला तर त्याचे अत्यंत महत्व वाटे. मी म्हणे रामकथेची किंवा कृष्णकथेची जशी पारायणे आपण करतो तशीच स्वातंत्र्यलक्ष्मीच्या इतिहास-पुराणाचीही पारायणे आम्ही केली पाहिजेत. जशी धार्मिक संध्या प्रत्यही केली पाहिजे तशीच ही संध्या- राष्ट्रीय संध्या. पुन्हा नवीन सभासद जे येतात त्यांच्यावर तुम्हास जुने वाटणारे संस्कारच नव्याने ठसवायचे असतात. संपूर्ण राजकीय स्वातंत्र्यावाचून स्वदेशास तरणोपाय कसा नाही, का नाही, ते स्वातंत्र्य सशस्त्र बंडावाचून मिळणे कसे दुर्घट, इतर देशांनी ते कसे मिळविले, ते आपणास कसे मिळवता येईल याची चर्चा- याचा उच्चारसुद्धा त्या काळच्या शाळाकॉलेजांतून वा वर्तमानपत्रांतून वा सभांतून उघडपणे करणे केवळ अशक्य होते. मग ती चर्चा कुठे होणार? आमचे तरुण ते ज्ञान कुठे संपादणार- ह्या एका गुप्त संस्थेतूनच! बाकी राष्ट्रीय म्हणविणाऱ्या शाळातूनही जे अशक्य ते खरे राजकारण ह्याच गुप्त संस्थातून शिकविणे शक्य आहे. आणि त्याप्रमाणे कार्य करणाऱ्या ह्या गुप्त संस्थाच खऱ्या राष्ट्रीय शाळा होत. जोवर स्वातंत्र्याची उत्कट इच्छा जनतेत उघडउघड उपदेशिणे शक्य केले जात नाही, तोवर ते गुप्तपणे उपदेशिणेच अवश्य आहे. गायत्रीमंत्र गुप्तपणेच जपावा लागतो. श्रीकृष्णास उघडपणे मथुरेस नांदता येत नाही तोवर त्याचे परिपालन गुप्तपणेच गोपांकरवी करविले पाहिजे. अशा निष्ठेने अगदी धार्मिक बुद्धीने दर शनिवारी मी आणि आबा दरेकर प्रभृति माझ्या या निष्ठेस उचलून धरणाऱ्या मंडळींनी कोणी येवो न येवो बैठकीस खंड पडू द्यावयाचा नाही, असा विडाच उचललेला होता. रामभाऊ, माझे ज्येष्ठ बंधू बाबा प्रभृति मंडळी वर लिहिल्याप्रमाणे केव्हा तरी येत आणि प्रत्येक सभासदाने शक्यतो बैठकीस आलेच पाहिजे, हा नियम या ना त्या निमित्ते टाळीत. पहिल्या दोन वर्षांपर्यंत बाबांना खरे म्हटले तर, राजकीय चळवळीची उत्कट तळमळ इतकीशी नव्हती. विरोध नसे. अनुकुलताहि नसे. पण दुसरे काही सुचूच नये असा राजकारणाचा ओढा नसे. माझ्या संगतीने आणि वशिल्याने जे जे येत ते ते येत. कधीकधी शनिवारी रात्री इकडे बैठकीस न येण्याचे कारण डोके दुखते असे सांगून नंतर तिकडे हळूच नाटकासही ही मंडळी गेलेली केव्हा केव्हा धरली जात. विचारले म्हणजे म्हणत ती सभाबिभा वगैरे बोलण्याची कामे काय ती तुम्ही पाहा- प्रत्यक्ष काही काम असेल तेव्हा आम्ही रेंगाळलो तर मग काय हवी ती शिक्षा द्या. निदान बाबांनी तरी हे वचन, प्रसंग येताच तंतोतंत पाळले. हे राष्ट्रस्वातंत्र्यार्थ समरमखाचे होमकुंड पेटताच आपल्या देहाची

सर्वांच्या आधी जी आहुति त्यांनी टाकली त्यावरूनच दिसत आहे. कारण हिंदुस्थानच्या अर्वाचीन स्वातंत्र्य-उत्थानात तोच देशवीर जवळजवळ सर्वांआधी अंदमानातील जन्मठेपेच्या भयंकर शिक्षेस मेरूसारख्या अचल धैर्याने तोंड देता झाला. दृष्ट्राकराल फाशीची तांत, असहनीय गुप्त छळांचा घातपात, करकचून रोगांचा दात यापैकी काहीही त्या भारताच्या झुंजार सैनिकास त्याच्या ठाण्यापासून विचलीत करू शकले नाही! इतिहासात देशवीरांनी जे अघोर छळ सोसले म्हणून आम्ही वाचू ते त्या देशवीराने जवळजवळ पहिल्या झुंजीतच आम्हास स्वतः सोसून दाखविले. त्यायोगे असल्या छळासही आणि त्यागासही तोंड देण्याची शक्ति अजूनही आमच्या रक्तात आहे, ही जाणीव राष्ट्रास झाली. ही आत्मविश्वासाची ज्योत पेटली आणि त्या चेतनेसरशी दिव्य करण्यास एकामागून एक शतावधि तरुण अहमहमिकेने भारताच्या कानाकोपऱ्यातून पुढे येत गेले.

### प्रेते जाळणारे स्वयंसेवक पथक

पुढे कधीकधी असंभाव्य वाटणारा बाबांची ही सहनक्षमता, परोपकारता, मनोधैर्य तेव्हा देखील निरनिराळ्या स्वरूपात का होईना पण मधून-मधून प्रकट होई. त्या सन १९०० व्या आणि १९०१ व्या वर्षाच्या मध्यंतरी नाशिकास प्लेगची वार्षिक फेरी पुन्हा एकदा आली. आम्ही मंडळी आता प्लेगला अगदी निर्ढावलो होतो. प्लेग येताच पळापळ होण्याच्या जागी आम्ही गावातच राहावे. इतकेच नव्हे, तर निराश्रित अशा प्लेगच्या रोग्यांची शुश्रूषा स्वतः करून शेवटी त्यांची प्रेते स्वतः खांद्यावर वाहून न्यावी. या कामी पुढाकार म्हणजे बाबांचा आणि रामभाऊ दातारांचा. स्मशानाच्या वाऱ्या रात्रीबेरात्री आम्ही जीवाची चिंता सोडून इतक्यांदा केल्या, की स्मशानाचे भय असे न उरता ते एखाद्या गजबजलेल्या जगतातल्या चौकासारखे बैठकीचा अड्डा वाटावे.

### स्मशानातील फुले

एक रात्र मला स्पष्टपणे पुढे दिसत आहे. कोणाचे काय की प्रेत आमच्या मंडळींनी स्वयंसेवक होऊन आणलेले चितेवर चढवून आम्ही स्मशानातल्या धर्मशाळेतच ती रात्र काढली. रामभाऊ स्मशानाच्या वर्णनाचीच कुठल्याशा नाटकातील पदे म्हणू लागले. त्या तालावर तेथील लाकूडविक्याचा डफ आणून कोणी वाजवू लागले. आम्ही ऐकत राहिलो आणि मधूनमधून स्मशानातील धर्मशाळेच्या पुढे लावलेल्या जाईजुईच्या पढऱ्या शुभ्र फुलांकडे मी मधून-मधून पाहत नि त्यांचा दरवळलेला अत्यंत कोमल परिमळ उपभोगीत झोपी गेलो. तो त्या दिवशींचा सुवास असा माझ्या स्मृतीत नित्याचा साठवून ठेवल्यासारखा झाला. अजून जाईजुईचे फूल पाहिले, की मला त्या स्मशानातील त्या फुलांचा परिमळ दरवळल्यासारखा भासतो.

### आजोळात भेट

एक-दोन महिने लोटले तरी प्लेग हटेना. आणि मामांची आम्ही नाशिक सोडून कोठुरास मामांच्या गावास त्वरित निघून येण्याची तर सारखी निकड लागली. मलाही प्लेगमध्ये स्थलांतर करणे हाच शहाणपणाचा मार्ग वाटे. शेवटी बाबांनी मला, बाळाला नि वहिनीला कोठुरला धाडले. पण ते काही केल्या नाशिक सोडीनात. आम्ही कोठुरला येताच प्रथम तेथील जहागिरदार अण्णाराव बर्वे यांच्या बागेत दहा-

पंधरा दिवस गावाबाहेरच राहिलो. कारण प्लेगच्या ठिकाणाहून येणाऱ्या माणसासह प्लेगही येण्याची योग्य भीति प्रत्येक गावास पडत असे. म्हणून एकदमच गावात जाणे ठीक नसे. त्या बर्व्यांच्या एकांत बागेत मी नि बाळ असता आमच्या प्रेमळ मामांनी सकाळ-संध्याकाळ स्वतः जेवण घेऊन यावे. दिवसरात्र आम्ही दोन्ही मुले एकटी त्या बागेत राहिल्याने मन झूरू लागे. भूकही खूप लागे. त्यामुळे मामांचे वाटेकडे अगदी पिलांचे, चारा घेऊन येण्यास उशीर लागलेल्या आईच्या वाटेकडे जसे लक्ष लागते तसे आम्ही दोघा मुलांनी टक लावून बसावे. मामा आले म्हणजे किती आनंद होई! तिथेच एक दिवस आम्हास पाहण्याकरता म्हणून बर्व्यांची मुले आली. त्यात अण्णाराव बर्व्यांचा एकुलता एक मुलगा तात्या होता. तो माझ्याच वयाचा. थोड्याच दिवसात तो नि मी अगदी जिवलग स्नेही झालो. आम्हास एकमेकावाचून अगदी करमेनासे होई. तो आमचा स्नेह क्रांतिकारक चळवळीत आम्हा दोघांवर आलेल्या जिवावरच्या संकटातही अखंड राहिला आणि तात्याचा अकाली अंत होईतो टिकला.

तात्याचे चुलतभाऊ बळवंतराव बर्वे-ज्यांना आम्ही बाळू म्हणावे तेही बाबांच्या वयाचे असून आमचे दूरचे नातलग असत. त्यांची माझी प्रत्यक्ष ओळख याचवेळी झाली. ह्या जहागिरदार बर्वे यांचे हे घराणे इतिहासप्रसिद्ध! पुण्याचे पेशवे यांचे जामात. पुढे उत्तर पेशवाईतही दिल्लीपर्यंत पेशव्यांची कारस्थाने चालविण्यात बर्वे मंडळी गुंतलेली असत. बर्वे यांची दुसरी शाखा दादाराव बर्वे यांची. त्यांचा आणि माझ्या मामांचा अत्यंत घरोबा. मामाबरोबर ही मंडळी भगूरलाही वडिलांच्या वेळेपासूनच आमच्या घरी येत-जात. दादांचे धाकटे भाऊ गोपाळ आणि वासुदेव हे बाबांच्या नि माझ्या वयाचे. मामांच्या घरोब्यामुळे ते घर मला आजोळासारखेच भासे. पुढे या घराण्याशी माझे सासरचे नातेही जुळावयाचे होते. पण त्या वेळी त्याची कल्पनाही नव्हती. वासुदेव, मी नि तात्या या आम्हा तिघांची त्या वेळी इतकी मैत्री जमली की, गावच्या लोकांनीही कौतुक करावे. बर्व्यांच्या बागेत काही दिवस ‘पृथक्करणात’ (सेग्रिगेशन प्रमाणे) काढल्यानंतर आम्ही निरोग ठरून गावात मामांच्या घरी आलो. तिथे मामांची वृद्ध आई- माझी आजी आणि मामी भेटली. आजीचा लळा तर विचारावयास नको. तिच्या एकुलत्या एक मुलीची, त्यातही आम्हास लहानपणीच सोडून परलोकी गेलेल्या मुलीची आम्ही मुले. म्हणून आजीने आम्हास जीव की प्राण करावे- आमची मामीही फार मायाळू. बाबांच्याच वयाची. तिच्या पोटच्या मुलांप्रमाणे आम्हा भाच्यांवर तिचा लोभ. मी तिच्याशी किती खेळावे, तिला जेवावयास सोबत बसवावे, गाणी म्हणून दाखवावी, तिचे सामान पळवावे, खोड्या कराव्या. मामांच्या शेजारी डोंगरे यांचा वाडा. त्याच वाड्यात पूर्वी आईबरोबर मी अगदी लहानपणी येई. पण ते जरी मला आठवत नसे तरी त्यांना आठवते आणि म्हणून मजवर ती मंडळी फारच लोभ करीत. त्यांची धाकटी बहीण मथुराई, मी तिला मथूमावशी म्हणे, ती खरोखर मावशीसारखीच माझ्यावर ममता करी. त्या साऱ्या मुलींबरोबर झोपाळ्यावर ओव्यांची चढाओढ लावण्यासाठी मला तिने कितीदा बोलवावे नि मी एका बाजूस होऊन त्या साऱ्यांना ओव्या रचून म्हणण्यात हसवीत असता आजीप्रभृती प्रौढ स्त्रियांनी ती गंमत पाहत बसावे. त्या ओव्यात देखील मी देशभक्तीची, स्वदेशीची, क्रान्तीची, आणि परकीयांच्या होणाऱ्या राजकीय पीडेची वर्णने गोवावी. त्या गावीच माझ्या आतेचे सासर. त्या कानिटकरांकडे मी जावे. लखू नावाचा आमच्याच वयाचा एक त्यांचा

मुलगा असे. तोही माझ्या स्नेहीमंडळात प्रविष्ट झाला. आणि होता होता माझ्या या स्नेहीमंडळाचे रूपांतर ठराविक पायऱ्यांनी शेवटी एका राजकीय मंडळात झाले.

**कोठूरच्या शाखेची स्थापना**

मामांचे त्या वेळी त्या गावात फार वजन असे. ते कसरतीत आणि नियुद्धात-कुस्तीत मोठे कसलेले. बर्वे मंडळीत व्यायामाची मोठी हौस. त्यांच्या घरीच एक व्यायामशाळा असे. मामा शरीराचे मूळचे धिप्पाड, उंच दुहेरी, गोरे आणि देखणे त्यात व्यायामाने कसलेले. मलाही त्यांनी नियुद्ध (कुस्ती) शिकण्यासाठी त्यांच्या तरुण शिष्यात धाडले. मामांच्या वजनामुळे आणि स्नेहामुळे मजवर त्या गावातील लोक फार प्रेम करीत. आणि मी जेथेजेथे जाई तेथेतेथे माझ्या राजकीय मतांचा फैलाव होत जाई. माझे वय १७/१८ वर्षांचे लहान होते, परंतु काही अंशी त्यामुळेच माझी छाप मी जाई तेथे पडे. मोठाली मंडळीही माझ्याशी बोलताना आणि माझी ही थोरथोर विचारांची बोलणी ऐकताना मोहून जात. मी तिथे कित्येक घरी माझा चाफेकरांचा पोवाडा म्हणून दाखवी. माझ्या वयाची मंडळी एकत्र करून गोदानदीच्या तेथील सुंदर घाटावर पुढे मी संध्याकाळी मधूनमधून मित्रमेळ्याच्या धर्तीवर बैठकीच भरवू लागलो. गावात माझे सार्वजनिक भाषणही करविण्यात आले. त्याने माझा गावात अधिकच गौरव होऊ लागला. तोवर गावात तशा इतर गावांप्रमाणे दहा-पाच मंडळी वर्तमानपत्रे वाचीत. पण ती एक इतर चैनीच्या वस्तूप्रमाणे चैन म्हणून. तशा इतर गावाप्रमाणे स्वदेशास्तव स्वतः त्याग करण्याची तळमळ लागावी इतकी उत्कट देशभक्ति कोणातही उत्पन्न झालेली नव्हती. काय केले पाहिजे याची कल्पनाही नव्हती. लोकमान्यांच्या चळवळींनी स्वदेशाविषयी जागृति नि सदिच्छा गावोगाव उत्पन्न झाली होती. अशा स्थितीत माझ्या या भावनोत्कट आणि निधड्या प्रचाराने तरुण मंडळीतच नव्हे, तर अनेक प्रौढ मंडळीतही स्वदेश-स्वातंत्र्याचा कधी ऐकला नव्हता असा स्पष्ट, भव्य आणि दिव्य संदेश ऐकून ती देशभक्तीची जीवंत तळमळ उत्पन्न झाली. लगेच मी नाशिकच्या धर्तीवर तिथे त्या गुप्त संस्थेची शाखा उघडून माझ्या विश्वासास पात्र झालेल्या मंडळीस देशस्वातंत्र्यार्थ प्रसंगी सशस्त्र युद्धासही तोंड देवून प्राणत्यागही करीन अशा आमच्या शपथा दिल्या. या मंडळीत माझे समवयस्क आणि स्नेही श्री. तात्याराव अर्थात् वामन श्रीधर बर्वे आणि बळवंतराव बर्वे ह्यांनी प्रथमपासूनच उल्लेखनीय पुढाकार घेतला होता.

इकडे कोठुरला त्या चळवळी चालल्या असता मला बाबांची चिंता वाटे. कारण इकडे नाशिकला प्लेगमध्ये ते राहत होते. तो एक दिवस अकस्मात् बातमी आली, की बाबा कोठुरास वेशीच्या बाहेर देवळात येऊन उतरले आहेत. आणि त्यास जांघेत प्लेगच्या दोन गाठी आलेल्या आहेत. नाशिकास त्यास प्लेग झाला - वायु देखी झाला - ताप अंगात तसाच. पण आम्हाला चिंता लागेल म्हणून काही न कळवता ते भयंकर दुखणे तसेच काढले. इतकेच नव्हे, तर थोडा उतार पडताच कोणाचे न ऐकता त्यांचा सारा जीव जिथे गुंतला होता त्या मला नि बाळाला भेटण्यासाठी ते कोठुरास आले. त्यांची सहनक्षमता आणि शरीराची अमर्याद निष्काळजी प्रथमपासून अशी अचाट. स्टेशनपासून दोन मैल पायी चालत--प्लेगच्या त्या भयंकर गाठी दोन्ही जांघेत तशाच दुखत असता, ते गावापाशी आले. तो गावात येण्याची त्यांस बंदी झाली. बाहेर धर्मशाळेतच पडले. मामा भेटावयास गेले. पण 'तशाचा तसाच नाशिकला निघून

जा कोणी आत घेणार नाही. ' असे त्यांचे शब्द ऐकून बाबांना आम्हास नुसते पाहून अन्नाचा घासही न घेता तसेच मागे परतावे लागले. माझे हृदय त्यांची ती दशा पाहून तिळतिळ तुटावे- पण निरुपाय. परिस्थितीच तशी निर्दय, दारुण, तिथे कोणास बोल द्यावा! वासरापासून हिसडून चाललेली गाय जशी मागे पाहत पुढे ओढली जाते, तसे बाबा आम्हा दोघा लहान मुलांकडे वळून पाहात-पाहात तसेच लंगडतलंगडत परत नाशिकला गेले. आमच्या प्रेमासाठी किती कष्ट, किती अपमान, कितीदा तरी सोसले! त्यानंतर महिन्याभराच्या आतच नाशिकचा प्लेग ओसरताच आम्ही नाशिकला आलो.

**राजा इंग्लंडचा की हिंदुस्थानचा?**

**मित्रमेळ्यात खडाजंगी वाद!**

नाशिकला परत येताच पाहिले तो मित्र-मंडळात बरीच चलबिचल झालेली आहे. त्यावेळी इंग्लंडची प्रख्यात राणी क्वीन व्हिक्टोरिया ही वारल्यामुळे हिंदुस्थानभर जिकडे तिकडे शोकसभांची धूम उडाली होती. मोठमोठ्या राष्ट्रीय वर्तमानपत्रांतून देखील या निमित्ते राजनिष्ठा व्यक्त करण्याची चढाओढ लागलेली होती. कारण त्यांची प्रतिज्ञाच ही असे की, “इंग्रजी राज्य हिंदुस्थानावर हवे की नको हा वादच नाही, अर्थात राजाविरुद्ध, बादशहाविरुद्ध आमचे काही एक भांडण नसून आम्ही इंग्लंडच्या राजाची इंग्लिश लोकांइतकीच राजनिष्ठ प्रजा आहो. आमचे भांडण केवळ त्यांच्या येथे असलेल्या वाईट अधिकाऱ्यांशी आणि पद्धतींशी आहे. ती परत बदलून चांगले अधिकारी आले तर आम्ही त्यांचा गौरव करू- जसा लॉर्ड रिपनचा केला. त्याची गाडी स्वतः काशीच्या पंडितांनी देखील एकदा ओढली!” अशा या राजकीय उन्नतीच्या अवनत अवस्थेत महाराणी व्हिक्टोरिया वारताच तिची एखाद्या देवीची कोणी केली नसेल अशी स्तुति देशभर होऊ लागली. नवीन राजाच्या एडवर्डच्या चरणावर लोक मानसिक लोटांगणे घालू लागले. मागे चाफेकरांनी याच राणीच्या डायमंड ज्युबिलिस अपशकुन करण्यासाठी रँडला पुण्यास मारले. तेव्हापासून सरकारचा कोप ज्या ज्या व्यक्तीवर नि संस्थांवर झाला त्यांनी- त्यांनी यावेळी त्या राणीची आणि नव्या राजाची वाटेल ती स्तुति करून आणि आपली राजनिष्ठा व्यक्त करून आपल्यावरील सरकारच्या मागच्या कोपाचा उपशम करण्याची पराकाष्ठा चालविली. आणि आश्चर्याची गोष्टी ही की, मित्रमेळ्याच्या प्रमुख मंडळीपैकी श्री. म्हसकर आणि श्री. पागे यांनीही मित्रमेळ्याने आपल्यावरील पोलिसांचा डोळा चुकविण्यासाठी हेच धोरण स्वीकारावे म्हणून बेत योजला.

कारण मित्रमेळा स्थापन होऊन जरी दीड वर्षच झाले होते, तरी या संस्थेत आम्हा तरुण मुलांचाच भरणा होता. आणि आम्हीही वरवर ती अगदी एक उघडउघड चालणारी संस्था आहे, असे दाखविण्याचा यत्न करीत होतो, तरी तिच्या प्रत्येक आठवड्याच्या बैठकीत होणाऱ्या आमच्या देशस्वातंत्र्यविषयक कडक चर्चांनी, गणेशोत्सव, शिवोत्सव वगैरे तिच्या नावाने चाललेल्या उत्सवातील मागे दिलेल्या भाषणातून आणि गायलेल्या पदातून “सुराज्य नव्हे स्वराज्य!” ह्या आम्ही करीत असलेल्या सुस्पष्ट घोषणेने, आणि त्या वेळी अगदीच अपूर्व आणि धाडसी भासणाऱ्या आणि असेणाऱ्या तेजस्वी प्रचाराने, नाशिकच्या तरुणांचीच नव्हे, तर प्रौढ आणि पुढारी गणल्या जाणाऱ्या अनेक गृहस्थांचीही आम्हास सहानुभूति मिळत चालली. त्या गुप्त आणि प्रकट सहानुभूतीने सरकारी अधिकाऱ्यांचे तीक्ष्ण लक्ष

मित्रमेळ्याकडे न वेधते, त्या संस्थेस भयंकर या मथळ्याखाली न नोंदते तरच आश्चर्य होते. इंग्रजांची राज्यपद्धति ती. मध्यरात्रीच्या अंधारात वाटेवरची सुई तीस दिसावी इतकी तिखट नि चौकस दृष्टि तिची. तिचा डोळा आमच्या संस्थेवर आहे- चौकशीही होत आहे हे सर्व श्री. म्हसकरप्रभृति आम्हा पुढाऱ्यास ठाऊक होते. त्याची चिंता म्हसकरांना लागली. संस्थेच्या हिताकरिता आपण उघडपणे काही तरी राजनिष्ठेचे सोंग करीत जावे असे त्यांचे वारंवार मत पडे. पण यावेळी तर त्यांनी तो अगदी हट्टच घेतला. संस्थेत जितके म्हसकर पागेप्रभृति मंडळीसारखे सरकारी नोकर होते त्यांनीही त्यांस पाठिंबा दिला. कारण मित्रमेळ्याचे दिवसेंदिवस अधिकाधिक कडक होत चाललेले क्रांतिकारक विचार नि व्याप पाहून त्यांस आधीपासून आम्हा तरुणांस काही पायबंद घातलाच पाहिजे, असे वाटू लागले होते. ह्या मंडळीच्या मतास वळवून म्हसकरांनी बेत ठरविला की, आपण ज्या अर्थी मित्रमेळ्याच्या वतीने गणेशोत्सव आणि शिवोत्सव आणि राजकीय चळवळीच्याही सभा करतो त्या अर्थी आपणही व्हिक्टोरिया राणी मेल्याची आणि सुरेंद्रनाथ टिळकप्रभृति झाडून साऱ्या राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांनी देखील राजनिष्ठा व्यक्त करण्यास ज्या लाटेत सापडून मागे- पुढे पाहिले नाही त्या लाटेची संधि साधून मित्रमेळ्याच्या वतीने एक दुःखप्रदर्शनार्थ सभा भरवावी आणि त्यातच नवीन राजे एडवर्ड यांच्याशी आम्ही राजनिष्ठ असल्याचा एक ठरावही करून टाकावा. म्हणजे इतर राजकीय चळवळीत जरी आम्ही वाटेल तितकी कडक भाषा वापरतो तरी आमचा राजाशी काही वाद नाही. आमची राज्यपद्धति सुधारा इतकाच वाद आहे. इंग्रजी राज्यच नको असा नाही, असे स्पष्ट होऊन सरकारी संशयास आपणास अकालीच बळी पडावे लागणार नाही. संस्था पुष्कळ दिवस तगेल आणि उपयुक्त कामे करील.

श्री. म्हसकरांच्या ह्या कोटिक्रमाच्या अगदी उलट माझा कोटिक्रम होता. म्हणून म्हसकरांनी माझा विरोध असला तरी हा ठराव मित्रमेळ्यात मांडावयाचाच, असा निश्चय करून तो बैठकीत आणला. तेव्हा त्यांच्या ठरावास मीही कसून विरोध करीत उत्तर दिले, “म्हसकर राजनिष्ठेचे सोंग म्हणूनच ही सभा करू म्हणत आहेत, त्यांच्या मनातून तेही आमच्यासारखेच इंग्रजांचा राजा हा हिंदुस्थानचा नाही, ह्या मताचेच आहेत, त्या त्यांच्या मतांत बदल झाला नाही ही आनंदाचीच गोष्ट आहे. तेव्हा ही सभा एक राजनीतीचा डाव म्हणून करावी की करू नये, एवढाच प्रश्न. राजनीतीचे डावही प्रसंगी खेळलेच पाहिजेत. किंबहुना गुप्त संस्था म्हणजे एक राजनीतीचा डावच आहे. शिवाजीने वेळेवर औरंगजेबालाही शरणागतीची पत्रे लिहिली. कृष्णही उघडपणे कंसाला मारावयास जातो म्हणून मथुरेस आले नाहीत. तसे प्रसंगी आपणही राजनिष्ठेचे सोंग करू. पण आज तो प्रसंग आहे का? जेव्हा आपण शत्रूस फसविण्याकरिता एखादी वरकरणी माया दाखवितो तेव्हा नेहमी हे पाहिले पाहिजे की, त्या फसविण्याच्या डावाने विपक्ष खराच फसतो, की आपणच काय ते फसतो. एकंदरीत त्या डावामुळे आपल्यापेक्षा विपक्षाची हानीच जास्त होण्याचा संभव असेल तर असे राजनिष्ठेचे शाब्दिक सोंग, छाप्याच्या आधीचे अफझुलखानास दाखविलेले भीतीचे कापरे, समर्थनीय ठरेल. पण आपल्यावर तसा कोणताही प्रसंग गुदरलेला नाही. राजनिष्ठेची ही सभा वा व्हिक्टोरियाचा शोक करावयास इंग्रजी निर्बंधाप्रमाणे देखील बांधलेले थोडेच आहोत आपण, मग टाळता येणारे असूनही असे राष्ट्रीय पाप बळेच का करा? इंग्रजांना

www.savarkarsmarak.com

भर सभेत राजे म्हणावयाचे! जोवर भारतात त्यांचे बलात्कारी राज्य आहे तोवर एका प्रचंड सशस्त्र दरवड्याहून त्याला नैतिक निष्ठेचा लवलेशही पाठिंबा असू शकत नाही. ते राज्य करण्यात भाग घेणारा प्रत्येक इंग्रज चोर आहे- आणि दंडनीय आहे. तो राजा असेल तर इंग्रजांचा, आमचा नव्हे. त्यांनी रडावे हवे तर. व्हिक्टोरिया व्यक्तिशः चांगली होती इतकेच म्हणून ठराव करावा असे म्हसकर म्हणतात. पण ती मेली, त्या दिवशीच किती तरी अशा चांगल्या बायाबापड्या मेल्या त्यांचा का नाही उल्लेख होत? हे सर्व ढोंग आहे. ती राणी होती म्हणूनच ही सभा तुम्ही करणार -- ती आमची राणीच नव्हती. उलट तिच्या कारकीर्दीत हिंदुस्थानचे प्रांतामागून प्रांत इंग्रजांनी गिळले, तिने गिळविले आणि थापेबाजींचे ते चिटोरे, तो 'सत्तावनचा जाहीरनामा' ज्याला दुधखुळे राजकारण 'सनद' म्हणते, ते प्रसिद्ध करून आपण त्या दुष्ट लुटीची राजरोस स्वामिनी बनली! एक कपर्दिक तरी तिने परत दिली का? नेला कोहिनुरी राजमुकुट- आणि मूल्य म्हणून दिले ते 'जाहीरनाम्याचे' चिटोरे! एवढी साध्वी होती तर सत्तावनच्या क्रांतियुद्धात लाखो हिंदुंच्या रक्तात भरलेला मुकुट तिने हसतहसत स्वतःच्या डोक्यावर का ठेविला? इंग्रजांच्या कोणत्या एखाद्या तरी राक्षसी नीतीला तिने दूषण दिले आहे काय? इंग्रजी दुष्टाईचे दायित्व तिच्यावर नाही म्हणून म्हणाल. कारण ती बुद्धिबळांतील राणी होती. तर मग सुष्टाईचे दायित्वही तिचे कसे? तेही बुद्धिबळ खेळणाराचेच! त्याला त्याच्या घातकी डावपेचात त्या सनदेच्या वेळेस- जाहिरनाम्याच्या वेळेस- थोडा मायावीपणा दाखविल्यावाचून गत्यंतर नव्हते! तेव्हा राजा काय राणी काय- -ती इंग्रजांची राणी- म्हणजेच आमच्या शत्रुचीच राणी. म्हणजेच ह्या आमच्या राष्ट्रावर तुटून पडलेले दरवडेखोरांचा सरदार, मुख्य! त्याच्याशी म्हणे राजनिष्ठा व्यक्त करा! आणि तेही कोणी भाग पाडले नसता, तशी निरुपायाची युक्ति राष्ट्रहितार्थच योजावी लागावी असा कोणताही प्रसंग गुदरला नसता! उलट हीच वेळ मित्रमेळ्याचे विशिष्ट कर्तव्य करून दाखविण्याची आहे. सर्व देश राणी मोठी चांगली म्हणून राजनिष्ठेच्या निर्लज्ज स्तुतिपाठात वाहवला असता आपण घरोघर जाऊन सांगू कसली राणी! कसली राजनिष्ठा! ही राजनिष्ठा नव्हे, ही गुलामगिरीची गिता आहे! आमचा राजा आमचा देश! दुसरा राजाबिजा आम्ही जाणत नाही! अशा प्रकारे तेजस्वी सत्य सांगणारी एक तरी संस्था या प्रसंगी आहे हे सिद्ध करण्याचे, भविष्याच्या प्रतिवादाची मूर्तिमंत सूचना होण्याचे भाग्य ह्या आपल्याच संस्थेस लाभत असेल, तर त्यास आपण निष्कारण भेकडपणाने का अंतरावे! एवढ्यावर जर यापायी या संस्थेस मृत्यु आलाच तर तिचे जीवन सफल होईल! मोठे अगदी तोलूनतोलून लिहिणारे देशभक्तही इंग्रजांच्या मनात येताच तुरुंगात दडपले जातात की नाही! मग आता स्पष्ट काय ते बोलून टाकूया! स्वातंत्र्याचे तेजस्वी ध्येय आणि त्याचा दिव्य ध्वज अम्लान, अनवनत असा उघडपणे उभारू या!- क्षणापुरता जरी तो आपण तोलू शकलो आणि दुसऱ्याच क्षणी शत्रूच्या गोळीने ठार होऊन चितेत पडलो तरी चिंता नाही, कारण असे, मेलेल्याची चिता पेटताच तिच्या आगीने आग भडकते. आणि अशाच एखाद्या भडकलेल्या आगीचा वणवा होऊन परसत्तेचा राजवाडा त्यात जळून खाक होतो! अशा प्रयत्नास फाशीची शिक्षा असते म्हणून बजाविता? ते आम्हास माहित आहे! चाफेकरांच्या फाशीतून आम्ही जन्मलो, आमची फांशी आणखी कोणास जन्म देईल आणि हा वंश राखील. फार दिवस जगून पक्वकाली जे देशहित साधावयाचे ते हे

लक्षावधि म्हातारेकोतोरे, बायाबापड्या जगून साधतच आहेत. आता अकाली मरणारांचेच मारक मरण काय साधते ते पाहण्याचे उरले आहे. फाशीवर अकाली मरतात- आणि या प्लेगांत, दुष्काळांत, महामारीत? प्राण की स्वातंत्र्य, हा प्रश्न आम्ही स्वतःस आधीच विचारून आणि 'स्वातंत्र्य! प्राण गेला तरी बेहत्तर पण स्वातंत्र्य!' ही शपथ घेऊनच येथे पाय ठेवला नाही का? प्रस्तुतचे राष्ट्रीय पुढारी म्हणतात, आमचा राजाशी वाद नाही, पद्धत आणि अधिकारी तेवढे चांगले असले की झाले! त्यामुळे लाखो लोकांची खरोखरच तशी भ्रामक समजूत होते. म्हणून आपण स्पष्टपणे घोषीत करू या की "नाही! राजाशीच आमचा मुख्य वाद आहे. देवदूत जरी अधिकारी म्हणून धाडाल नि प्रत्यही जिलबी फुकट चाराल तरीही हे युद्ध आम्ही थांबविणार नाही-कारण आम्हांस तुमचे राज्यच नको आहे-- तुमचा राजेपणाच नको आहे. आम्हांस स्वतःसच राजा व्हावयाचे आहे. आमचा देश हाच आमचा राजा! बाकी सगळे चोर!" (जाताजाता हेही सांगणे मनोरंजक होणारे आहे की ज्या सत्तावनच्या घोषणेस (Magnacharta) स्वराज्याचा ताम्रपट म्हणून त्याकाळी राष्ट्रीय सभेतसुद्धा सर्व राष्ट्र गौरवीत होते, त्यासच पुढे थोड्याच दिवसानंतर प्रत्यक्ष व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन 'अशक्य सनद' म्हणून झिडकारणार होते. आणि राष्ट्राचे डोळे उघडणार होते. पण कर्झननी तसे सांगण्यापूर्वीच त्या वेळच्या मित्रमेळ्याच्या वादविवादांत आम्ही ते सांगितले होते- एक भिकार चिटोरे म्हणून त्या सनदेस लाथाडले होते. )

अशा आशयाचे नि बहुतांशी याच शब्दांत नि याच क्रमाने माझे भाषण होता मंडळीत आवेश भरला. फार काय स्वतः म्हसकरही त्यास अपवाद नव्हते. त्यांनी पुन्हा काही उत्तरच दिले नाही. मित्रमेळ्याने राजनिष्ठेची सभा भरवू नये इतकेच नव्हे, तर आपल्या अंगीकृत व्रताप्रमाणे शक्य तितक्या अंशी सभांस आणि ठरावांस अडथळा करावा असे ठरले. मनातून म्हसकरांस आनंदच झाला.

मी वरील माझे भाषण जाणूनबुजूनच जरा सविस्तर एवढ्यासाठी दिले आहे की, त्यावेळचे आमचे विचार, भावना आणि भाषा कशी असे याची थोडीफार स्पष्ट कल्पना या ग्रंथाच्या या पकरणात कुठे तरी देणे अवश्य होते. अशा प्रकारची भाषणे मित्रमेळ्यात अनेक समयी होत. आणि मित्रमेळा छापाचे विचार म्हणजे असेच असत. प्रकट अशा उत्सव, सभाप्रभृति प्रसंगी उघड भाषणांतून मात्र अगदी इंग्रजांचे नाव घेऊन नसू बोलत, तर रामाने रावणास, किंवा कृष्णाने कंसास, कधी शिवाजीने अफझुलखानास, किंवा माझिनीने ऑस्ट्रियास असे असे, अशा समयी सांगितले अशा जरा अप्रत्यक्षपणे बोलू. पण गर्भितार्थ असा हाच बोलत असू. अर्थात म्हसकर प्रभृति सर्वांचेच हे वळण असे.

पण राणीच्या विषयीची ही सभा करण्याचा म्हसकरांचा बेत निष्फळ झाल्यापासून ते निष्कपटपणे अगदी आमच्या हितार्थ म्हणूनच पण नेहमी अशा चिंतेत निमग्न असत की, या तरुणास थोडाफार तरी पायबंद कसा घालावा. शेवटी मित्रमेळा अगदी निघाला तेव्हाची आठवण त्यांनी उकरून काढली. आणि मला म्हटले की आता एक गोष्ट तरी तुम्ही सर्वांनी माझी ऐकली पाहिजे. आणि तसे मान्यच केले होते की, काळकर्ते श्री. परांजपे यांना जर एखाद्या सभेचा ठराव मान्य न झाला तर तो बहुमताने झाला असता तरी कार्यवाहीत आणला जाऊ नये. काळकर्त्यांच्या अडोशाखाली म्हसकरांना आमचा कोणाचाही पुरोगामी ठराव दाबता येईल असा या सूचनेचा परिणाम होणार हे जाणून मी म्हटले, 'काळकर्ते यांना

एकदा समक्ष येथे आणून ही संस्था, तिचे गुप्त उद्देश प्रकट चळवळी हे सर्व त्यांस समजाऊन देऊ, मग त्यांचे काय म्हणणे पडते ते पाहू नि मग काय ठरवायचे ते ठरवू. कारण ते स्वतः असल्या संस्थेचा असला दायित्वपूर्ण बोजा घ्यावयास सिद्ध होतील की नाही हीच मुळी शंका आहे. आणि काही झाले तरी क्रांतीच्या मुख्य तत्त्वा विरुद्ध आणि आम्ही आमच्या शपथेतच जे व्रत गोवले आहे त्याच्या विरुद्ध किंवा विसंगत असे कोणतेही मत आपणांस मानताच येणार नाही. ते सांभाळून मग फुटकळ प्रकरणी फरक एक वेळ करू. म्हसकरांनी त्या विषयावर सभेतही चर्चा करून पाहिली. सभेतही सर्वस्वी बांधून घेण्यास बहुमताने नाकारले. परंतु मुख्य तत्त्वास वगळून इतर प्रकरणी काळकर्त्यांस मुख्य मार्गदर्शक नेमण्यास आम्ही अनुकूलता दर्शविली. कारण "काळ" पत्र म्हणजे आम्हांस निदान मला तरी क्रांतीकारक स्फूर्तीचा एक जीवंत झरा वाटे. आणि म्हणून काळकर्त्यांविषयी साहजिकपणेच मला म्हसकरांहूनही अधिक पूज्य बुद्धि वाटे. परंतु त्यांना समक्ष भेटून त्यांचे अशा क्रांतिकारक गुप्त संस्थांच्या प्रत्यक्ष प्रयोगाविषयी काय म्हणणे ते ऐकल्यावाचून त्यांच्या नांवाचा दुरुपयोग इतर कोणास करता येऊ नये अशाविषयी जपणे आम्हास कर्तव्य वाटले. परंतु म्हसकर होते तोवर काळकर्त्यांस नाशिकास प्रत्यक्ष आणविण्याचा प्रयत्न म्हसकर करीत असताही तो सफल झाला नाही. त्यामुळे तो बेत तसाच राहिला.

## माझे या वेळचे ज्ञानार्जन

सन १९०१ मध्ये मी इंग्रजी सहावी उतरून सातवीत मॅट्रिकच्या वर्गात गेलेलो होतो. या वर्षी मी माझ्या वाचनाचा मुख्य भार इतिहासावर दिला. बडोद्याच्या राष्ट्रकथा मालेतील आणि त्याचा मूळ आधार जो Stories of Nations त्यातील अगदी प्राचीन अकोडिया, असिरिया, बाबीलोन त्या राष्ट्रांच्या इतिहासापासून ते स्पॅनिशमूर, तुर्की साम्राज्य प्रभृतींचे इतिहास मी वाचले. मी जे जे पुस्तक वाची त्याचा सारांश व उतारे एका पुस्तकात उतरून ठेवी. त्यामुळे माझे वाचन धुळीवरचे सारवण न होता पूर्ण पचविले जाई. पुन्हा वाटेल तेव्हा तेवढे सूचक टीपण पाहिले की तो उभा विषय डोळ्यांपुढे उभा राही आणि त्यामुळे त्या विषयावर मला वाटेल तेव्हा निबंध वा व्याख्यान लिहिता वा देता येई. त्या उताऱ्यांच्या पुस्तकाची रीत मला आपण होऊन भगूरला होतो तेव्हाच लागली. आणि मी त्याला माझ्या बाराव्या वर्षीचे जे नाव ठेवले तेही पुढे केव्हाही अपुरे वाटू नये इतके व्यापक होते. त्यास "सर्वसारसंग्रह" असे ठेवलेले ते नाव अगदी अन्वर्थक ठरले. कारण मी पुढे अगदी बी. ए. होईतो त्यात कायकाय माहिती सहज ग्रंथिली गेली, किती नानाविध ग्रंथांच्या ज्ञानास मंथून त्याचे नवनीत त्यात साठविले गेले, किती उतारे, भाषापद्धती, संख्या, नावे ते अगदी बघण्यासारखे असे. त्या माझ्या उताऱ्याच्या पुस्तकांचे चारपाच खंड झाले होते. जर ते प्रसिद्ध केले असते तर ते एक नामांकित संदर्भ पुस्तक झाले असते. पण! पुढे क्रांतिकारक खटल्याच्या वावटळीत जे दिसेल ते जाळून टाकण्याच्या धडाक्यात ते पुस्तकही जाळले गेले. निरुपाय!

माझ्या वाचून टाकलेल्या ज्ञानास स्थायी, सुव्यवस्थित आणि सुसंगतपणा देण्यास या "सर्वसार संग्रहात" ते सार उतरून ठेवण्याच्या सवयीचा जसा उपयोग झाला तसाच ते ज्ञान वाढविण्यास आमच्या मित्रमेळ्यांच्या संस्थेतील साप्ताहिक सभांचाही फार उपयोग झाला. वाचून जे कळे तेच इतरांस सांगू

जाता किती तरी पटीने अधिक कळे. परिणामकारक रीतीने ते व्यक्त कसे करावे, दुसऱ्यास कसे पटवून द्यावे तीही कला शिकता येई. मी या वर्षी प्राचीन इराणी साम्राज्य, स्पॅनिश-मुर, नेदर्लंडच्या बंडाचा इतिहास, मॅझिनि, ग्यारिबॉल्डी या विषयांवर जी व्याख्याने मित्रमेळ्यांत दिली, ती प्रत्येकी ऐकणारांच्या आणि माझ्या स्मृतीत कोरून ठेवल्यासारखी चिरपरिणामी झाली. त्याच वर्षी एकदा एक महिनाभर मी तापाने फार आजारी होतो. तेव्हा सुधारानंतरचे प्रकृतीच्या विश्रांतीचे दिवस मी मोरोपंतांच्या विस्तृत आणि विवेचक अभ्यासात घालविले. मोरोपंतांचा छंद मला लहानपणापासूनच असे. नाशिकच्या नगरवाचनालयातील मोरोपंतांची कविता अशी मी वाचल्यावाचून ठेवली नाही. 'काव्येतिहास' आणि 'काव्यसंग्रह' मी नियमीत वाची. अलंकारशास्त्रावर आणि मोरोपंतांवरही मी व्याख्याने दिली. असे गोड विषय रंगविण्यात मला आनंद वाटे. याप्रमाणे मित्रमेळ्यांत संपादिलेले ज्ञान इतरांसह प्रतिसप्ताह वाटून आणि त्यायोगे वाढवून घेण्याची संधि मिळाल्याने माझ्या ज्ञानार्जनावर आणि कर्तृत्त्वावर फारच इष्ट परिणाम झाला. मित्रमेळ्याच्या ज्ञानाची वाढही एकंदरीत माझ्या ज्ञानाच्या वाढीवर अवलंबून असे. त्याची मला जाणीव होती. त्यामुळे त्या संस्थेच्या उन्नतीसाठीही मी काही तरी नवीन काय वाचू आणि काय सांगू असे मला होई. या ज्ञानार्जनास माझी आणखी एक सवयही उपकारी झाली. तरुणांस ती सांगण्यासारखी अनुकरणीय आहे. मी प्रतिवर्षी वाचलेल्या पुस्तकांची टीपणे ठेवी. "सर्वसारसंग्रहांत" जसे त्यांचे उतारे आणि सारांश टीपी, तसेच मी वाचलेल्या पुस्तकांची नावेही माझ्या दैनिकात टिपून ठेवी आणि प्रत्येक वर्षाची पुस्तके मागच्या वर्षापेक्षा अधिक भरली की नाही याची माझी माझ्याशीच चढाओढ लावी. नाशिकच्या नगरवाचनालयातील मराठी पुस्तके तर जवळजवळ अनुक्रमाने प्रथमपासून शेवटपर्यंत वाचली. त्यात काही समजेनात तर पुन्हा वाचावीत. समजेल तोच भाग आत्मसात करावा. याविषयी ज्ञेय आणि अज्ञेय-मीमांसेचे एक मनोरंजक उदाहरण मला आठवते. स्पेन्सरच्या ग्रंथाशी या वर्षी जो माझा पहिला परिचय झाला तो मराठीतून. दाभोळकरांच्या मालेतील पुस्तके मी वाची. त्यात हे ग्रंथ वाचले-दोनदा वाचले. कारण कोणचाही विषय समजत नाही असे मानण्यास मी सहसा सिद्ध होत नसे. अगदी नाहीच समजले तर ते मानी. पण मनास ते लजास्पद वाटे, खाई. पण ही दोन्ही पुस्तके समग्र समजेनात. तेव्हा ते तसेच राहिले. पण पुढे विलायतेत गेल्यावर जेव्हा मी स्पेन्सर इंग्रजीतून प्रथम वाचलेल्या विद्वानांबरोबर चर्चा करू लागलो तेव्हा ती चर्चा माझ्या वयाच्या मानाने आश्यर्चकारक वाटावी इतके ज्ञान त्या विषयाचे मला या मराठी पुस्तकांच्या वाचनाने झाले होते असे माझे मला कळून आले. मग तिकडे मी हर्बर्ट स्पेन्सर मुळातून वाचला. तेव्हाही या मराठी पहिल्या वाचनाचे श्रम व्यर्थ गेले नव्हते असेच मला आढळले. उपयुक्ततावादाचा, हितवादाचा प्रथम परीचय झाला. दाभोळकरांच्या मालेतील इंग्रजी भाषांतरीत पुस्तकांतून याच वर्षी तेव्हांपासून मी त्या हितवादाचा हा अभिमानी बनलो. पुढे कॉलेजमध्ये बेनथम आणि मिल, थोडा वाचला. तेव्हा मी याच नीतितत्त्वास माझ्या सर्व व्यवहारांची कसोटी, माझे नीतिसूत्र, माझा व्यवहारिक धर्म असे मानू लागलो. या उपयुक्तता वादाचा मी माझ्या मंडळीत सारखा प्रचार करावा. त्यावर कित्येक व्याख्याने मी गुप्त संस्थेतून त्या वेळी आणि पुढे इंग्लंडपर्यंत दिली. ज्या नीतीशास्त्रांच्या पायावर आणि सूत्राधारे आपल्या क्रांतीकारक आंदोलनास आपण

उभारले पाहिजे आणि समर्थिले पाहिजे ते हे Utility हेच नीतिशास्त्र हीच क्रांतीची मनुस्मृति असे मी म्हणे, असे मी मानी. आणि महाभारतांतील कृष्णाच्या अनेक प्रसंगीच्या भाषणावरून आणि उपदेशावरून आणि व्यवहारावरून मी सिद्ध करी की, उपयुक्ततावादाचा श्रीकृष्ण हाच पहिला प्रणेता, नव्हे पहिला आचार्य कारण त्याने तो आचरून दाखविला. त्याच्या सर्व आचाराचे समर्थन याच तत्त्वावर त्याने केले, करता येणारे आहे. "धारणात् धर्म मित्याहु धर्मोधारयति प्रजा", "जोरांनी चोरांनी धरिला त्याची करावया मुक्ति. लेश विचार न करितां बोलावया तेथ शतमृणा युक्ति", "युक्तीहीन विचारेतु धर्म हानि प्रजायते" 'यद्भुतहितमत्यंतमेतत्सत्यंमतंमम्।" इत्यादी संस्कृत प्राकृत वाक्ये आमच्या मंडळींची नित्यपाठांतील असत. किंबहुना महाभारतांतील बहुतेक प्रसंग धर्माच्या सनातनी अहिंसा सत्यास्तेय ब्रह्मचर्यादि सार्वभौम म्हणून समजल्या जाणाऱ्या शब्दांचा खरा अर्थ काय, व्यवहारात त्यांना कोणती मोड घातली तरच ते धर्म होतात, नि न घातली तर ते अधर्म होतात, हे स्पष्ट करण्यासाठी हेतुतःच घालण्यात आलेले आहेत. महाभारत म्हणजे व्यवहार्य आणि व्यवहृत नीतिशास्त्राची सोपपत्तिक नि उदाहृद अशी किल्ली आहे, अशी माझी धारणा पुढे दिवसेंदिवस होत गेली. माझ्या ज्ञानार्जनास नि अध्यवसायासच नव्हे तर कार्यकर्तृत्त्वासही शिस्तीचे आणि व्यवस्थित टापटिपेचे वळण लागण्यास माझी आन्हिकी, [Dairy] प्रत्येक दिवशी नियमितपणे लिहिण्याची आणि दर महिन्यास वेळापत्रक करून ठेवण्याची पद्धतही फार उपयोगी पडे. ही सवय मला भगूरला होतो तेव्हा लहानपणापासूनच झाली. माझ्या आन्हिकीत माझ्याशी परिचित असेणाऱ्या व्यक्तींची स्वभावचित्रे, घटनांची सुरस माहिती, माझ्या बालभावना, विचारांचीच पृथक्करणे इत्यादी वर्णने आकर्षक भाषेत टीपलेली असत. त्यामुळे त्या दैनिकी फारच वाचनीय झालेल्या असत. सरासरी बाराव्या वर्षापासून ते थेट बी. ए. होईपर्यंतच्या डायऱ्या एकत्र क्रमवार ठेवलेल्या होत्या. इंग्लंडमध्येही प्रथम-प्रथम आन्हिकी ठेवी. पण ती रीत क्रांतिकारकास लाभणे नि पचणे फार कठीण हेही मी फार दिवस जाणून होतो. किती लपवालपवी करून त्या आन्हिकी मी अगदी कंठाशी भिडेतो राखून जतन करून ठेवल्या. पण जेव्हा त्या पोलिसांच्या हाती पडून अनेकजणांवर राजकीय संकट आणण्यास कारणीभूत होतील असा उलट संभव दिसू लागला तेव्हा माझ्या बंधूंनी हिंदुस्थानात नि मी इंग्लंडात त्या आन्हिकी जिथे होत्या तिथे त्या त्या जाळून टाकल्या. त्यायोगे माझ्या व्यक्तीच्याच नव्हे पण अभिनव भारत संस्थेतील राष्ट्रीय उलाढालीच्या वृत्तांताची फार हानि झाली. परंतु त्या वेळेस त्या जाळल्या नसत्या तर गुप्तसंस्थेच्या अनेक महत्त्वाच्या हालचाली आणि हजारो जणांचा त्यातील संबंध नि भाग पोलिसांच्या हाती पडून देशभर जो हाहाःकार होता त्या कहराची हानि अधिक होती. म्हणून त्यावेळी माझे लिखाण असे जिथे जे मिळेल तिथे ते आम्ही जाळून टाकले तेच चांगले झाले.

वाचलेल्या ग्रंथाच्या सारांशाने आणि उताऱ्यांनी भरलेला तो माझा "सर्वसारसंग्रह", त्या माझ्या आन्हिकी, माझी वेळापत्रके, वर्षाकाठी वाचलेल्या पुस्तकांच्या टीपणी इत्यादी प्रकारच्या व्यवस्थितपणाच्या सवयीने माझ्या बौद्धिक, मानसिक आणि व्यावहारिक कर्तृत्त्वाची व्याप वाढण्यासच नव्हे तर त्यात टापटीप, चिकाटी आणि सुसंगता येण्यासही फार साहाय्य झाले. त्यामुळे माझ्या देखरेखीखाली माझ्या पुष्कळ इष्टमित्रांनीही ते वळण उचलले. आमच्या संस्थेच्या सभासदांचेही ज्ञान वाढावे आणि प्रत्येकास

राज्यक्रांतीच्या ज्या महत् कार्यास वाहून घ्यावयाचे होते त्याची त्यावेळी आम्ही प्रथमतः हाती धरलेली बौद्धिक सिद्धता आणि योग्यता काही प्रमाणात तरी सर्व सभासदांत यावी यास्तव प्रत्येक सभासदाने वाचलाच पाहिजे असा एक वीस-पंचवीस पुस्तकांचा संच आम्ही ठरवून टाकला. त्यांत जगांतील राजक्रांत्यांची पुस्तके, नेपोलियनप्रभृति जगत्वीरांची चरित्रे, भारतीय इतिहास, व्यायाम पुस्तके आणि विवेकानंद रामतीर्थांचे एकदोन वेदान्त ग्रंथही समाविलेले होते. इतकी पुस्तके तर प्रत्येकास वाचावीच लागत. त्यावाचून ज्यास अधिक वाचणे असेल त्यांच्यासाठी आम्ही एक लहानसे फुकट पुस्तकालयही दातारांच्या विष्णूच्या देवालयात ठेवलेले होते. काळपत्र प्रत्येकजण वाची वा ऐके तरी. त्यातून येणाऱ्या 'तरुण इटली' किंवा 'पिकांची पाहाणी' प्रभृति लेखमालांतून युरोपांतील गुप्त संस्थांची दिलेले माहिती आम्ही संस्थेतून नित्य चर्चावी, विवादावी, संवादावी.

## भगूर येथील शाखा

मध्यंतरी मी एकदा भगूरला गेलो होतो. नाशिकला मित्रमेळ्याची स्थापना झाल्यानंतर माझी भगूरची लहानपणीची मित्रमंडळी मधूनमधून मला नाशिकला भेटावयास आली म्हणजे मित्रमेळ्याची माहिती मी त्यांना सांगेच. वास्तविक पाहाता नाशिकला मी येऊन तिथे गुप्तसभा आणि तिची ही उघड शाखा स्थापन होण्यापूर्वीच भगूरला माझ्या बालवयातच भारतीय स्वातंत्र्य संपादनाची तीव्र आकांक्षा आणि ते शस्त्रयुद्धावाचून केव्हाही मिळणारच नाही असे झाल्यास ते शस्त्रयुद्ध देखील करण्यासाठी आपापल्यापुरती प्रत्येक भारतीयाने सिद्धता करण्याची चर्चाही माझ्या बालमित्रांच्या अंगवळणीच पडली होती. नाशिकच्या मंडळीशी चर्चा मी करू लागण्यापूर्वीच भगूरच्या माझ्या बालमित्र मंडळीस ती परिचित झालेली असे. परंतु त्यांची संघटित संस्था अशी तोवर नव्हती. ती मी मित्रमेळ्याच्या धर्तीवर चालू करण्याचे ठरवून ती शाखा स्थापिली. त्यांनीही आठवड्यास बैठकी भरवाव्या, इतर राष्ट्रांनी स्वातंत्र्य कसे मिळविले तो अभ्यास त्यांनी करावा, आजूबाजूच्या गावातून देशविषयक सर्व चळवळी पसराव्या, इंग्रजी सत्तेचा-परसत्तेचा तीव्र तिटकार आणि स्वातंत्र्याची उत्कट लालसा शेतकऱ्यांतून उत्पन्न करवावी, त्यास शपथा देऊन संस्थेच्या शाखा पुढे पसरवाव्या. शेवटी सशस्त्र उठावणी करवायची ती कशी करावयाची. साधने कोणची, इंग्रजांची सर्व सत्ता हिंदी लोक कशी चालवीत आहेत, ते ठिकठिकाणचे शिपाई, पोलिस, शेतकरी यांना एकाच वेळी फितूर केले तर सत्तावन्नच्या उठावणीप्रमाणे इंग्रजांचा कोंडमारा कसा करता येईल, अशा असंतोषाने व वेळोवेळी इंग्रज अधिकाऱ्यांच्या उडणाऱ्या कत्तलीने न गांगरून, हक्कामागून हक्क घेत शेवटी त्यास एखाद्या युरोपियन महायुद्धात गाठून, त्यावेळी आपणही उठून शेवटच्या तुमुळ युद्धात त्यांस हार जाणे कसे भाग पाडता येईल इत्यादी कार्यक्रम सर्व जनतेत तोंडातोंडी प्रचारविणे आणि शेवटी काही होवो न होवो आपण एकट्याने एक शत्रू तरी बळी घेऊन मरण्याची निदानीची सिद्धता ठेवणे इत्यादी आमच्या ठराविक धोरणावर मी व्याख्याने देऊन त्याप्रमाणे चालण्याची माझ्या पूर्वीच्या बालमित्रांस रूपरेखा आखून दिली. तेव्हांपासून ही भगूरची शाखाही नाशिकप्रमाणेच सर्व सार्वजनिक उलाढाली आपापल्या कक्षेत नियमितपणे करीत असे. गावकरी, शेतकरी लोकांस स्वातंत्र्यार्थ आमच्या गुप्त सभेच्या शपथा देणे- शिवोत्सव-गणेशोत्सव-स्वदेशी इत्यादि उघड-उघड चळवळी गावोगावात

पसरविणे आणि एकंदरीत इंग्रजी राज्य म्हणजे रामराज्य, राजा म्हणेल ते खरे इत्यादी तोवर खेड्यापाड्यांतून पसरलेल्या दास्यप्रवण नीच समजुतीस नामशेष करून त्या परसत्तेविषयी तीव्र द्वेष पसरवून स्वराज्याविषयी, देशस्वातंत्र्याविषयी उत्कट लालसा आणि सहानुभूति उत्पन्न करणे ही कार्ये त्यांच्या अल्पशक्तीप्रमाणे, त्यांच्या अल्पकक्षेत करीत राहिलो. इंग्रज म्हणजे मायबाप सरकार हे पूर्वीचे ठराविक पालुपद जाऊन इंग्रज म्हणजे चोर ही भावना शेतकऱ्याखेडवळापर्यंत उत्पन्न करण्याचे कार्य अशा खेडोखेडीच्या लहानलहान गुप्त संस्थांनीच उत्कृष्टपणे साधे. कारण इतके स्पष्टपणे हे सत्य सांगणे त्या वेळेस प्रकट पुढाऱ्यांपैकी कोणास वा वर्तमानपत्रास शक्य नव्हते. बहुतेकांची तसे सांगण्याची इतकी मानसिक प्रगती देखील झालेली नसे. त्यांच्यातील मोठमोठे लोक देखील इंग्रजी राज्यच उलथून पाडण्याच्या इच्छेसही अनिष्ट म्हणून 'बालिश-अशक्य' म्हणून हसत.

**पहिला मोठा गणेशोत्सव आणि मेळा**

या १९०१ व्या वर्षीचा दुसरा गणपत्युत्सव मित्रमेळ्याने फारच मोठ्या प्रमाणावर केला. माझे सहकारी त्रिंबक, वामन, शंकरप्रभृति तरुणांनी अशांत मेहनत घ्यावी. त्यांचीही कर्तृत्वशक्ति आणि वक्तृत्वशक्ति नावाजण्यासारखी वाढत होती. गोविंदकवींनी स्वतंत्र पदे रचली. आणि मित्रमेळ्याचा एक मेळाही काढला. त्याची तेजस्वी छाप जी एकदा जनसमूहावर पडली ती नित्याचीच. पुढे लवकरच थेट पुण्यापर्यंत त्याचा लौकिक गाजणारा होता. पुढे गोविंदकवींनी राम-रावणाचे अत्यंत तेजस्वी संवाद जे बसविले, ते ऐकत असता हजारो प्रेक्षकांचे बाहू थरारून जात. रावणाचे भारतवर्षाच्या मूर्तिमंत लक्ष्मीला अपहरणारे उद्दामपण आणि रामाने त्याच्या दहा शिरांचा शिरच्छेद करून उगविलेला सूड यांची वर्णने अशा भाषेत जुळविली की ती पंजात तर असू नयेत पण ऐकताच ती सीतालक्ष्मी म्हणजेच स्वातंत्र्यलक्ष्मी हे सांगतिल्यावाचून समजावे. कोण रावण, कोण राम, सशस्त्र युद्धात शिरच्छेद झाल्यावाचून कोण शुद्धीवर येणार नाही ते मनामनांत जाणून त्याने चित्तवृत्ती भडकाव्या. "हे घनश्याम श्रीराम" हे भारतीय स्वातंत्र्यास्तव उत्कट करुणा भाकण्याचे पद मला वाटते, त्याच वर्षी त्यांनी रचिले. मित्रमेळ्यांत प्रतिसप्ताह ज्या विषयांची आणि विचारांची पारायणे मी करी बहुधा तेच विषय आणि विचार गोविंदाने मोठ्या कुशलतेने ह्या सुंदर आणि तेजस्वी पदांतून गोवावेत. ती पदे जितकी मार्मिक आणि प्रभावशाली असत तितकाच परिणामकारी अभिनय करून ती मोहक सुरात म्हणणारी मुलेही त्यांना लाभली होती. ती मुले ती पदे नुसती पाठ म्हणणारी नसत, तर त्यांच्या मनांतील तळमळीचीच ती पदे केवळ उद्‌गार असल्याने कवीइतकेच ते दुःख, ते तेज, ती उत्कटता, ती करुणा, तो क्रोध प्रत्यक्ष त्या मुलांच्या स्वतःच्याच भावना उचंबळवीत असल्याने त्यांची स्वतःची दुःखे आणि क्रोध ते जितक्या तत्परतेने, सहज आवेशाने व्यक्तविते तशी ती पदे त्यांच्या तोंडून ऐकताना आणि त्यांचा तो ऐटदार अभिनय वा हातांनी व्यक्तविली जात, त्या वेळी ही मुले तीनच होती. माझा लहान भाऊ बाळ, केतकरांचा दत्तू आणि जोशांचा बापू. मग वर्तकांचा श्रीधर. पुढे माझा सिंहगडचा पोवाडा, बाजी देशपांड्यांचा पोवाडा, गोविंदाचा अफझुलखानाच्या वधाचा पोवाडा आणि इतर अनेक पदे आणि संवाद बसवून ह्या मुलांचा तो मेळा महाराष्ट्रभर प्रचार करीत होता. त्या पदांना हीच मुले शोभत. त्या मुलांना हीच पदे शोभावीत. त्या

पाचसहा वर्षांत महाराष्ट्रातील सहस्रावधी लोक, नगरेच्या नगरे ह्या 'अभिनव भारताच्या' ह्या तेजस्वी कुमारांच्या तोंडच्या ह्या प्रभावी पदांवर लुब्ध होऊन गेलेली होती. सहस्रावधी लोकांच्या हृदयांत देशभक्तीची आणि राष्ट्रस्वातंत्र्याची ज्योत ह्या मुलांची ही पदे ऐकताच पेटावी. बाहूंत आवेश थरारावा. त्या मेळ्याने या पदांतून सांगितलेल्या तेजस्वी संदेशासारखा देशवीरत्त्वाचा संदेश अर्वाचीन काळी महाराष्ट्रास पूर्वी कोणीही सांगितला नव्हता. इतर कोणासही तसे सांगण्याचे धाडस झाले नव्हते, होत नव्हते. आणि म्हणूनच त्या मेळ्याच्या संदेशाच्या अद्भुतपूर्व श्रवणासरशी महाराष्ट्रभर अंगात चेताना संचरे. त्यातही विशेष हे की, ज्या देशवीरत्त्वाचा वाचिक संदेश ती मुले सांगत त्याच देशवीरत्त्वास कृतीत आचरून दाखविण्याची धमकही त्यांच्यापैकी काही जणात होती. ती पुढे यथासमय प्रकटही झाली. आणि म्हणूनच ही बहुतेक पदे पुढे इंग्रजांनी जप्त केली.

यावेळी नाशिकच्या प्रौढ आणि पुढारी वर्गातही मित्रमेळ्याच्या चळवळीची छाप पडत चालली होती. त्यातील कित्येकजण त्याचे सभासदही झाले होते. संस्थेच्या हेतूप्रमाणे नाशिकच्या बहुतेक राजकीय चळवळी तिच्या हातात आलेल्या होत्या. सार्वजनिक सभा अशी- मित्रमेळ्याच्या पुढाऱ्यांच्या सहकार्याने झाली तरच बहुधा यशस्वी होई, आणि मित्रमेळ्याचे सहकार्य हांजीखोर उद्देशास किंवा ठरावांस मिळणे शक्य नसल्याने नाशिकची राजकीय भाषा सार्वजनिक ठराव सभांतून पुण्यापेक्षाही कडक आणि ठसठशीत झाली. अशा रीतीने मेळ्याचा व्याप आणि छाप वाढत चालेला असता त्या उगवत्या संस्थेवर एक अत्यंत दुःखकारक प्रसंग ओढवला, कारण या १९०१ व्या वर्षीच देशभक्त म्हसकर प्लेगने एकाएकी वारले!

वर्षानुवर्षे त्यांनी प्लेगच्या रोग्यांत रात्रंदिवस काम केले असल्याने त्यांस प्लेग अगदी अंगवळणी पडल्यासारखा झाला होता. म्हसकर म्हणजे एक प्लेग कवचच!! (प्लेग प्रूफच) असे जो तो म्हणे. त्यातही गावात प्लेग शमत आलेला. असे असता ध्यानीमनी नसता त्यांना प्लेगने अचानक पछाडले. आम्ही सर्व जणांनी यत्नांची पराकाष्ठा केली. वडिलांच्या अंथरूणाशी बसावे तसे बसून अलोचन रात्री काढल्या. शेवटी त्यास उन्माद झाला, पण कोणता? तर राष्ट्रोन्माद! या वायूच्या झटक्यांत ते इग्रजांशी लढाया खेळू लागले. स्वातंत्र्यलक्ष्मीचा जयघोष करीत धावपळ मांडू लागले. इग्रजांशी लढून स्वदेश स्वातंत्र्याच्या प्रत्यक्ष समरात मारीतमारीत मरण्याची त्यांची हाव निदान त्यांच्यापुरती तरी त्यांनी खरोखर पुरवून घेतली, कारण आम्हास जे हे त्यांचे युद्ध उन्माद वाटते ते त्यांस त्या उन्माद स्थितीत तरी वास्तविकच वाटत असणार. त्यांच्या त्या मानस जगतात तरी त्यांनी आपली घेतलेली शपथ पाळली. आणि परशत्रूशी लढत त्यांनी देशस्वातंत्र्यार्थ प्राणाचे बलिदान केले! त्या उन्मादात अशा झुंजी घेत-घेत थकून त्यांनी स्वातंत्र्याच्या ध्यासात देह ठेविला. त्यांच्या मते खरोखरच ते स्वातंत्र्य समरात वीरगती पावले. 'अंते मतिः सा गतिः'- असे म्हणतात. कोणी सांगावे! तशा झुंजार स्वातंत्र्यवीराच्या जन्मास ते गेले नसतील म्हणून! असे समाधान मानीत आम्ही सर्वांनी स्वतः खांदा देऊन म्हसकरांना चितेच्या जळत्या वेशीतून या लोकीच्या सीमेपलिकडे पोहोचवून दिले. अशा रीतीने व्यक्तिशः मजवर अत्यंत प्रेम करणारा आणि माझा निस्सीम अभिमानी असलेला एक थोर अंतःकरणाचा आत्मीय मला अंतरला आणि भारतास त्याचा एक एकनिष्ठ भक्त! गाजावाजा होण्यासारखे त्यांनी काही शतकृत्य केले नव्हते. कारण गाजावाजा

करण्यासारखे काही दान मातृभूमीच्या चरणी अर्पिण्यास त्या बिचाऱ्यापाशी काही नव्हतेच; पण सर्वस्व दान म्हणजे जे नसेल त्याचे दान नसून, ज्यापाशी आहे त्याचे सर्वस्वी दान असे असेल तर एकनिष्ठेचे जे तुळसीपत्र त्याच्याजवळ होते ते त्यांनी मनःपूर्वक आणि विशेषतः या भारतमातेच्या चरणी वाहिले होते. राष्ट्रस्वातंत्र्यार्थ तळमळणे एवढेच त्यांच्या हाती होते. आणि तेही काही थोडे नव्हते. कारण दुसरे काही गाजावाजा करण्यासारखे कार्य या तळमळीला करता आले नसले तरी प्रत्यक्ष कार्य असेही एक जे तिने केले ते शंभर बेगडी कार्यांहून थोर होते. एवढ्यासाठी देखील महाराष्ट्राने या अज्ञात पण थोर देशभक्तीच्या स्मृतीस कृतज्ञतेच्या एकाददुसऱ्या अश्रुने तरी केव्हा केव्हा अभिषेकावे! कारण 'अभिनव भारताच्या' यज्ञकुंडास अगदी पहिल्याप्रथम प्रज्वलिणाऱ्या ऋत्विजांतील तोही एक ऋत्विक होता.

म्हसकर वारल्यानंतर त्यांचे सहकारी श्री. पागे यांनीही संस्थेतून आपले अंग जवळजवळ काढून घेतले. आणि आमच्या गुप्तसंस्थेच्या आम्हा तिघा मूळ संस्थापकांपैकी मीच काय तो मागे उरलो. प्रथमप्रथम मित्रमेळ्यातील गुप्तसंस्थेच्या 'राष्ट्रभक्त समूहाच्या' शपथा देऊन जे मुख्य अंतरंग त्या अंतर्मंडळांत घ्यावे असा आमचा- म्हसकर, पागे व मी यांचा- पहिला बेत होता, हे मागे सांगितलेच आहे. त्याप्रमाणे कित्येक दिवस मित्रमेळ्यांत येणाऱ्या सभासदांस आरंभी आमचे सर्व हृद्गत सांगितले जात नसे. या योगे आम्हा तिघांच्या मागून आलेल्या काही जणांची अशी समजूत, त्याचा अनुभव तसाच असल्याने झाली की प्रथम मित्रमेळा ही खरोखरच नुसती एक विवादसभा व वक्तृत्वसभा एक सामान्य सार्वजनिक उत्सव वगैरे करण्याचे मंडळ होते नि मग ते आपण होऊनच क्रांतिकारक गुप्त सभेत परिणित झाले. पण ही साफ चूक आहे. वस्तुस्थिती अगदी त्याच्या उलट होती. आधी 'राष्ट्रभक्तसमूह' ही गुप्त संस्था स्थापून तिची उघड शाखा म्हणून मित्रमेळा ही संस्था काढलेली होती. परंतु म्हसकर वारले तोपर्यंत मित्रमेळ्यांतील बहुतेक मंडळी गुप्त संस्थेच्या शपथा घेऊनच राष्ट्रभक्तसमूहामध्ये प्रविष्ट झालेली असल्यामुळे मित्रमेळा हीच एक गुप्त संस्था होत आली होती. तरी देखील नवीन सभासदांत आणि अंतरंग मंडळांत अवश्य तो भेद ठेविलेलाच असे. त्यातही अधिक सावधपणा असावा म्हणून आमच्या मागून येणाऱ्या किशोर मंडळीसाठी या वेळी एक 'किशोर मंडळाची शाखा उघडली नि त्याचे चालकत्व माझा धाकटा भाऊ बाळ, वर्तकांचा धाकटा भाऊ श्रीधर, केतकरांचा दत्तू प्रभृति लहान मुलांकडे सोपविले. ही मुले आमच्या आखाड्यात कसरत करून मित्रमेळ्याच्या संप्रदायात पटाईत झालेली होती. त्यांनी त्यांच्या वयाची मुले सभासद करून घ्यावी, त्यांच्या साप्ताहिक बैठकी कराव्या, त्यांत विषय घेऊन व्याख्याने द्यावीत, व्यायामाचे-कसरतीचे वगैरे नियम घालून ते पाळावेत आणि आमच्या देखरेखीखाली त्यांच्या वयाच्या मुलांत लहानपणापासून देशभक्तीचीच नव्हे तर देशवीरत्त्वाचीही ज्योत पेटवावी. त्याच किशोर मंडळात बाळाचे वयाचाच कर्वे मामलेदारांचा एक चुणचुणीत मुलगा प्रविष्ट झाला. देशवीरत्त्वाचे बाळकडू प्याला. पुढे अभिनव भारताच्या क्रांतिकारक कटाच्या खटल्यांपैकी एका खटल्यात जे देशवीर कर्वे फाशी गेले, ते हेच.

## त्रिंबकची शाखा

या वर्षीच माझ्या बहिणीला सासरला पोहोचविण्या-करिता म्हणून आणि इतर कारणांनीही त्र्यंबकेश्वरी माझे जाणे घडले. लहानपणी वडील बंधूंच्या लग्नास आणि बहिणीच्या लग्नासाठी मी त्र्यंबकेश्वरी गेलो होतो. मला त्र्यंबक चांगले आठवावे अशा वयात आताच तेथे आलेला होतो. त्र्यंबकला मी माझ्या वडील भावाचे सासरे श्री. नानाराव फडके यांच्या घरी असे. तिकडेच आम्ही उतरत असू. फडक्यांचे त्या वेळचे कुटुंब म्हणजे आपल्या जुन्या अविभक्त कुटुंबपद्धतीचा एक पाहण्यासारखा आदर्श असे. तीस-चाळीस माणसांपर्यंत मंडळी त्या कुटुंबात नानांच्या शांत, मायाळू, सहनशील आणि उदार छत्राखाली नांदत. मूळ कुटुंबातील तिघे भाऊ. त्यांची बायकामुले, मावस-आते-मामे, बहिणी भावांची काही अनाथ झालेली मंडळी, पाळलेले विद्यार्थी, इतकेच नव्हे, तर घरात चांगल्या प्रकारे बऱ्याच दिवस राहिलेले कारकून आश्रित देखील आपली बायकामुले घेऊन त्या कुटुंबात समाविष्ट होत, दोनदोन पिढ्या त्या कुटुंबीयातच त्यांचा संसार चाले. नानांच्या घरच्या मुलांच्या मुंजीसहच त्या आश्रितांच्या मुलांच्या मुंजी आणि घरच्या मुलींबरोबरच त्यांच्या मुलींचीही लग्ने होत. नानांकडे वृत्तीचेही मोठे वळण असे. दूरदूरहून धार्मिक तीर्थविधी, यात्रा, नवस, प्रभृतिनिमित्ते त्यांची पिढ्यानपिढ्या बांधलेली यजमान मंडळी येत. त्यामुळे ते घर म्हणजे एखाद्या चिमुकल्या संस्थानासारखे गजबजलेले असे आणि त्या सर्वजणांची गाऱ्हाणी ऐकत, कौटुंबिक कलह-रुसवे मिटवीत दहाजणांची बरी आणि दहाजणांची वाईट बोलणी सोशीत ज्यांच्या त्यांच्या परी ज्याची त्याची व्यवस्था ठेवीत नानाराव फडके ओटीवर धीमेपणाने आणि निर्मम ममतेने कुटुंबाच्या योगक्षेमाची चालना करीत, चंची सोडून बसलेले असत. प्रत्यही एखादे ना एखादे लग्न, मुंज, श्राद्धपक्ष, प्रभृति धर्मकार्य यांच्या घरी चालूच असे!

हा थोर पुरुष वारल्यानंतर त्यांच्या घराचे गाडा हाकण्याचे काम त्याचे वडील चिरंजीव अण्णा यांजकडे ते अवघे वीस वर्षांचे असताच आले. नानांची पुतणी म्हणजे अण्णांची चुलतबहीणच आमच्या बंधूंना बाबांना, दिलेली- तीच माझी वहिनी. त्यामुळे आणि अशांच्या फारच स्नेहाळू स्वभावाने आमची आणि आमच्या त्या बरोबरीच्या मेहुण्याची फारच गट्टी जमली. नाना वारताच ते घर एकदम डबघाईस आले. आपल्या अविभक्त कुटुंब पद्धतीचे दोषही त्यात असल्याने अण्णांनी वाटेल ती मेहनत केली तरी त्यांच्या इतर बंधूत कोणीच कर्तृत्ववान न निघाल्यामुळे ते एखाद्या संस्थानाप्रमाणे नांदणारे विशाल कुटुंब विच्छिन्न होऊन गेले. परंतु ते थोडे पुढे. तेथे जाण्याच्या त्या दोनतीन पाळीपर्यंत ते कसेबसे जीव धरून होते. त्या सर्वांत धाकटा भाऊ जो महादेव तो पुढे मोठा झाल्यावर “अभिनव भारत” संस्थेतून आणि इतर त्याच्या शक्तीच्या मानाने बरेच सार्वजनिक कार्य करीत असे. अण्णांबरोबर एकसारखे काही दिवस राहण्याचा हा योग मला येताच त्या तरुणाच्या मनात देशभक्तीची ज्योत पेरली. त्याने आमच्या धाडसी कार्यक्रमांत भाग घेण्याचा निश्चय केला. मी त्यास देशस्वातंत्र्यार्थ प्रसंगी सशस्त्र युद्धातही प्राण देईन, अशी आमची परिपाठाची शपथ दिली. हळूहळू माझे शंकरप्रभृति इतर मेहुणे आणि त्रिंबकची इतर तरुण मुलेही माझ्या कक्षेत येऊन त्यांच्यात क्रांतिकारक मते फैलाविली. त्रिंबक गांव मूळचेच भटाभिक्षुकांचे आगर. त्या वेळेला तर धर्मवेडेपणा आणि आकुंचित स्वार्थ यांच्या कोलाहलात सार्वजनिक

जीवनाची जाणीव देखील कोणास नसे. जातीजातीचा पिसाट भेदभाव तर इतका आकुंचित की ब्राह्मणा-ब्राह्मणांतही ही देशस्थ आळी, ही कोकणस्थ आळी, म्हणून दोघां राष्ट्रांत जसे वैमनस्य माजलेले तसे वैमनस्य, तशा सांघिक मारामाऱ्या नि मत्सर! नवीन पद्धतीने शिकलेले दोघेतिघेच, पण ते सर्वस्वी कुटुंबास वाहिलेले. पूर्वीची संस्कृत विद्या जीव धरून होती पण ती आंधळी शब्दपाठी. आजचे दर्शनच जिला घडलेले नाही, कालच्या रात्रीच्या अंथरुणांत पडलेली अशी. इंग्रजांच्या राजाला मनःपूर्वक देवावतार मानणारे आणि "न: विष्णुः पृथ्वीपतिः!" म्हणून त्यास आधार दाखविणारे कित्येक संस्कृत विद्वान पंडित, उपाध्याय आणि भिक्षुक, तेथे मला भेटले. मी त्यांच्यातील बहुतेकांची भेट घेतली, वाद केले. अशाच एका पंडिताने, ज्याला थोडेसे इंग्रजीही येई, एकदा एका राजनिष्ठ समारंभाप्रीत्यर्थ संस्कृत श्लोक केले आणि बऱ्याच प्रौढ मंडळीत ती चर्चा चालताना माझा विषय निघून मला बोलाविले व ते श्लोक मला दाखविले. त्या संस्कृत श्लोकांत कवित्व होते पण ते "मायबाप" म्हणून इंग्रज सरकारास संबोधिणारे आणि इंग्रजांच्या राजास देव, पृथ्वीपति म्हणून गौरविणारे! मी ते वाचल्यानंतर मोठ्या आशेने त्या पंडिताने मत विचारले. मी सांगितले की, Truely these are pearls but they are thrown before swine. ती सगळी मोती आहेत; पण ती डुकरापुढे विखुरलेली.

ते सर्व थक्क झाले. मी तसे का म्हटले ते समजावून देताना खूप चर्चा झाली आणि त्या प्रामाणिक पंडिताने मी म्हणतो त्या "न: विष्णुः पृथ्वीपतिः!" इत्यादी वचनांचा अर्थ खरा आहे असे सांगितले. आणि पुन्हा आपण आपल्या गीर्वाणवाणीला असा हांजीहांजीखोर स्तुतिपाठकपणाचा विटाळ होऊ देऊ नये ही माझी विनंती मानली! "राजा प्रकृति रंजनात्" दुसऱ्याच्या देशावर केवळ शस्त्रबळाच्या आधारावर जो राज्य करितो तो त्या देशाचा राजाच नव्हे मग देव कुठला, अशा माझ्या धाडसी विधेयाची संवादाची हातोटी पाहून त्रिंबकच्या प्रौढ मंडळीत प्रथमपासूनच माझी छाप पडली. माझ्या मताचीच झालेली तरुण मंडळी एकत्र करून मी मित्रमेळ्याची शाखा तिथे स्थापिली. त्यांना काळपत्र आणि क्रांतिकारक अशी माझी ठरलेली पंचवीस पुस्तके वाचण्याची रुची लावली. सार्वजनिक अशी दिलेली एकदोन व्याख्यानेही फार परिणामकारक झाली. अण्णाराव फडक्यांच्या चालकत्वाखाली राष्ट्रभक्त समूहाच्या अर्थात मित्रमेळ्याच्या या शाखेच्या बैठकी होत. क्रांतिमतांचा फैलाव नि उत्सव, व्यायाम शाखा प्रभृति प्रकट सार्वजनिक कार्यही चाले. त्यातली एखाददुसरी घटना उदाहरण म्हणून सांगावयाची तर राजे एडवर्ड यांच्या एका समारंभाची सांगता येईल. त्रिंबकला तेथील सरकारी आणि निमसरकारी अधिकाऱ्यांनी स्वतः पुढारीपण घेऊन राजे एडवर्ड यांचा आयुरारोग्य चिंतनपूर्वक राजनिष्ठप्रदर्शक एक उत्सव करण्याचा बेत केला. असे उत्सव सरकारी अधिकारी त्या काळी वारंवार घडवून आणीत. बिचाऱ्या भटाभिक्षुकांचे काय- राजकारणात गम्यच नाही. अधिकाऱ्यांचा शब्द न बोलता झेलावा ही सवय. समारंभार्थ त्यांनी गाव सजविले. बाहुल्यासारखे आले गेले. रात्री दीपोत्सव! या उत्सवास आधीपासून आमच्या तरुण मंडळाचा वाचिक विरोध चालू होता. मी आणि अण्णांनी रातोरात लिहून भिंतीवर चिकटविलेल्या गुप्त हस्तपत्रिकांनी त्या दिवशी सकाळीच उत्सवास अपशकून केला होता. "तुमची राष्ट्रमाता ज्याने बटिक केली त्या राजाचा उत्सव म्हणजेच तुमची स्वातंत्र्यता ज्या दिवशी मेली त्या दुर्दिनाचा वाढदिवस! परराजाशी

राजनिष्ठा म्हणजे स्वराष्ट्राशी देशद्रोह!" अशा अनेक कडक क्रांतिकारी वाक्यांची ती भित्तीपत्रके (Posters) फडकल्यामुळे गावात अपूर्व खळबळ उडाली. कारण त्यांना अशी वाक्ये वाचण्याचा हा उभ्या तीन पिढीत पहिलाच प्रसंग! पोलिसांची चुळबुळही चालली. सभेतही रंग उरला नाही. रात्री आमच्या मुलांनी अण्णा फडके यांसह जाऊन कुशावर्त वगैरे प्रमुख ठिकाणचे दिवे मालवून, पणत्या पाण्यात ढकलून साधले तेथे सजावटीच्या पताका फाडून बोभाटा होतो, तो सूंबाल्या केला. सभेत ज्या अध्यक्षांनी "एडवर्ड हे आपले खरोखरच बाप आहेत!" असे म्हटले, त्यांना उद्देशून "एडवर्ड जर आपले बाप आहेत तर आपले वडील आपल्या मातुश्रीचे कोण?" असे अगदी उनाड खणखणीतपणे विचारणारी गुप्तपत्रके लिहून रातोरात भिंतीवर पुन्हा फडकविली! दोनचार दिवस तो प्रश्न ज्याच्या त्याच्या तोंडी होता. जिथे-तिथे या आमच्या गुप्त उपद्व्यापाची चर्चा चालली होती. आम्ही मुले पकडली जाण्याचा दोनचार दिवस बोभाटा होऊन त्यातच ते प्रकरण शिळे होत संपले.

## माझे शरीर आणि व्यायाम

माझे शरीर लहानपणी तरतरीत पण एकेरी नि चिमुकले असे. रंग गोरा आणि खूप पाणीदार कोमल नि मोहक दिसले, असे जो तो म्हणे. इतकेच नव्हे तर ते माझे मलाही तसेच आवडे. मला साधारण पण टुमदार राहणीची भारी हौस. वकिलांच्या वगैरे मुलांनी केस ठेवलेले पाहून मलाही केस ठेवावेसे वाटत. पण त्या काळी केस ठेवणे म्हणजे बहुतेक ब्राह्मण कुटुंबांतून तरी पाखंडपणाचेच एक चिन्ह समजले जाई. त्यातही बाबांना तर या सुधारकी चाळ्यांचे फारच वावडे. त्यामुळे त्यांच्या अधिराज्यात असेतो हा केस ठेवण्याचा हक्क मला हप्त्या-हप्त्यांनी आणि अनेक वेळा निर्बंधभंगाच्याच चळवळी करून संपादावा लागला. प्रथम घेऱ्याचा हक्क हाती आल्यानंतर त्या घेऱ्याचा घेर मागेपुढे वाढत वाढत चालेला. त्याच मानाने हळूहळू शेंडीची अक्राळविक्राळ लांबीरूंदी माणसाळवीत तिची एक बट बनवून टाकली गेली. शेवटी बाबांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालून निघून कॉलेजचे वसाहतीचे स्वराज्य मला मिळाल्यानंतर तो विस्तृत घेरा दोन-तीन आठवड्यांतच राखलेल्या, छाटलेल्या नि भांग पाडलेल्या केसांत परिणामला. माझ्या खोलीत क्रांतिकारक हुतात्म्यांच्या आणि वीरवरांच्या छायाचित्रांभोवती आणि स्मरणासहच सुंदर फुलांचा, अत्तरांचा आणि उदबत्त्यांचा सुगंध दरवळलेला असे. गबाळेपणाची मला प्रथमपासूनच नावड आणि सर्व विषयांत टापटीपीच्या राहणीची मोठी आवड. भफबाजपणाचा जितका तिटकारा तितकीच शोभिवंतपणाची हौस. काकांची मागल्या पिढीतील सनातन बाराबंदी नि अंगरखे तर राहोच, पण बाबांचे ते बेडौल घोळाचे सदरे देखील वापरण्याइतका धार्मिकपणा माझ्या ठिकाणी नसे. मी शर्ट घालावे, जाकीट घालावे, कोट घालावा, आणि धोतराचा सुटसुटीत काचा मारण्याची बंडखोरी देखील करण्यास कचरू नये. हळूहळू बाबांनी तो एक क्षम्य छंद म्हणून दुर्लक्ष करण्यास आरंभ करताच तोही हक्क प्रस्थापित झाला. मला भगूरला असताना व्यायामाची रुची अगदी प्रथमतः लागण्यास एक कारण ही शोभिवंतपणाची हौस झाली. माझ्या घरी कोठूरची बर्वे मंडळी केव्हाकेव्हा येत. त्यांच्यातील विशेषतः "गोपाळचे" ते झोंबीत पटाईत असलेले कसलेले आणि पिळदार शरीर पाहून मलाही आपले शरीर तसेच गोटीबाज, बांधेसूद आणि शोभिवन्त व्हावे असे वाटे. माझी उंची माझ्या शरीराच्या मानाने नसली तरी

माझ्या वयाच्या मानाने मूळचीच कमी असे. त्यातही माझ्या बरोबरीची बहुतेक मुले दणकट आणि राकट असल्याने आणि वयानेही माझ्यापेक्षा पुष्कळ वाढलेली पडल्याने माझे कोमल नि चिमुकले शरीर हे त्यांच्याबरोबर चाललेल्या शारीरिक खेळांत आणि दांडगाईत एक माझ्या अंगी असलेली उणीवच भासे. हा उणेपणा काढून टाकून शारीरिक बळानेही त्यांचा वरचढपणा चालू नये, या अच्छेनेही माझ्या मनाची प्रवृत्ति व्यायामाकडे वळावी. मी बारा-तेरा वर्षांचा असताना प्रथम नमस्काराचा व्यायाम घेऊ लागलो. घामाची मूर्ति जमिनीवर उठेतो नमस्कार घातले पाहिजेत हे त्या वेळेपासून बाबांचे सूत्र असे. नि ते तसा व्यायाम घेतही. तेव्हा केव्हाकेव्हा देखोदेखी मी ही घामाची मूर्ति भूमीवर उठेतो नमस्कार घालू लागलो. हातास घट्टे पडले. ते मोठ्या अभिमानाने माझ्या सवंगड्यास आणि वडीलधाऱ्यांस दाखवावे. सोळा-सतराव्या वर्षी नाशिकास आल्यानंतर तर व्यायाम हे आमचे एक राष्ट्रीय कर्तव्यच ठरले. कारण मित्रमेळ्यांत सभासदांच्या शारीरिक उन्नतीस्तव व्यायामावरही फार भर दिला जाई. त्यात मी तर पडलो एक प्रमुख व्याख्याता नि प्रचारक. तेव्हा व्यायामाच्या आणि बलिष्ठ शरीराच्या उपयुक्ततेवर व्याख्यान देण्यास उभे राहिले असता माझ्या चिमुकल्या नि कोमल देहास दाखवून कोणास हिणवता येऊ नये म्हणून मला सर्वाआधी व्यायाम घ्यावा लागला. त्या वेळेस मी डंबेल्स करू लागलो. कारण त्या वेळेस सॅन्डोच्या डंबेल्सचा मोठा बोलबाला झालेला असे. डंबेल्सचा व्यायाम मीही तेव्हा जो घेऊ लागलो तो मला इतका आवडे नि मानवे की, पुढे विलायतेत देखील मी प्रत्यक्ष सॅन्डोच्या वर्गात काही दिवस शिकवणी घेतली. नि पकडला जाईतो तो व्यायाम नियमितपणे करी. परंतु एवढ्यावरच न थांबता मी जोर आणि बैठकाही काढण्याची सवय केली. पुढे कॉलेजमध्ये असताना पैजेवर पाचपाचशे जोर आणि हजार बैठका मी केव्हाकेव्हा काढीत असे. मलखांबही मी शिके आणि झोंबी खेळण्याचीही मला आवड असे. या स्वतःच्या व्यायामतत्परतेमुळे मला जरी सर्व तरुणवर्गाने व्यायाम घेतलाच पाहिजे म्हणून प्रकट व्याख्याने देण्याचा राजकीय अधिकार प्राप्त झाला तरी माझे शरीर जसे भरदार आणि मूळचे होते त्याहून अधिक देखणे होईल ही माझी आशा होती ती मात्र फारशी सफल झाली नाही. कारण माझे शरीर व्यायामाने सुगठीत आणि केव्हाकेव्हा तर माझ्या मित्रांनी कसरतीनंतर त्याची उघडी छायाचित्रे घ्यावी असे वळणदार आणि रेखीव झाले तरी ते भरभक्कम आणि धष्टपुष्ट असे केव्हाच झाले नाही. उलटे ते केव्हाकेव्हा पूर्वीहून सुकटलेले आणि राकट होऊ पाही. त्याचे एक कारण व्यायामाचा अतिरेक हे असावे असे मला आता वाटते. अन्नांशाप्रमाणेच व्यायाम हा कितीही चांगला असला तरी तो व्यक्तीव्यक्तीच्या मूळच्या शारीरिक आवाक्याप्रमाणे निरनिराळ्या वैयक्तिक प्रमाणात हवा. एकास एक हजार जोर मानवतात म्हणजे ते सर्वांसच मानवतील असे नाही. प्रकृतिवैचित्र्याप्रमाणेच व्यायामांतही वैचित्र्य आणि प्रमाण हवे. पण मला व्यायामाच्या अतिरेकाची माझ्यापुरती सीमा सांगणारा मार्मिक गुरुजी कोणी न लाभल्याने मी शरीराने थकून सुकून जाई इतका व्यायाम केव्हाकेव्हा घेई. राकटपणा म्हणजेच काही सशक्तपणा नव्हे. शरीराचे गोंडस देखणेपण न गमावताही प्रमाणबद्ध व्यायामाने शरीर सुश्लिष्ट असूनही बलिष्ट होऊ शकते- जसे कृष्णाचे! माझ्या या कैशोरांतील व्यायामविषयक अनुभवांचा दुसरा एक धडाही सांगावासा वाटतो, की कोवळ्या वयात केवळ दंडबैठकांच्या ठिकच्याठिकाणीच मांसपेशी गोठून टाकणाऱ्या

व्यायामाचे प्रमाण किंचित कमी करून एक दंडा (सिंगलबार), दुहेरी दंडा (डबलबार), मलखांब हे ताणते नि उंची वाढणारे व्यायाम लहान वयात विशेष अनुसेवनीय वाटतात.

## मित्रमेळ्याचे व्यायामविषयक ध्येय आणि शिस्त

केवळ शारीरिक व्यायामाच्या दृष्टीने या वेळी आम्ही व्यायामाकडे पाहात नव्हतो. तर ज्या राजक्रांतीच्या भयंकर दिव्यात आम्ही आमचे उभे जीवन बलिदान करणार होतो, त्या क्रांतीच्या भावी असह्य संकटांस सहण्याची शक्ती आणि बळ आपल्या शरीरास असावे ह्या दृष्टीनेच विशेषतः आम्ही तरुणवर्गाने काय व्यायाम घ्यावे ते उपदेशीत असू, आचरीत असू. बंदिशाळा, उपासमार, मारहाण, छळ, काबाडकष्ट, सैनिकी काटकपणा या सर्वांस आम्हास तोंड द्यावे लागेल हे जाणून आम्ही ज्यायोगे मनच नव्हे तर देहही काटक, तितिक्षु आणि सबळ होईल अशा प्रकारे तो कमावू लागलो. नाशिकला पोहण्याची कला म्हणजे एक जवळजवळ उपजत गुणच असे. आम्हीही टोळ्या करून रामकुंडावर जावे. खोबऱ्याच्या वाट्या उगाळून एकमेकांस ते चोळूनचोळून लावावे, आणि उंचावरून उड्या आणि कोलांट्या मारून गोदेच्या पाण्यात तासतास डुंबावे, पाणी मारावे, खेळ खेळावे. महापुरात पोहण्याची मला लहानपणी छाती झाली नाही. पण त्यावेळी नाशिकला जे थोडेबहुत पोहणे शिकलो तेच पुढे मार्सेल्सच्या भर समुद्राशी दोन हात खेळण्यास उपयोगी पडले. पोहण्याप्रमाणे आम्ही धावण्याची सवय करावी. उपासमार सोसावी, उघड्यावर निजावे, झाडे-डोंगर चढावे, रानावनांतून हिंडावे, अुंचावरून उड्या माराव्या, आणि या किरकोळ गोष्टी करीत असता आपल्या स्वदेशाच्या स्वातंत्र्ययुद्धात झुंजण्याची काटकता आपल्याला हवी म्हणून त्या आपण करीत आहोत, ही जाणीव केव्हाही विसरत नसू. आमच्या संस्थेच्या सभासदांस लावून दिलेली ही शिस्त मला इतरांस उपदेशिण्याच्या आधी, पाळून दाखवावीच लागे आणि माझ्या प्रकरणी तरी ती तशी मी पाळली, आणि स्वतःच्या देहास सकस, काटक आणि तितिक्षु जे बनविले ते मला माझ्यावर गुदरणाऱ्या भीषण विपत्तीत खरोखरीच फार कामास आले. राज्यक्रांतीच्या अवघड, घातक, संकटमय अशा ज्या मार्गात आम्ही पाऊल टाकले होते त्या मार्गात अशी संकटे आम्हांवर ओढवणारच आणि त्यास तोंड देण्यासाठी आमची शरीरे अशी कणखर केलीच पाहिजेत, अशी मनाची आणि देहाची जी सिद्धता मी या लहानपणापासून करीत आलो तीच मला अंदमानच्या त्या मारक 'काळ्या पाण्यात' नावेसारखी उपयोगी पडली. ज्या भयदायी देहिक काबाडकष्टांची आणि छळांची दृष्टादृष्ट होताच बेरडांतील बेरड माणसांनी आत्महत्या कराव्या, हत्तीसारखी शरीरे क्षयाने झिजून मरून जावी ते छळ आणि ते काबाडकष्ट सोसण्याचा असह्य प्रसंग आला असताही वर्षानुवर्षे त्यात टिकण्याचे जे मानसिक आणि शारीरिक काटकपण मला आले ते काही अंशी तरी आमच्याच गुप्त संस्थेच्या आम्ही पाळलेल्या शारीरिक शिस्तीचे आणि केलेल्या कसरतीचेच फळ होय यात शंका नाही.

## माझे लग्न

ह्या सन १९०१ व्या वर्षीच्या शेवटी माझी मॅट्रिकची परीक्षा पडत होती. त्यामुळे माझे नित्यक्रमाप्रमाणे शेवटचे तीन महिने केवळ त्या अभ्यासासाठीच राखून ठेवण्याचा निश्चय करून मी जो त्याप्रमाणे अभ्यासास आरंभ करतो तो एक दिवस माझे मामा घरी येऊन अकस्मात् सांगू लागले की,

तात्याचे लग्न ठरवून आलो. त्या वेळी माझे अठरावे वर्ष संपून एकोणिसावे वर्ष लागत होते. म्हणजे त्या वेळच्या प्रघाताप्रमाणे लग्नाचे वय झाले होते. म्हणून काही ठिकाणेही सांगून येत. परंतु आपल्या लग्नाचा प्रश्न इतक्या निकडीने अकस्मात तेव्हांच पुढे येइल अशी मला किंवा कोणाला कल्पना नसल्याने मी त्याचा फुटकळ नि सांगोपांग विचार केलेला नव्हाता. त्या वेळी माझे लक्ष प्रमुखतः मॅट्रिक झाल्यावर पुढील कॉलेजच्या अभ्यासाची सोय काय करावयाची इकडे गुंतलेले असे. बाबांच्या अडचणीसाठी मी पब्लिक सर्व्हिसची नोकरी परिक्षा आधी दिली होती तरी शक्यतो कॉलेजचे शिक्षणही घ्यावयाचेच असा माझा नि माझ्याहून बाबांचा दृढ निश्चय होता. पण काही केले तरी स्वतः बाबांना तो खर्च झेपणे अशक्यच होते. तेव्हा वशिल्याने वा शिष्यवृत्तीने वा अशाच इतर कोणच्या तरी मार्गे तो प्रश्न सोडविणे भागच होते. यास्तव मी वाटेल ते कष्ट नि त्रास सोसण्यास सिद्ध होतो. माझ्या विस्तृत वाचनांत मूळच्या दारिद्र्यांतून वा संकटांतून काबाडकष्ट सोसून थोर पदवीस चढलेल्या अनेक थोर पुरुषांची चरित्रे वारंवार येऊन गेली होती. रात्री तेल देखील घेण्यास पैसे नसल्यामुळे नगर संस्थेच्या (म्युनिसिपालिटीच्या) रस्त्यावरील दिव्यापाशी रात्री अभ्यास करून पुढे मोठ्या विद्वत्तेस आणि अधिकारास हस्तगत केलेली उदाहरणे त्या न्यायमूर्ति रानड्यांच्या मावळत्या पिढीतही माझ्या डोळ्यांसमोरून जात होती. अशा वेळी मीही तसाच निश्चय केला होता, की वेळच आली तर पुण्यास कोणाच्या घरी कामकाज करीन, माधुकरी मागेन, पण पुढे शिकेन. या बेताप्रमाणे एकदा श्री. म्हसकरांनी पुण्याच्या काळकर्त्यांशी पत्रव्यवहार केला होता. माझी प्रशंसापर प्रस्तावना त्यांनी “काळकर्ते” यांजकडे वारंवार करावी आणि माझ्या कॉलेजच्या शिक्षणाची सोय काही तरी लागली पाहिजे असे लिहावे. त्या मागच्या प्रस्तावनेचा उपयोग झाल्यास पाहावा म्हणून मी या वेळेस एकदा काळकर्त्यांस पत्रही टाकले होते की मी आपल्या छापखान्यात झाडझुडीचे, जुळाऱ्याचे (Compositorचे) किंवा आपल्या वा अन्य कोणाच्याही घरी पडेल ते गड्याचे कामही करण्यास सिद्ध आहे. पण आपण हस्ते परहस्ते कसेही करून माझ्या कॉलेजच्या शिक्षणाची सोय लावावी. या शिक्षणाच्याच विवंचनेत लग्नाची संधी केव्हाकेव्हा सुचे. पुष्कळ तरुण मंडळींनी लग्न केल्यामुळे त्यांच्या आलेल्या हुंड्याच्या वा मिळालेल्या सासऱ्याच्या वशिल्याने भाग्योदय झालेला मी पाहात होतो. पण शिक्षणाला हुंड्याचा वा सासरचा आधार मिळण्याची पहिली अट त्याच शिक्षणाच्या पायात लग्नाची बेडी ठोकणे ही असल्यामुळे अशी अडचणीची सोय केवळ तिच्याचसाठी सहसा कोण स्वीकारणार! तेव्हा शक्यतो दुसरी सोय पाहून कॉलेजचे शिक्षण कसे घेता येईल या विवंचनेत मी असता अकस्मात् मामा येऊन म्हणाले, “तात्याचे लग्न ठरले!”

आम्हा मुलांस वडिलामागे अगदी प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे वडीलधारे मनुष्य म्हणजे मामाच. तेव्हा जुन्या परंपरेप्रमाणे मला एका शब्दानेही न विचारता लग्न “ठरवण्याचा” अधिकार त्यांना होताच. तरीही आमच्याशी राजकारणासारख्या विषयांवरही अगदी बरोबरीने संवाद करण्याची आणि गृहकारणातही नसती उलाढाल विचारल्यावाचून न करण्याची मामांची मूळचीच खेळीमेळीची सवय असे. त्यामुळे दोनचार दिवस लग्न “ठरले” तरी तो ठराव मानावा की मोडावा, याची माझ्या घरातील आणि बाहेरील इष्टमित्रमंडळीत मामांशी यथेच्छ चर्चा झाली. माझ्या आयुष्यातील कोणचेही पुढचे पाऊल टाकताना माझी

पहिली चिंता हीच असे की ते पाऊल ज्या स्वदेशस्वातंत्र्याच्या खडतर क्रांतिमार्गाचे आम्ही यात्री झालो होतो त्या मार्गात ते माझे पाऊल मला मागे तर खेचीत नाही ना? त्या दृष्टीने पाहाता जो क्रांतिकारक सत्त्याच्या जयास्तव कारागारात वा फासावर वा रणांगणावर आपले शीर हातावर घेऊन कार्यक्षेत्रात उतरला त्याने विवाहाची बेडी पायात ठोकून घ्यावी की काय, हा प्रश्न प्रथमतःच त्या चर्चेत निघाला. लग्नामुळे स्वतःचे पाय कुटुंबाच्या मायाजाळात गुरफटणार. जाणूनबुजून कोण्या वधूस अनाथपणाच्या दुःखात ढकलण्यास आपण कारणीभूत होणार! आम्ही सर्व तरुण मंडळी. आम्हा सगळ्यांच्या समोर विवाहित होतोस की अविवाहित राहातोस, हा प्रश्न उभा राहाण्याचा सारखाच संभव. त्यामुळे याविषयाची चर्चा यापूर्वीच अनेक वेळा होऊन माझे मत ठाम झाले होते नि मी मित्रमंडळीस त्याप्रमाणे नेहमी अभिप्राय देत असे. आमच्या परिस्थितीत असलेल्या--

**क्रांतिकारकांनी लग्न करावे की नाही?**

या प्रश्नाचे समाधान मी अशा कोटीक्रमाने करी. प्रथमतः सुजननाच्या (Eugenics च्या ) दृष्टीने मी असे दाखवी की, स्वदेशास्तव, लोकहितास्तव प्राणत्याग करण्याची प्रामाणिक प्रतिज्ञा करणारा आणि ती पुरी करण्याची धमक असेणारा क्रांतिकारक बहुधा समाजातील उच्च मनोवृत्तीचा कर्मवीरच असणार. अशा उच्च बीजांचीच संतति वृद्धिंगत होणे समाजोन्नतीस परम आवश्यक. परंतु मनुष्याच्या दुर्दैवाने अशा हुतात्म्यासच कोणत्याही अन्यायी सत्तेस प्रथम बळी पडावे लागणार. त्यामुळे त्या दलित समाजात, त्या दलित ज्ञातीत वा देशात असे वीरात्म जीवन कारागारात वा फासावर वा रणांगणात निःसंतानतेत लोपून जाते. देशभक्तांचे संतान उत्पन्न करणारे वंश लुप्त होतात आणि जो जितका अधिक कृतघ्न, स्वार्थी, लोकहितपराङ्मुख, भ्याड, देशद्रोही, पिशुन असेल तोच जगतो, नांदतो नि त्याची त्याची संतति मात्र तितक्याच अधिक पटीने समाजात वाढली जाते. जो शेतकरी चांगले गहू निवडून फेकून देतो आणि किडकेसडके तितकेच पेरीत राहातो त्या पिकासारखेच त्या राष्ट्राचे वा संघाचे पीक क्षीण आणि निकस होत जाते. यास्तव वास्तविक पाहाता अशा वीरात्म्यांनी योग्य समयी विवाह करून शक्यतो उत्कृष्ट संततीस जनन देणे हे त्याचे राष्ट्रीय कर्तव्यच ठरते. लग्न केल्यास पत्नीच्या किंवा संततीच्या मोहाने तो प्रतिज्ञेपासून चलित होईल? पण असेच का व्हावे? त्याचे मनोबळ जर स्वतःच्या पित्याचा, बंधूचा, स्वतःच्या प्राणाचाही मोह सोडण्या-इतके प्रखर असेल, तर मग केवळ पत्नीच्या वा संतानाच्या मोहास तोडणे त्यास कठीण पडणार नाही. तो पत्नीच्या मोहाने वा मायेने स्वतःच कर्तव्यच्युत होण्याच्या स्थली उलट आपल्या पत्नीपुत्रासही स्वतःच्या प्रेमाने आणि प्रभावाने आपल्यासारखे विरात्मे करून सोडील. आपल्या संततीच्या ओघानेच तो वीरत्त्वाचा ओघही अखंडित प्रवाह राखील, देशभक्तांची परंपरा उत्पादील. तो वीर आघाडीसच पडला तर त्याची बायकामुले अनाथ होतील! होतील तर होतील! ज्या राष्ट्राच्या वा संघाच्या हितार्थ तो स्वतःचे प्राण देखील देतो त्या राष्ट्राच्या हितार्थ त्या संघातील अन्य व्यक्तींनीही काहीना काही तरी छळ सोसणे, त्याग करणे भागच आहे! असे सांगण्याचा आणि तो भार लोकहितार्थच लोकांकडून वाहण्याचा त्याला अधिकार आहे. त्याच्या पत्नीपुत्रांनी आपला नाथ असा महान हुतात्मा झाला, या विचारासरशी आपल्या त्या अनाथपणासच वास्तविक स्पृहणीय असे सनाथत्व मानले पाहिजे!

पण तेही होत नसेल तर अशा अनाथ स्त्रियांनी सुखेनैव तशाच कोणा थोर पुरुषाशी पुनर्विवाह करून आपला संसार पुन्हा थाटावा, अशी अनुज्ञा मनःपूर्वक देण्यापुरता तो क्रांतिवीर बहुधा उदार असेलच! निदान असला तरी पाहिजे. पुरुषाने पत्नी वारताच जर नि ज्या कारणासाठी पुनर्विवाह करणे पाप नाही तर पती वारताच स्त्रियांनीही हवे तर पुनर्विवाह करणे त्या त्या कारणासाठीच पाप नव्हे. पुन्हा प्लेगच्या दुष्काळातही तरुण माणसे पटापट मरतात म्हणून त्यासाठी तरुणांची लग्ने थांबून राहातात का? प्लेगसराई आणि लग्नसराई केव्हा एकत्रच चालू असते की नाही? जिथे जर केवळ दैवाचाच आधार पुरतो तर अशा क्रांतिकारकाच्या विवाहाच्या ज्या वेदीस त्या कसल्याशा दैवाचाच नव्हे तर दैवीकर्तव्याचाही दुहेरी आधार आहे ती विवाहवेदीच तेवढी निराधार म्हणून अनिष्ट कशी ठरवता येणार? तेव्हा धर्म्यकार्यी हाती शीर घेऊन रणात उतरत्या वीरात्म्याने विवाहित होऊन आपल्या सद्गुणांचा ओघ ज्यायोगे आपल्या राष्ट्रात सतत राहातो ती संतति उत्पन्न करणे हे राष्ट्रीय कर्तव्यच होये- जर ते कर्तव्य करण्याइतके त्याचे मनोबळ प्रखर असेल तर! पण त्याचे मनोबळ तसे प्रखर नसेल तर? तर त्याने मात्र अविवाहित राहाणे क्षम्य आहे. त्याचे तेच कर्तव्यही ठरू शकेल. क्वचित- कारण पत्नीसाठी वा पुत्रासाठी वा मातेसाठी मला कर्तव्याचे रणशृंग फुंकले जाताच मरता येत नाही म्हणून जो निमित्त पुढे करतो तो बहुधा त्या सर्वांच्या मोहापेक्षा आतून स्वतःच्या प्राणाच्या मोहानेच मरण्यास सिद्ध नसतो. कळत वा नकळतही आपण आपल्या अमक्या नातलगासाठी मरण्यास कचरलो हे समर्थन त्यास केवळ स्वतःच्या मनाचे दौर्बल्य झाकण्यास एखाद्या ढालीपुरतेच उपयोगी पडते. याविषयीचे माझे विचार पुढे "कमला" काव्यात क्रांतिकारक जो 'मुकुल' याच्या भूमिकेकडून मी वदविले आहेत. मुकुल हा 'आत्मप्रत्यय' नसल्याने स्वतः अविवाहित असताही त्याचा सहकारी क्रांतिकारक वयस्क जो मुकुंद त्याच्या विवाहाचे समर्थन करताना मुकुंदाला म्हणतो.

*न सख्या अनिरुद्धाचा एक केवल की परी ।*
*अशेष जनसौख्यांचा पाळणा रतिच्या घरी ।।१।।*
*अशेष जनसौख्या दे धर्म तोचि वदे स्मृती ।*
*धर्मदा शर्मदा देवी रति ना सुखदाचि ती ।।२।।*
*राष्ट्रसेवेप्रती झालो व्रतबद्ध तया आम्हां ।*
*रामदासीय दासांही तरी धर्म सुपूज्य हा ।।३।।*
*ओजस्विवीर्य गांधर्व-विधीने अथवा अशा ।*
*पूता वेदी विवाहाची वाढवी प्रियभू यशा ।।४।।*
*"तू लबाडा तरी का ना विवाह करिशी परी"*
*तुझ्यासम न की माते आत्मप्रत्यय अंतरी ।।५।।*
*यद्यपी राष्ट्रधर्माचा बीजमंत्र विवाह हा ।*
*प्राणोज्या संग ना तो ये का पुण्यत्व जलाशया ।।६।।*
*परंतु परतेची जै आपदा प्रिय भू छळी ।*

*धर्मार्थची सख्या होती आपद धर्म तदा बळी ।।७।।*
*अर्धभुक्तचि तै अर्धांगिच्या बाहुलतेतुनी ।*
*होय रे सखया जाणे हाय ह्या विषमी रणी ।।८।।*
*भीति धीटही तै द्याया प्रीतीचा असला हवी ।*
*चळती अचलांची ही शिखरे पडतां पवि ।।९।।*
*पुण्यही श्लाघ्याहि होती तै वैवाहिक बंधरे ।*
*आत्मदुर्बल जे माझ्या-सम घातुक त्या त्वरे ।।१०।।*
*प्राप्तची न तयाचा की त्याग दुष्करसा नसे ।*
*रोग्या पौष्टिक तैसे या रतिमंगल वर्जसे ।।११।।*
*अल्प धर्मी चुकू आम्ही महद्धर्म करावया ।*
*म्हणून विहिताची तै अविवाहितताचि या ।।१२।।*
*परंतु जो मनस्वी हे दोन्ही धर्म शके करूं ।*
*कामिनीच्या कटाक्षांही जाता येअ न जो धरी ।।१३।।*
*धर्मवीर्यत्व तीसंगे ज्याचे लुप्त न जो परी ।*
*तिलाचि अपुल्यासंगे धर्मवीर्यवती करी ।।१४।।*
*धन्यधन्यचि तो धीमान् धर्मवीर चितोडचा ।*
*राजीवाक्ष अयोध्येचा, तान्हा भारतभूमिचा ।।१५।।*
*तूं मुकुंद तसे व्हावे होऊ तू-क्षमची तसे ।*
*विश्वास हा मनी माझ्या आकांक्षा मजही असे ।।१६।।*
*आमुची देशभक्ती तो निर्नदीक सरोपमा ।*
*तुझी जयात जन्मा घे गंगा संतत त्या समा ।।१७।।*
*धर्मार्थ एकची त्यागू आम्ही प्राण तुम्ही परी ।*
*कांता सुता स्वतः आत्मत्याग हा त्रिगुणे तरी ।।१८।।*
*ध्येय मी देशभक्तीचे क्वचित्! जीवन हो तुझे ।*
*पितृत्वाचे पतित्वाचे ध्येय देश सुभक्तिचे ।।१९।।*
*शुद्धसंचिततेजस्वीधृतवीर्य कुमार तू ।*
*योग्य दीक्षित कामाचा सांग हा करण्या क्रतु ।।२०।।*
*धर्माज्ञा जा! मदाज्ञा जा! माझाची कमला हृदी ।*
*ठेव जा, ठेवशी आलिंगनाच्या कुलुपामधी ।।२१।।*

तेव्हा विवाह हा माझ्या कर्तव्याच्या पायातील शृंखला होणे केव्हाही शक्य नाही असा माझा मला पूर्ण आत्मविश्वास वाटत असल्याने माझ्या विवाहाच्या मार्गात तो प्रश्न आडवा येण्याचा संभव नव्हता. केवळ माझ्या त्या वेळच्या कौटुंबिक परिस्थितीत आणि उच्च शिक्षणाच्या आकांक्षेच्या दृष्टीनेच काय तो

www.savarkarsmarak.com

इतक्यालवकर लग्न करण्याचा माझा किंवा माझ्या घरच्या कोणाचाच विचार नव्हता. यास्तव मी काही केल्या मामानी ठरविलेल्या लग्नास मान्य होईना. त्यातही ठिकाणाविषयी माझा लवलेश विचार न घेता त्यांनी लग्न ठरवलेले! परंतु ते मी काहीही सांगितले तरी मामांचा आग्रह सुटेना. कारण मामांनी ज्यांची कन्या मला वधू म्हणून निश्चित केली होती त्या श्रीयुत भाऊराव चिपळूणकरांचा आणि मामांचा आबाल्य अत्यंत स्नेह असल्यामुळे श्रीयुत भाऊराव चिपळूणकरांसारख्या प्रभावशाली पुरुषाचा शब्द मामांस मोडवेना. अशा घराण्याशी आपला स्नेहसंबंधच नव्हे तर इतका निकटचा संबंधही जुळण्याचा हा योग अगदी अलभ्य- यापाई इतर कोणाचीही अडचण वा 'मुलींविषयींची' आवडनिवड दूर सारावी लागली तरी चिंता नाही- असे मामांस वाटे. बाबांनी पुन्हा पुन्हा सांगितले की, तात्या मॅट्रिक झाल्यावर त्याच्यासारख्या वरास अधिक उत्तम ठिकाणे येतील. तेव्हा ती परीक्षा होईपर्यंत तरी वाट पाहावी. हे लग्न का होईना पण पुढे करू. परंतु श्री भाऊराव चिपळूणकरांनीही अत्याग्रहाचे बोलणे केले. की हेच लग्न झाले पाहिजे आणि ते आताच झाले पाहिजे. मुलगी मोठी झाल्याने (त्या काळाच्या रीतीप्रमाणे) थांबणे अशक्य.

**श्रीयुत भाऊराव चिपळूणकर**

हे आमच्याही परिचयाचे होते. इतकेच नव्हे तर लहानपणापासून माझा त्यांना थोडाफार लळाच लागलेला असे. कोठूरचे दादा बर्वे यांची बहीणच भाऊराव चिपळुणकरांस दिलेली. त्यामुळे माझ्या आजोळास मी अगदी लहानपणी जाई तेव्हा तिथेच भाऊराव चिपळूणकरही केव्हा केव्हा त्यांच्या सासरी बर्व्यांकडे येत. तेथे लहानपणापासूनच ते माझे कौतुक करीत. माझ्याशी खेळतानाही आपण घोडा होऊन आपल्या पाठीवर मला बसवीत. मला पाहाताच त्यांना मोठी प्रसन्नता वाटे. ते माझ्या अगदी अकराबाराव्या वर्षीच आपल्या इष्टमित्रांस दाखवून विनोदाने म्हणत, "पाहा आमचा जावई कसा फक्कड आहे तो!" पुढेही येताजाता त्यांनी ममतेने आमचा समाचार घेत असावा. त्यातही ते कोणी उपेक्षणीय गृहस्थ नव्हते. श्री. चिपळूणकर म्हणजे जव्हार संस्थानातील एक मोठे प्रस्थ असे. त्यांच्या दोन पिढ्या त्या संस्थानात उच्च अधिकार भोगीत आलेल्या. तेथील त्या वेळचे राजे भाऊरावांस आपल्या घरच्या मुलासारखा वागवीत. युवराज तर त्यांना भाऊच मानीत. भाऊरावांचे कर्तृत्वही दांडगे असे. शरीरही त्यांच्या औदार्यास शोभे. ते देहाने उंच, दुहेरी बांध्याचे, गोरेपान आणि फार देखणे पुरुष असत. त्यांची मुद्रा, त्यांची ती डौलदार राहणी, ते चाणाक्ष नयन, चालण्याची ती प्रभावशाली ढब. त्यांना पाहाताच पेशवाईतील कोणी अस्सल चित्पावन सरदारच आपण पाहात आहोत की काय, असे वाटून मनुष्य क्षणभर त्यांच्याकडे पाहातच राही. ते स्वतः घोड्यावर बसण्यात, बंदूक मारण्यात, मृगया करण्यात, मल्लयुद्धात, व्यायामात पटाईत असत. गाण्याचाही मोठा हौशी, देवलसीही तसाच, दानीही तसाच, अनेक मल्लांस आणि विद्यार्थ्यांस त्यांचे सहाय्य असे. अनेकांस त्यांनी पोटापाण्यास लावले, अनेकांस संकटांत हात दिला. त्यांच्या वाड्यात एका खोलीत कोणी बैरागी वा कर्मठ आपली अर्चा करीत बसला आहे, भली मोठी पार्थीव लिंगे करून पाट्यापाट्या फुलांचा शृंगार रचून पूजा बांधीत आहे, तिकडे बंगल्यात गवई लोक उतरले आहेत, कोणी सतार लावितो तर कोणी तबला, माडीवरील बैठकीत कोणी विद्वान, वैदिक, नामांकित पुढारी, अधिकारी, स्नेही ह्यांनी परिवेष्टीत असे भाऊराव चिपळूणकर विनोदी वा विद्वत्ताप्रचुर संवादात

गढले आहेत. दाराशी शिपायांची, स्वारांची, घोड्यांची, वर्दळ चालली आहे, असा देखावा वारंवार दृष्टीस पडे.

अशा घराण्याशी शरीरसंबंध कोणासही उपेक्षणीय वाटणार नव्हता. त्यात त्रिंबकचे नानाराव फडके (माझ्या वडील बंधुंचे चुलतसासरे) आणि आमचे मामा या दोघांही वडीलधाऱ्या निकट आप्तांचा अत्याग्रह, माझ्या वहिनीची आणि भाऊरावांच्या कुटुंबांची आणि त्यातही त्यांच्या उपवर कन्येची दाट ओळख आणि काही नातेही. लग्नाचा प्रश्न निघण्यापूर्वीच त्या मुलीला भाऊराव चिपळूणकरांनी एकदा आमच्या घरीच आठ दिवस राहाण्यास धाडली होती. तिचाही फार मानस की इथेच आपल्यास द्यावी. अशा स्थितीत मामांस नाकारणे मला अगदी कठीण जाऊ लागले. तेव्हा शेवटी मी एक अट घातली की, जर माझ्या कॉलेजच्या शिक्षणाचा भार भाऊराव चिपळूणकर सांभाळीत असतील, जर ते तसे वचन स्पष्टपणे देतील तर मी लग्नस तयार होईन. तेव्हा ते हसून म्हणाले "तात्याचे शिक्षण होय? माझ्या मुलाचे शिक्षण मी करीन हे जसे मला कोणास वचन द्यावयास नको तसेच ते! ते माझे कर्तव्यच आहे." तेव्हा त्यांच्या शब्दांवर विश्वासून हुंड्याबिंड्याची फारशी भानगड न होता मी लग्नास मान्य झालो. पुढे केव्हाही पश्चात्ताप करण्याचे कारणच उरु नये इतका तो शरीरसंबंध सुदैवाने शुभप्रद आणि सुखावहच झाला. कारण त्यासंबंधाने शिक्षणाची आणि थोरपणाची अत्युच्च पायरी गाठण्यास आणि त्यायोगे माझ्या जीवनाचे जे मुख्य ध्येय ती राष्ट्रसेवा, ती मानवसेवा करण्यास मी अधिकच समर्थ झालो. माझ्या देशाच्या स्वातंत्र्यार्थ झुंजताना मला त्या संबंधाचा अडथळा तरी मुळीच झाला नाही. वैयक्तिक सुख? माझ्या जीवनात तो विचार तर केव्हाही दुय्यमच होता. लग्न सन १९०१ च्या माघ (एप्रिल) महिन्यात नाशिकला झाले.

पण आज जरी माझ्या विवाहाचा हा सुपरिणाम निश्चितपणे सांगता येतो तरी त्या वेळेस लग्नास घाईघाईने दिलेली किंबहुना बहुतेक अंशी मला देणे भागच पडलेली ही सम्मति चूक ठरते की काय, अशी धुगधुग मला सारखी लागलेली होती. कारण या शिक्षणाच्य सोयीसाठी जी मान्यता मी दिली ती नुसती शाब्दिक वचनावरच विसंबून होती. पण तो शब्द श्री. भाऊराव चिपळूणकरांचा होता इतकेच समाधान मानून बाबांनी पण अनुमती दिली. आणि नाशिकला सन १९०१ च्या माघ (एप्रिल) महिन्यात माझे श्री. चिपळूणकर यांच्या वडील कन्येशी लग्न झाले. लगेच ओझर नावाच्या एका गावी श्री. जोशी यांच्या घरी माझ्या धाकट्या मेहुणीस, चिपळूणकरांच्या दुसऱ्या मुलीस देण्याचे ठरवून त्या लग्नासाठी आम्ही ओझर तांबट या गावी गेलो. आमच्या वऱ्हाडी मंडळीतच श्री. बळवंत खंडूजी पारख हे नाशिकचे प्रख्यात शीघ्र कवी आणि एक वकील, ज्यांचा परिचय या चरित्राच्या पूर्वीच्या भागातून आलेला आहे तेही आलेले होते. त्यांच्या संगतीत दोन-तीन दिवस काव्यविनोदात गमतीचे गेले. त्यांनी जमलेल्या मंडळीत माझ्या कविताशक्तीचे फार कौतुक करावे. गमतीने मला आर्येचे प्रथम चरण देऊन दुसऱ्या चरणाची समस्यापूर्ति करण्यास सांगावे. त्यांना यमकाची फार आवड, मलाही आवड, म्हणून त्यांनी दिलेल्या चरणाची समस्यापूर्ति करताना मी उत्तरार्धात छान यमक साधावे. एकदा त्यांनी "पंधरा" शब्द शेवटी आणला-त्यास चटकन मनाप्रमाणे यमक मला सुचले नाही तरी मी "वसुंधरा" शब्दाने ते साधले, तेव्हा त्यांनी

मला 'कंधरा' हा शब्द सुचविला. अर्थातच ते यमक खरोखरच सुसंवादी होते. एकदा त्यांनी माझी अगदी ताज कविता म्हणावयास सांगितली. मी त्याच आठवड्यात नाशिकला एक दिवशी संध्याकाळी माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे गोदेच्या घाटावर एकांत बसलो असता दिल्लीहून नारो शंकराने आणलेली नाशिकची प्रसिद्ध घंटा ज्या नारोशंकराच्या देवळात वाजत होती त्या देवळात श्लोक रचला होता, तो म्हटला :-

"दिल्लीचे पद हालवोनि वरिली तेजे जिही" संपदा
"राहोनी निरपेक्ष वाहुनि दिली श्री शंभुच्या" शंपदा
"होते ते तुमचे सुपूर्वज असे यत्कीर्तिते" ना लय
"नारो शंकरचे असे कथितसे आम्हांसि देवालय"।। १।।

पारख तो श्लोक ऐकून फार संतुष्ट झाले. म्हणाले, "पण!!! ह्या तेजस्वी युवकाची क्रांतिकारी कविता त्याच्या स्वतःच्याच तेजाने एक दिवस जळून भस्म होईल!" भविष्यवाणीच ठरली ती!

आता हे सन १९०१ चे वर्ष संपत आले होते. वर्णिलेल्याप्रमाणे सार्वजनिक नि वैयक्तिक उलाढालीत माझा अभ्यास रेंगाळला होता. तरीही लग्न होताच घाईघाईने तो सुधारून हायस्कूलच्या उपांत्य (Preliminary) परीक्षेस बसलो आणि तीत उत्तरून दाखला मिळून मुंबईस मॅट्रिकला धाडण्यात आले. मॅट्रिकला एक महिना उरला तेव्हा तेवढा महिना इतर सर्व व्याप बाजूला सारून अभ्यासच अभ्यास करणे शक्य व्हावे यास्तव तो महिना मुंबईतच एकांत राहाण्याचे ठरविले. मुंबईस माझी मला आठवते अशी ती पहिलीच खेप. म्हणून माझे कोठुरचे मित्र श्री. बळवंतराव बर्वे त्या वेळचे बाळू बर्वे हेही मॅट्रिकला जाणार होते, त्यांच्या ओळखीने आंग्रवाडीत जाण्याचे योजिले. माझे जाणे म्हणजे "मित्रमेळ्या"च्या संस्थेपासून बहुधा दूर राहाण्याचाच आरंभ होता. कारण मॅट्रिक झाल्यावर कॉलेजमध्ये जाण्याचा उत्कट संभव होता. त्यामुळे मित्रमेळ्याची संस्था अशी त्यांच्याच अंगावर पडल्यानंतर कोणी ती मुख्यतः चालवावी, कोण पक्के, कोण कच्चे, काय धोरण ठेवावे इत्यादी चर्चा माझ्या निष्ठावंत सहकाऱ्यांशी करण्यातच त्या शनिवारची बैठक खर्च झाली. याच संधीस माझ्या मागे माझे कार्य चालविण्यास एकनिष्ठपणे स्वतःस वाहून घेणाऱ्या दोनचार उत्तम युवकांची जोड संस्थेस लाभली. त्यात संस्थेच्याच दृष्टीने नव्हे, तर माझ्या वैयक्तिक स्नेहाच्या दृष्टीनेही.

**श्री. विष्णु महादेव भट**

ह्यांचा उल्लेख प्रमुखपणे केला पाहिजे. त्या काळच्या या आठवणी लिहिताना त्या काळच्या भावभावनांशी समरस होता यावे, यास्तव श्री. वि. म. भट ह्यांचा उल्लेखही आजच्या ह्या औपचारिक आणि लौकिक पद्धतीने करण्यापेक्षा त्या काळी त्यास आम्ही ज्या ममतेच्या नावाने संबोधित होतो, त्या त्यांच्या "भाऊ" या नावाने ह्या कैशोरातील आठवणी संपेतो त्यास निर्देशणे अधिक सुसंगत होणारे आहे. श्रीयुत लावून बनणारे ते लौकिक नाव त्यास त्या आमच्या किशोर वयापासून जणू काय दूर नेते. पण भाऊ हे नाव घेताच त्या काळच्या आठवणी अधिक ओळखीच्या वाटतात, जशाच्या तशा दिसू लागतात. हीच स्थिती माझ्या सर्व स्नेह्यांची, आप्तेष्टांची. त्यातही विष्णूचे भाऊ हे नाव मीच ठेवले. पुढे तेच नाव

त्याला घरीदारी पडले. भाऊची आई माझी नात्याने दूरची मावशी, पण भाऊचा माझा स्नेह त्या नात्याने जवळचा झालेला नव्हता, तर त्या स्नेहानेच ते दूरचे नाते जवळचे केले. इतके जवळ, की जर मला सख्खी मावशी असती तर ती आम्हा तिघा बंधूंना इतक्या ममत्वाने क्वचितच वागविती की जितक्या ममतेने ह्या आमच्या दूरच्या मावशीने ती चारपाच वर्षे वागविले. भाऊ तर आमचा एक चवथा भाऊच झाला. तो इंग्रजी सहावीत होता तेव्हा प्रथम माझ्या लग्नात त्याची दाट ओळख झाली. माझ्या दाट ओळखीचा जो बहुधा एक अपरिहार्य परिणाम माझ्या स्नेह्यांच्या मनावर होत असे तो लवकरच भाऊच्याही मनावर होऊन मित्रमेळ्यांत दोघातिघा सभासदांच्या रीतसर प्रस्तावाने नंतर आणि माझ्या हमीनंतर त्यांचा प्रवेश झाला. थोड्याच महिन्यांत आमची मने इतकी एक बनली, आमचा स्नेह इतका निष्कपट ममत्वाचा झाला आणि आमचे स्वभाव परस्परांशी इतके तद्रूप झाले की, त्या सन १९०१ च्या वर्षीच्या अंतापासून तो मी विलायतेत १९०६ ला गेल्यामुळे आम्ही एकमेकापासून दूर होईतो भाऊसारखा कौटुंबिक वा सार्वजनिक सुखदुःखात आणि कर्तव्यात माझा प्रमुखतम सहभागी आणि सहकारी, एकनिष्ठ अनुयायी आणि अभिन्नहृदय स्नेही त्या माझ्या शेकडो स्नेह्यात वा अनुयायात दुसरा एखादा क्वचित आढळता. आम्ही वयाने जवळजवळ समवयस्कच होतो, आम्ही राहू एकत्र, जेवू एकत्र, अभ्यासू एकत्र, वाचू एकत्र, वेषदेखील आम्ही सारखेच करावे. भाऊचे वडील लहानपणीच वारले होते. त्याच्या आईने तिच्यावर अगदी विशीच्या आत कोसळणाऱ्या वैधव्याच्या संकटास तोंड देऊन आपल्या ह्या पहिल्या आणि एकुलत्या एका मुलाला लहानाचे मोठे केले. माझी ओळख झाल्यापासून भाऊने मला आपला जिवलग स्नेहीच नव्हे, तर आपला गुरु आणि पालकही मानावे. त्याच्या कौटुंबिक वा सार्वजनिक जीवनात त्या चार-पाच वर्षांत मीच त्याचा मार्गदर्शक होतो. माझ्या शब्दाबाहेर त्याने त्या पाच वर्षांत सहसा एक पाऊलही टाकले नाही. मित्रमेळ्याच्या गुप्तसंस्थेत प्रथमप्रथम जरी कोणीही त्याच्या फारसे परिचयाचे नव्हते तरी माझ्या प्रयत्नाने त्याचा त्या संस्थेत एकदा प्रवेश झाल्यानंतर त्याच्या अंगच्या गुणांचा विकास झपाट्याने होत जाऊन त्या मंडळीतही तो अगदी एकजीव होऊन गेला. आणि आपल्या ज्ञानाने, वक्तृत्वाने आणि तत्परतेने त्या संस्थेचा एक विश्वासू, प्रामाणिक, धीर आणि धुरंधर असा पुढारी गणला जाऊ लागला. भाऊकडून मी अनेक इतिहास वाचून घेतले, माझ्या बुद्धीप्रमाणे त्याचे मर्म समजावून दिले. काव्य आणि वाङ्मय, लेखन आणि वक्तृत्व, तत्व आणि आचार, सामाजिक क्रांति आणि राजकीय क्रांति, याविषयी मी संपादित चाललेल्या सर्वज्ञानात मी त्यास मोठ्या आशेने आणि औत्सुक्याने पारंगत केले. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यार्थ त्याकाळी भारतवर्षात ज्या थोड्याशा युवकांस अत्यंत तळमळ लागली होती, तत्प्रीत्यर्थ येतील त्या संकटास तोंड देऊन प्राणांतिक त्यागही करण्याची ज्यांची प्रामाणिक प्रतिज्ञा होती, भारतीय स्वातंत्र्यास्तव अगदी आरंभी ज्यांनी इंग्रजी राज्य सशस्त्र क्रांतीनेही उलथून पाडण्याच्या केलेल्या इंग्रजी आरोपासही एकाकी तोंड दिले, आणि त्याचे भीषण परिणाम धैर्याने सोसले, त्या आघाडीच्या स्वातंत्र्य सैनिकांत भाऊचीही गणना विपक्षानेच पुढे प्रकटपणे केली आहे.

www.savarkarsmarak.com

## श्री. सखाराम गोरे

त्याच वेळी मित्रमेळ्याच्या आणि नंतर अभिनव भारताच्या नाशिककडील कार्याचा पुढाकार घेऊन ज्याने मी विलायतेत असेतो त्या संस्थेला वाहून घेतले, इतकेच नव्हे तर अंती त्या स्वदेशस्वातंत्र्याच्या कार्यी आपले प्राणही वाहून टाकले, आणि आपण घेतलेली शपथ अक्षरशः पूर्ण केली ते श्री. सखाराम दादाजी गोरे हेही प्रथम माझ्या स्नेहाच्या कक्षेत आणि नंतर ठराविक क्रमाने त्या गुप्त संस्थेच्या कक्षेत समाविष्ट झाले. सखारामाचा स्वभाव माझ्या वर उल्लेखिलेल्या भाऊप्रभृति सहकाऱ्यांच्या प्रवृत्तीहून प्रथम फारच वेगळा होता. एक चैनी, खोड्याळ, पण त्याच्या त्याच्या मित्रमंडळीत मनमिळावू नि धीट असा तो एक हायस्कुलातील विद्यार्थी होता. मॅट्रिक परीक्षेत वर्गातील विद्यार्थ्यात सर्वात अधिक वेळा नापास झाल्याचा मान त्याचाच होता. आणि त्या मानाचा उपयोगही करून घेण्यास त्याने मनःपूर्वक झटत असावे. कारण त्या वेळच्या कोणत्याही विद्यार्थ्यापेक्षा दोनतीन वर्षे तरी मॅट्रिकच्या वर्गात अधिक काळ तो वसत असल्यामुळे त्या पुरातन वडीलकीचा अधिकार यच्चयावत विद्यार्थ्यांवर तो अभिमानपूर्वक गाजवी. मास्तर देखील त्याच्या त्या वर्गाच्या राजवटीत दोनदोनदा बदलले. त्यामुळे त्यांना देखील जुनी परंपरा शिकावी लागे आमच्या सखाराम गोऱ्याकडून! “असे कितीक मास्तर मी पाहिले आहेत!” असे हातवारे करून त्यांनी मनमानेल तेव्हा मास्तरांस धाब्यावर बसवावे. वर्गातील बाकावर शेवटच्या क्रमांकाची जागा म्हणजे गोऱ्याची जहागिरीच. तेथे ते अविरोध ऐटीने सर्वदा विराजत. एक डोळ्याने तो तिरवा असे. त्यामुळे तर याच्या चेष्टेखोर उनाडकीच्या हंसण्यात अधिकच रंग भरे, शोभा येई. मी सातव्या इयत्तेत आल्यावर त्याचा माझा स्नेह जमू लागला. त्यापूर्वीचे त्याचे एक बंधूही आबा दरेकरांच्या मंडळीतील पत्तेसोंगट्याच्या युगात समाविष्ट असत. त्यामुळे आमचे सखारामपंतही त्या तिळभांडेश्वराच्या गल्लीत पूर्वीपासूनच वरचेवर पायधूळ झाडीत असत. सखाराम मुळचाच जितका टवाळ तितकाच धीट, तितकाच मनाचा मोठा. मित्रमेळ्यांत त्याचा शपथविधी झाल्यावर देखील कित्येक दिवस, त्या मंडळाच्या साप्ताहिक बैठकीत ही स्वारी जेव्हा केव्हा येईल तेव्हा त्या बैठकीच्या गांभीर्यात त्या सखारामच्या बेशिस्तपणाचा सुरुंग पायाखाली लागल्यासारखी धडकी भरे. केव्हा त्याच्या माकडचेष्टांनी तो सुरुंग हसण्याच्या धडाक्यात उडेल नि त्या बैठकीचे गांभीर्य कोसळेल याचा नेम नसे. पण हळूहळू सखारामाच्या त्या चेष्टा मावळत चालल्या. मी थोडे दाबताच तो गंभीरपणे बसण्याचा यत्न करी. माझ्या संभाषणाचा, संगतीचा आणि मित्रमेळ्याच्या संस्काराचा परिणाम होतहोत ध्येयशून्य सखारामाचा ध्येयभक्त सखाराम झाला. आणि शेवटी स्वदेशाच्या स्वातंत्र्यार्थ अनन्वित शारीरिक छळ सोसावे लागले तरी प्राण जाईतो विश्वासघाताचा शब्दही न उच्चारता त्यापायी अंती प्राण देखील सोडणारा हुतात्मा सखाराम झाला. पण ते सर्व पुढे! ज्या वेळी माझ्या स्नेहाने आकर्षित होऊन तो मित्रमेळ्यात काम करू लागला त्यावेळी त्या भावी स्थित्यंतराची कल्पना देखील कोणास नव्हती. मंडळीतील एक ब्याद पण कोणास नकोशी न वाटणारी, जवळजवळ हवीशीच वाटणारी ब्याद हीच काय ती सखाराम गोऱ्यांची त्या वेळची मित्रमेळ्यांतील मोठ्यात मोठी पदवी होती. यावाचून खाडेबंधू, सरोदे, शंकर गिर गोसावी, धनप्पा चिवडेवाला, देवसिंग परदेशी, खुशालसिंग, गणपती मगर, मायदेव, घनःशाम चिपळूणकर प्रभृति त्यांच्या त्यांच्या शक्तीप्रमाणे एकनिष्ठपणे संस्थेची

सेवा करणारी अनेक लहानमोठी मंडळी मित्रमेळ्यात या वर्षी समाविष्ट झाली. मायदेव हा एक विनोदी प्राणी असे. पण त्याचा स्वभाव उनाड वा बाष्कळ नसे. माझ्या त्या वेळच्या अगदी एकनिष्ठ अनुयायात तोही असे. पण देशकार्यात पडला तो माझ्या संगतीने. मी दूर झाल्यावर ती सुटताच त्याची ती देशकार्याची दिशाही सुटली. पुढे तो एक विनोदी नट म्हणून एका नाटक मंडळीत प्रसिद्धी पावला, असे मी अंदमानात ऐकले.

या भागात उल्लेखिलेल्या आणि इतर अनेक मंडळींचा मजवर जो अत्यंत लोभ जडलेला असे तो मी त्यांच्या संस्थेचा प्रमुखतम पुढारी म्हणूनच नसून, त्यांना वाटणाऱ्या मजविषयीच्या वैयक्तिक स्नेहामुळे असे. ह्या सर्व अशिक्षित-शिक्षित स्नेहांशी मी अगदी मनमोकळेपणाने वागावे, गुरु म्हणून मला मनःपूर्वक ते सन्मानित असताही मी त्यांस सलगीने बरोबरचे स्नेही म्हणून जवळ बसवून घ्यावे. त्यांची आपापसातील भांडणे मिटवावी. कोणी काय अभ्यास करावा. कोणी काय धंदा करावा, तो नेमून द्यावा. त्यांच्या कौटुंबिक संकटात त्यास हातभार द्यावा. यापैकी बहुतेक तरुणांचा आणि प्रौढांचा- कारण- त्यापैकी कित्येक माझ्याहून वयाने पुष्कळ मोठे असत- माझ्यावर इतका विश्वास आणि भक्ती असे की माझा शब्द त्यांना वेदवाक्य वाटे. वेळी आई-बापांचा व बायका-मुलांचा दंडक देखील माझ्या शब्दासाठी त्यांनी मानू नये. त्यांस काही समजवावयाचे म्हणजे त्यांचे आईबाप वा कुटुंबे मला येऊन त्यांस समजावून सांगावे म्हणून विनवीत. कारण मी सांगितल्यास ते ऐकतीलच असा अनुभव असे. मीही माझ्या स्वतःच्या लाभासाठी वा लहरीसाठी त्यांच्या मजवरच्या विश्वासाचा दुरुपयोग करून घेतला नाही. तर सर्वदा त्यांचे हित ज्यात असेल त्याच गोष्टीचा अनुरोध करीत असावे. जातीपातीचा अहंकार माझ्या ठायी मुळीच नसे. आपण मोठे, अमुक लहान वा अडाणी अशा गर्वाने मी कोणाशीही वागत नसे. उलट माझ्यावर हाच आक्षेप आल्यास माझ्या शिक्षित सहकाऱ्यांकडून येई की मी जात किंवा धंदा किंवा शिक्षणाची योग्यता न पाहता सर्वांशी फार बरोबरीने वागतो नि त्यामुळे माझ्या मोठेपणास कमीपणा येतो. असा मोठेपणा मला पोकळ आणि दुर्बळ वाटे. मी समानतेने वागत असताही माझ्या स्नेह्यांनी वा अनुयायांनी आपण होऊनच जो मोठेपणाचा आदर वा भक्ती मजविषयी बाळगावी तोच खरा आदर असे मला वाटे आणि अशी माझ्या सहकाऱ्यांची आणि अनुयायांची भक्ती आणि आदर मला सर्वदा लाभत गेल्यासच मी त्या माझ्या सलगीच्या आणि बरोबरीच्या स्नेहाळू वर्तनाचे समर्थन आणि समाधान समजतो. संस्थेचे काम वाटून देण्यात मात्र विश्वासपात्रतेची पारख करून ज्याचा जो गुण त्या मानानेच मी त्यास निवडी. त्या कामी ती निवड अगदी कसोशीने करी. स्नेह वा वशिला तेथे चालू देत नसे. पण केवळ वैयक्तिक बोलणे, हसणे, बसणे, साहाय्य देणे वगैरे प्रसंगी कोणासही हीन लेखीत नसे. बडेजावी वर्तन कोणाशीही करीत नसे. पण त्यामुळे माझी योग्य मर्यादा ते माझे स्नेहीमंडळ उलट अधिकच पाळीत असा माझा तरी अनुभव आहे. माझ्या या वयातही माझ्यावर शेकडो समवयस्क आणि प्रौढ स्नेह्यांचा आणि अनुयायांचा अत्यंत लोभ आणि भक्ती असे. मी स्वतः कोणासही अनुयायी समजत नव्हतो. सर्वांशी बरोबरीच्या स्नेह्यांसारखेच प्रेमळ वर्तन ठेवी. अनेक स्नेह्यांसह मी केव्हाकेव्हा संध्याकाळी किंवा चांदण्या रात्री गोदेच्या घाटावरील सुंदर पटांगणात किंवा सभोवरच्या उंच नि भव्य

देवळाच्या गच्च्यांवर जाऊन गप्पागोष्टी कराव्या. केव्हा लालबुंद कलिंगडे, शेव, चिवडा, पुऱ्या आणवून आम्ही मंडळींनी एकत्र सरमिसळ बसून फराळ करावा. न्हावी, मराठे, वाणी, कुणबी, ब्राह्मण, प्रभु आमच्यात कोणाची जात कोणची हा विचारच नसे. त्या काळी हिंदु स्पृश्यदेखील एकत्र बसून फराळ करीत नसत. एकदा चैत्रातील हळदीकुंकवाचे निमित्ताने आम्ही ब्राह्मणाच्या घरी गेलो असता त्यांनी दिलेली फोडणीची डाळ आमच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे एकाच ठिकाणी सरमिसळ बसून खाल्ल्यामुळे केवढा गवगवा झाला होता! आमच्या तरुणांस घरोघर वडिलधाऱ्यांकडून या पापाचा जाब देतादेता पुरेसे झाले, पण आमच्या मंडळीचे हे 'उपहार' हा चहाचिवडा उघडउघड सरमिसळपणे उतरत नसे. आमच्या मंडळीपैकी आमचे नाना आणि तशी देवलसी मंडळी मात्र बरेच दिवस दूर बसून आपला भाग खात. या मंडळीनी आबा दरेकरांची चोखून टाकलेली उसाची चुलटी रस्त्याने चालताना मी ओलांडून गेलो तरी प्रथमप्रथम दोष मानावा- कारण आबा दरेकर शूद्र! शूद्राची उसाची चुलटी मार्गावर पडलेली, ती जातिवंत ब्राह्मणाने टाळून दुसरीकडे जावे की ओलांडावी!! त्याचा विटाळ नाही होणार? इतकी त्या काळी विटाळवेडाची परमावधी समाजात चालू होती. पण आम्ही ती तोडीत चाललो तरीही जुन्या भावनांच्या मंडळीस मी कोणताही निष्कारण उपद्रव देऊ देत नसे. पण उलटपक्षी ही विटाळवेडाची मूर्ख आणि मारक रूढी तोडण्याच्या आम्हा सुधारकाच्या आमच्या आमच्यापुरत्या स्वातंत्र्यात त्यांनीही लुडबूड करू नये असा माझा सक्त कटाक्ष असे. हळूहळू या विटाळवेडाच्या रूढीचा विचार करताकरता आणि आमच्या देखोदेखी आमच्या बाबांच्या आणि तशाच आमच्या संस्थेतील इतर सोवळ्या मंडळींचाही कल आमच्या जातिसमानतेच्या मताकडे झुकू लागला.

चैत्र वैशाखाच्या चांदण्यात गोदेच्या घाटावर नि पटांगणात निवडक स्नेहीमंडळीसह चांदण्यात अशा गोड गोड नि गुलाबी कलिंगडाच्या फाका खात, नाना असंबद्ध विषयावरील संभाषणाच्या लाटांवर कुठेच्या कुठे जाणारे झोले घेत बसणे मला तेव्हा फार आवडे. विनोद, कोट्या, उपरोध, गमती, चुटके, कविता, भेंड्या लावणे, चंद्राची नि ताऱ्यांची माहिती, राजकारण, गाणी, इतिहास, नकला काय काय गंमतीच्या गप्पा मारीत आम्ही त्या चांदण्या रात्री घालवाव्यात! कधी मोरोपंतांच्या एकशे आठ रामायणांपैकी महत्त्वाच्या रामायणाचे प्रकार मी तोंडपाठ म्हणून दाखवावे- निरोष्ट, दाम, ओवी, मंत्र, लघु इत्यादी मोरोपंती अद्भुत् कारागिरीच्या रामायणाच्या प्रत्येक दहा-बारा पहिल्या नि शेवटच्या आर्या मला पाठ येत. त्या मी म्हणाव्या, इतिहासातील रम्याद्भुत प्रसंग सांगावे. किती मनोवेधक पण मनोरंजक गप्पा असत त्या! पण त्यातही सर्व विषयांच्या आंदोलनाचे केंद्र असे राजकारण! स्वदेशाला स्वतंत्र करण्यासाठी तळमळणारे राजकारण! लहानपणापासूनच दहा मंडळीत अशा संवादास नाना प्रकारच्या रंगांनी रंगवून सोडण्याची सवय झाल्याने माझ्या Conversational Powers संभाषण शक्ती सारख्या विकसित होत गेल्या.

**मनाची पंचसभा (पार्लमेंट)**

नेहमी मंडळी माझ्याभोवती असेच. मीही त्यांच्यात रंगेच. पण मला मधूनच एकांताचीही लहर वारंवार येई. घरातील खोलीत वा पुढील दाराच्या गच्चीवर वा गंगेच्या वा नारोशंकराच्या देवळातील

गच्चीवर वा गंगेच्या वा नारोशंकराच्या देवळातील गच्चीवर वा घाटावर मी वरच्यावर गुपचूप सगळ्यास टाळून अगदी एकटे जाऊन बसावे आणि मनाशीच बोलत रमावे. एकांतसमयी मी कधीकधी लहानलहान सुभाषिते, कविता करी. उदाहरणार्थ, त्या काळचे असेच गोदातीरावर रचलेले हे सुभाषित पाहा :

*।। गंगातीरी बिंबित दीप शिखा नचि परंतु कज्जळते।।*

*।। सज्जन हृदय असेची दोषा त्यजुनी गुणाकडे वळते ।।१।।*

पण बहुधा अशा एकांती मी आत्मनिरिक्षणात गुंग होई. माझे अंगचे गुण कोणते, कोणाचे आक्षेप काय आहेत, त्यात तथ्य कोणते, अतथ्य कोणचे, माझे कोणचे चुकते, काय बरोबर याचा अगदी विरहित दृष्टिने मी माझ्या मनाशीच विचार करी. भगूरला होतो तेव्हांपासून महिन्या दोन महिन्यांनी एकदा तरी ह्या माझ्या "मनाच्या पार्लमेंटची" या मनाच्या पंचसभेची एक तरी बैठक भरेच. माझे कोण्या मित्राशी भांडण झाले की तो खटला अशा एकांतसमयी मीच माझ्या मनाच्या न्यायालयासमोर मांडावा आणि त्या चर्चेस मनाचे पार्लमेंट म्हणावे, विवेकास न्यायाधीश नेमला असे मानावे. त्यात त्या मित्राच्या चुका एका मनाने सांगाव्या. दुसऱ्या मनाने माझ्या चुका सांगाव्या नि मग वाटल्यास माझ्या विरुद्धही निर्णय एखाद्या मध्यस्थाप्रमाणे माझा मीच घ्यावा. मला मंडळींना टाळणे कठीण जाई. मी दिसेनासा झालो की कोणी तरी शोधीत आलेच. केव्हा केव्हा घरात मंडळी दाट जमून अशा गप्पा छाटीत आहे तोच मला एकांताची लहर अकस्मात आली तर मी माझ्या खोलीतील एका फडताळात संध्याकाळच्या वा रात्रीच्या अंधारात तोंड खुपसून स्वस्थ उभे राहावे. कोणास वाटे हा पुस्तके वगैरे सामान नीट लावीत आहे. पण मी त्या फडताळात तोंड घालून उभ्या उभ्यास स्वस्त एकांताचे, अगदी मनाच्या स्वस्थेतेचे, सुख उपभोगीत असे. काही संकट आले, संस्थेच्या वा व्यक्तिच्या प्रकरणी एखादा पेच आला, की मी एकांतात जाऊन माझ्या मनाच्या पंचसभेची ही बैठक बोलवावी. निःपक्षपातपणे विचार करण्याची बळकट शक्ति विकसित होण्यास हा माझा करमणुकीचा छंद पुष्कळ उपकारक झाला, असे मला वाटते. बहुधा कार्याने वा मंडळींच्या गर्दीने व्यग्र झालो असता मी एकीकडे जाऊन मुळीच काही विचारच येऊ न देता एकांत शांत बसे, तेव्हा मला फार प्रसन्नता वाटावी. आणि माझी कार्यशक्ति पुन्हा ताजीतवानी व्हावी. पूर्वी अगदी लहान वयाचा होतो तेव्हा देवीपुढे ध्यानस्थ बसे. मला वाटते निर्विचार, निःशब्द एकांताच्या सुखाची गोडी तेथूनच मला लागली असावी.

### बाबांचे प्राणायाम साधनेचे यत्न

पण तिची प्रगति चित्तवृत्तिलयाचा शास्त्रोक्त अभ्यास करण्यापर्यंत या वेळी अर्थातच पोचली नव्हती. मला त्या वयापर्यंत योग हे प्रत्यक्ष सिद्ध शास्त्र आहे हीही निश्चिति नव्हती. एकांतातील मन शांत करीत असता जी सहज प्रसन्नता वाटावी तिचीच गोडी तेवढी मी तोवर चाखली होती. बाबांनी मात्र त्या वेळी योगाचा अगदी शास्त्रोक्त अभ्यास करण्याचा मोठा निग्रही यत्न चालविला होता. सुयोग्य गुरु असा कोणी नसे. पण येत्याजात्या गोसाव्या-बैराग्याकडून आणि स्वतः वेदांती पुस्तके वाचून त्यांना जे सुचे त्या मार्गे ते साधना करीत. त्यांनी आम्ही राहत होतो त्या घराशेजारच्या दातारांच्या देवळात पडदे लावून सकाळ ते मध्यान्ह जप करावा. ध्यानस्थ राहावे. मार्गर्शक नसताही त्यांनी प्राणायामाचा अभ्यास

सुचेल तसाच चालविला. इतकेच नव्हे, तर धूतिनैती शिकण्यासही आपल्याच शिकवणीखाली आरंभ केला. चांगले पंधरा-वीस हात फडके ते तोंडाने चघळीत चघळीत पोटात नेत आणि ते आतल्या स्नायूत आत फिरवून पोट धुवूनपुसून टाकीत. मग तोंडानेच बाहेर आणीत. मला भय वाटे की, निग्रही प्राणावरोध आणि असले हठयोगी प्रयोग कोणा तज्ज्ञाच्या साहाय्यावाचून त्यांनी केवळ निग्रहाने सुचेल तरी केल्यास प्रकृतीस धोका होईल. शेवटी तसेच झाले त्यास भयंकर डोकेदुखीची व्यथा लागली. त्यांस भूक इतकी भयंकर लागावी की पोळ्यांच्या चळथीच्या चळथी त्यांस वाढतावाढता स्वैपाक करणाऱ्याने थकून जावे. प्रथम त्यांनी या विकारासही दाद दिली नाही. उलट ती पुरस्सर प्रसादचिन्हेच मानली. पण शेवटी कुठे चुकले काय की त्यांचे डोके सुजले. कवटीचे हाड मऊ होऊन बोटाने दाबावे असे झाले. मेंदूत रक्तविकार झाल्यासारखे सुजून डोक्यावर ठिकठिकाणी गोळे यावे. त्यायोगाने त्यांना महिनोगणति त्रास झाला. तरी देखील चुकलेल्या हठयोगी निग्रहानेच तो झाला असे त्यांना नक्की वाटेना. परंतु संभव तरी तोच अशी समज काढून आम्ही त्यांचे ते तसे मार्गदर्शक तज्ज्ञावाचून देहावर प्रयोग करीत सुटणे बंद पाडले.

**केरळकोकिळ**

या संधीसच एकदा महाराष्ट्रात या वेळी नावाजलेल्या “केरळकोकिळ” मासिकाचे कर्ते श्री. आठल्ये हे मित्रमेळ्यास भेट देण्यास येणार होते. केरळकोकिळकारांची कविता फार चटकदार, साधी आणि गोड असे. “राघोभरारी,” “स्वदेशीचा फटका,” “सासरची पाठवणी” इत्यादी त्यांची काव्ये घरोघर वाचली जात. त्यांनी गीतेवरही श्लोक केले होते. अनुवाद केला होता. त्या मासिकातले पुस्तक परीक्षणही फार मार्मिक, चुरचुरीत आणि केव्हाकेव्हा ग्रंथकारावर अगदी तुटून पडण्याइतके निर्दय असे. ह्या मासिकाच्या कवितांची धाटणी मीही उचलण्याचा प्रयत्न करी. त्यांच्या त्या मार्मिक तिखट टीकापद्धतीच्या अभ्यासाने लेखनातील गुणदोषांची मार्मिक पृथक्करण करण्याची तीक्ष्ण दृष्टि कधीकधी तर अगदी काकदृष्टि माझ्याही अंगी मुरून गेली. विविधज्ञान विस्तारादिक त्या काळच्या बहुतेक मासिकाप्रमाणे मी केरळकोकिळ नियमाने वाची. वाङ्मयप्रकरणी बराचसा वाखाणीही. मित्रमेळ्यात बाहेरच्या प्रसिद्ध व विद्वान लोकांच्या भेटी वरचेवर आम्ही जुळवून आणीत असू. तसे केरळकोकिळकारही भेटीस येणार होते. त्यांच्या स्वागताची कविता करणे मजकडे संस्थेने सोपविले. त्यातील नारोशंकराच्या गच्चीवर चांदण्यात बसून ‘दोषभीति मनि धरुनि’ मी जे श्लोक रचले त्यातील दोनतीन श्लोक आठवतात ते त्या वयातील कवितेचा प्रकार म्हणून खाली देतो.

*श्रीमत् शंभुशिरावरी विलसते गोदावरी सर्वदा ।।*
*पापक्षालन-काम सन्मुनिवरे जी वेष्टिता सर्वदा ।।*
*धावे श्रेष्टपदस्थितापरि धुण्या नीचांग गंगासती ।।*
*श्रेष्ठामूर्ति तुझी आम्हास्तव इथे येता तशी भासती ।।१।।*
*श्री राजा शिव, घोर शत्रु दमनी दादा भरारी भले ।।*
*स्तोत्रे त्वद्रचिते तया वरिल जे दैवे आम्हा लाभले ।।*
*ही जिव्हा जपते तसे निशिदिनी के कर्ण नादावले ।।*

*दृष्टिही न चळे हिला उगिच म्या त्वद्दर्शना दाविले।।२।।*
*श्रीगीता जननी तुझी तव गृहा येता त्वरे त्या दरे ।।*
*होती नांदत कीर्ती देवि तुजला सेवून अत्यादरे ।।*
*सासूचा छळ आठवूनि निसटे गेली पळूनी दुरी ।।*
*माझ्या कर्ण पथे असे कळविण्या धैर्यास जिव्हा करी।।३।।*
*बिंदूंचे बनते तळे हृदयी ह्या सृष्टिक्रमाते धरा ।।*
*हिंदू जे असतील ते मिळवुनी निर्दाळणे या परा ।।*
*निंदूनी जनघातकारक सुखा राष्ट्रार्थ मृत्यू वरा ।।*
*शुक्लेंदूज्जल बीजमंत्र हृदि ही संस्था थरी उर्वरा।।४।।*
*आजी येउनिया गृहासि अपुल्या वेळात आम्हावरी ।।*
*त्वां जी केलिस सत्य ती उफती! आशा परी हावरी ।।*
*पाजी आजि अम्हासि बोध सुरसा दोषा सदा सावरी ।।*
*गाजी तूं करणे दया त्यजुनिया रोषास दासांवरी।।५।।*

याच संधीस मी “चुकलेले कोकरू,” ( Lady of the Lake ) ह्या माझ्या फार आवडत्या स्कॉटच्या इंग्रजी काव्याचा मराठीत अनुवाद केलेले शेसवाशे श्लोकप्रभृति अनेक कविता रचल्या. मित्रमेळ्याच्या सार्वजनिक चळवळीची, माझ्या लग्नाच्या वैयक्तिक कार्याची, ह्या कविता निबंधप्रभृति लेखनाची गडबड चालू असताच मी हायस्कूलमधून सातवीमध्ये पास झालो नि मॅट्रिक परीक्षेसाठी मुंबईस शाळेच्या वतीने धाडल्या जाणाऱ्या इच्छुकात माझे नाव आले. आता परीक्षेसाठी केवळ महिना सव्वामहिना उरला होता. तेव्हा सर्व कार्ये क्षणभर बाजूस ठेवून ह्या महिन्यात केवळ अभ्यास करावयाचा असे ठरवून नि मागे निदर्शविल्याप्रमाणे मुंबईस आलो. माझे स्नेही बाळू बर्वे यांच्या ओळखीने मी त्यांच्याबरोबरच आंग्रे यांच्या वाडीत उतरलो आणि अभ्यासाचा अगदी धडाका चालविला. तेथील त्या वाडीच्या मोठ्या विहिरीत स्नानाच्या वेळी उड्या माराव्या, डुंबावे, खानावळीत जेवावे नि दिवसभर अभ्यास करावा. मी शिकवणी वगैरे कधीच ठेवली नाही. स्वतः वाचून समजून घेई. त्या वाडीत तेव्हा नेटिव्ह ओपिनिय हा जुन्यातील जुना छापखाना असे. ते पत्रही असे आणि टिळकांचे स्नेही नामदार दादाजी आबाजी खरे हे प्रसिद्ध पुढारीही तेथेच राहत. या एक महिन्यात अभ्यास पुरा केला. मॅट्रिकला बसलो. मुंबई नगर आणि विश्वविद्यालय पाहण्याची, मला आठवते अशी, हीच पहिली वेळ. परीक्षेचे कागद बरे गेले. मला वाटते याच वेळेस मी दोन-तीन दिवस अलिबागेस गेलो आणि तेथील वक्तृत्वसभेत अविभक्त कुटुंबपद्धतीसारख्या कोणा एका विषयावर बोललो. या विषयाचे चांगले अध्ययन परीक्षेच्या धांदलीत न करताच मी गेलो होतो. तरीही भाषण रंगले चांगले. तोच त्यात मी बोअर युद्धात त्या लोकांचे स्वातंत्र्यहरण करण्याच्या इंग्रजी दुष्ट आकांक्षेवर मित्रमेळ्याच्या परंपरेची कडक टीका करू लागलो. ती तिथे कशी पचणार! सर्व सभासद नि परीक्षक चुळबूळ करू लागले. शेवटी अध्यक्षांनी मला मध्येच तो भाग अप्रस्तुत म्हणून गाळावयास सांगितले. मी ते नाकारून भाषणच बंद केले. अर्थात मला पारितोषिक

मिळाले नाही. वास्तविक अध्यक्षांचे सांगणे वावगे नव्हते. तरी देखील मला विषयांतरामुळे पारितोषिक देता आले नाही, याविषयी अध्यक्षांनी खेद प्रदर्शित केला आणि माझ्या तडफदार वक्तृत्वाची प्रशंसा केली.

मुंबईहून मॅट्रिकची परीक्षा देऊन आल्याबरोबर नाशिकला प्लेगची गडबड पुन्हा चालू झाल्यामुळे आणि विसाव्यासाठीही मी परीक्षेचा निकाल लोगेतो कोठुरला आजोळी गेलो. तिथे असताना मी मोरोपंतानी रचलेल्या "गंगावकिली"च्या धर्तीवर मामांच्या सांगण्यावरून त्या वेळच्या कोठुरच्या त्यांच्या आत्पेष्टांच्या आणि माझ्या स्नेहीमंडळाच्या चिरकालिक स्मरणार्थ "गोदावकिली" ही कविता रचली. कोठुरला गोदेचे पात्र मोठे सुंदर असे. तेथील अुंच घाटावरून मी पात्रात उड्या मारावयास शिके. ह्या घाटावर निवांत बसून मी ही कविता रचली. ती पुरी होताच गावच्या अनेक प्रतिष्ठित कुटुंबातील आबालवृद्धांनी मला बोलावून बोलावून ती मजकडून म्हणवून घेत ऐकावी आणि मोठी प्रसन्नता व्यक्तवावी. नाशिकचे प्रसिद्ध गोपाळराव बिवलकर वैद्य हेही प्लेगनिमित्त स्थलांतर करावयास आले होते. त्यांनी माझी आई शेवटच्या बाळंतपणात अडली होती तिला जिवावरच्या संकटातून सोडविली होती. तेव्हापासून आमच्या कुटुंबाच्या वेळीप्रसंगी ते बरेच उपयोगी पडत. त्यांनीही माझ्या त्या वयात मी कविता रचली याचे कौतुक करून मला जवळ घेऊन पाठ थोपटली. त्या विशीच्या आतील वयातील माझ्या भावना आणि विचार त्या वेळच्याच शब्दांत सांगणारी बहुतेक व्याख्याने, लेख, कविताप्रभृति अस्सल पुरावा नष्ट झाल्यामुळे तत्कालिन ज्या काही थोड्या बऱ्यावाईट कविता अजून मला आठवतात. त्या काव्याच्या दृष्टीने नसल्या तरी त्या पिढीच्या चरित्राच्या दृष्टीने तरी अवश्य संग्राह्य होत, असे समजून त्यातील आठवतात त्या खाली देत आहे.

**गोदावकिली**

*धवले धन्ये गोदे सन्मुनिवर संघ-वेष्टिते गंगे ।।*
*संगे तव तो अतितर दुस्तर भवसिंधु-परि त्वरें भंगे।।१।।*
*आजवरी बाह्यांगा न्हाणिती माता न अंतरंगाते ।।*
*श्री सांब शिराखाली साधाया कार्य येत गंगा ते ।।२।।*
*घाट नव्हे पाट स्वयें मांडुनी न्हाणावया आम्हा तो का।।*
*स्वांगी पसरवि खेळवि जगजननी दे अवर्णनिय तोका।।३।।*
*पळता केव्हा येते धावत धरण्या फुगोनि रागाने ।।*
*केव्हा खडकी बसुनी मोहवि काढुनी सुस्वरा गाने ।।४।।*
*विकसित कमले दाउनि न्हाअल पहिला मिळे तयाशि वदे ।।*
*ऐशा परोपरीने चुचकारूनि माय ही सदाशिव दे ।।५।।*
*पूजापेक्षित ऐशा भूमितलि अनंत देवता असेति ।।*
*स्वशिशु समावन करती तुजसम अजि तूचि गे दुजी नं सती ।।६।।*
*तरिही अबुद्ध बाल प्रार्थित जननी तुझ्या पदा हा की ।।*

कौस्तुभवासि जनांच्या योगक्षेमासि तू सदा हाकी ।।७।।
सांप्रत सर्वचि झाले माते हे भरत खंड हीन खरे ।।
परवशता बहू दुस्सह बरवी हृदयस्थ नडगिची नखरे ।।८।।
तत्तारणा झटावे सदये संतत समस्त गावकरी ।।
गाव जुटीने उठला तरि तदहित केलि दुष्ट राव करी ।।९।।
मन्मातुल कुलज, जननि! तारी सारे त्वरे मनोहर ते ।।
होऊत तद्वंशज कृति सत् कृतिने संतजन मनोहरते ।।१०।।
गंगे संकट काली द्यावा त्या डोंगऱ्या सदा थारा ।।
तत्सद्वंशज शुचिमति पत्नीसह वृद्ध भाऊ उद्धारा ।।११।।
तद्वंशज अप्पांना, तात्यांना, तेवि शंकरा बाला ।।
रक्षी सांग तयांच्या गेही सिद्धीस सिद्धीस शं करायला ।।१२।।
कानिटकर बंधूत्रय पावन, दे भक्ति रुचिरसा कर गे ।।
तद्वंशवृद्धि होउनि येवो जन वदनि रुचिर साकर गे ।।१३।।
गंगे परोपकारी करी रत गोपालराव बिवलकर ।।
शस्त्रक्रियेत मिळवी हटकुनी ज्याचा यशासि धवल कर ।।१४।।
गुरुजींचे सद्गुरुसि जावोत गुणज्ञ नित्य तर तरूनी ।।
विद्या परीक्षकास्तव जशि तरुणास्तव समुत्सुका तरुणी ।।१५।।
नीच विसरावे माते उद्योगी ते समस्त कुळकर्णी ।।
ग्रामजनांचे वदनी होवो तद्रुचिर कृत्य ललकरणी ।।१६।।
ख्यातपित्यासम केशव, तो हरि, गोपाल, बाल, भागवत ।।
होऊत सुविद्यारत निज देशिहतार्थ दक्ष भागवत ।।१७।।
यत्पूर्वजे मिळविला गाव जहागिरी प्रभुरते बरवे ।।
सन्मति स्वभूमिसेवा करवुनि तारा समस्त ते बरवे ।।१८।।
होती शुभगा भारत देवी स्वातंत्र्यशालु वापरित ।।
त्याच्याच चिंधड्या ह्या अभिमाने जपुनि ठेवु त्या त्वरित ।।१९।।
कोणे काली धाडिल प्रभु कोणी तुणविणार कुशल जरी।।
उपयोगी ह्या पडतिल जरी जपुनि सतेज ठेवु त्यास तरी ।।२०।।
घरबुडवा कलह मिटो, अज्ञ असा व्यर्थ डौल समुल तुटो ।।
विघ्नाचे ऊर फुटो सत्कुल हे कर्तिसंपदेस लुटो ।।२१।।
तव भक्त शुद्ध बर्वे श्री गंगे साप्त तार भाऊते ।।
भव सर्प दंश नाशक प्रभु भजन बरा उतार भाऊते ।।२२।।
चिंता कानन जाळूनि अण्णाना जननि गे सदा शिवदे ।।

*करि दीर्घायु यशस्वी साप्त तया दास हे पदाशि वदे ।।२३।।*
*मजला मत्प्रिय मित्रां संरक्षा वासुदेव-तात्यांना ।।*
*मत्सह वरदा व्हावी सद्‌विद्या आशुदेवता त्याना ।।२४।।*
*दे वर आम्हा प्रति की ह्या हस्ते देशशत्रु दंडावे ।।*
*उद्धार तिघांसिसवे "तो आधी" असे आम्ही न तंडावे ।।२५।।*
*जननी सकलत्र सदा दादादना प्रेम दृष्टिने पाला ।।*
*यश विभव तया द्यावे रक्षावे गान-कुशल गोपाला ।।२६।।*
*सुज्ञ सुशिक्षित नाना तत्बंधू विनायकासि रक्षावे ।।*
*भक्षावे किल्मिष तिहि देशाहिताते सदैव लक्षावे ।।२७।।*
*पात्र करावे गंगे सद्‌गति दानार्थ बापुना साचे ।।*
*मुक्ता करी सदये की भवकर बहु पाप ना पुन्हा साचे ।।२८।।*
*ते रामभाऊ बरवे संरक्षा पत्नि सहित सकलाना ।।*
*प्रिय दामोदर त्यांचा होवो तो सुखनिवास सकलाना ।।२९।।*
*सन्मित्र लखापती तो बलवंत हि नित्य सुपथ गमनि सजो ।।*
*विद्यालंकृत होउनि पंचकडी मिळुनि 'राम-हरिस' भजो ।।३०।।*
*देश यशाचे वर्धक सांप्रत अतिदीन क्षेत्रकार सदा ।।*
*होवोत धान्य वृष सह संपन्न असो प्रसन्न त्या रसदा ।।३१।।*
*वाणी सुतार गवेळी लिंगायेत भिल्ल आणि वेसकर ।।*
*तव दरबार अभेदचि रक्षि तयांचे जगात सुयशकर ।।३२।।*
*गोदे तव राजसभे वकिली शिशुची असे अशी सरली ।।*
*तरली सुकल्पना ज्यावरि त्या तव जलि तरंगसम विरली ।।३३।।*

शेवटी कोठूरला मी कवि म्हणून इतका गाजलो, की तेथील तमासगिरांच्या फडानीही माझ्यामागे लावण्या करून देण्याची निकड लावली. आणि त्या फडात आमच्या मामांचा जो आवडीचा फड असे त्यास काही लावण्या देत असे. मामांनीच सांगितल्यावर मी काही लावण्या "दारुडा," "दोन बायकांचा दादल्या" प्रभृति त्यातल्या त्यात उपदेशपर होतील अशा विषयावर रचून दिल्या.

कोठुरच्या या भेटीत तेथील मित्रमेळ्याच्या मी मागे स्थापिलेल्या शाखेच्याही बैठकी अर्थातच जोराने भरू लागल्या. आमच्याहूनही वयाने किंचित लहान असलेले बर्वे प्रभृति किशोर मंडळी संस्थेत आली. त्यापैकी पहिला किशोर पुढे बऱ्याच लौकिकास चढून आजही देशसेवेचे कार्य बरेच करीत आहे. आमच्या नाशिकच्या मित्रमेळा संस्थेत श्री. आप्पाराव पट्टेकर नावाचे एक प्रौढ आणि नाशिकच्या त्या वेळच्या वकिली राजकीय चळवळीत पुढे आलेले गृहस्थ म्हसकरांच्या वळणाने सभासद झालेले असत. ते त्या वेळी तेथील बर्वे जहागिरदार यांची एक दुसरी शाखा असे त्यांच्या कुटुंबातील कारभारी असत. त्या

श्री. पट्टेकरांच्या आमंत्रणावरून मी त्या गावी जाऊन तिथेही वाड्यात एक व्याख्यान दिले. तेथीलही काही मंडळी जमवून मित्रमेळ्याचे राजकारण विवेचून त्यास त्या संस्थेचे सभासद करून घेतले.

### माझा धाकटा भाऊ बाळ

कोठुरला माझ्याबरोबर माझा धाकटा भाऊ बाळही होताच. तो लहान असताच आई-बाप आम्हास सोडून गेले आणि स्वतः त्यालाही प्लेगचा भयंकर आजार होऊन कित्येक महिन्यानंतर त्याचा म्हणतात तसा पुनर्जन्म झाला. तेव्हापासून बाबांनी आणि वहिनीनेच त्या लेकराला वाढविले. अशा मायेने की आई-बापांनी त्याहून अधिक ते काय करावे. त्यातही त्या वेळी बाळास माझा फारच लळा असे. नेहमी मजपाशीच राही. त्यामुळे अगदी लहानपणापासूनच माझ्या स्वभावाच्या मुशीतच त्याचाही स्वभाव ओतला गेला. माझ्या व्याख्यानाप्रमाणे त्याने व्याख्याने देण्यास शिकावे. माझ्या कविता पाठ करून तशा आपण करू पहाव्या. माझ्या संभाषणातील आणि विवादातील कोट्या नि कोटिक्रम त्यानेही अचूक उचलावेत. मित्रमेळ्याच्या राजकारणात ती मुले माझ्यापेक्षाही लहान वयापासूनच मुरलेली होती. मित्रमेळ्याच्या संस्थेने त्या किशोरांना ती स्वदेश-स्वातंत्र्याची गायत्री शिकवून धार्मिक व्रतबंध केलेला होता. ती संस्था त्या मुलांचे एक राजकीय गुरुकूलच होते. माझ्या देखोदेखी त्या संस्थेत ह्या मुलांचेही कर्तृत्व विकसत गेले. माझ्या चळवळीच्या धोरणात नि डावपेचात तेही हळूहळू निष्णात होत चालले. मित्रमेळ्याच्या ह्या किशोर मंडळीची स्वतंत्र शाखा उघडली जाताच तिचे चिमुकले पुढारीपण आमच्या लहानग्या बाळाकडेच असे. आता या वेळी त्याचे वय १३ वर्षांच्या जवळजवळ होते. मराठी पाच इयत्ता शिकून तो इंग्रजी शाळेत जाण्याच्या बेतात होता. त्याच संधीस मी मॅट्रिकची परीक्षा देऊन कोठुरास जाताना त्यालाही बरोबर घेऊन गेलो होतो. तिथे मंडळीच्या अभावी मला पुष्कळ शांतता लाभल्याने मला त्याच्या शिक्षणावर लक्ष देण्यास अवसर सापडला. बाळाकडून मी प्रथमपासूनच काव्य, बखरी, चरित्रे, वाचून घेई, समजून देई. कोठुरास त्यास घरीच दोन इयत्तांपर्यंतचे इंग्रजी शिकविण्यात, वीरकथा सांगण्यात, त्याच्याकडून कविता-निबंध लिहवून घेण्यात माझे दिवस गमतीचे जात.

### सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोण

याच संधीस श्री. हरी नारायण आपटे यांच्या ‘करमणूक’ नावाच्या प्रख्यात पत्रात “सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोणते व ते का याची कारणे” ह्यावरील उत्कृष्ट निबंधास पारितोषिक लावले होते. मी हरीभाऊ आपट्यांच्या उषःकालप्रभृति ऐतिहासिक नि समाजाकि अशा बऱ्याच कादंबऱ्या वाचलेल्या होत्या. ‘करमणूक’ मी नियमाने वाची. त्यातील त्या निबंधस्पर्धेत मीही भाग घेतला आणि कोठुरास असताच त्या विषयावर निबंध लिहिला. सर्व पेशव्यात थोर पेशवेपणाचा मान मी पहिले माधवरावास देई. तो निबंध उत्कृष्ट ठरून करमणुकीत प्रसिद्ध झाला नि मला ते पहिले पारितोषक मिळाले. आता मॅट्रिक परीक्षेच्या निकालाची तारीख जवळ आल्याने कोठुराहून मी नाशिकास निघून आलो. एक-दोन दिवसातच तार आली की - **माझी मॅट्रिकची परीक्षा उतरली**

हे कळताच मलाच नव्हे, कौटुंबिक दृष्टीने बाबांनाच नव्हे, तर आमच्या मित्रमेळ्याच्या संस्थेसही फार आनंद झाला. कारण ती संस्था स्थापन झाल्यानंतर तीत आलेल्या युवकांत मॅट्रिक असा पहिल्याने

मीच झालो आणि तोही माझ्या पहिल्याच खेपेस. त्यामुळे त्या संस्थेमुळे राजकारणाच्या नादी लागलेल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे मातेरे होणार म्हणून आमचे शिक्षक, वडील, पालक वगैरे मंडळींनी जे आक्षेप वारंवार घेतले होते त्यांचे तोंड धडाक्यासरशी बंद झाले. त्यातही मी माझा बहुतेक वेळ त्या संस्थेच्या उलाढालीत घालणारा, त्याचा प्रमुखतम पुढारी, मजकडे साऱ्यांचे डोळे, जर का मी प्रथमच अनुत्तीर्ण झालो असेतो तर त्या संस्थेची पतच वरील मंडळीत धुळीस मिळती. पालक आम्हा विद्यार्थ्यांस ती संस्था सोडण्यासाठी सळो की पळो करते नि ते आमचे आम्हासही खाते. याहूनही एक अधिक महत्त्वाच्या दृष्टीने त्या संस्थेस ती वैयक्तिक गोष्टही सार्वजनिक अभिनंदनाची वाटणे साहजिक होते. कारण मी मॅट्रिक झालो तर कॉलेजमध्ये जाण्याचा संभव. आणि मी कॉलेजमध्ये जाताच तिथे माझ्या मागोमाग मित्रमेळ्याच्या क्रांतिकारक तत्वचाही प्रवेश झाल्याविना राहणार नव्हता. याविषयी मी नेहमी म्हणे की नाशिक जिल्ह्याचे ठिकाण, तिथे मित्रमेळ्याच्या क्रांतिकारक तत्त्वांचा प्रसार फार तर त्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांत नि प्रमुख जनतेत होऊ शकला. ते कार्य ती दोन वर्षे चालू होते. पण आता महाराष्ट्रातील यच्चयावत् जिल्ह्यांच्या भावी तरुण पिढीतील निवडक आणि होतकरू युवकांचा संघ सहज हाती पडणार होता. कारण सर्व जिल्ह्यांतून फिरत राहण्याचा द्रविडी प्रणायाम करण्याचे ह्या आमच्या परिस्थितीत वाचू शकेल. कारण तिथे महाराष्ट्रातील होतकरू तरुण जाळ्याच्या एका फेकीसरशी कॉलेजात एकत्रच गवसण्याचा उत्कट संभव असणार. ते तरुण आमच्या क्रांतिकारक तत्त्वाने उत्स्फूर्त झाल्यास ती क्रांतीची बीजे आपापल्या घरी घेऊन जाणार. त्यातही पुढे हे बी. ए. एम. ए. च समाजात मोठमोठ्या योग्यतेची माणसे होणार, पुढारी होणार, आणि त्यामुळे अर्थातच सर्व जिल्ह्यातून आपल्या क्रांतिकारक संस्थेचे आणि धोरणाचे धागेदोरे जाऊन ठिकठिकाणचे पुढारीपण सहजच क्रांतिपक्षाच्या हाती पडेल. त्या पक्षाचे बळ नि वजन वाढून महाराष्ट्राच्या राजकारणाचे रूप पाच-सहा वर्षांत अगदी पालटून टाकण्यास प्रबळ साहाय्य मिळेल. त्या दृष्टीनेच संस्थेने माझ्या मॅट्रिकच्या निकालाकडे पाहिले असल्याने माझी ती प्रवेशपरीक्षा होऊन मला कॉलेजमध्ये प्रवेश होण्याची संधि मिळणे म्हणजे संस्थेचीही प्रवेशपरीक्षा उतरून तिलाही महाराष्ट्रीय राजकारणात प्रवेश करण्याची संधि मिळाल्यासारखेच वाटले आणि तिने विशेष समारंभ करून माझी प्रवेशपरीक्षा पहिल्या खेपेसच आणि सार्वजनिक कार्यात रात्रंदिवस खपूनही उतरल्या-विषयी फारच प्रेमाने सन्मान केला. त्या संस्थेत मी क्रांतिकारक तत्त्वाचा प्रसार महाराष्ट्रभर करण्यास या संधीचा उपयोग कसा करून घेता येईल याचे वर उल्लेखिलेले कारण पुन्हा एकदा स्पष्ट केले आणि मुख्यतः त्या हेतूनचे आणि धोरणानेच आपण कॉलेजातील आपले जीवन व्यतीत करणार, असा निर्धार प्रकटविला.

पण हे सर्व मनोराज्य कॉलेजमध्ये जाण्यावर अवलंबून होते आणि कॉलेजमधल्या व्ययाचा भार मागे लग्नात तोंडी ठरल्याप्रमाणे माझे श्वशुर खरोखरीच घेतात की नाही, घेऊ शकतात की नाही ते निःसंदेह स्पष्टतेने अजून काही कोणी मला वचन दिले नव्हते. म्हणून परीक्षा उतरताच मी माझ्या श्वशुरास ते नक्की उत्तर लिहिण्याची विनंती केली. ते नाशिकला आले. माझी भेट झाली. आपल्या मुलाप्रमाणे माझे ममतेने मॅट्रिक उतरल्याबद्दल कौतुक करून त्यांनी सांगितले की चिंता करू नकोस.

कॉलेजात जा. निदान या वर्षापुरती तरी व्यवस्था होईल. मी आतुरतेने पुन्हा विचारिले की, पण पुढे काय? अर्धेमुर्धेच शिक्षण सोडावयाचे तर मग मुळीच हे वर्षतरी का दवडावे? घरची बाबांची अत्यंत विवंचना असल्याने मी आताच कुठे एखादी नौकरी तरी पदरात पाडून घ्यावी हेच बरे. तेव्हा कॉलेजचे शिक्षण पुरे होईतो तो भार सोसण्याची नक्की हमी मिळेल अशी आताच व्यवस्था लावावी. म्हणजे मला चिंता उरणार नाही! ते हसून म्हणाले, ह्याची चिंता मला का तुला? तू जा तर खरा कॉलेजात! मामाही म्हणाले, त्यांच्या मुलीच्या भाग्योदयाची चिंता तरी त्यांना आहेच ना? तेव्हा सध्या पहिले पाऊल जे निश्चितपणे टाकता येत आहे ते तरी टाकून घ्यावे असे मनाशी ठरवून मी श्री. भाऊरावांच्या त्या वचनाविषयी कृतज्ञतेने आभार मानले नि घरी परतलो. ह्या वचनावर विश्वासून मी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये अर्ज केला. ते वचन माझ्या त्या मायाळू आणि दानशील सासऱ्याने शेवटपर्यंत पाळले. कॉलेजमध्ये प्रवेशाचा हा अर्ज केल्यापासून तो बी. ए. होऊन त्यातून बाहेर पडेतो मला एक दिवसही पैशाची चिंता पडू दिली नाही. वेळी मी इतर विद्यार्थ्यांना हातभार लावू शकलो असेन पण मला कॉलेजमध्ये कोणाच्याही तोंडाकडे पाहण्याची वेळ कधीही आली नाही. इतक्यानियमितपणे नि सढळ हाताने श्री भाऊरावांनी मला साहाय्य पोचविले. मी काटकसरीने राहीच, गणनही (हिशोबही) धाडी, पण त्यांनी ते कधी मागितले नाही. उलट काही आणखी हवे का म्हणूनच विचारले तर विचारले असेल.

माझे कॉलेजमध्ये जावयाचे निश्चित झाले असे कळताच मित्रमेळ्यांच्या सभासदासच नव्हे तर नाशिकच्या माझ्या सार्वजनिक चळवळीकडे आश्चर्य व औत्सुक्याने पहाणारे अनेक वकील, संपादकप्रभृति प्रौढ पुढाऱ्यांसही मनःपूर्वक आनंद झाला. मॅट्रिक परीक्षा ती काय? तीत उतरणे हे विद्यार्थ्यास केवळ वैयक्तिक, फार तर कौटुंबक उल्हासाचा विषय. पण वर दिलेल्या कारणासाठी मित्रमेळ्यासारख्या संस्थेसही तो सार्वजनिक अभिनंदनाचा प्रकार वाटावा, हे साहाजिकच होते. संस्थेने माझ्या अभिनंदनार्थ आणि मला प्रेमाचा निरोप देण्यासाठी एक बैठक बोलाविली. प्रत्यक्ष शपधबद्ध सभासदावाचून नाशिकातील इतरही अनेक प्रौढ पुढारी जे आतून-आतून दुरून-दुरून संस्थेच्या गुप्त हेतूशी आणि चळवळीशी सहकार्य करीत असत तेही त्या सभेस आले होते. त्या सभेत मी मित्रमेळ्याच्या स्थापनेपासून तो त्या दिवशीपर्यंतच्या प्रगतीचे, त्या संस्थेच्या ध्येयाचे, धोरणाचे, साधनांचे, तिच्या अनन्य महत्त्वाचे आणि संभवनीय महान भविष्याचे समालोचन एका उत्कृष्ट आणि आवेशयुक्त भाषणात केले होते. त्याच भाषणाच्या सारांशात ह्या माझ्या आत्मचरित्राच्या दुसऱ्या खंडाचाही समारोप करणे समुचितच होणार असल्यामुळे मी कॉलेजात जाण्यासाठी नाशिक सोडले त्या काळच्या त्या संस्थेविषयी आमच्या असलेल्या कल्पनेची रूपरेषा खाली संकलितपणे जवळजवळ त्या काळच्या शब्दातच देत आहे.

मित्रमेळ्याच्या जानेवारी सन १९०० ते जानेवारी १९०२ इसवी ह्या दोन वर्षांच्या इतिवृत्ताचे आणि आकांक्षेचे संकलित समालोचन

मित्रमेळा किंवा त्या संस्थेचे गुप्तनाव राष्ट्रभक्त-समूह त्या (रामहरी) संस्थेचे ध्येय, भरतखंडास इंग्रजांच्या राजकीय पारतंत्र्यातून संपूर्णपणे स्वतंत्र करणे हेच होते. आणि साधनसामुग्री? या ध्येयाच्या प्राप्तीस्तव झुंजताना जी जी साधने ज्या ज्या वेळी संपूर्ण स्वातंत्र्याच्या साध्यास अधिकअधिक जवळ आणण्यास उपयुक्त असतील ती सर्व! अर्जविनंत्यांपासून सशस्त्र क्रांति-युद्धापर्यंत जी जी साधने शक्य आणि उपयुक्त होतील ती ती सर्व! मित्रमेळ्याच्या वरील पहिल्या दोन वर्षांच्या शेवटी त्यातील प्रत्येक सभासदच नव्हे, तर त्या संस्थेची माहिती असलेल्या सर्व लोकांस त्या संस्थेचे ध्येय आणि धोरण स्पष्टपणे आकलन झालेले होते. फार काय, सरकारी पोलिसांस देखील त्याची चांगली कल्पना आलेली होती.

मी सन १८९८ त स्वदेशस्वातंत्र्यार्थ प्रसंगी सशस्त्र क्रांतियुद्धाची उठावणी करूनही मारीत-मारीत मरण्याची शपथ माझी माझ्याशीच प्रथमतः घेतली. सन १८९९ च्या शेवटी म्हसकर, पागे नि मी अशा आम्ही तिघांनी हीच शपथ घेऊन शेवटी राष्ट्रभक्तसमूहाची गुप्त संस्था काढली. आणि सन १९०० च्या जानेवारीत तिचेच कार्य व्यापक प्रमाणावर चालविण्यासाठी मित्रमेळ्याची ही प्रकट-गुप्त संस्था स्थापिली.

ज्या वेळी ही क्रांतिकारक संस्था स्थापिली त्या काळची हिंदुस्थानातील राजकारणाची स्थिती आणि प्रगति कुठवर आलेली होती, याची नुसती रूपरेखातरी, या क्रांतिकारक संस्थेचे खरे वैशिष्ट्य यथावत् ध्यानात येण्यासाठी, निर्देशिणे अवश्य आहे. सत्तावनच्या राष्ट्रव्यापी सशस्त्र क्रांतियुद्धानंतर हिंदुस्थानच्या राजकारणास न्यायमूर्ति रानडे यांच्या पिढीने अगदी निराळेच वळण लावले. ते राजकारण त्यावेळच्या अत्यंत असाहाय्य परिस्थितीचा सहज परिणाम होता. त्यांचे ध्येय राज्यक्रांति नसून, राज्यसुधारणा होते. अर्थातच त्यांची साधनेही नैर्बंधिक (Legal) होती वैध (Legitimate) किंवा (Constitutional) देखील नव्हती. नैर्बंधिक (Legal) साधने अपुरी पडली म्हणजे वैध (Legitimate) साधने सुचू लागतात. पण त्या पहिल्या पिढीच्या पुढाऱ्यांपैकी बहुतेकांस नैर्बंदिक साधने अपुरी पडतील असे वाटतच नसे. राणी व्हिक्टोरिया हिने केलेल्या घोषणापत्रास, राणीच्या जाहीरनाम्यास, ते Magnacharta म्हणत. नव्हे, त्यातील बहुतेकांस तो खरोखरच Magnacharta वाटे. आणि त्यातील वचने पाळावयासाठी दिलेली आहेत ही असे त्यांची निष्ठा. ही निष्ठा अगदी प्रामाणिकपणे अंतस्थ भाषणांतही व्यक्त करणारे शेकडो राजकीय पुढारी आम्ही स्वतः त्यावेळी पाहिलेले आहेत. ते खरोखरच राजनिष्ठ असत. इंग्लंडच्या राजास ते हिंदुस्थानचा सम्राट मानीत इतकेच नव्हे, तर ना विष्णु पृथिवीपतिः या वचनाने उल्लेखून ते त्यास विष्णूचा अंश मानीत. इंग्लंडच्या राजास हिंदुस्थानचे राजे म्हटले नाही तर ते अगदी अंतस्थ भाषणांतून देखील चिडून जात. ते परम देशभक्त होते. त्यांचे आपल्या राष्ट्रावर अनेक उपकार आहेत. पण त्यांच्या राजकारणाची कल्पना आणि आकांक्षाही अशीच असे. 'अमृतबझार पत्रिके'चे सुप्रसिद्ध संपादक परम देशभक्त मोतिलाल घोष हे इंग्लंडचा युवराज वा राजा हिंदुस्थानात आला की त्याच्यापुढे बोलावणे जाताच जे देवदर्शनासारखे भाग्य मानीत, आणि प्रकटपणे

सभेत त्यांच्यासमोर गुढगे टेकून त्यास हात जोडीत, ते केवळ नाटक म्हणून नसे. निरुपाय म्हणून तर नसेच नसे- तर प्रथम प्रथम तरी अगदी निष्ठा असे. 'विटाळ! विटाळ!' म्हणून आपल्या स्वधर्मबंधू हिंदुसही जे शिवत नसत, त्या काशीच्या पंडितांनी लॉर्ड रिपनांची गाडी स्वतः बैलाप्रमाणे ओढून नेली. इंग्रजी राज्याचे आपल्या देशाला अनेक लाभ झाले. इतकेच मानून ही पिढी राहत नसे, तर ते लाभ आपल्या देशाचे हित व्हावे म्हणूनच स्वतःचे अहित करून देखील, दयार्द्र बुद्धीने इंग्रजांनी आम्हास करून दिले, ते नुसते लाभ नसून आमच्या देशावर इंग्रजांनी जाणूनबुजून केलेले उपकार आहेत, इंग्रजी राज्य ही देवाची देणगी आहे असे प्रामाणिकपणे समजणारे लाखो लोक त्या वेळी राजकीय पुढाऱ्यांतून आणि अनुयायांतून निवसत होते, हे त्या पहिल्या पिढीचे बंगाल्यात वा महाराष्ट्रात जे वाङ्मय अजून उपलब्ध आहे त्यावरून निर्विवादपणे आजही दिसून येईल. आम्हास तर प्रत्यक्ष सहवासात तो अनुभवच आलेला आहे. सत्तावनच्या सशस्त्र क्रांतियुद्धासारखे प्रचंड बंड पुन्हा हिंदुस्तानात होऊ नये, राष्ट्राची राज्यक्रांतीची इच्छाही मरून जाऊन केवळ राज्य-सुधारणेच्या पिठाच्या पाण्याच्या दुधासच त्याने दूध समजून पीत राहावे अशी अगदी स्पष्ट हेतूनेच, ह्यूम कॉटनप्रभृति इंग्रजांनी राष्ट्रीय सभा काढली आणि ती प्रत्यक्ष गव्हर्नर जनरलच्या अंतस्थ विचारांच्या उभारणीने!

अर्थातच त्या वेळचे सर्व राजकारण प्रकट होते, उघड होते. सत्तावननंतर गुप्त राजकारण आणि सशस्त्र क्रांतीचा उठाव असा पंजाबात रामसिंग कूका यांच्या कुक्यांचा, महाराष्ट्रात वासुदेव बळवंतांचा आणि थोड्या अंशी चाफेकरांचाच झाला. त्यावाचून केवळ स्वदेश-स्वातंत्र्यार्थ गुप्त राजकारण वा सशस्त्र उठावणी बहुतेक कुठे झालीच नव्हती. त्या क्रांतिकारक वीरवरांचा अंत होताच ती तुरळक आणि तात्कालिक चळवळ नामशेष होई. अर्थात् त्या चाळीस-पन्नास वर्षांत राष्ट्रव्यापी नि सततचे राजकारण या सर्व राजसुधारणा पक्षाच्या राजनिष्ठ म्हणजेच परराज्यनिष्ठ नैर्बंधिक चळवळ करणाऱ्या मंडळींचेच काय ते होते. त्यांच्याच कुशीतून सुरेंद्रनाथ, टिळकांचा उदय झाला. टिळक-सुरेंद्रनाथाच्या प्रथमार्धातील जीवनांत ह्या पहिल्या पिढीच्या त्या पहिल्या धोरणाचा आणि ध्येयाचा संस्कार वारंवार उपटून निघतो ही गोष्ट त्या टिळक-सुरेंद्रनाथ पिढीच्या पूर्वार्धातील वाङ्मयावरून स्पष्ट होत आहे. परंतु टिळकांना शिवाजीच्या परंपरेचे बाळकडू कळतनकळत पाजलेले, ते त्यांच्या रोमारोमात अंतर्हित असलेले ते जसजसे सारखे प्रस्फुटता पावत गेले तसतसे त्या पहिल्या पिढीच्या राजकारणाचे आणि टिळकांच्या राजकारणाचे ध्येय आणि धोरण भिन्न होत चालले. त्यांचा संघर्ष चालू झाला. मित्रमेळ्याच्या म्हणजेच अभिनव भारताच्या उदयाच्या वेळेस हा संघर्ष विकोपास गेलेलाच होता. टिळकांची राजकीय प्रकट भाषा जरी या मागील पिढीचीच होती तरी टिळकांचा राजकीय अंतरात्मा शिवाजीच्या वंशातला पडला. ते इंग्रजांशी मनातून केव्हाही "राजनिष्ठ" नव्हते. ते इंग्रजांच्या राजास मनातून केव्हाही "ना विष्णुः पृथ्वीपति" समजत नव्हते. इंग्रजी राज्यापासून अनेक लाभ झाले; पण त्याहून प्राणघातक तोटेच अधिक झाले; असे तर ते उघडच उपदेशीत. ह्या ह्यूमप्रभृति राष्ट्रसभावाल्या इंग्रजास ते हिंदुस्थानचे हितचितक समजत खरे आणि इंग्रज लोक आपली वचने आणि आपल्या घोषणा पाळतील असे त्यास थोडेसे वाटेही. आणि ते प्रथमतः तरी नेहमीच तसे जोराजोराने लिहीत, म्हणत हेही खरे. पण म्हणून इंग्रजांचे राज्य असणे

www.savarkarsmarak.com

केव्हाही मनातून आवडत होते असे मुळीच नाही. त्या दिवशी एखाद्या शिवाजीस राज्याभिषेक होता तरी टिळक साखर वाटते. कोर्टातून मरेतो टिळक प्रतिज्ञेवर सांगत “मी बादशहाचा एक राजनिष्ठ प्रजानन आहे!”. पण टिळक आतून सदैव राजद्रोहीच होते. आणि यातच त्यांचे टिळकपण होते! तथापि, टिळक-सुरेंद्रनाथांच्या दुसऱ्या पिढीचे प्रकट राजकारण त्या नैर्बंधिक कक्षेतच अभिनव भारताच्या उद्यापर्यंत प्रतिबद्ध झालेले होते, तोवर “सुधारणा” हेच ध्येय त्या सर्वांचे असे. Home rule (स्वराज्य) हे देखील ध्येय उच्चारण्याची तेव्हा सोय नव्हती. हे स्वतः टिळकच पुढे सांगत असत. साधनेही अर्ज विनंत्या-पण पूर्वीहून कडक भाषेत व्यक्तविलेली हीच होती. आणि टिळकपक्षीय निषेध आणि नैर्बंधिक प्रतिकार या साधनासही अलीकडे योजू लागले होते. त्यामुळे मागील पहिल्या पिढीतील मोतीलाल घोष, अय्यरप्रभृति अनेक लोकही यांच्यात येऊन मिळाले. ज्याप्रमाणे टिळकपक्षही पुढे बहुतांशी Home rule च्या चळवळीस जाऊन मिळाला. परंतु अभिनव भारताच्या उद्यापर्यंत राजनिष्ठा, ब्रिटिशांचे उपकार, ब्रिटिशांची वचने, राणीचा जाहीरनामा म्हणजे Magnacharta आणि हिंदुस्थानच्या ब्रिटिश बादशहाच्या विषयीचा अत्यंत पूज्य भाव नि एकांत राजनिष्ठा प्रभृती शब्दांच्या भाषेच्या चौकटीत बसेल तेवढी “राज्यसुधारणा” हेच हिंदी राजकारणांतील प्रमुखतम पुढाऱ्यांचेही ध्येय असून, त्यामुळे सामान्य जनताही त्यांच्या पोपटपंचीस देशाभिमानाची आणि राष्ट्रीय शहाणपणाची परमावधी समजत होती. त्यावेळच्या राजकारणाची यथोचित कल्पना येण्यास एक प्रत्यक्ष उदाहण म्हणून थेट राष्ट्रीय सभेचा त्याच वेळचा एक प्रांतिक ठराव आणि एक सभेचा ठराव देणे पुरेसे आहे. सन १८९९ च्या लखनौ येथील १५ व्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीत बंगालचे प्रसिद्ध देशभक्त श्री. रमेशचंद्र दत्त यांचे अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सभेचा जो मुख्य मागणीचा ठराव झाला, त्यात “स्थानिक कायदे कौन्सिलावर (विधि-मंडळावर) प्रत्येक जिल्ह्याचा एकेक लोकनियुक्त सभासद घ्यावा. विधिमंडळाच्या कामकाजाचे दिवस ठरवावे. ठराव पुढे मांडण्याचा अधिकार द्यावा आणि प्रत्येक प्रांताला एकेक कार्यकारी मंडळ (एक्झिक्यूटीव्ह कौन्सिल) असावे”, अशी मागणी करण्यात आली होती!! अर्थात ज्या वेळेस कोणी काहीच करीत नव्हते त्या वेळी या देशभक्तांना इतके तरी केले, हेही त्यांचे उपकारच आहेत. त्याचे त्यांच्यापरीने ते धाडसच होते आणि त्याविषयी त्यांचे वंशज त्यांच्याशी कृतज्ञच राहतील; पण त्या वेळेची परिस्थिती भिन्न होती. जनतेची राजकीय आकांक्षा किती अल्प नि आकुंचित होती, हेही त्या ठरावांनी आणि चळवळींनी व्यक्तविले जाते. राष्ट्रीय सभेखालोखाल प्रांतिक सभा, त्यातही त्या वेळी जहाल म्हणून गणली गेलेली मुंबई इलाख्याची प्रांतिक सभा, जीत स्वतः टिळकपक्ष उपस्थित होई. मुंबई प्रांतिक परिषदेच्या सन १९०० मध्ये साताऱ्यास झालेल्या बैठकीत लॉर्ड सँड्हर्स्टसारख्या दडपशाही गव्हर्नरचा निषेध करणाऱ्या ठरावात, टिळकांना सरकारने हायकोर्टात राजद्रोही म्हणून दोषी ठरविले असल्यामुळे त्यास निर्दोषी म्हणणेही प्रांतिक परिषदेस शोभत नाही, असा वाच्छा मेथाप्रभृती प्रमुखतम पुढाऱ्यांचा आक्षेप येऊन तो उल्लेखही गाळण्यात आला आणि इतके करूनही तो सँड्हर्स्टच्या निषेधाचा ठराव परिषदेपुढे येऊ शकला नाही तो नाहीच! स्वतः टिळकांचा देखील निरुपाय झाला. वाच्छा, चंदावरकर, मेथाप्रभृती राष्ट्रीय सभेचे पुढारी लॉर्ड हॅरिस आणि लॉर्ड सँड्हर्स्ट यांच्यासारख्या पीडक गव्हर्नरांचे पुतळे उभारण्यास पुढे येत आणि पुण्याच्या मर्द मंडळीने कितीही कसून विरोध केला

तरी, सँड्हर्स्टचा पुतळा- चाफेकराना फाशी देणाऱ्या, लोकमान्यांना शिक्षा देणाऱ्या त्या क्रूर गव्हर्नरचा पुतळा - हजारो लाखोनी वर्गण्या करून मुंबईस उभारला तो उभारलाच. हिंदुस्थानभर व्हिक्टोरियाच्या स्तुतीची भाकड पदे गायिली जात. मोठमोठ्या राष्ट्रीय गणेशोत्सवात देखील "देवी श्री व्हिक्टोरिया सार्वभौमिनी!" असली स्तोत्रे घोळूनघोळून म्हटली जात. (Home Rule) शब्द राजद्रोही ठरेल म्हणून तो देखील उच्चारणे शक्य नव्हते असे स्वतः लोकमान्यच पुढे सांगत. लाला लजपतराय टिळकांच्या राजकारणाकडे नुकतेच झुकत होते. अरविन्द घोष, बिपिनचंद्र पाल, यांचे नावही निघाले नव्हते. गांधीजी तर God Save the king ही प्रार्थना, निरुपायाने नव्हे तर धन्यतेने गात. हिंदुस्थानच्या राजकारणाच्या आकाशात मध्यरात्रीचा हा असा अंधकार भरला असता त्यात अभिनव भारताचा तो तेजोपुंज अकस्मात उदय पावला. अकाली अरुणोदय व्हावा तसे झाले. लोकही बिचकले. विधिमंडळात जिल्ह्याचा एकेक लोक-प्रतिनिधि असावा, आणि लोक-प्रतिनिधिना विधिमंडळात ठराव मांडण्याचा अधिकार असावा, ही ज्या वेळी स्वतः राष्ट्रीय सभेची अधिकातील अधिक मागणी त्या मध्यरात्री त्या विधिमंडळातील बहुमत लोक निर्वाचित असणे, स्थानिक स्वराज्याची Home Rule मागणे, वसाहतीचे स्वराज्य मागणे, ह्या सर्व पुढील प्रहरांचे तास वाजण्याच्या आधीच अकस्मात संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाचा ह्या प्रकट उदय निद्रिस्थ जनतेस एखाद्या अकाली अरुणोदयासारखा एक उत्पात वाटावा, यात फारसे आश्चर्य नव्हते! आणि संपूर्ण स्वातंत्र्यप्राप्तीस्तव सशस्त्र क्रांतियुद्ध हेच अपरिहार्य साधन होय म्हणून ठासून सांगणारे आणि त्यापायी शत्रूचे आणि आपले प्राण उघडउघड पणाला लावणारे हे अवघे मूठभर तरुण! ते माथेफिरु म्हणून बुद्धिमंत नि विचारी शहाण्या जनतेस वाटले नसते तर गुलामगिरी गुलामांची बुद्धीच निर्बुद्ध करून टाकते, की अपुरुषतेलाच पौरुष भासविते, हा सिद्धांत खोटा ठरला तरच आश्चर्य होते!

राजद्रोही! भयंकर! बंडखोर! म्हणून राजसत्ता गुरगुरु लागली. माथेफिरु! मूर्ख! म्हणून शहाणे तिरस्कारू लागले. अनिष्ट! अकाली! आत्मघात होतील! म्हणून हितचितकही गळी पडून मागे ओढू लागले. पण आम्हास शुद्ध नव्हती. बेशुद्धासारखे, अंगी संचार झाल्यासारखे, आम्हास जे शब्द ऐकू येत होते ते शिवाजीचे नि कृष्णाचे, मॅझिनीचे नि ग्यारीबॉल्डीचे. त्या भूतकाळाचे आणि 'धन्य! धन्य!' म्हणून स्वागत करणाऱ्या त्या अजात भविष्य काळाचे! त्या काळच्या निशेत आणि त्या भविष्य काळच्या संचारात आम्ही वेडावलो होतो. तेव्हा देखील आमचे आम्हासही ते कळत होते. आमच्या गोविंद कवींनी त्या काळीच रचलेल्या ह्या कवितेचा त्या विषयीचा तत्कालीन अस्सल पुरावाच जेव्हा सांगू लागला, "अरे बापरे! काय जपसी! लागे वेड तुला!! शिपाईबुवा धरून नेईल देईल चोपाला!!" तेव्हा त्यास अभिनव भारताच्या त्या वेड्यांच्या रुग्णालयातील तो वेडा तरुण उत्तर देतो-

"वेड? खरेच खरेच!
कंसकंदना, रघुनंदना समान मज साचे ।।
वेड लागले स्वातंत्र्याचे । दास्यमोचनाचे ।।
बंधुनो, धरारे मला ।।
म्लेंच्छ पामरा ।। बधिर मी खरा

मज स्वदेशरिपु रक्ताचे ।।
पाजावे अमृत साचे ।।
तेव्हाच आज मी वाचे ।।
स्वातंत्र्याच्या बंदीमाजी चला मला कोंडा ।।
भारत भूवरि विमुक्त फडको परि भगवा झेंडा ।।

पण ज्या स्वातंत्र्यलक्ष्मीचे आम्ही पूजक होतो ती कोणत्या रुपाने आम्हांस प्रकट झाली होती?

ज्या ह्या स्वातंत्र्याचे आम्हास वेड लागले होते ते काय केवळ रक्तपिपासू आततायी, आसुरी राष्ट्रीय स्वातंत्र्यच होते? नाही, नाही! अगदी पहिल्यापासून देशभिमानाचा अतिरेक हा देशाभिमानाच्या अभावाइतकाच एक अनैतिक दुर्गुण आहे अशी अभिनव भारताची स्पष्ट शिकवण असे. हिंसा आणि अहिंसा, सत्य आणि असेत्य; व्यक्तिराष्ट्र आणि मानुषक (Humanity) यांच्या मर्यादा कोणत्या या विषयाचा मित्रमेळ्याच्या त्या पहिल्या दोन वर्षात देखील प्रतिसप्ताहाच्या बैठकीत यथेच्छ खल होत असे. व्यावहारिक नीतीचे अत्युच्च तत्व जे उपयुक्ततावाद, आधिकात अधिक मनुष्याचे हित ज्याने साधते तो सद्‌गुण, असे त्याचे मर्म - त्याचा सुगावा मला लागताच आणि मला तो पटताच मी त्याच्या कसोटीत ही सर्व द्वंदे लावून त्याच्या हितकारक स्वरूपाच्या मर्यादा स्पष्ट करणारी अनेक व्याख्याने मित्रमेळ्यात त्याच काळात दिलेली होती. आमच्यात धार्मिक आणि वेदांतिक प्रवृत्तीचे अनेक सभासद असत. त्यांनी गुप्तसंस्था, शस्त्रयुद्धप्रभृति शब्दांना पापाचा वास येतो म्हणून स्पष्ट शंका अनेक वेळा घेतलेल्या होत्या. इतकेच काय, पण राजकीय किंबहुना ऐहिक चळवळी व्यर्थ होत, परमेश्वराचे अधिष्ठान, दैवी कृपा, जपतपादि साधनाने मिळवून पारमार्थिक मुक्ति मिळविणे हेच साध्य आणि साधन असे वाद आमच्या बैठकीतून पुंडलीक, बाबा केव्हा केव्हा म्हसकर-प्रभृति देवलसी मंडळी अनेक वेळा उपस्थित करीत. त्यामुळे त्यांच्या समाधानार्थ त्या पारमार्थिक आणि ह्या ऐहिक चळवळीचा, साधनांचा आणि ध्येयाचा समन्वय घालण्यासाठी वारंवार “धर्म” “मुक्ति” “हिंसा” अशा तात्विक विषयांचा माझ्या त्या वेळच्या ज्ञानानुसार मी यथेच्छ उहापोह करी. माझी त्या वेळची काही ठराविक सूत्रे येथे दिली असता माझी आणि माझ्या मतानुवर्ति असलेल्या संस्थेच्या नीतिकल्पनांची काहीशी सहज कल्पना सहज येऊ शकेल. गुप्ततेचा आणि सत्याचा समन्वय घालताना मी नेहमी सांगावे की, मनुष्यजातीचे हित सर्व सद्‌गुणांचे समर्थन आहे. अर्थात ज्या सत्याने मनुष्याचे एकंदरीत कल्याण साधते ते सत्य, सद्‌गुण, धर्म, पण ज्या सत्याने चोरास सोडून संन्याशास फाशी होते ते सत्यही दुर्गुण, ते सत्यच असेत्य. तोच “जो रात्री चोरानी धरिला!! त्याची करावया मुक्ती!! लेश विचार न करिता बोलव्या तेथ शत मृणा उक्ती!!” “धारणात धर्म मित्याहुः धर्मो धारयति प्रजा” ही श्रीकृष्ण नीतीची खरी नीति होय. बाकी केवळ वाग्जाल! अर्थात जेव्हा अन्यायी, दुष्ट शक्ति सत्य पक्षाची वाचा जखडून टाकतात, ते वाकस्वातंत्र्य हिरावून घेतात, प्रकट सदाचरणही अपराध ठरवितात, तेव्हा तेव्हा त्या शक्तीचा पाडाव करण्यासाठी अवश्य झाल्यास गुप्तपणेही न्यायाचे दळ एकत्र, संघटित, आणि संचलित करणे अगदी धर्मकर्तव्यच होऊन बसते. श्रीकृष्ण गोकुळात गुप्तपणेच वाढले. ते तसे वाढताहेत हे सत्याच्या नावाने कंसास जर कोणी नंद वा वासुदेव अकाली

जाऊन सांगता तर त्याचे ते सत्यच अक्षम्य अधर्म होता. कारण तशा सत्यानेच मानुषकाचे अधिकांत अधिक अहित होते. यास्तव गुप्तता तिथे खरी नीति होती. खरा धर्म होता. दिल्लीहून निसटलेले शिवाजीराजे अमक्या पेटाऱ्यात आहेत, अमक्या स्थळी आहेत, असे औरंगजेबास सांगणाऱ्या मराठ्याची जीभच कापून टाकावयास हवी होती. जेवढे विश्वासघातकी, देशद्रोही सूर्याजी पिसाळ तेवढे बहुधा सत्यवादीच नव्हते काय? गुप्तता हा दुर्गुणही नव्हे, सद्‌गुणही नव्हे. तिचा उपयोग लोकहितार्थ केला जात आहे की अहितार्थ यावर तिचे सद्‌गुणत्व वा दुर्गुणत्व ठरविले पाहिजे. गर्भाधान बहुधा गुप्तच असते- पण तेवढ्यासाठी ते पाप ठरते की काय? तीच स्थिती शस्त्रयुद्धाची. रावणाच्या हाती वा कंसाच्या हाती जी तलवार पापी, रक्तलिप्सु, अधर्म्य ठरते तीच रामाच्या वा कृष्णाच्या हाती यज्ञाग्नीच्या ज्वाळेसारखी निर्मळ, पावन आणि पावक ठरते! तीच स्थिति देशाभिमानाची. आपले जे न्याय्य अधिकार आहेत, ज्या अधिकारांच्या योगे अधिकात अधिक मनुष्यांचे हित साधता येते त्या राष्ट्रीय अधिकारांच्या रक्षणार्थ आणि विकासार्थ जो झटतो आणि झुंजतो तो देशाभिमानच तेवढा सद्‌गुण होय. पण स्वदेशाच्या राक्षसी हावेला जो बळी पडून अन्य देशांच्या न्याय्य अस्तित्वावर वा अधिकारावर अतिक्रमण करतो, मनुष्यास उपद्रव देतो, तो देशाभिमान हा आपल्या वैयक्तिक स्वार्थास्तव दुसऱ्याच्या घरावर निखारे ठेवणाऱ्या आततायी आगलावेपणाइतकाच अधर्म्य आणि दंडनीय होतो. राष्ट्र हे केव्हाही मानुषकाच्याच हितार्थ आहे, असले पाहिजे. हे तत्व आम्ही कंठशोष करून सांगत असावे. इंग्लिशांचा इंग्लिश म्हणून आम्ही केव्हाही द्‌वेष केला नाही. करू दिला नाही. इंग्लंड हिंदुस्थानवर आततायी आक्रमण जोवर करीत आहे, तोवरच ते आमचे शत्रू. तो आततायीपणा त्यांनी सोडताच ते आमचे मित्रच आहेत. कारण मनुष्यमात्र एक आहे, आपला बंधू आहे. इतकेच नव्हे, तर इंग्लंडच्या न्याय्य स्वातंत्र्यास जर कोणी दुसरे आततायी राष्ट्र अन्यायी दंडेलीने तुडवू पाहील तर आम्ही इंग्लंडच्या मुक्ततेस्तवही असेच झटू, झुंजू; ही आमची अनेक वेळा व्यक्तविलेली प्रतिज्ञा असे. **आमची खरी जाती मनुष्य. खरा धर्म माणुसकी, मानवधर्म. खरा देश पृथ्वी, खरा राजा ईश्वर** अशी आमची अत्युदात्त भावना असे. अगदी अशाच शब्दांत आम्ही भावनेच्या भरात ती तेव्हापासून व्यक्तवावी. अर्थात् ज्या स्वतंत्रतेसाठी आम्ही झुंजत होतो तिचेही स्वरूप असेच अत्यंत व्यापक असे. सद्यः परिस्थितीत हिंदुस्थानात इतर सर्व प्रकारची स्वतंत्रता, मुक्ति, व्यक्तींची पारमार्थिक मुक्ति देखील राजकीय स्वतंत्रतेवाचून खुरटली आहे, प्रतिबद्ध आहे, कुंठित आहे. म्हणून ती राष्ट्रीय स्वतंत्रता हेच आमचे सद्यकालीन, ध्येय, लक्ष होते. धर्म, पारलौकिक साधना, आत्मिक उन्नति ही राजकीय दास्याने कशी जखडली जाते आणि धर्मासाठी देखील आज राजकीय स्वातंत्र्य कसे अवश्य आहे हे तर मला वारंवार सिद्ध करून द्यावे लागे. रामदासांच्या 'तीर्थक्षेत्रे भ्रष्टली' प्रभृति वचनावर कितीकदा तरी प्रवचने करावी लागत. बळावाचून तत्व, शक्तीवाचून न्याय, प्रयत्नावाचून दैव, भौतिकावाचून आत्मिक, ऐहिका वाचून पारमार्थिक पंगु आहे, अपूर्ण आहे, हे विवरावे लागे आणि त्या विवरणार्थच अभिनव भारताचे तत्कालीन निकटतम ध्येय जे राष्ट्रीय स्वतंत्रता ते व्यक्तीच्या व राष्ट्राच्या अंतिमतम पारमार्थिक ध्येयाला, मुक्तीला, विसंवादी नाही, इतकेच नव्हे, तर त्या पहिल्या स्वतंत्रतेचा परिपूर्ण विकास म्हणजे दुसरी स्वतंत्रता ही मुक्ति असते, ते मला वारंवार विशद करावे लागे. कारण

त्यायोगेच पहिल्या राष्ट्रीय ऐहिक चळवळीस पापी निदान बंधक समजून केवळ वैयक्तिक मुक्तीचाच अवलंब करू इच्छिणारी आमच्यातील देवलसी मंडळी या राष्ट्रीय, या लोककल्याणकारक राज्यक्रांतीची अभिमानी आणि अनुयायी करून घेता येई. यापुरती रामदासांनी शिवाजीस उपदेशिलेला दासबोध हीही आमची एक स्मृतीच असे. ती देवलसी मंडळींनाही देशलसी बनवावयास फार उपयोगी पडे. त्यावेळी अनेक साधु आणि संत, हरिदास आणि पुराणिक, गोसावी आणि बैरागी आम्हांस जेव्हाजेव्हा हा राजकीय खटाटोप व्यर्थ आहे, ईश्वराची कृपा तेव्हढी असली की झाले, म्हणून उपदेशीत, तेव्हा भारतीय राजकीय स्वतंत्रता हेच त्या ईश्वरी कृपेचे ह्या युगीचे खरे साधन होय; स्वराज्यावाचून स्वधर्म पंगु आहे असे आम्ही अशाच कोटिक्रमांनी वारंवार सिद्ध करीत असू. अभिनव भारताचे आदिध्येय जी स्वतंत्रता तिचा अर्थ किती उदात्त स्वरूपाचा होता. व्यक्तीच्या, राष्ट्राच्या आणि मानवाच्या ऐहिक नि पारलौकिक कर्तव्याचा समन्वय आणि संपूर्णता म्हणजे स्वतंत्रता- आणि इतर कोणत्याही तामसी आकुंचित अर्थी नसून, त्या अत्यंत व्यापक अर्थीच आम्ही प्रथमपासून त्या ध्येयास कसे वाहून घेतलेले होते, हे त्या तीन-चार वर्षांतच रचलेल्या माझ्या स्वतंत्रतेच्या स्तोत्रातील खालील पंक्तींची तत्कालिन साक्षही सिद्ध करील:--

**जयोस्तुते श्री महन्मंगले! शिवास्पदे! शिवदे! ।।**
**स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे ।।१।।**
**राष्ट्राचे चैतन्य मूर्त तूं! नीतिसंपदांची ।।**
**स्वतंत्रते भगवती, श्रीमती राज्ञी तूं साची।।२।।**
**जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्, मधुर, ते ते ।।**
**स्वतंत्रते भगवती, सर्व तव सहचारी असते ।।३।।**
**मोक्ष मुक्ति ही तुझीच रुपे तुलाचि वेदांती ।।**
**स्वतंत्रते भगवती, योगिजन परब्रह्म वदती ।।४।।**
**हे अधम रक्तरंजिते । सुजन पूजिते । श्रीस्वतंत्रते!**
**तुजसाठी मरण ते जनन ।।**
**तुजवीण जनन ते मरण ।।**
**तुज सकल संपदा शरण ।।**
**भरतभूमिला दृढालिंगना, कधि देशिल वरदे ।।**
**स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे ।।५।।**

इंग्रजांससुद्धा अखिल मनुष्यमात्राचे कल्याण व्हावे म्हणून, मानुषकाचा परम विकास व्हावा म्हणून, आम्हांस स्वतंत्रता हवी होती. मनुष्याची आत्मिक उन्नतीच नव्हे, तर मानसिक उन्नति, नैतिक उन्नति आणि आत्मिक उन्नतीही राजकीय पारतंत्र्याने खुंटते म्हणून आम्हास भारताची राजकीय स्वतंत्रता हवी होती. तीस कोटी मनुष्यांच्या माणुसकीचा विकास अवबद्ध करणारे भारताचे राजकीय पारतंत्र्य मनुष्य जातीच्याही अधःपतनास कारण होणार असल्यामुळे त्याचा उच्छेद-शिरच्छेद करणे हे

आम्ही आमचे राजकीय कर्तव्यच नव्हे, तर धार्मिक कर्तव्यही समजत होतो. जसा रावणाचा शिरच्छेद हे रामास कर्तव्य वाटले, कंसाचा शिरच्छेद हे कृष्णास कर्तव्य वाटले. जुन्या अवताराप्रमाणेच परित्राणाय साधुनाम विनाशायच दुष्कृताम्, धर्मसंस्थापनार्थाय, हा अभिनव भारताचाही नवा अवतार देवाने धारण केला आहे, अशी आमची निष्ठा होती. आणि ती जवळजवळ अशाच वचनांनी, युक्तिवादांनी, शास्त्राधारांनी आणि तत्वप्रवचनांनी आम्ही अनेक प्रसंगी आणि अनेक प्रकारांनी अगदी प्रारंभापासूनच प्रकटवीत आलो.

**स्वातंत्र्यलक्ष्मी की जय!**

ज्या स्वतंत्रतालक्ष्मीचा आम्ही सत्तावनच्या क्रांतियुद्धानंतर पुन्हा उभ्या भारतवर्षात प्रथमतःच झालेला संघटित नि प्रकट जयजयकार केला ती स्वतंत्रता आम्हांस ह्या स्वरूपात प्रकट झाली होती ती देवीच्या, दैवी संपत्तीच्या, दैवी शक्तीच्या रूपात प्रकटली होती- कोण्या जड, कवडीचुंबक, खिसेकापू, गळेकापू, 'डॉलरच्या', वा 'ट्रेड नॉटच्या' भुताटकी रूपात नव्हे, अशा त्या स्वतंत्रतादेवीचे आम्ही पूजक होतो. ह्या आमच्या ध्येयास अनुरूप अशी आणि ह्या युगीच्या भारतीय आकांक्षास अचूकपणे व्यक्तवील अशी अभिनव, भारताचा विशिष्ट जयशब्द म्हणून मी "स्वातंत्र्यलक्ष्मी की जय" ही गर्जना प्रत्येक समारंभातून आणि विधीतून चालू केली. मागे वर्णिलेल्या भारताच्या राजकीय जीवनातील मध्यरात्रीच्या अंधःकारात जेव्हा ती प्रथमतः वातावरणात उठली तेव्हा त्या "स्वातंत्र्यलक्ष्मी की जय"च्या गर्जनेसरशी त्या वेळचे मोठमोठे म्हणवणारे पुढारीही भितीने दचकून गेले. त्यांनी आमच्या ह्या 'माथेफिराऊपणा'साठी त्यांच्या अहंमन्य शब्दात सांगावयाचे म्हणजे आमचे कान पिळण्याचे यत्न केले. पण शेवटी काळाने, युगशक्तीने त्यांचेच कान पिळले! कोणासही न जुमानता आम्ही त्या "स्वातंत्र्यलक्ष्मी की जय" ह्याच मंत्राचा जयघोष करीत वातावरण दुमदुमवीत चाललो. आमच्या पत्रावर, पुस्तकांवर, लेखांवर "स्वातंत्र्यलक्ष्मी की जय" हेच ब्रीदवाक्य अंकित असे. आम्ही "स्वातंत्र्यलक्ष्मी की जय" गर्जतच अंती कारागृहात पडलो, अंधारकोठड्यात पडलो, अंदमानात सडलो, फाशीवर चढलो- पण ते पुढे.

आज तो मंत्र, ती स्वातंत्र्यलक्ष्मी की जय, उभ्या भारतात निनादत आहे. पण अशासाठीच आणि अशावेळीच हे भारतातून आजही विसरता कामा नये, की तो मंत्र अगदी पहिल्याने त्या नाशिकला त्या तिळभांडेश्वराच्या बोळातील त्या भुयारासारख्या कोंदट खोलीत, त्या अभिनव भारताच्या गुप्त मठीत प्रथमतः आविर्भूत झाला. तो भारतीय स्वातंत्र्याचा प्रकट आणि सुस्पष्ट जयघोष, रणघोष गर्जण्याचे प्रथम गर्जण्याचे, त्या काळच्या परिस्थितीत परमावधीचे असेणारे धाडस ज्या वेळी आम्ही केले- त्याच्या आधी त्या स्वातंत्र्यलक्ष्मी की जय भारतात कुठेही आणि कोणीही ऐकलेला ऐकिवात नव्हता. जर असेल तर, माझ्याही आधी भारतामध्ये या आपल्या राष्ट्रमातेच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचा असा व्यापक आणि उदार आणि महान ध्वज कोणी उभारलेला होता असे पुढेमागे इतिहासावरून जर आढळून येईल तर, त्याचा इतर कोणाहूनही अधिक आनंद मलाच वाटेल. मला त्याची अधिक धन्यताच वाटेल. कारण त्यायोगे माझ्या मातृभूमीच्या पायांतील शृखंला तोडण्यासाठी प्राण पणास लावून घण उचलणारे वीरपुरुष

आमच्याही आधी उत्पन्न झाले होते. या जाणिवेनेही आमची वीरप्रसव भारतमाता अधिकच गौरवार्ह ठरेल. तिच्या ह्या वीर कुशीत जन्मल्याची धन्यता आम्हास अधिकच उपभोगिता येईल.

अशा अर्थी आणि अशा कारणासाठी स्वतंत्रता- पूर्ण राजकीय स्वतंत्रता हेच अभिनव भारताचे सुनिश्चित आणि सुस्पष्ट ध्येय होते. अर्थातच त्याचे अंतिमसाधन सशस्त्र क्रांतियुद्ध हेच असणारे होते. ज्या राष्ट्राला कोणत्याही आततायी आणि केवळ शस्त्रबळाच्या आधारावरच त्यावर सत्ता चालविणाऱ्या मदांध शत्रूच्या कचाट्यातून सुटावयाचे असेल, त्याला ह्या जीवनार्थ कलहाच्या धकाधकीत, जो टिकेल तोच जगेल अशा निर्घृण नियमाने चालणाऱ्या सृष्टीत, आपल्यावरील त्या केवळ आसुरी शस्त्रबळाने चालत असलेल्या परसत्तेस दैवी शस्त्रबळानेच हतवीर्य केल्यावाचून, त्या आसुरी परसत्तेचे ते शस्त्र छिनावून तोडून टाकल्यावाचून गत्यंतरच नसते. पण जर ते सशस्त्र क्रांतियुद्ध झुंजणे त्या राष्ट्रास अगदी अशक्य असेल तर? त्यास राजकीय स्वातंत्र्याची प्राप्तीही अशक्यच असणार त्याने त नाद पार सोडून दिला पाहिजे. मोठा निष्ठुर सिद्धात हा? होय, पण अगदी अपरिहार्य! जग आहे हे असे आहे. थंड विस्तव,काळे ऊन पाण्यासारखी पृथ्वी आणि पृथ्वीसारखे पाणी हे वदतोव्याघात चरितार्थ करणे हे जसे मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरचे आहे तसेच जीवनार्थ कलहाचा सृष्टिक्रम बंद पाडणे हेही त्याच्या हातातले नाही. जगावयाचे तर तो क्रम विचारात घेऊनच जगले पाहिजे- त्यास तोंड देऊनच जगले पाहिजे! नाहीतर त्यास बळी पडले पाहिजे, मेले पाहिजे. जगातील ज्ञात इतिहास चाळूनचाळून आम्ही थकलो! देवासुरांच्या, इंद्र वृत्रासुरांच्या, रावणाच्या वैदिक आदि कथानकांपासून तो प्राचीन अराण, ग्रीस, रोम, अरब, अमेरिका, इंग्लंड, चीन, जपान, स्पेनमूर, तुर्क, ग्रीस, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया, इटली अशा अगदी ताज्यातील ताज्या अर्वाचीन इतिहासापर्यंत सर्व राज्यक्रांतीच्या आणि राष्ट्रस्वातंत्र्याच्या इतिहासापर्यंत मानवी राज-कारणाच्या बहुतेक इतिहासग्रंथांची मी स्वतः पारायणे केली आणि त्यावर शेकडो व्याख्याने दिली. हिंदुस्थानच्या काही प्राचीन आणि रजपूत, बुंदेल, शीख, महाराष्ट्रातील अर्वाचीन इतिहासाचे पान नि पान चाळून पाहिले; पण हाच एक निष्कर्ष निघे की, “धर्मासाठी मरावे” एवढेच म्हणून भागत नाही. “मरोनी आतताई मारावे”, “मारिता मारिता घ्यावे राज्य आपुले” यास्तव स्वातंत्र्यप्राप्तीचे भयंकर पण अपरिहार्य साधन- यशस्वी राजकारणापर्यंतचे अनन्य साधन म्हणजे गोविंदकवी म्हणाले तसे, सशस्त्र “रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना” हा आमचा ठाम सिद्धान्त झाला. तामसी आंधळेपणाने वा एककल्ली उतावळेपणाने नव्हे, तर किंचित पुढेच रचलेल्या माझ्या या तत्कालीन श्लोकांतच स्पष्ट होत आहे तसे-

***“की घेतले व्रत न हें आम्ही अंधतेने”***

***“लब्धपकाश इतिहास-निसर्ग-माने”***

इतिहासनिसर्ग म्हणजे मनुष्यस्वभाव आणि सृष्टिक्रमाने म्हणजे तर्कशास्त्राने, अर्थातच ऐतिहासिक, स्वाभाविक आणि युक्तायुक्त दर्शने विचार करून करून पूर्ण निश्चिति पटल्यामुळे या दाहक पण अपरिहार्य दिव्यात आम्ही आपले प्राण अर्पिण्यास सिद्ध झालो.

***।। की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने ।।***

***// लब्धपकाश इतिहास-निसर्ग माने //***

***// जे दिव्य दाहक म्हणूनि असावयाचे //***

***// बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे //१//***

बुद्ध्याचि! अगदी बुद्धिपूर्वक विचार करून! हौसेने नव्हे, तर निरूपाय म्हणून! कारण ज्या सशस्त्रे क्रांतियुद्धाचे साधन आम्ही अंगिकारणार होतो, त्याचा नुसता उच्चार देखील आमच्या प्राणास धोक्यात घालीत होता, घालणार होता. मग त्याच्या आचरणाची तर गोष्टच वेगळी. हे आम्ही पूर्णपणे तेव्हाच आणि अगदी प्रथमपासून जाणून होतो. आम्ही लहान होतो - पण तरीही आमच्या त्या वयात डोळ्यादेखतच चाफेकर, रानड्यांचे प्रकरण घडलेले होते. त्याना जे फासावर लटकावे लागले, मारहाण छळ सोसावे लागले, त्यांच्या दोन-तीन पिस्तुलांच्या बारासाठी सारा महाराष्ट्र दडपशाहीच्या वरवंट्याखाली कसा चेचला जात होता, भेदरून थरकापत होता, हे राष्ट्रास सशस्त्र क्रांतियुद्धात पाडू तर त्या छळाच्या लक्षपटीने उग्रतर, बहुलतर, भयंकर छळास आणि प्राणघातास, कत्तलीस, नादिशाहीस, औरंगजेबीस आम्हास नि आमच्या राष्ट्रास तोंड द्यावे लागेल- लाखो आया निपुत्रिक होतील, लाखो लेकरे पोरकी होतील, घराघरात बांगडी फुटेल, नगरेची नगरे जाळूनपोळून भस्म होतील आणि त्यात सर्वांआधी आमची नि आमच्या कुटुंबांची राखरांगोळी उडेल हे आम्ही, निदान मी तर स्पष्टपणे जाणून होतो. आम्ही ज्या सशस्त्र क्रांतियुद्धाच्या मार्गावर पाय टाकीत आहो त्याचे परिणाम दुर्धर, रक्ताळ आणि हिंस्त्र आहेत याची यच्चयावत कल्पना माझ्या सहकाऱ्यांस येण्यास्तव मी नेदर्लंड, आयर्लंड, इटली वगैरे देशात झालेल्या भयंकर दडपशाहीची आणि क्रांतिकारकांच्या राक्षसी छळांची वर्णने हेतुतः स्वतंत्र व व्याख्यानांतून आणि लेखनातून स्पष्टपणे करीत असे. तुम्हांस नुसते टिळकांसारखे कारागृहात कोंडले जाणार नाही तर तुम्हांस मारहाण करण्यात येईल, चोप देण्यात येईल, अन्नावाचून तडफडविण्यात येईल, आईबापांस आणि बायकापोरांस ओढून आणून तुम्हांसमक्ष अपमानित करण्यात येईल- त्यांची लाज काढण्यात येईल- की जरी तुम्ही स्वतःच्या देहास दिलेले छळ सोसण्याइतके कठोर असलात तरी तुमच्या निरपराध प्रेमी जनांच्या छळाने तरी तुमच्या मनोधैर्याचा बुरूज कोसळून धायधाय रडून तुम्ही पोलिसांना कटाची माहिती सांगावी. त्या वीर बैरागीच्या समोर त्याच्या राजबिंड्या मुलाला मारून त्याचे कच्चे हृदय त्या वीर बंद्याच्या तोंडास जसे कोंबले तसे तापल्या सांडसाने डोळे तुमचे उपसूनही त्या देहछळाने जरी तुम्ही नमला नाही तरी तुमच्या आत्म्यास, तुमच्या हृदयास, तुमच्या जिवलगाहून जिवलग असेणाऱ्या प्रिय जनांच्या छळाच्या लाल तप्त सांडसांनी भोसकून लचके तोडण्यात येतील, की त्यायोगे तरी तुम्ही हतबल व्हावे! फाशीहून दुर्धर अशा दैहिक आणि मानसिक छळांनी तुमचे हालहाल करण्यात येतील. अशाही छळास पूर्वीच्या हिंदू वा प्रॉटेस्टंट धर्मवीरांनी जसे सहन केले तसे तुम्ही सहन करू शकाल का? तुम्ही तुमच्या स्वदेशाच्या स्वातंत्र्यार्थ मनुष्य जातीच्या हितार्थ असे या नव्या युगाच्या नवधर्माचे धर्मवीर, राष्ट्रवीर बनू शकाल का? हे सतीचे वाण असे उत्युग्र आहे, दाहक आहे- ते उचलून त्यासारखे चितेत जीवंत जळाल का? तरच आणि हे सर्व परिणाम समजून-उमजून ह्या भयंकर मार्गावर आपण पाऊल टाकावे, हे भयंकर दिव्य करावे! असे मागच्या इतिहासातील क्रांतिकारकांच्या छळाची वर्णने भडक रीतीने

रंगवून ती भीषण चित्रे समोर धरून मी मला आणि माझ्या सहकाऱ्यांना विचारत असे. चुकून नव्हे, अज्ञानाने नव्हे, तर मी असे विवेचून, त्या वेळच्याच भाषेत सांगावयाचे म्हणजे-

***जे दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचे ।।***
***बुद्ध्याचि वाण धरिले करिं हे सतीचे ।।***

तीस कोटी लोकांच्या ह्या महान राष्ट्रास मृत्यूच्या तावडीतून वाचविण्यासाठी, हा राष्ट्रीय पारतंत्र्याचा महारोग नष्ट करण्यासाठी, अगदी अपरिहार्य म्हणून स्वतःवर आणि या राष्ट्रावर ही अशी "शस्त्रक्रिया" करणे आणि त्या परकीय रोगजंतूस आणि रोगग्रंथीस कापून टाकणे हे नुसते क्षम्य, आपदधर्मीयच नव्हे तर नीतिदृष्ट्याही अत्यंत पवित्र आणि कर्तव्य होय. अपरिमित हिंसा टाळण्यासाठी दुष्टांची वीण थांबविणारी किंचित हिंसाच खरी अहिंसा होय, अशी निश्चिति झालेली होती. म्हणून आम्ही सशस्त्र क्रांतीचा बेलभंडार उचलेला. पण तरीही हे विसरता कामा नये की, जर कोण्या जादुगाराने कोण्या छूमंतर फूचा मंत्र म्हणून हिंदुस्थान स्वतंत्र करून आपणहून निघून जाण्यास इंग्रजांची मने वळविली असती तर आम्हांस कोणाहूनही आधिक असा आनंदच झाला असता. ज्या राष्ट्राच्या प्रेमासाठी आम्ही स्वतःवरही अघोर आपत्ति ओढवून घेत होतो त्या मातृभूमीचे आणि आमचे स्वतःचे रक्त सांडण्यासाठी आम्हांसा हौस का होती? जीवनाची आणि तारुण्याची मोहक सुखे आम्हासही नकोशी का होती? सोप्या देशभक्तीचा डौल आणि स्वतःच्या जीवास धोक्यात न घालता मिळणारे मोठेपण आम्हांसी संपादिता आले असते, ती "नेमस्तांची" ती "राष्ट्रीयांची " पिढीच होती. त्यांच्याप्रमाणेच देशभक्तीच्या पायऱ्यांनी हायकोर्ट जज्जशिपची वा लोकधुरूणत्वाची उच्चासने उपभोगिणे आम्हास किती तरी सोपे होते, पण देशभक्तीच्या पायरीवरून फासावर चढणाऱ्या आणि चितेवर जळणाऱ्या पुण्याच्या चाफेकरांचा आणि झाशीच्या लक्ष्मीचा अत्युग्र मार्ग जो आम्ही स्वीकारला होता, तो हौसेने असणे अशक्य नव्हते. यास्तव नेमस्तांच्या अर्जविनंत्यांनी, राष्ट्रीयांच्या निषेध नैर्बंधिक प्रतिकारांनी किंवा स्वदेशी बहिष्कार-करबंदीप्रभृति शांततेच्या वा निःशस्त्र प्रतिकाराच्या इतर कोणत्याही उपायांनी जर स्वातंत्र्य मिळू शकेल तर ते आम्हांस पाहिजे होते. पण तो "जर" अगदी अशक्य होय, अशी आमची भयभीत धारणा होती. तरी देखील ह्या सर्व निःशस्त्र मार्गाची त्या शेवटच्या शस्त्र क्रांतीच्या दिव्यास्तव अवश्य असणारी सिद्धता आणि क्षमता राष्ट्रात उत्पादिण्याच्या कार्यी अत्यंत आवश्यक आहेच आहे. त्या पायरीनेच चढत बहुधा मनुष्य शेवटची पायरी गाठू शकतो, हे आम्ही जाणीत असू, आणि म्हणून आमच्या कार्यक्रमात त्या सर्व उपायांचा आणि साधनांचाही समावेश प्राथमिक शिक्षणाच्या शाळांप्रमाणे केलेलाच असे. सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, साहित्यिक, राजकीय-विनंती निषेध नैर्बंधिक अडवणूक आणि निःशस्त्र प्रतिकार या प्रकारच्या सर्व चळवळी त्या त्या कक्षेत आणि परिस्थितीत आणि प्रमाणात आम्हास हव्या होत्या. पण त्या त्या शेवटच्या सशस्त्र क्रांतीच्या कार्यक्रमास ज्या मानाने उपयुक्त होतील अशाच मानाने हव्या होत्या. फार काय, सरकारी नोकऱ्या देखील या दृष्टीने विशिष्ट प्रकारच्या अटीवर आम्हास टाकावू वाटत नसत; तर उलट सर्व सरकारांतून आमची माणसे घुसविण्याची आमची योजना असे. यास्तव "वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागा हिंदी लोकांस द्याव्या," या राष्ट्रीय सभेच्या व इतरास भिकार वाटणाऱ्या नेमस्त पक्षीय

मागणीलाही आमचा पाठिंबाच असे. सारांश, अभिनप भारताचे अंतिम साध्य जसे पूर्ण राजकीय स्वातंत्र्य हे असताही मिळतील त्या त्या सुधारणा आणि हक्क जाता खिशात टाकण्यास आम्ही सिद्ध असू. त्याचप्रमाणे त्याचे अंतिम साधन सशस्त्र क्रांति हे असताही ज्या ज्या मानाने आणि ज्या ज्या परिस्थितीत इतर कोणतेही साधन त्या साध्यास अनुकूल पडेल त्या मानाने त्या परिस्थितीत ती सर्व साधने योजिण्यासही आम्ही सर्वसिद्ध असू.

स्वातंत्र्य हे सशस्त्र क्रांतियुद्धावाचून मिळणे नाही ही निश्चित होताच अर्थातच पहिला प्रश्न येई की ते खरे, अगदी खरे. पण ती सशस्त्र क्रांति ह्या निःशस्त्र, निर्वीर्य, निसंघटित राष्ट्रात शक्य आहे काय? अभिनव भारत सांगे, होय! ईश्वराच्या कृपेने अजूनही आणि या हतबलतेतही आणि इंग्रजासारख्या परम बलाढ्य सशस्त्र शत्रूशी लढावयाचे असताही भारतास सशस्त्र क्रांति-युद्धाची उठावणी करणे शक्य आहे! अति दुर्घट खरे पण शक्य आहे. जय? मिळेल हो! निदान पक्षी अशा जगण्यापेक्षा अशा क्रांतियुद्धात हे राष्ट्र ठार जरी झाले तरी ते मारीतमारीत मरण ह्या मरतमरत मरण्याहून केव्हाही अधिक अभिप्रेत होय. तसा अपजयही एक जयच आहे. कारण दास्यातही अंती मरणच आहे. मग “यदि मरणमवश्यमेव जंतोः किमिति मुधा मालिन यशः कुरूध्वे?” ही महान हिंदु जाती ह्या धर्मयुद्धात विजयी जरी झाली नाही, तरी निदान एखाद्या झाशीच्या राणीसारखी “अभिमुख शस्त्राघाती समरमखा माजी वेचिला काय। स्वतंत्र कवण मजहून आता कर्तव्य राहिले काय।।” अशी गर्जना करीत गतप्राण होऊन यशस्वी तरी झाल्यावाचून आणि आपल्या आजवरच्या अस्तित्वास शोभेल असाच महान अंतही संपादिल्यावाचून केव्हाही राहणार नाही! पुन्हा मानुषकाच्या दृष्टीनेही आततायास वचक बसणारा सूड उगवितच मरणे इष्ट. यामुळे आततायांची संख्या घटते. दुसऱ्या कोणा अनागसाचा छळ करण्याची त्याची छाती ह्या प्रतिशोधाच्या भीतीने सहसा होत नाही. पण गृहणीय व स्पृहणीय वीरगति संपादिणे ह्या हिंदुराष्ट्रास जिच्या योगे अजूनही शक्य आहे त्या सशस्त्र क्रांतीची ही योजना तरी कोणाची? अभिनव भारत, ज्या त्याच्या ह्या पहिल्या दोन वर्षांच्या शेवटचा वृत्तांत उल्लेखिला जात आहे, त्या कालीही उपदेशी की, जी योजना मॅझिनीने इटलीच्या क्रांतियुद्धास्तव आखली, जी आयर्लंड आणि रशियातील क्रांतिकारक त्याच परिस्थितीत त्यांच्या क्रांतीत आचरित होते आणि सत्तावनच्या क्रांतियुद्धात भारताने आचरून दाखविली, त्या योजनांच्या आधारे ते गनिमीकाव्याचे धोरण, त्या सशस्त्र उठावणीस भारतातही शक्य आणि बहुधा विजयीही करून दाखवील. सैन्यात आणि पोलिसात क्रांतीचा प्रसार आणि गुप्त क्रांतिकारकांची भरती करणे. रशियादिक परराष्ट्रांशी संधान बांधणे, गनिमी काव्याची युद्धपद्धती स्वीकारणे, इंग्रजी सत्तेच्या केंद्रावर आणि प्रतिनिधीवर वैयक्तिक छापे येताजाता घालणे, संस्थानातून नि सरसीमेपलिकडे शस्त्रास्त्रांचे साठे करून आत घुसण्याची संधी पाहत टपून बसणे, मधूनमधून शक्य होताच लहानमोठ्या उठावण्या आणि बंडे करीत राहणे, त्यायोगे देशात क्रांतीचे शिक्षण, मरणाचे बाळकडू, मरणाची क्षमता, प्रदीप्तवीत शत्रूस राज्यशकट हाकणे अधिकाधिक धोक्याचे आणि दुर्घट करीत जाणे, आणि शेवटी एखाद्या महायुद्धांत इंग्रजी साम्राज्याची कोण्या प्रचंड शक्तीशी टक्कर जुंपून त्यात इंग्लंडचे बळ परस्पर विद्ध आणि क्षीण होत असताना भारतातील निकराचे क्रांतियुद्ध पुकारून मुक्त होणे, पुन्हा फसल्यास पुन्हा

तशीच उठावणी घेणे, मरेतो असेच मारीत मारीत झुंजणे, ही त्या वेळच्या आमच्या सशस्त्र उठावणीची रुपरेखा होती. इंग्रजांचे दहापाच लोक मारले, की ते पळतील, अशी दुधखुळी समजूत आम्ही केव्हाही करून घेतली नव्हती. पण आमची निष्ठा असे की, तीस कोटी लोकांचे हे राष्ट्र, यातील सर्वजण जरी कधीच उठले नाहीत, उठणार नाहीत, तरी दोन लक्ष वीर जरी अशा छाप्यांच्या पद्धतीने गुप्त संघटनेने, गनिमी काव्याने, अखंड, अदम्य, अविश्रांत, वृकयुद्ध लढू निघतील तरी आपले राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादू शकतीलच शकतील. निदान तसा संभव असलाच तर ह्याच योजनेत काही तरी होता, पण त्या सशस्त्र क्रांतियुद्धास "पोरकट" वेडेपणात ढकलून जे थोरकट शहाणे केवळ अर्जांच्या-विनंत्यांच्या-निषेधांच्या, केवळ स्वदेशीच्या-समाज सुधारणेच्या वा निःशस्त्र प्रतिकाराच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळेल, इंग्लंड दया येऊन वा हिंदुस्थान वयात आले म्हणून वा आपली वचने स्मरून वा जनलज्जेने त्याच्या बंदुकीतील बारही झाडल्यावाचून निघून जाईल, म्हणून शपथेवर सांगत, त्यांच्या त्या योजनांत तर तो संभव मुळीच -मुळीच-मुळीच नव्हता!!!

यास्तव आम्ही या सशस्त्र क्रांतियुद्धास कंबर कसली. कोणाच्या शक्तीवर? नुसत्या आमच्या नव्हे, तर राष्ट्राच्या! ज्या पहिल्या दोन वर्षांच्या वृत्तांताचे हे समालोचन आहे त्या काळी आम्ही म्हणजे पुरेसे चाकूही जवळ नसलेली शे-पन्नास मुले! आणि महासमर लढावयाचे होते महाबलाढ्य इंग्रजी सत्तेशी! वृत्रासुराचा वध करावयाचा आणि हातात आमच्या अत्यंत तुच्छ शक्तीची ही काडी घेऊन! किती हास्यास्पद! निःसंशय हास्यास्पद- ते आमचे आम्हीच इतर कोणाहूनही अधिक स्पष्टपणे जाणून होतो. पण आम्ही हेही जाणून होतो की, आमची ही संस्था एक यत्किंचित काडी असली तरी ती आगकाडी होती. इतिहासात अशा एखाद्या अत्यंत क्षुल्लक आगकाडीने केव्हा केव्हा अचूक एखाद्या दारूच्या कोठारावर आपली ठिणगी टाकून त्या स्फोटासरशी साम्राज्याचे साम्राज्य उडवून त्याची राखरांगोळी केली होती. तशीच ही तुच्छ आगकाडी ही एक क्षणात स्वतःजरी जळून गेली तरी अचूकपणे आपली सरती ठिणगी त्या दारूच्या कोठारावर- जर टाकू शकली तर? त्या तुच्छ आगकाडीच्या सूक्ष्म ठिणगीच्या बळे नव्हे, तर त्या प्रचंड दारूच्या कोठाराच्या प्रबळ स्फोटाच्या बळे आततायी विपक्षाचे हेही साम्राज्य धुळीस मिळणार नाही कशावरून? आणि त्यातही त्या दारूच्या कोठारात एकतीस कोटी राष्ट्राच्या भयंकर असंतोषाची स्फोटक द्रव्ये खचाखच भरलेली असता निदान प्रयोग करण्यास तरी काय हरकत! अशा विचारे आमची अतिशय क्षुद्र शक्ति जाणीत असताही आमच्या प्राणाच्या शक्तीची ठिणगी त्या दारूच्या कोठारास आग लावण्यासाठी त्यावर फेकण्याचा आम्ही निश्चय केला.

त्यात किती यश आले? तो प्रश्न काळाला लागूच नव्हता. असा निश्चय आम्ही करू शकलो एवढेच त्या पहिल्या दोन वर्षाचे कार्य- युद्धाच्या आधीची मानसिक योजना हीच युद्धाची पहिली सिद्धता, पहिले शस्त्र, जे रणगीत, जो रणमंत्र, रणमखाचा हरि ओम् करतो तोही एक शब्द असला, नुसता बोल असला तरी ते एक रणकृत्यच असते.

ते रणगीत आम्ही रचले."रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?" हा प्रबल प्रश्न, हा साहसी सिद्धान्त आम्ही प्रकटपणे राष्ट्रापुढे टाकला, उद्‌घोषित केला, हेही एक शतकृत्यच होते. त्या अभिनव भारताच्या

गुप्त संस्थेने त्या काळी किंवा पुढेही जरी दुसरेतिसरे काही केले नसते तरी या एका कृत्यानेही तिच्या अस्तित्वाचे चीज झाले असते. तिचे असित्व अनन्य महत्व पावले असते. कोणत्याही प्रबुद्ध क्रियेचा आरंभ प्रबुद्ध संकल्पांतच असणार! यास्तव अभिनव भारताच्या कार्यक्रमाचे मी प्रथमापासूनच मनप्रवर्तन आणि शरीरप्रवर्तन, राष्ट्राची मानसिक क्रांति आणि मग वास्तविक क्रांती, प्रबुद्ध संकल्प आणि मग प्रबळ क्रिया, मतप्रचार आणि कृति-प्रचार अशा अनुक्रमाने विभागला होता. ही पहिली तीन वर्षे राष्ट्रात ह्या संपूर्ण राजकीय स्वातंत्र्याच्या साध्याचा आणि सशस्त्र क्रांतियुद्धाच्या साधनांच्या मताचा प्रचार करणे, राष्ट्राची मानसिक क्रांती करणे, राष्ट्राकडून तो संकल्प सोडविणे, ह्याच कार्यी शक्यतो आमची अल्पस्वल्प शक्ती वेचण्याचे आम्ही ठरविले. त्या पहिल्या दोन वर्षात आम्ही जे काही करू शकलो ते याच दिशेने. इतर राजकीय चळवळीची दिशाच चुकल्यामुळे परसत्तेच्या बालुकामय कर्दमांत फसून बसण्याच्या संकटात सापडलेले राष्ट्राचे तारू बरोबर दिशेला हाकविण्यासाठी अभिनव भारताचे बिनचूक होकायंत्र काय ते आम्ही घडविले; पण निःक्रिय होकायंत्राचे कर्तृत्व तारवावरील इतर कोणत्याही क्रियेहून कमी नसते. केव्हा केव्हा तर जीवनाच्या नौसाधनावरील (आरमारावरील) इतर सर्व क्रिया सफल वा विफल होणे हे एका होकायंत्रांच्या कर्तृत्वावरच अवलंबून असते जसे कोलंबसाच्या त्या साहसी नौका अमेरिकेच्या शोधाच्या प्रसंगी भर महासागरात गांगरून दिङ्मूढ झाल्या त्या दिवशी!

अभिनव भारताची पहिल्या दोन वर्षांच्या क्रांतिकारक चळवळीची ही रुपरेखा होती. त्या संस्थेव्यतिरिक्त स्वातंत्र्याच्या दिव्य ध्येयाचा आणि सशस्त्र क्रांतीच्या दाहक साधनांचा असा प्रकट, सतत नि संघटित प्रचार करणारी दुसरी कोणतीही लहान वा मोठी संस्था उभ्या हिंदुस्थानात एखाद दुसरीच असेल नसेल,बहुधा नव्हतीच. ती उणीव भरून काढीत असताच त्यावाचून त्यावेळेस राजकारणाचे जे दोन पंथ देशात काम करीत होते त्या नेमस्त (Moderate) आणि राष्ट्रीय जहाल (Nationalist extremists) अशा त्या दोन्ही पंथांच्या संस्थांतून जी सक्रीय कामगिरी चाले तीही सर्व मित्रमेळ्याने आपल्या क्षेत्रात चालविलीच होती. निदान त्या वेळच्या कोणत्याही संस्थेइतकी तरी ही संस्था आपल्या त्या दोन वर्षातही कर्तबगार झालेली होती. त्यांच्या बहुतेक चळवळीत सक्रीय भाग घेत होती. त्यातही लोकमान्य टिळकांचा राष्ट्रीय पंथ तिच्या अधिक निकट असल्यामुळे त्यांच्या कार्यक्रमातील सर्व कार्ये ती आपल्या क्षेत्रात अधिक उत्साहाने करीत होती. ही गोष्ट स्पष्टविण्यासाठी, या खंडात मित्रमेळयातील अशा चळवळीचा जो फुटकळ वृत्तांत आला आहे त्याचे थोडे संक्षिप्त वर्गीकरण येथे देणे अवश्य आहे. मित्रमेळ्याच्या या पहिल्या दोन-तीन वर्षातील प्रत्यक्ष कार्यक्रमातही खालील चळवळीही समाविष्ट असत.

१) **वक्तृत्वोत्तेजक सभा** :-

मित्रमेळ्यात वकृत्वकलेचे शास्त्रीय शिक्षण आणि प्रायोगिक अनुभव उत्कृष्ट रीतीने मिळत असे. अभिनव भारत छापाच्या वकृत्त्वाची एक नवीच परंपरा महाराष्ट्रात गाजू लागली. मोठमोठ्या पट्टीच्या वक्त्यांना फिके पाडणारे अनेक तरुण वक्ते मित्रमेळ्यात उदय पावले.

२) **साहित्य संस्था** :-

www.savarkarsmarak.com

निबंध शक्ती, काव्य शक्ती, तर्क शक्ती यांचाही विकास या संस्थेच्या द्वारे उत्कृष्टपणे होऊ लागला. महाराष्ट्रीय कवितेत अत्यंत स्फूर्तिदायक गीतांची आणि सुंदर काव्याची भर या संस्थेने टाकली. तर्कशुद्धता, कोटिक्रम, प्रावीण्य नि वादकौशल्य-यात मित्रमेळ्यातील तरुणांचा हात धरणार वाग्वीर विरळाच सापडे. अनेक वक्त्यांप्रमाणेच त्या संस्थेतून अनेक नामांकित लेखक आणि कवी निर्माण झाले. त्या त्या कलांचे शिक्षण आणि अनुभव ह्या संस्थेच्या साप्ताहिक बैठकीतून सतत मिळत असे. संभाषणशक्तीही (Conversational power) विकास पावे. मराठी वक्तृत्त्वाप्रमाणेच मराठी भाषेतही अभिनव भारत छापाची काव्यमय, तेजस्वी, प्रदीप्त आणि प्रबळ अशी एक नवीनच भाषाशैली उदय पावली. आणि तिच्यापुढे त्या वेळच्या इतर भाषाशैली अगदी निस्तेज भासू लागल्या. उपनिषदे नि वेदांत, कालिदास नि भवभूति, ज्ञानदेव आणि तुकाराम, वामन नि मोरोपंत अशा विषयांचा नि ग्रंथांचा चिकित्सक अभ्यास नि चर्चा या संस्थेत चालू असे. त्यामुळे तिचे तरुण आणि प्रौढ- सारे सभासद आपापल्या परी साहित्याचे भोक्ते होते. काव्यशास्त्रविनोदाचे मर्मज्ञ होते.

**३) राष्ट्रीय शिक्षण संस्था :-**

अभिनव भारताच्या या राष्ट्रीय शिक्षणाच्या क्षेत्रातील त्या वेळचे कार्य तर तशा त्या काळच्या कोणत्याही संस्थेहून अधिक व्यापक, तेजस्वी परिणत नि परिणामी होते! किंबहुना तिच्यासारखे तेजस्वी व राष्ट्रीय शिक्षण देणारी दुसरी संस्था त्या काळी एकही ऐकिवात नव्हती. पृथ्वी वाटोळी आहे, बे बे चार, अन्नचर्वण चांगले करावे, थेम्स नदी इंग्लंडात आहे प्रभृती गणित, ज्योतिष, वैदिक, भूगोलादिक ज्ञान विद्यार्थ्यांस सरकारी शाळा काय, राष्ट्रीय शाळा काय, सारख्याच देणार. राष्ट्रीय शाळा झाली तरी बे बे पाच, पृथ्वी सपाट आहे, म्हणून काही शिकवीत नाही. तेव्हा राष्ट्रीय शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे हेच की, आपल्या राष्ट्राच्या भूतकालीन इतिहासाचे यथार्थ महत्व, आपल्या राष्ट्रावरील वर्तमानकाळच्या संकटाची नि आवश्यकतांची उत्कट आणि स्पष्ट जाणीव, त्या संकटातून त्यास सोडवून त्याला उज्ज्वल भविष्यकाळ प्राप्त करून देण्यासाठी वेळी प्राण पणास लावून झटण्याची नि झुंजण्याची आतुर सिद्धता नि त्याग, राष्ट्रीय तरुणात जे शिक्षण उत्पन्न करते तसे राष्ट्रीय शिक्षण नुसत्या त्या नावाच्या उघडलेल्या कोणत्याही प्रकट संस्थेत अभिनव भारतासारखे मिळत नव्हते. इतकेच नव्हे, तर त्या काळी मिळणे शक्यच नव्हते. स्वातंत्र्य हे या भारतीय राष्ट्रास नुसते अभिप्रेतच नव्हे, तर साध्य आहे, इंग्रज सत्ता साधलेल्या साधनाने उलथून पाडणे न्यायच नव्हे तर शक्य आहे आणि सशस्त्र क्रांतिवाचून ते स्वातंत्र्य इंग्रजांच्या मगरमिठीतून सुटणे केव्हाही संभवत नसल्यामुळे त्या सशस्त्र क्रांतियुद्धात निदान 'तू तुझे कर्तव्य कर- तू आपल्या वाट्याचा निदान एक शत्रू तरी ठार करून चालता हो- पुढे इतर तसे करोत न करोत, यश येवो न येवो, देशमाता मुक्त करण्यासाठी, निदान तिचा सूड उगविण्यासाठी तू एकटा जरी लढलास, तू एक शत्रू तरी बळी घेऊन दास्यशृंखलेचा एक दुवा जरी तोडलास, या धर्मबुद्धि

केवळ चढण्यास निशेचाच आत्मप्रसाद उपभोगीत तुझा तू जरी मारीत मारीत मेलास, तरी तुझे कर्तव्य तू केलेस-' असे अत्युग्र, अत्युत्कट, त्यागाचे, शिक्षण स्पष्टपणे या अभिनव भारताच्या प्रकट गुप्त राष्ट्रीय शाळेतील साप्ताहिक नि दैनिक बैठकीतूनच कायते देण्यात येत होते, हजारो जणास भरसभातून ते उपरोधिक वक्तृत्त्वाच्या प्रच्छन्न पिचकारीनी टोचले जात होते. या दृष्टीने नानाविध देशांचे इतिहास त्या संस्थेत चर्चिले जात, विवेचिले जात. त्यामुळे इतिहास शास्त्रात अभिनव भारताचे सभासद मोठमोठ्या पदवीधर इतिहासज्ञासही सहसा हार जात नसत. अत्युत्कट देशभक्ति आणि निःसीम त्यागशक्ति त्यांच्यात उत्पन्न होई. आणि तरीही ती देशभक्ती तामसी नसे. कारण मानव्याच्या, मानुषकाच्या, अधिकात अधिक मानवांच्या हितास पोषक असेल तीच खरी राष्ट्रभक्ती, द्वेशासाठी नव्हे तर मानुषकांच्या प्रेमासाठीच, हितासाठीच, ही तलवार आम्ही उपशीत आहो- जसा शस्त्रवैद्य आपले शल्यतंत्र उपयोजितो, हे सूत्र, ही नीति, हा धर्म सदोदित एखाद्या पालुपदासारखा वारंवार त्या संस्थेत उपदेशिला जाई.

४) **स्वदेशी, व्यायाम, सामाजिक सुधारणाः-**

राष्ट्राची सर्वांगिण उन्नति करील असा सर्वसंग्राहक कार्यक्रम आम्ही पुढे ठेवलेला असल्यामुळे स्वदेशाच्या शारीरिक उन्नतीस्तव वैयक्तिक आणि सैनिक व्यायामाचा पुरस्कार आणि अभ्यास तरुणात प्रसृत होण्याचा यथाशक्य यत्न ही संस्था करी. स्वदेशी व्रत, स्वदेशीच्या औद्योगिक उन्नतीस्तव, प्रत्येक सभासदाचे निरपवाद कर्तव्य समजले जाई. स्वातंत्र्य मिळाल्यावाचून राष्ट्राची इतर कोणत्याही दिशेने खरी उन्नति होणे हे हातपाय बांधून टाकलेल्या व्यक्तीची प्रगति, ती बंधने तोडल्यावाचून जसे दुर्घट तसे दुर्घट होय. हे लोकमान्य टिळकांचे म्हणणे सर्वथैव सत्य मानीत असूनही आम्ही त्यातल्यात्यात शक्य ती औद्योगिक नि सामाजिक सुधारणा राजकीय प्रगतीलाही उपकारकच आहे हे आगरकरप्रभृतीचे म्हणणेही आम्ही अनुवादू- राजकारणात टिळक चिपळूणकर आमचे गुरू. समाजकारणात रानडे, आगरकर आमचे गुरू. त्या उभयतांच्या मतांचा यथाशक्य समन्वय हे आमचे धोरण, म्हणून त्या काळी राष्ट्रीय प्रगतीस अडविणाऱ्या रूढींचा उच्छेद विधवाविवाह, वेदोक्त स्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, विटाळवेडाचा नायनाट, परदेशमगन-स्वातंत्र्य, धार्मिक अवडंबाराचे उच्चाटनप्रभृती सुधारणांचे आम्ही सक्रीय पक्षपाती होतो. ह्या आणि अशाच इतर अंधरुढीभंगाच्या विषयावर संस्थेत अनेकदा कडाक्याचे वाद होत. आणि त्यांचा बुद्धिपूर्वक निर्णय सुधारणास अनकूल असाच होई.

५) **राष्ट्रीय उत्सव, सभासंमेलने :-**

लोकमान्यांनी राष्ट्रात राजकीय चैतन्य आणि पौरुष संचारण्यास्तव जे शिवाजी-उत्सव, गणपती-उत्सव, प्रभृति राष्ट्रीय उत्सव चालू केले त्यांचाही आम्ही आमच्या कार्यक्षेत्रांत भरपूर प्रसार केला आहे. इतकेच नव्हे, तर त्यास मुंबई पुण्याहूनही अधिक तेजस्वी स्वरूप आणून सोडले. त्याचप्रमाणे इंग्रजी अत्याचार, अन्याय आणि जाचक निर्बंध यामुळे देशात जेव्हा जेव्हा

असंतोष माजे तेव्हा तेव्हा त्यांच्या फुटकळ निषेधाच्या ज्या सभा, अर्जसंमेलने नेमस्त वा राष्ट्रीय पक्षाकडून घडत त्यांच्या त्यांच्या त्या चळवळीचे लोण आम्ही तत्काळ आमच्या त्या काळच्या कार्यक्षेत्रातही आणून पोचवावे आणि नाशिकात आणि नाशिकचा प्रतिध्वनी उठेपर्यंतच्या भागात राजकीय असंतोषाची आग पुण्या-मुंबईहूनही तीव्रतर अशी भडकावीत राहावे. कारण त्या आगीत आम्ही नुसत्या 'मायबाप सरकारच्या' अधिकारांच्या त्या विशिष्ट नि फुटकळ छळाविरुद्धच नव्हे, किंवा हिंदुस्थानातील इंग्रजी कूटनीतीविरुद्धच नव्हे, तर थेट इंग्रजी सत्तेविरुद्धच असंतोष माजवावा. आणि राष्ट्रीय असंतोषाच्या आगीत अर्जांची भेंडोळी वा निषेधांची चिटोरी न फेकता क्रांतिकारक विचारांचे पेट्रोल ओतावे आणि अशा प्रत्येक सभेच्या वा संमेलनाच्या शेवटी अधिकाऱ्यावरील टीकेचे प्रायश्चित्त म्हणून "God save the king" चा जयघोष होत असता आम्ही मात्र तो "किंग" बिंग गुंडाळून ठेऊन निर्भेळ "स्वातंत्र्यलक्ष्मी की जय" च्या गर्जना करीत उठावे. सारांश, त्या वेळच्या राजकीय क्षेत्रात ज्या निरनिराळ्या पक्षांच्या संस्था कार्य करीत हेत्या, त्यांच्या कार्यक्रमांतील आणि विशेषतः लोकमान्य टिळकांच्या त्या काळी सर्वात अग्रेसर असेणाऱ्या राष्ट्रीय पक्षाच्या कार्यक्रमांतील बहुतेक कामे मित्रमेळ्याने आपल्या परीने आपल्या क्षेत्रांत चालविली. त्या वेळच्या कोणच्याही राजकीय संस्थेइतकी तरी ही संस्थाही सक्रीय होती. आणि त्या कार्यक्रमाचा अपुरेपणा पुरतेपणी जाणून, त्या सर्व चळवळींच्या पुढे जाऊन ज्यावाचून राष्ट्राची खरोखरीची प्रगती होणे केव्हाही अशक्यच असणार, त्या संपूर्ण राजकीय स्वातंत्र्यास्तव सशस्त्र बंडाचाही झेंडा तिने उभारला व तिच्या असीम धाडसासरशी जनतेत अपूर्व खळबळ उडवून देणारे तेज त्या संस्थेच्या प्रत्येक कार्यात आणि शब्दात तळपू लागले.

अवघी शेपन्नास मुले, इतकेच तिचे त्या वेळचे सैनिक होते. त्यांचे असीम धाडस नि देशमातेच्या मोचनार्थ पणास लावलेले त्यांचे प्राण, ही दोनच शस्त्रे काय ती तिच्या हाती होती. आणि तिचे कार्यक्षेत्र फारफार तर एका जिल्ह्याएवढे काय ते विस्तृत होते. पण तिने जो संपूर्ण राजकीय स्वातंत्र्याचा महामंत्र उच्चारिला आणि त्या साध्याच्या प्राप्तीस्तव सशस्त्र क्रांतीच्या ज्या भव्यभीषण साधनेची योजना आखली त्या दैवी मंत्राच्या नि भीषण साधनेच्या स्फोटासरशी एका महान क्रांतिप्रलयातून तीस कोटी जनतेचे राष्ट्र उद्भवणार होते. एक आसुरी साम्राज्याचे साम्राज्य उलथून पाडणार होते. त्या अभिनव भारताच्या त्या वेळस अशा अगदी क्षुल्लक आणि तुच्छ शक्तीच्या असेणाऱ्या संस्थेने तिच्या पहिल्या दोनतीन वर्षांत जे कार्य केले ते इतके थोडे नि इतके मोठे होते. एखाद्या प्रचंड किल्ल्याच्या मर्मस्थानीच लावलेल्या अतिशय लहान आकाराच्या आणि मूठभर पण मारक स्फोटक खच्चून भरलेल्या गुप्त सुरुंगासारखे तिचे ते त्या वेळचे अस्तित्व इतके भिकार नि इतके भयंकर होते.

**माझ्या वहिनींची आठवण**

या आत्मवृत्ताच्या पहिल्या खंडात माझ्याविषयींच्या माझ्या वहिनींनी टिपून ठेवलेल्या काही आठवणी दिलेल्या आहेत. मी जन्मठेपेवर अंदमानात गेलो असता पुन्हा कधीही या जगात परत येण्याचा

फारसा संभव उरला नव्हता. अशा वेळी त्या दुःखाने विव्हल झालेल्या तिच्या वत्सल अंतःकरणास काही तरी हलके वाटावे आणि पुढेमागे जेव्हा माझे चरित्र लिहिले जाईल, तेव्हा प्रत्यक्ष पाहिलेल्या मजविषयीची काही तरी माहिती उपलब्ध असावी म्हणून माझ्या वडील वहिनीने सौ. येसूमाईने या आठवणी स्वहस्ते लिहिल्या. तिने त्या अपुऱ्याच सोडलेल्या आहेत. त्या वेळी माझे चित्र ठेवले असताही पोलीस जप्त करीत तिथे चरित्र उघडपणे प्रसिद्ध करण्याची गोष्टच बोलावयास नको होती. पण अशाही वेळी तिच्या ह्या वैयक्तिक आठवणी इष्टमित्रांनी ती वारल्यावरही गुप्तपणे राखून ठेवल्या. त्यातील माझ्या नाशिकातील वास्तव्याच्या वेळचा किंचित भाग वानगी म्हणून येथे दिला जात आहे. माझ्या आठवणीपेक्षा त्या माझ्या वत्सल वहिनीचीच आठवण म्हणून मला त्या अधिक स्मरणीय आणि संग्राह्य वाटल्या. कारण तिनेही आपल्या राष्ट्रास्तव एखाद्या वीरांगनेस शोभेल अशाच धैर्याने त्या राष्ट्रीय संकटास तोंड दिले आणि आपल्या वाट्याचे ते असह्य कष्ट सहन करीत त्याच कार्यी शेवटी देह ठेविला. तिच्याच भाषेतील उतारा तिने ठेविला तसा अपुराच दिला आहे.

"आम्ही आणि दातार मंडळी एकत्रच राहत होतो. पुढे त्यांची नातलग मंडळी जेव्हा राहावयास यावयाची होती, तेव्हा दोघांच्या सोयीसाठी दोघांच्या विचारानेच आम्ही दातारांच्या माडीवर या वेळेपासून निराळे राहू लागलो. इतक्यात चिपळूणकरांची उपवर मुलगी येसू आमच्याकडे राहावयास आली. तिची माझी लहानपणापासून ओळख व नाते असल्याने ती आमच्या घरी मनमोकळी आठ-दहा दिवस राहिली. परंतु तिला तात्यास द्यावयाचा मामांचा बेत आहे हे आम्हास मुळीच कळले नव्हते. मग समजले तेव्हा तात्यांनी मामांना सांगितले की,मी लग्न करणार नाही. कारण माझे शिकणे व्हावयाचे आहे. मग मामा फार दादा-बाबा करावयास लागले. तसे ह्यांनी असे काढले की, जर ते शिक्षणाचा खर्च देत असतील तर ठरवा. ते ठरून शिमग्यात लग्न झाले. लग्नात मिरवणुकीत तात्या घोड्यावर बसले ते किती चांगले दिसत म्हणून सांगू- त्यांना नवरकळा किती तरी चांगली आली होती. तो लांबलचक अंगरखा, ते पागोटे वेडेवाकडेच होते. पण हे जातीचेच सुंदर, त्यांना ते सर्व फार चागंले दिसे. हौसेने सगळे खेळ खेळत, उखाणे निरनिराळे नवीन रचून घेत व 'सर्व वहिनीला पाहू द्या, तिला ऐकू द्या, वहिनी, मी नाव घेत आहे तू ऐकतेस ना?' असा माझा मान किती तरी ठेवीत. नंतर सातवीची परीक्षा आली तर काय असेल ते असो, फार जबर दृष्टि झाली, व हिवतापाने तात्या फार आजारी पडले. लग्नाची व अभ्यासाची खटपट असे एकदाच आले. लग्नाच्या या दिवसापासूनच तात्यांची नि भाऊची (भटांच्या कुटुंबात दिलेल्या तात्यांच्या एका दूरच्या मावशीचा मुलगा विष्णू, आता आम्ही ज्यांना भाऊ म्हणतो त्यांची) मैत्री झाली. ती अशी वाढत गेली की, असे प्रेमळ आणि एकमेकांना जीव की प्राण लेखणारे मित्र आम्ही काही कुठे पाहिले नाहीत. तात्यांना मी भाऊजी म्हटले की म्हणायचे मला तात्या म्हणत जा, नाही तर मी ओ देणार नाही. म्हणून मी त्यांना तात्याच म्हणत असे. मला त्यांचे विचारणे हेच की काही लिहितेस की नाही, वाचतेस की नाही? कसे लिहावे ते सांगावयाचे व दुपारी जेवताना मला सोबत करून वर्तमानपत्र आणून वाचून दाखवायचे. पुढे आम्ही त्रिंबकला गेलो. त्रिंबक गाव किती खेडे. माणसे किती मंद- पण त्या माणसांना देखील तात्यांच्या मधुर नि रसाळ वाणीने आनंद, उत्साह व तरतरी आणली, स्त्रियांस, मुलांस,

पुरुषांस तात्यांवाचून करमेनासे होई. नेहमी दहाबारा मंडळी भोवती बसलेली. माझ्या माहेरी घरात आई वगैरे सर्वांनी म्हणावे : येसूच्या दिराचा स्वभाव गोडबोल्या आहे. कोणावर वसखर नाही. किती धीट. आम्ही सर्व मैत्रिणींनी, आईने, आजीने, त्याना बसवून घ्यावे. त्यांना आम्ही गाणी म्हणून दाखवावी, खूप गप्पा माराव्या, असे दिवस फार आनंदात गेले. तात्यांच्या सासरी देखील किती मान असे. घरात बायकामंडळीत नि बाहेर पुरुषमंडळीत सर्वांना वाटे, की फार फक्कड जावई मिळाला. ह्यांनी पानसुपारी करावी, त्यांनी मेजवानी द्यावी, घरीदारी ज्याला-त्याला वाटे त्यांनी आपल्याजवळ बसावे, आपल्याशी बोलावे, अशी त्यांची बोलण्याची माधुरी काही निराळीच. उन्हाळ्याचे दिवस असले की रात्री कलिंगडे आणावयाची 'नि गार होण्यासाठी चांदण्यात ठेऊ अं,' असे सांगून मला चिरावयास बसवीत. पण मी जशी चिरी तशी फोडीवरील लाल गर सारखा खाऊन फस्त करीत, खालचे ठेवीत, नि म्हणत हे तुम्हाला अं. मी रागावले की म्हणत, माझ्यासमोर का बसतेस चिरीत? मी यावयाच्या आधी चिरून ठेवले असतेस तर? तसेच थालीपीठ त्यांना फार आवडे. मी खाली चुलीवरून उतरले म्हणजे भराभर तोडांत टाकीत. मी लपवून ठेवले की म्हणत, तू देशील तितकेच खाईन. मी फसे नि ते काढी, की लागले धुमाकूळ घालायला. कोट, टोपी, कपडे घातले आहेत, याचे त्यांना काहीच नसे. तसेच खात. पण घरी (बाबांचे) सोवळेओवळे फार. एकदा तात्या येताच थालीपीठ पाहून, कोटटोपीसह भराभर खाऊ लागले. तोच घरी यायचा (बाबांचा) आवाज ऐकला. तसे तात्या भरकन थालीपीठ घेऊन नकळत आबांच्या घरी पळून गेले. आम्हाला कधी सोवळ्यानी जेऊ देत नसत. मुकटा, धाबळ कधी न धुतलेली, तिच्यापेक्षा नित्य धुतलेले लुगडे खरे सोवळे म्हणून मावशींना, मला शेजारी आमच्या मैत्रिणींना, मामीला सगळ्यांना चिडवीत. आम्ही सोवळे आहे म्हटले की 'शिवू? शिवू?' म्हणून त्रास देत. पण जर आपण मानले की न धुतलेली धाबळच खरी ओवेळी तर मग सोडून देत. एकदा तात्या धोतरसदऱ्यासह खाताना घरी (बाबांनी) पाहिले. तेव्हा मग त्या विषयावर दोघांची खूप चर्चा झाली. मग घरी (बाबांनी) मानले. स्वतः (बाबा) सोवळ्याने जेवीत; पण मग तात्यांना फारसा विरोध करीत नसत. "तो तसाच" म्हणून सोडून देत. मला नेहमी कामात विचारीत पाने मांडू का? हे करू का, ते करू का, असा ज्याचा त्याचा जीव जाणीत. पन्हे त्यांना आवडे. 'मी पन्हे करतो, तुला साहाय्य देतो अं', असे म्हणून पन्हे करायला लागत. पण गोड झाले का बघू बरे, असे म्हणत चमच्यामागून चमचे पीत ते वाढायच्या आधीच संपवून टाकीत मग मी पुन्हा पन्हे करू देत नसे. हुळा घरी आला की आम्ही तो किती चोरून ठेवला तरी त्यांना सुगावा लागावाच. मग लिहित-वाचीत असले तरी हुळ्याचा दाणा सोलीत तोंडात टाकीत वाचीत बसत. आम्ही खाऊ लागलो की म्हणत, "ते माकडखाणे काय खाता? माकडे आहात की काय, ते फार खाणे चांगले नाही. यापुढे मी पण खाणार नाही." मग आम्ही ते नेऊन ठेवले की केव्हाच जाऊन ते गुपचूप सगळा हुळा खाऊन टाकीत. आम्ही पाहावे तो टोपली रिकामी. असे ते सगळ्यांना हसवून खेळवून जात. जिथे तिथे मंडळींना आनंदीआनंद वाटे. ते अभ्यासच केवळ करीत नसत. तर किती तरीच उद्योग चालत. काही कविता करायचे. काही लेख लिहायचे. व्याख्यान द्यायचे. आपण करीत ते करीत पण सगळ्यांना अशा कविता करा, असे लेख लिहा, असे सारखे शिकवीत असायचे. मला नि माझ्या मैत्रिणींना देखील त्यांनी शिकवावे.

गाणी रचून द्यावी, वर्तमानपत्रे वाचून आपली मते पटवावी. निबंध लिहवून घ्यावे. माझ्याकडून थोडेच लिहवीत. कारण माझे डोळे फारच अधू. तरी त्यांनी चार-पाच निबंध माझ्याकडून लिहवून घेऊन सुधारून दिले होते. अक्षरापासून मला त्यांनीच शिकविले. मला कविता करायलाही शिकवीत. आमच्या सगळ्या मैत्रीणींनाही तेच शिकवीत.”

## वैद्यभूषण वामनशास्त्री दातार यांच्या 'गोविंदकवी'च्या चरित्रातील उतारे

श्री वैद्यभूषण वामनशास्त्री दातार ह्यांचा मित्रमेळ्याशी पहिल्या दिवसापासून नसला तरी पहिल्या वर्षापासून कसा संबंध असे आणि त्या लहान वयात संस्थेच्या अंतिम ध्येयाचे मर्म समजण्याइतकी जिज्ञासा त्यास प्रथम जरी नव्हती तरी त्यांची ती आकलनशक्ति लवकरच कशी वाढली, हे खंडात स्पष्ट झालेच आहे. “कवी गोविंद” या पुस्तकाच्या आरंभी श्री. दातारशास्त्री यांनी गोविंदकवींच्या दिलेल्या अल्पचरित्रात मित्रमेळ्याची ही जी ओझरती पाहणी त्यांनी केली, ती त्या संस्थेच्या या खंडात दिलेल्या रूपरेखेचा एक स्वतंत्र प्रमाणार्ह पुरावा म्हणून संग्राह्य वाटल्याने त्यातील या खंडातील काळास लागू तेवढा भाग जुळवून खाली देत आहे.

“कवी गोविंदाच्या लहान वयात त्यांच्याभोवतालचा परिवार अशिक्षित, उनाड आणि निकृष्ट वृत्तीचा असे. सतरा-अठरा वर्षांनी नाशिकला आल्यावरही त्यात फारसा पालट झाला नाही. ते पुढे नगरकरांच्या गल्लीत राहावयास आल्यानंतर तेथील ब्राह्मण वस्तीतील सहवासाचा बराचसा इष्ट परिणाम त्यांचावर झाला. तथापि, त्याच्या मंडळीचे पोरकट आणि उच्छृंखल वृत्तीचे प्रकार सुरू असतच. त्यामुळे त्या उनाड मुलांचा अनेक प्रकारचा त्रास, गल्लीतील मोठ्या मंडळींना सहन करावा लागे. त्या वेळची मंडळी म्हणजे श्रीपतराव वैजनाथ गोरे, बळवंतराव काशीकर, अनंतराव वैशंपायन, भाऊराव नातू, रामभाऊ दातार वगैरे होत. दरेकर याही मंडळीत प्रमुख असत. ज्या मंडळीत ते बसतील त्यात ते चमकून दिसावेत, हा त्यांचा स्वभावसिद्ध गुणच असे. कोठेही बाहेर जावयाचे असल्यास (गोविंद हे पंगू असल्यामुळे दुसऱ्या कोणाच्या खांद्यावर बसूनच त्यांची स्वारी निघे. ) तेव्हा गरुडवाहनाची आठवण करून देत. भगवान विष्णूला एकच गरुड असे; पण त्यांना मात्र त्यांच्या स्नेही मंडळीच्या बाहुल्यामुळे प्रत्यही एक नवीन गरुड मिळे आणि हा गरुड होण्याचे काम पुढे होणाऱ्या बॅरिस्टरांनीही (बॅ. सावरकरांनीही) आपखुशीने वेळोवेळी पत्करले होते. . . पुढे १८९८ सनात नाशिकला प्लेगचा धुमाकूळ झाला. तेव्हाच स्टुअर्ट कलेक्टरांच्या राजवटीत लोकांना फार त्रास झाला. गाव सोडून लोक बाहेर गेले. १८९९ सनात पुन्हा गाव भरला. तेव्हा श्री. गणेश दामोदर सावरकर आणि विनायक दामोदर सावरकर शिक्षणाच्या निमित्ताने याच नगरकरांच्या गल्लीत वर्तकांच्या वाड्यात राहावयास आले. विशेषतः विनायक सावरकर हे या गल्लीत राहण्यास आल्यापासून त्यांच्या समवयीन मुलांच्या मनात महत्त्वाकांक्षांचे वारे खेळू लागले, असे म्हणावयास हरकत नाही. त्यावेळी सावरकरांचे वयही त्यांच्या बुद्धीचे कौतुक करण्याइतके लहान होते. तथापि, त्यांच्या त्या आकर्षक चेहऱ्यावर दिसणारी बुद्धिमत्ता व तरतरी व त्यांचा सततोद्योगी स्वभाव याचा परिणाम आसपास राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर झाल्यावाचून

राहिला नाही. त्यांच्याविषयी कोणी मत्सराने तर कोणी कौतुकाने, कोणी महत्त्वाकांक्षेने तर कोणी प्रेमाने पाहू व विचार करू लागल्याने प्रत्येकाच्या बुद्धीला त्यायोगे चालना मिळून जीवंतपणा व निराळे वळण लागल्यावाचून राहिले नाही. व त्याचाही अप्रत्यक्ष परिणाम रा. दरेकर यांच्यावर झाला असलाच पाहिजे... १८९९ च्या मार्च महिन्यात आमच्या वडिलास प्लेग झाला. तेव्हा रा. बाबाराव सावरकरांनी स्नेहभावाने त्यांची अत्यंत शुश्रुषा केली. आमचा दातार घराण्याचा आणि सावरकर घराण्याचा स्नेहसंबंध सारखा दृढ होत गेला. याच वर्षी भाद्रपद महिन्यात सावरकर कुटुंबावर भावी प्लेगची भयंकर आपत्ति गुदरली. त्यात सावरकरबंधूंचे वडील दामोदरपंत सावरकर व लहान बंधू यांस प्लेग झाला. प्लेगच्या अधिकाऱ्यांच्या जुलमामुळे त्यांना स्मशानाजवेळील देवळात राहण्याचा प्रसंग आला. हे वृत्त कळताच रा. रामभाऊ दातार दत्तोपंत भट वगैरे मंडळी तेथे जाऊन आजारी मंडळीसह सावरकरबंधूंस आमच्या घरी आणले. लहान बंधूस हॉस्पिटलमध्ये पोचवून गणपतराव त्याच्या शुश्रुषेसाठी हॉस्पिटलमध्येच राहिले. अन्न पोचविण्याचे काम विनायकराव करीत. तेथे म्हसकर कारकून असत. त्यांचा सावरकरांशी परिचय झाला. म्हसकर हे स्वार्थत्यागी, स्वदेशीविषयी अत्यंत कळकळ बाळगणारे व लोकमान्य टिळकांचे कट्टे अनुयायी होते. याच परिचयाचा परिणाम सुप्रसिद्ध मित्रमेळा संस्थेच्या स्थापनेत झाला. प्रत्यक्ष मित्रमेळ्याची स्थापना नातूबंधुंच्या सुटकेनिमित्त त्यांचे अभिनंदन सार्वजनिक तऱ्हेने झाले नाही, याविषयी मनास वाईट वाटून विजयानंद नाटकगृहात नाटक पाहण्यास गेलेल्या ह्या मंडळीच्या मनात स्वतंत्रपणे कार्य करण्यास अवसर व स्थान असावे, अशा विचाराने झाली. दरेकर यांचा प्रवेश या संस्थेत सुमारे तीन-चार महिन्यांनी झाला असावा. अशा संस्थेत प्रवेश व्हावा ही इच्छा होणे हे रा. दरेकरांवर सावरकरादी मंडळीच्या तत्कालिक वागणुकीच्या परिणामाचे द्योतक होय. आणि प्रत्यक्ष संस्थेत त्यांचा प्रवेश होणे म्हणजे तर दरेकरांचा पुनर्जन्मच होय. कारण दरेकरांच्या अंगी असलेल्या सर्व गुणांच्या विकासास येथूनच आरंभ झाला. आता दरेकर हे स्वदेशाचा विचार करू लागले.

मित्रमेळ्याचा कार्यक्रम प्रथमतः पुढील-प्रमाणे होता. आठवड्यातून दर रविवारी किंवा शनिवारी मंडळीची नियमितपणे रात्री बैठक भरे. त्या बैठकीत आगाऊ ठरलेल्या विषयावर पूर्वनियोजित वक्त्यांचेच भाषण होई. बाकी उपवक्ते म्हणून याच विषयावर बोलत. अशा रीतीने अनेक विषयांची साधकबाधक चर्चा होऊन निरनिराळ्या विषयांचे ज्ञान व तात्विक सत्य सिद्धांत सर्व सभासदास अवगत होत. त्यांची वैयक्तिक योग्यताही वाढण्यास साहाय्य होई. संस्थेचे सर्वसाधारण धोरण असे असे की, मित्रमेळ्यातील सर्वसामान्य सभासद हाही आपले उद्दिष्ट साधण्याकरिता समाजा-मध्ये वावरत असता आपल्या कर्तृत्त्वाने व ज्ञानाने लोकांमध्येच चमकला जावा, यासाठी इतिहास, काव्य, निबंध, तत्वज्ञान, धर्म वगैरे विविध विषयांची ठराविक पुस्तके त्यानी वाचलीच पाहिजेत, असा निर्बंध असे. वादविवादात अचूक सत्य हुडकून काढण्याची कलाही त्यास अवगत असावी यासाठी त्याने वादविवादातही भाग घेतलाच पाहिजे, असा निर्बंध असे. यामुळे प्रत्येक सभासद बहुश्रुत, चपखल, कोटिक्रम करणारा असा होई आणि याच पद्धतीमुळे आधी 'सामाजिक की राजकीय' वगैरे दैशिक चळवळींमध्ये मोठमोठ्या कार्यकर्त्यांसही ज्या प्रश्नांसंबंधी व्यामोह होई व अजूनही होतो, त्या सर्व प्रश्नांचा संशय दूर होउन सभासद स्थिरबुद्धी होत असे. याचा

परिणाम असा झाला की, मित्रमेळ्याचे सभासद स्वदेशाच्या पूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय मध्यवर्ति ठेवून त्याला अनुषंगून असणा-या सर्व प्रकारच्या सर्व विषयांच्या चळवळींमध्ये पूर्णपणे भाग घेण्यास समर्थ होत असत आणि ते कुठेही गोंधळत नसत. कारण ते तितकेच धार्मिक, शैक्षणिक, शारीरिक इत्यादी विषयांचे भक्त म्हणून त्या त्या विषयांच्या भक्तांबरोबर मोठ्या तत्परतेने कार्य करण्यास समर्थ होत व त्या विषयाच्या अवास्तव व स्वातंत्र्य ध्येयविरोधक अशा स्तोमापासून तितकेच चटकन दूर राहत. मित्रमेळ्यांच्या कार्यक्रमांचे दुसरे अंग राष्ट्रवीर व धर्मवीर पुरूषांचे उत्सव साजरे करणे, त्याचप्रमाणे श्रीशिवाजी, श्रीरामदास, श्रीगजानन इत्यादीकांचे उत्सव साजरे केले जात. त्याचप्रमाणे देशहिताच्या चळवळींना व त्या करणा-या इतर पुढा-यांनाही शक्य असेल ते साहाय्य देण्याचा मार्गही त्यांनी पत्कारला होता. या सर्व कार्यक्रमातून जात असता हिंदुस्थानला स्वातंत्र्यावाचून तरणोपाय नाही, बाकीचे सर्व प्रयत्न या दृष्टीने अगदी अलीकडील होते. या कार्यक्रमाचा आणि ध्येयाचा दरेकरांवरही पूर्ण पगडा बसला व ते पूर्ण स्वातंत्र्यासाठी निस्सीम देशभक्त बनले. संस्थेचा आदरणीय असा आणखीही एक असा कार्यक्रम होता की, संस्थेतील प्रत्येक सभासदांचे गुणदोषविवेचन दर तिमाहीस सर्वांनी मुक्तकंठाने करावे, त्याचाही फायदा रा. दरेकर यांनी घेउन आपल्या अंगातील दोष नाहीसे करून अभिवृद्धी करण्यास ते झटत असत. त्यांनी आपले लेखन सुधारले, वाचन सुधारले, निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथ मागवून आणून ते वाचण्याचा त्यांचा सपाटा सुरू झाला. हे वाचन करीत असताना महाराष्ट्रकवींची काव्ये विशेषतः मोरोपंतांची काव्ये काव्याभ्यासाच्या दृष्टीने त्यांनी वाचली व त्यांच्या कवित्त्वास श्रीगणपती-उत्सव, श्रीशिवाजी-उत्सव व इतर सार्वजनिक प्रसंगांमुळे वाव मिळाला. मित्रमेळ्याचा शिवाजी-उत्सव व गणेशोत्सव साजरा करण्याच्या वेळी आपली स्वातंत्र्य ध्येयाची कल्पना लोकांत प्रसृत करण्याचा व देशाभिमान प्रज्वलित करण्याचा प्रघातच पडल्याने शिवोत्सवप्रसंगी ऐतिहासिक उदाहरणे व गणपत्युत्सवप्रसंगी धार्मिक अगर पौराणिक उदाहरणे घेउन आपली ध्येये लोकांपुढे उदात्त स्फूर्तिमय पद्धतीने मांडण्याचे काम त्यांनी केले. त्यावेळी रा. सावरकरांनी सिंहगड (तानाजी) आणि बाजीप्रभू यांचे पोवाडे केले. तर रा. दरेकरांनी अफजुलखानाच्या वधाचा पोवाडा व शिवाजी व मावळे यांचा संवाद शिवजन्मोत्सवप्रसंगाने केला. रा. सावरकरांनी श्रीशिवाजी महाराजांची सुप्रसिद्ध आरती रचली. तर रा. दरेकर यांनी श्रीसमर्थांची आरती केली. गणपती उत्सवातील मेळ्यांची पदे मात्र रा. दरेकर यांचीच होती. या सुमारास रा. अनंत वामन बर्वे यांच्या पदांचेही मेळ्यांमधून नाशिक येथे गायन होत असे व इतर बरेच मेळे गावात होत असत. यामुळे रा. दरेकरांनीही चढाओढीच्या महत्त्वाकांक्षेने स्फुरण येउन ते आपली पदे, काव्य या दृष्टीनेही सरस कशी होतील इकडे लक्ष पुरवीत असत. लवकरच त्यांची पदे नावाजली गेली व ती पदे गाणारा मेळा श्रेष्ठ प्रतीचा ठरला.